म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र.
REFBK-0018427

५८६९२
संघर्ष
३१।३।५२
निबंध

१९८२८

[illegible] ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थलांतर [illegible]
अनुक्रम ५८६९२ वि: निबंध
क्रमांक २९८० नोंद दि: ३१-३-५२

# महानुभाव संत

लेखक

डॉ. वसंत स. जोशी

प्रस्तावना

डॉ. वि. भि. कोलते

कुलगुरु, नागपूर विद्यापीठ, नागपूर.

पुरस्कार

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

REFBK-0018427

मॉडर्न बुकडेपो प्रकाशन

किंमत रु. ७–५०

डॉ. वसंत स. जोशी,
एम्. ए., पीएच्. डी.
हे सध्या वाई येथील मानव्य व वाणिज्य महाविद्यालयात मराठी विभागाचे प्रमुख आहेत. त्यांचा 'मुक्तेश्वरकृत भावार्थ रामायण : उत्तरकांड' हा ग्रंथ १९६२ साली प्रसिद्ध झाला. ते शिवाजी विद्यापीठाचे मराठी विषयातील पहिले पीएच्. डी. असून 'श्री एकनाथकृत भावार्थ रामायणाचा विवेचक अभ्यास' हा त्याच्या प्रबंधाचा विषय होता. १९६८ साली त्याना ती पदवी मिळाली. 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका', 'नवभारत', 'प्रसाद', 'महाराष्ट्र टाईम्स', 'लोकसत्ता' इत्यादि नियतकालिकातून त्याचे विविध विषयावर लेख प्रसिद्ध झाले आहेत.
[ जन्म तारीख ९–१०–१९३० ]

आवृत्ति पहिली
१० फेब्रुवारी १९७२
सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन

प्रकाशक
मुकुंद नारायण भिडे
संचालक, मॉडर्न बुकडेपो,
बाजीराव रस्ता, पुणे ३०.

मुद्रक
शशिकान्त महादेव देच
सुलभ मुद्रणालय,
२९१ शनिवार पेठ, पुणे ३०.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ८८६०२ दि:
क्रमांक २७८० नों. दि:

माझे ज्येष्ठ बंधू

**कै. ती. स्व. दादा**

( नारायण सखाराम जोशी )

यांच्या पवित्र स्मृतीस—

आणि

**ती. स्व. अप्पा**

( श्री. रघुनाथ सखाराम जोशी )

याना

सादर समर्पण

# अनुक्रमणिका

प्रस्तावना [ ७ ]

पुरस्कार [ ११ ]

निवेदन [ १३ ]

१ पूर्वपीठिका पृ. १–२२

महानुभाव पथ २, प्राचीन मराठीतील वाङ्मयप्रकार ४, महानुभाव चरित्र वाङ्मय: प्रेरणा व स्वरूप ६, म्हाइंभटाचे लेखनकर्तृत्व १२, लीळाचरित्र–रचना : काही विचार १७, महानुभाव संत २०.

२ . श्री गोविंद प्रभू २३–३९

हा इस्वर अवतारु होये २३, राऊळ माए : राऊळ बापू : राउळ इस्वरु : २५, ते थोर कणवेचे २६, राउळ सांगती ते अन्यथा नव्हे : २८, इस्वरी काइ अवेवस्था असे ? ३०, ऐशी प्रसादाची नावे : ३२, गोसावी कळेसि रूप केले ३५, गोविंद प्रभू आणि चक्रधर ३६, गोविंद प्रभूंचे वृद्धत्व व देहान्त ३६, 'माझे माहेर गेले:' ३७.

३ : 'सर्वज्ञ' चक्रधर ४०–६४

चक्रधराच्या जीवनाची रूपरेषा ४०, चक्रधराचे रूपसौंदर्य ४२, क्रीडा ४५, विनोदी वृत्ती : ४६, एथ सरण आलेल्या काइ मरण असे ४८, नामकरण ४९, गोविंद प्रभु आणि श्रीचक्रधर ५०, गुरु-शिष्य संबंध ५२, उपदेश ५५, 'अवतारी चक्रधर' ५६, भविष्याची चाहूल ५८, चक्रधर ' चांगदेव राउळ : ५९, लोकप्रवाद ५९, अवयव छेद व उत्तरापथे गमन ६१, प्रधानपुत्राचा पंथप्रवर्तकः ६२, चक्रधराची परिणत अवस्था : ६२, सर्वस्पर्शी व्यक्तित्व ६४.

४ : वेधवंती नागदेव ६५–७९

वेधवती नागदेव : ६६, चक्रधर व नागदेव ' ६७, चक्रधर आणि नागदेव : ६८, 'पायवणि घ्यायचे तर देवाचे घ्या' : ७२, भक्ताच्या गुणाची पारख ' ७२,

दृष्टीच्चिये आळविं राखा ' : ७४, मार्गरक्षणाची काळजी · ८५, व्यवहारी नागदेव : ७६, मराठी प्रेम व ग्रंथसंपादन ७७, ' भटोबासाचें बोलणें ईश्वरी वाणी की ७८.

५ आद्य मराठी कवयित्री : महदाइसा ८०–९४

धवळे निर्मिती ८०, महदाइसेचे व्यक्तिमत्व ८१, चक्रधर आणि महदाइसा ८२, महदाइसेची काशीयात्रा ८३, अमोल वस्त्र ८३, म्हातारी एथ काही पूसतचि असे : ८४, पंथीयांची नाते : नागदेव व महदाइसा ८६, महदाइसा व इतर भक्त ८९, रुपैची सिद्धवाणी : ९०, गोविंदप्रभूंच्या सान्निध्यात— ९१, लोककाव्यसौंदर्य ९४.

६ : आद्य मराठी चरित्रकार : महेंद्रभट ९५–१०६

चरित्रे— जुनी व नवी ९५, चरित्रकार ९६, पूर्वजीवन ९६, चक्रधर आणि म्हाइंभट : ९७, गोविंद प्रभूंचे शिष्यत्व ९९, वैयक्तिक जीवन : १०२, स्मृति-संकलनाचा निदिध्यास १०३, इतर ग्रंथरचना १०४, अखेर · १०५.

७ कवीश्वराचार्य भास्कर १०७–११५

व्यक्तित्व १०७, तुम्ही सकळे कलाव्युत्पन्न १०७, पुण वाचा रसाळा : गर्वू साडवीन कोकिळा १०८, तुम्ही सकळ कलाव्युत्पन्न—बहुताचे धर्मपालिते की : १११, ' देह योर तुटले . ११३.

८ : महानुभाव वाङ्मयपरंपरा ११६–१२४

विविध वाङ्मयप्रकार : ११६, साती ग्रंथ : ११६, केशीराज व आनेराज ११७, दामोदर पंडित ११८, नरेंद्र - ११८, स्वयवर काव्ये : ११९, सांकेतिक लिपी : १२०, पंथ प्रसार : १२०, भाष्य, टीका, शास्त्र ग्रंथ—निर्मिती : १२१, समारोप—१२३.

परिशिष्ट १ १२४

परिशिष्ट २ तीन चक्रधर १२५

आधारभूत व संदर्भ ग्रंथ १२९–१३०

७८६१२ — निबंध
२९६० ३१-३-८२

# प्रस्तावना

प्रा. डॉ. वसंत स. जोशी यांच्या 'महानुभाव संत' या पुस्तकाला प्रस्तावना लिहिण्यास मला फार आनंद वाटतो. महानुभाव पथ आणि त्याचे वाङ्मय यासंबंधी अभ्यासकात अलीकडे अपूर्व आस्था आणि उत्साह निर्माण झालेला दिसून येतो. जुन्या पिढीतील संशोधकांनी केलेल्या कार्याचे हे फळ होय. या पथाकडे पाहण्याचा वास्तव दृष्टिकोन या नवीन अभ्यासकामध्ये दिसून येतो, ही विशेष नमूद करण्यासारखी बाब आहे. डॉ. अ. ना. देशपांडे यानी आपल्या 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास' या ग्रंथात यासबंधी केलेले विवेचन या गोष्टीची उत्तम साक्ष देईल. डॉ. शं. गो. तुळपुळे, प्रा. व. दि. कुलकर्णी, डॉ. यू. म. पठाण, डॉ. सुरेश डोळके, श्री. रा. चिं. ढेरे, श्री. ना. ब. जोशी इत्यादींच्या लेखनावरूनदेखील ही गोष्ट प्रत्ययाला येईल. श्री. रा. चिं. ढेरे यानी तर आपल्या सशोधनाने या पंथाच्या अभ्यासाला एक नवीन दृष्टी दिली आहे, असे मला वाटते. प्राचीन महानुभावीय ग्रथाचे प्रकाशनही अधिक नेटाने आणि चिकित्सापूर्वक होत आहे. त्यात महानुभाव पंथाचे अनुयायी विशेष आस्थेने भाग घेत आहेत. हैदराबाद येथून श्री. कृष्णदास महानुभाव यानी आपल्या 'आध्यात्मिक साहित्य प्रकाशन' संस्थेतून आतापर्यंत पंचवीस निरनिराळी पुस्तके प्रसिद्ध केल्याचे आढळते. अमरावती येथील श्री. पुरुषोत्तम च. नागपुरे यानीही या क्षेत्रात प्रवेश केला असून, ज्ञान–प्रबोध' या ग्रंथाचे संपादन पुन्हा अभ्यासकांसमोर ठेवले आहे. महानुभावीयेतर विद्वानांत हैदराबाद येथील डॉ. श्रीधर रंगनाथ कुलकर्णी, व प्रा. व. दा. कुलकर्णी, औरंगाबादचे डॉ. यू. म. पठाण इत्यादींनी अप्रकाशित काव्याचे चिकित्सापूर्वक संपादन करून महानुभावीय ग्रंथ-भांडारातील नवीन रत्ने उजेडात आणली आहेत. या अभ्यासकात आता प्रा. डॉ. वसंतराव जोशी यांची नवीन भर पडत आहे, ही गोष्ट मला अत्यंत संतोषजनक आणि उत्साहवर्धक वाटते.

प्रा. जोशी यांचा हा ग्रथ संशोधनात्मक आहे असे म्हणता येणार नाही. जुन्या अप्रकाशित काव्याचे ते सपादन नव्हे, किंवा एखाद्या नवीन दृष्टिकोनाचे दिग्दर्शन त्यात आहे, असेही नाही. महानुभाव पंथातील काही संताची चरित्रे उपलब्ध साधनसामग्रीच्या आधारे त्यानी यात सादर केलेली आहेत. 'महानुभाव संत' ह्या ग्रंथनामावरून ही गोष्ट दिसून येईल. एक विचार मनात येतो, तो येथे मांडला पाहिजे. श्री गोविंद प्रभू आणि श्री चक्रधर स्वामी ह्यांना 'संत' म्हणून संबोधणे हे महानुभावीयाच्या धर्ममतांना धरून नाही. या दोन्ही व्यक्ती परब्रह्म परमेश्वराचे अवतार होत, अशी त्याची श्रद्धा आहे; किंबहुना दत्तात्रेय, श्रीकृष्ण,

दृष्टीचिये आळविं राखा ' : ७४, मार्गरक्षणाची काळजी : ८५, व्यवहारी नागदेव : ७६, मराठी प्रेम व ग्रंथसंपादन ७७, ' भटोबासाचें बोलणें ईश्वरी वाणी की . ७८.

५ : आद्य मराठी कवयित्री : महदाइसा ८०–९४

धवळे . निर्मिती ८०, महदाइसेचे व्यक्तिमत्व ८१, चक्रधर आणि महदाइसा ८२, महदाइसेची काशीयात्रा : ८३, अमोल वस्त्र : ८३, म्हातारी एथ काही पूसतचि असे ८४, पंथीयांशी नाते : नागदेव व महदाइसा ८६, महदाइसा व इतर भक्त ८९, रूपैची सिद्धवाणी . ९०, गोविंदप्रभूंच्या सान्निध्यात—९१, लोककाव्यसौंदर्य ९४.

६ : आद्य मराठी चरित्रकार : महेंद्रभट ९५–१०६

चरित्रे– जुनी व नवी ९५, चरित्रकार ९६, पूर्वजीवन ९६, चक्रधर आणि म्हाइंभट : ९७, गोविंद प्रभूंचे शिष्यत्व ९९, वैयक्तिक जीवन : १०२, स्मृति-संकलनाचा निदिध्यास १०३, इतर ग्रंथरचना १०४, अखेर : १०५.

७ कवीश्वराचार्य भास्कर १०७–११५

व्यक्तित्व १०७, तुम्ही सकळे कलाव्युत्पन्न १०७, पुण वाचा रसाळा : गर्वू सांडवीन कोकिळा १०८, तुम्ही सकळ कलाव्युत्पन्न—बहुतांचे धर्मपालिते की : १११, ' देह थोर तुटले ११३.

८ . महानुभाव वाङ्मयपरंपरा ११६–१२४

विविध वाङ्मयप्रकार : ११६, साती ग्रंथ : ११६, केशीराज व आनेराज ११७, दामोदर पंडित ११८, नरेंद्र-११८, स्वयवर काव्ये : ११९, सांकेतिक लिपी : १२०, पंथ प्रसार : १२०, भाष्य, टीका, शास्त्र ग्रंथ—निर्मिती : १२१, समारोप–१२३.

परिशिष्ट १ १२४

परिशिष्ट २ तीन चक्रधर १२५

आधारभूत व संदर्भ ग्रंथ १२९–१३०

६८९९२ — निबंध
२९८० ३१-३-८२

# प्रस्तावना

प्रा. डॉ. वसंत स. जोशी यांच्या ' महानुभाव संत ' या पुस्तकाला प्रस्तावना लिहिण्यास मला फार आनंद वाटतो. महानुभाव पंथ आणि त्याचे वाङ्मय यासंबंधी अभ्यासकांत अलीकडे अपूर्व आस्था आणि उत्साह निर्माण झालेला दिसून येतो. जुन्या पिढीतील संशोधकानी केलेल्या कार्याचे हे फळ होय. या पंथाकडे पाहण्याचा वास्तव दृष्टिकोन या नवीन अभ्यासकामध्यें दिसून येतो, ही विशेष नमूद करण्या-सारखी बाब आहे. डॉ. अ. ना. देशपांडे यानी आपल्या ' प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास ' या ग्रंथात यासबंधी केलेले विवेचन या गोष्टीची उत्तम साक्ष देईल. डॉ. शं. गो. तुळपुळे, प्रा. व. दि. कुलकर्णी, डॉ. यू. म. पठाण, डॉ. सुरेश डोळके, श्री. रा. चिं. ढेरे, श्री. ना. ब. जोशी इत्यादींच्या लेखनावरूनदेखील ही गोष्ट प्रत्ययाला येईल. श्री. रा. चिं. ढेरे यानी तर आपल्या संशोधनाने या पंथाच्या अभ्यासाला एक नवीन दृष्टी दिली आहे, असे मला वाटते. प्राचीन महानुभावीय ग्रंथांचे प्रकाशनही अधिक नेटाने आणि चिकित्सापूर्वक होत आहे. त्यात महानुभाव पंथाचे अनुयायी विशेष आस्थेने भाग घेत आहेत. हैदराबाद येथून श्री. कृष्णदास महानुभाव यानी आपल्या ' आध्यात्मिक साहित्य प्रकाशन ' संस्थेतून आतापर्यंत पंचवीस निरनिराळी पुस्तके प्रसिद्ध केल्याचे आढळते. अमरावती येथील श्री. पुरुषोत्तम च. नागपुरे यानीही या क्षेत्रात प्रवेश केला असून, ' ज्ञान-प्रबोध ' या ग्रंथाचे संपादन पुन्हा अभ्यासकांसमोर ठेवले आहे. महानुभावीयेतर विद्वानात हैदराबाद येथील डॉ. श्रीधर रंगनाथ कुलकर्णी, व प्रा. व. दा. कुलकर्णी, औरंगाबादचे डॉ. यू. म. पठाण इत्यादींनी अप्रकाशित काव्यांचे चिकित्सापूर्वक संपादन करून महानु-भावीय ग्रंथ-भांडारातील नवीन रत्ने उजेडात आणली आहेत. या अभ्यासकांत आता प्रा. डॉ. वसंतराव जोशी यांची नवीन भर पडत आहे, ही गोष्ट मला अत्यंत संतोषजनक आणि उत्साहवर्धक वाटते.

प्रा. जोशी यांचा हा ग्रंथ संशोधनात्मक आहे असे म्हणता येणार नाही. जुन्या अप्रकाशित काव्यांचे ते संपादन नव्हे, किंवा एखाद्या नवीन दृष्टिकोनाचे दिग्दर्शन त्यात आहे, असेही नाही. महानुभाव पंथातील काही संतांची चरित्रे उपलब्ध साधनसामग्रीच्या आधारे त्यांनी यात सादर केलेली आहेत. ' महानुभाव संत ' ह्या ग्रंथनामावरून ही गोष्ट दिसून येईल. एक विचार मनात येतो, तो येथे मांडला पाहिजे. श्री गोविंद प्रभू आणि श्री चक्रधर स्वामी ह्यांना ' संत ' म्हणून संबोधणे हे महानुभावीयांच्या धर्ममताना धरून नाही. या दोन्ही व्यक्ती परब्रह्म परमेश्वराचे अवतार होत, अशी त्यांची श्रद्धा आहे; किंबहुना दत्तात्रेय, श्रीकृष्ण,

चक्रपाणी, गोविंदप्रभू आणि चक्रधर हे महानुभावाचे ' पचकृष्ण ' अवतारी पुरुष होत. सत म्हणून संबोधण्याने त्याची जीवकोटीत गणना केल्यासारखे होते. "जीवनातील ' सत् ' चा शोध घेणारे व आपल्या जीवनक्रमाने लोककल्याण साधणारे हे सत आहेत," असे प्रा. जोशी यानी म्हटले आहे हे खरे; पण महानुभाव महत त्याना सत्याचा ' शोध घेणारे ' म्हणून मानत नाहीत, तर त्याच्या परमेश्वरत्वामुळे त्याच्या मुखातून या सत्चाच आविर्भाव होत असतो. तथापि महानुभावेतरानी या व्यक्तींच्या जीवनाचा ' संत म्हणून अभ्यास करणे चुकीचे आहे असे मला वाटत नाही. आधुनिक दृष्टीला ते धरून आहे. महानुभावीयाचा या बाबतीतील दृष्टिकोन कोणता आहे, त्याचा केवळ येथे मी निर्देश केलेला आहे.

श्री गोविंदप्रभू सर्वज्ञ श्री चक्रधर, वेधवंती नागदेव, आद्य मराठी कवयित्री महदाइसा, आद्य मराठी चरित्रकार महेंद्र भट आणि कवीश्वराचार्य भास्कर या सहा व्यक्तींच्या जीवनाचे आणि कार्यांचे दर्शन या पुस्तकात प्रा. जोशी यानी आपल्या सुंदर भाषाशैलीने घडविले आहे. या सताच्या व्यक्तिदर्शनाला हात घालण्यापूर्वी त्यानी ' पूर्वपीठिका ' म्हणून त्याच्या कार्याची पार्श्वभूमी सादर केलेली आहे. या पूर्वपीठिकेत महानुभाव पंथ व त्याचे वाङ्मय आणि त्यातून निर्माण होणारे काही प्रश्न याची चर्चा केलेली आहे. पूर्वपीठिकेतील हे समालोचन अभ्यासकांना उपयुक्त ठरेल. या पूर्वपीठिकेतील काही विधाने विचार करण्यासारखी आहेत. अनेक अभ्यासक महानुभाव पंथाची तुलना वारकरी पंथाशी करतात आणि प्रा. जोशी यानी लिहिल्याप्रमाणे, " या पंथास वारकरी सप्रदायाप्रमाणे व्यापक आणि विराट स्वरूप प्राप्त झालेले दिसत नाही, " अशी विधाने करतात. कित्येक अभ्यासक महानुभाव पथाचे सध्याचे स्वरूप अत्यंत स्वल्प आहे अशी कल्पना करून, त्याला ' पराभूत पंथ ' म्हणून संबोधतात. काहींना तर असे वाटते की, महानुभाव पंथ आज जवळजवळ नामशेष झाल्यासारखा आहे. अशी किंवा यासारखी विधाने हे अभ्यासक कोणत्या आधारावर करतात, हे कळत नाही. रिद्धपूर, सुकळी डाकराम, फलटण, डोमेग्राम इत्यादी महानुभावीयांच्या धर्मक्षेत्रांच्या ठिकाणी दरवर्षी भरणाऱ्या यात्राना त्यांनी एखादे वेळी जावे आणि तिथे जमलेल्या विशाल जनसमुदायाचे अवलोकन करावे, म्हणजे महानुभाव पथ पराभूत झाला आहे किंवा नाही, तो नामशेष झाल्यासारखा वाटतो काय, त्याचे स्वरूप विराट आहे किंवा कसे, इत्यादी प्रश्नाची वस्तुस्थितीच्या आधारावर त्याना उत्तरे मिळू शकतील. विदर्भ ही तर या पंथाची जन्मभूमीच होय, पण विदर्भाबाहेर मराठवाडा, उत्तर व दक्षिण महाराष्ट्र व खानदेश यातील अनेक ठिकाणी महानुभावाची धर्मक्षेत्रे आजही विद्यमान आहेत. तेथे श्री चक्रधर व दत्तात्रेय याच्याविषयीच्या भक्तिभावनेने भान हरपून गेलेले महानुभाव आपले धर्मपालन

अतिशय निष्ठेने आणि उत्कटतेने करीत असतात. नवीन मध्य प्रदेश आणि पंजाब येथून हजारो ' जयकृष्णी ' अर्थात महानुभाव पथीय लोक महाराष्ट्रात दरवर्षी यात्रेसाठी येत असतात; आणि अन्नदान करून पवित्र होतात. हे दृश्य आमच्या नवीन अभ्यासकांनी एक वेळ जरूर पाहावें असे मला वाटते.

या पूर्वपीठिकेतच महानुभाव चरित्रवाङ्मयाचा परामर्श प्रा. जोशी यानी घेतलेला आहे, तो समर्पक आहे. याच निमित्ताने, ' लीळा—चरित्रा 'चे लेखन-कर्तृत्व कुणाचे, या प्रश्नाची चर्चा त्यांनी विस्ताराने केलेली आहे. हे लेखनकर्तृत्व माहीम भटाचे होय असे अनेक अभ्यासक मानतात. ते कितपत बरोबर आहे, या प्रश्नाचा प्रा. जोशी यानी उत्तम परामर्श घेतलेला आहे. यासंबंधी निरनिराळ्या अभ्यासकाच्या मताचे दिग्दर्शन करून, लीळाचरित्राच्या बाबतीत माहीम भटाचे कर्तृत्व सकलन किंवा संपादन एवढ्यापुरतेच मर्यादित होय, असा आपला निष्कर्ष त्यानी काढला आहे. तो अभ्यासकाना मान्य व्हावा असे वाटते.

पूर्वपीठिकेनंतर कालानुक्रमे उपरोक्त सहा महानुभाव संतांची व्यक्तिचित्रे प्रा. जोशी यांनी सादर केलेली आहेत. त्यात नवीन सशोधन नसले, तरी उपलब्ध माहितीच्या आधारे त्यानी ती चित्तवेधक पद्धतीने अभ्यासकासमोर माडली आहेत, यात शंका नाही. या प्रत्येक व्यक्तीच्या संपूर्ण जीवनचारित्राचा विचार करण्याची या ठिकाणी आवश्यकता नव्हती आणि नाही. त्यांच्या जीवनातील आणि कार्यातील संतत्व कोणते, ते दाखवून देण्याचा प्रा. जोशी यानी विशेषेकरून प्रयत्न केला आहे. श्री गोविंदप्रभूंच्या बहुविध व्यक्तित्वातील थोर कणवेचा धागा प्रा. जोशी यांनी नेमका पकडला आहे. श्री चक्रधराचा जीवन-वृत्तान्त देताना एलिचपूर येथील राम दरणा या संस्थानिकाच्या, उमादेवी नावाच्या मुलीशी चक्रधराचा विवाह झाल्याची माहिती प्रा. जोशी यानी दिली आहे, ती बहुधा ' महाराष्ट्र सारस्वत ' या ग्रंथातील वर्णनाच्या आधारे. या माहितीचा अलीकडील संशोधनाच्या सदर्भात प्रा. जोशी यानी पुनर्विचार केला असता तर बरे झाले असते. श्री चक्रधराच्या परिभ्रमणात आंध्र प्रदेशातील त्याच्या तपस्येचा वृत्तान्त, श्री. रा. चिं. ढेरे याच्या नवीन संशोधनाच्या प्रकाशात नवीन पद्धतीने देण्याची आवश्यकता होती. नवीन लेखकानी, उपलब्ध होणारी नवीन माहिती साक्षेपाने लक्षात घेऊन, तिच्या आधारे आपल्या विचाराच्या बैठकीचे समायोजन करण्याची दक्षता सतत ठेवणे आवश्यक आहे. वेधवती नागदेवाचे येथील व्यक्तिचित्र रसाळ उतरलेले आहे. विशेषत ' एक माणूस ' म्हणून नागदेवाचार्यांच्या जीवनाचे प्रा. जोशी यानी केलेले दिग्दर्शन अभ्यासकाना मनोवेधक वाटेल. महदाइसा आणि महेंद्र भट याना महानुभाव वाङ्मयात महत्त्वाचे स्थान आहे हे खरे, परंतु ' संत ' या दृष्टीने या व्यक्तींचे कर्तृत्व फारसे उल्लेखनीय आहे असे मानीत नाहीत. भक्त या दृष्टीने त्याच्या जीवनाचा विचार अधिक समर्पक ठरेल. कवीश्वराचार्य भास्कर

यांच्याही बाबतीत हाच अभिप्राय समर्पक ठरेल. शेवटच्या प्रकरणात महानुभाव वाङ्मयाचे धावते समालोचन करून प्रा. जोशी यांनी हा ग्रंथ संपविला आहे.

या ग्रंथाच्या लेखनात प्रा. जोशी यांनी दाखविलेली अभ्यासू वृत्ती मला अभिनंदनीय वाटते. महानुभाव पंथ आणि त्यातील थोर पुरुष यांच्याविषयी त्यांच्या अंत:करणात आदर आहे. महानुभावांच्या जीवन कर्तृत्वाकडे सहानुभूति-पूर्वक मोकळ्या मनाने पाहण्याची दृष्टी त्यांच्या ठिकाणी आहे. महानुभाव वाङ्मयाचे परिशीलन त्यांनी चांगले केलेले आहे. अंतःकरणातील सद्भावाला त्यांच्या रसिक लेखणीची जोड मिळाली असल्यामुळे हा ग्रंथ वाचनीय झाला आहे. प्रा. जोशी यांचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो आणि मराठी वाचकांना हा ग्रंथ आवडेल अशी अपेक्षा व्यक्त करतो.

नागपूर,
२१ जानेवारी, १९७२.

वि. भि. कोलते

# पुरस्कार

माझे मित्र डॉ. वसंतराव जोशी यानी श्री गोविंद प्रभू व श्री चक्रधर-स्वामी हे दोन ईश्वरावतार आणि नागदेवाचार्य, महेंद्र भट, महदाइसा व कवीश्वराचार्य भास्कर हे चार संत यांची चरित्रे येथे वर्णिली आहेत. या चरित्रामध्ये संताची जीवनपद्धती साकार झाली आहे. मूळच्या महानुभावी साहित्यातून निवडलेली ही नररत्ने होत. साहित्यशैलीच्या सुरेख कोंदणांसह या नररत्नाना आपल्या आधुनिक मराठी विदग्ध शैलीच्या पीठावर उठावदार रीतीने लेखकाने उभे केले आहे, हे या ग्रंथाचे उत्कृष्ट वैशिष्ट्य आहे. या चरित्राच्या मुखानी मराठी वाचक महानुभावी साहित्यसागरात प्रवेश करून त्याचे अवगाहन करण्यास उत्सुक व्हावा, अशी आशा या ग्रंथाच्या वाचनाने बळावते.

वेदपूर्वकालापासून चालत आलेल्या सिद्धसंस्कृतीची महानुभाव पंथ ही एक शाखा आहे. या सिद्धसंस्कृतीवर वैदिक संस्कृतीचेही संस्कार झाले आहेत, परंतु वेदप्रामाण्य किंवा वेदमूलता नाकारण्याची प्रवृत्ती या सिद्धसंस्कृतीत पुष्कळ वेळा दिसून येते कित्येक वेळा वेदप्रामाण्य स्वीकारावयाचे व नाकारायचे अशीही प्रवृत्ती दिसते उदाहरणार्थ, भगवद्गीता. ‘ त्रैगुण्यविषया वेदा निस्त्रैगुण्यो भवार्जुन । ’ हा नकार; ‘ सर्वे वेदा यत्पदमामनन्ति । ’ हा स्वीकार. शैव व वैष्णव पाचरात्र पंथ हे मूळचे अवैदिक होत. त्याचा समावेश वैदिक परंपरेत उशिरा झाला, ही गोष्ट जवळजवळ सर्वमान्य आहे. जवळजवळ म्हणण्याचे कारण म्हणजे अजून काही पंडितांना ते मान्य होत नाही. या ग्रंथातील परिशिष्टात एका ब्राह्मणाच्या मातंगस्त्रीच्या पुत्रांनी स्थापलेला महानुभाव पंथ होय, अशी एक आख्यायिका उद्धृत केली आहे. अशी काल्पनिक आख्यायिका, महानुभाव पंथ अवैदिक परंपरेचा आहे याची सूचक आहे. ब्राह्मणपिता व मातंगमाता याच्या संगमाची ही आख्यायिका वैदिक व अवैदिक संस्कृतीच्या सुंदर संगमाची सूचक ठरते. महानुभाव पंथ हा कृष्णभक्तिपंथ होय. वैदिक इंद्राचा कृष्ण हा विरोधी होता, असे अनुमान गोवर्धनपूजेच्या कथेवरून धर्मेतिहासज्ञ काढतात.

या ग्रंथातील चरित्रवर्णनाच्या ओघात मूळची वचने उद्धृत केली आहेत. ज्या वाचकाना प्राचीन महानुभावी भाषेचा चागला परिचय नाही, त्याना अर्थ-ग्रहण करण्यात त्यामुळे जागोजागी व्यत्यय येईल, असे वाटते. या ग्रंथाच्या शेवटी सध्या प्रचलित नसलेल्या शब्दाचा कोश अर्थासह जोडल्यास सामान्य वाचकाची चांगली सोय होईल. महानुभावी मराठी साहित्याच्या परिशीलनास या ग्रंथाचा साधन म्हणून चागला उपयोग होईल, यात शंका नाही.

वाई,
१ फेब्रु. १९७२

लक्ष्मणशास्त्री जोशी

# निवेदन

[illegible] असताना मराठी विभागाच्या चर्चासत्रात वाचण्यासाठी महानुभाव पंथाचे आद्याचार्य नागदेव यांची व्यक्तिरेखा मी तयार केली होती. त्या अनुषंगाने अन्य प्रमुख महानुभावांच्या जीवनचित्राचा मी शोध घेऊ लागलो. कर्नाटक कॉलेजच्या समृद्ध ग्रंथालयातील महानुभाव साहित्याचा अभ्यास त्या निमित्ताने झाला. 'लीळाचरित्र', 'गोविंद प्रभु चरित्र', 'स्मृति-स्थळ' या ग्रंथाचा अभ्यास करणाऱ्या अनेकांनी, 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका,' 'नव-भारत,' इ. नियतकालिकांतून वेळोवेळी प्रसिद्ध झालेले माझे लेख अत्यंत उपयुक्त असल्याचे प्रत्यक्षात व पत्रद्वारे सांगितले; त्यांचे पुस्तक तयार करावे असेही सुचविले. या प्रमुख महानुभाव संतांच्या जीवनकार्याच्या परिचयाबरोबरच महानु-भाव चरित्राचे स्वरूप व त्यांचे लेखनकर्तृत्व यांचा परामर्श घ्यावा व महानुभाव साहित्याची परंपराही स्पष्ट करावी या हेतूने तशी दोन नवी प्रकरणे तयार केली. या सर्वांचा अंतर्भाव 'महानुभाव संत' या प्रस्तुत पुस्तकात करण्यात आला आहे. चक्रधरविषयक अध्यायात मतमतांतरांची माहितीही परिशिष्टात दिली आहे.

'महानुभाव संत' हे या पुस्तकास दिलेले नाव कदाचित अतिव्याप्त वाटण्याचा संभव आहे. तसेच त्यांत काही कवी वा लेखकही असल्याचा कोणी आक्षेप घेऊ शकेल, परंतु 'वारकरी संत' मंडळींत जसा सिद्ध पुरुषाप्रमाणे साधकाचाही अंतर्भाव केला जातो, तसाच तो या ठिकाणी करण्यात आला आहे. ज्ञानेश्वर–नामदेवादि संत, कवी म्हणूनही श्रेष्ठ असले, तरी त्यांचे संतत्व कोणी नाकारीत नाही. किंबहुना ते आधी 'संत' होते आणि नंतर 'कवी' होते. 'महानुभाव संत'ही आत्मोद्धाराकरिता सर्वसंगपरित्याग करणारे मुमुक्षू होते. चक्रधर, गोविंद प्रभू हे तर अवतारी पुरुषच मानले जातात. महेंद्रभटादि त्यांच्या अनुयायांनी केलेली ग्रंथरचना ईश्वरोपासनेचे एक अंग या स्वरूपात सिद्ध झालेली आहे. आपणाजवळ असणारे जे जे उत्कृष्ट ते ते परमेश्वरार्पण करण्याची थोर भक्तांची भक्तिभावनाच या वाङ्मयांत सर्वभाग आहे. पंथीय तत्त्वज्ञान त्यांच्या आख्यान–काव्यात भरून राहिले आहे, तर चरित्र ग्रंथांतून आचार–विचार प्रकट झाले आहेत. या सर्वांचे संतत्व आणि ग्रंथकर्तृत्व एकाच ध्येयाने प्रेरित झाले होते. त्यांच्या व्यक्तित्वाची ही दोन अंगे वेगळी करता येण्यासारखी नाहीत.

महानुभाव साहित्याचे थोर संशोधक व अधिकारी प्रवक्ते, नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. वि. भि. कोलते यांच्या एका प्रत्यक्ष भेटीत महानुभाव संत-चरित्रावरील या लेखाविषयी चर्चा झाली होती. या पुस्तकास डॉ. कोलते यांची प्रस्तावना लाभावी ही माझी विनंती त्यांनी मानली व अनेक व्यापातून सवड काढून प्रस्तावना लिहिली, याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. महानुभाव साहित्यावरील माझे हे लेखन, महानुभाव पंथ व साहित्य यावरील डॉ. कोलते यांच्यासारख्या अधिकारी व्यक्तीने 'दृष्टिपूत' केले याची मला धन्यता वाटते.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळाचे अध्यक्ष तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी माझ्या विनंतीवरून आपला आशीर्वादपूर्ण पुरस्कार कृपापूर्वक लिहिला. 'मुक्तेश्वरकृत भावार्थ रामायण: उत्तरकांड' या माझ्या पहिल्या पुस्तकाचे प्रकाशनही तर्कतीर्थांच्याच शुभहस्ते झाले होते. माझ्या याही पुस्तकासाठी तर्कतीर्थ जोशी यांनी पुरस्कार लिहिला, याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

'महानुभाव संत' विषयक वेळोवेळी प्रसिद्ध झालेले माझे लेखन ग्रंथरूपाने प्रसिद्ध व्हावे, म्हणून प्रारंभापासून प्रयत्न करणारे माझे स्नेही, पुण्याच्या एस्. एन. डी. टी कॉलेजचे मराठी विभागप्रमुख, डॉ. हेमन्त विष्णु इनामदार यांचे श्रेय मोठे आहे. ज्या ज्या वेळी काही अडचणी निर्माण झाल्या, त्या त्या वेळी, डॉ. इनामदार बंधुत्वाने माझ्या पाठीशी उभे राहिले. त्यांच्या अकृत्रिम स्नेहामुळेच हे पुस्तक आज साकार होत आहे. डॉ. भाऊराव इनामदार यांचे ऋण शब्दातीत आहे.

प्रकाशनाच्या व मुद्रित-शोधनाच्या कामात श्री. रा. प्र. कानिटकर यांनी अगत्यपूर्ण सहकार्य दिल्यामुळे माझी जबाबदारी खूपच हलकी झाली. त्याबद्दल श्री. कानिटकर व प्रकाशक श्री. मुकुंदराव भिडे यांचा मी फार आभारी आहे.

महानुभाव पंथ व साहित्य यांच्या कुतुहलपूर्ण अभ्यासातून निर्माण झालेले हे लेखन त्यांच्याविषयी वाचकांच्याही अंतःकरणात जिज्ञासा व आस्था उत्पन्न करील अशी आशा आहे. माझ्या या प्रयत्नात ज्यांनी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे सहकार्य केले, त्या सर्वांचा मी अतिशय आभारी आहे.

२८६ मधली आळी,<br>
वाई, जिल्हा सातारा<br>
१० फेब्रु. १९७२

वसंत स. जोशी.

१८८२८

# १ : पूर्व पीठिका

मध्ययुगीन महाराष्ट्रातील विशिष्ट धर्म पंथ हे काळाच्या विशिष्ट गरजेतून वेळोवेळी जन्मास आले. त्यानी परमार्थ मार्ग सामान्यांना सोपा करून सांगण्याचा प्रयत्न केला. ब्रह्मविद्येचा सुकाळ त्याना सर्वत्र करावयाचा होता. स्त्रिया, वैश्य, शूद्र अशा उपेक्षितांना परमार्थ मार्गात स्थान प्राप्त करून द्यावयाचे होते. त्यासाठी, लोक भाषा, मराठीचा अवलंब करून त्यानी परमार्थ निरुपण केले. संस्कृताची प्रतिष्ठा सांभाळीत मराठीलाही त्यांनी प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. विविध वाङ्मय प्रकारात रचना करून मराठी साहित्य समृद्ध केले. आत्मोद्धाराबरोबरच समाजोद्धाराचीही जाणीव ठेवणाऱ्यांची व्यापक दृष्टी त्याच्या वाङ्मयात स्वाभाविकपणे प्रकट झाली. या विविध धर्मपथातील प्रमुख संतकवींनी बहुमोल अशी साहित्यनिर्मिती केली. परंतु त्याची भूमिका केवळ कवींची नसून भक्ताची होती. ‘ वाचें बरवें कवित्व । कवित्वीं रसिकत्व । रसिकत्वीं परतत्त्व । स्पर्शु जैसा ’ असे म्हणून कवित्व आणि रसिकत्वाला परतत्त्वस्पर्शाची आवश्यकता ज्ञानेश्वरांनी सांगितली आहे.

आपण केवळ कवी आहोत ही कल्पना या संतकवींना मान्य नव्हती. आपले लेखन ईश्वरी प्रेरणेने होत असल्याचें त्यानी आवर्जून सांगितले आहे. जीवनातील जे जे उत्कृष्ट ते ते परमेश्वरार्पण करावे, त्याप्रमाणे आपली काव्यशक्ती व काव्यसृष्टी या संतकवींनी परमेश्वरचरणी अर्पण केली आहे. मात्र हे करीत असताना त्यानी ज्या एका विशिष्ट विचारप्रणालीचा, आचारधर्माचा अवलंब केला होता, त्याचा पडसाद त्याच्या वाङ्मयात अपरिहार्यपणे उमटला. त्यामुळे त्याच्या वाङ्मयाला पंथीय विचारांच्या मर्यादा पडलेल्या दिसतात. आख्यानकाव्यापासून भाष्य ग्रंथापर्यंत त्याची ही विशिष्ट विचारसरणी कार्यान्वित झालेली दिसते. समाजाला परमार्थ-मार्ग सांगताना सामाजिक नीति तत्त्वांचाही त्यानी पुरस्कार केला. समाजाला सन्मार्गाला नेणारे ते ‘ संत ’ होते. तुकारामानीही ‘ जगाच्या कल्याणा संताच्या विभूती ’ असे सांगून स्वसदृश संताची भूमिका

स्पष्ट केली आहे. त्यादृष्टीने पाहता हे सर्व संतकवी आधी संत आणि नंतर कवी या पातळीवर वावरताना दिसतात. त्यांच्या लेखनात उत्स्फूर्ततेचा, जातिवंत प्रतिभेचा आविष्कार झालेला दिसला, तरी विशिष्ट विचारापासून ते स्वतःला अलग करू शकत नाहीत असेही दिसते. त्यांची साहित्यनिर्मिती भक्तिभावाच्या उत्कटतेतून झाली. काव्यानंदाहून अधिक उच्च अशा ब्रह्मानंदाचा आस्वाद घेण्यास ते उत्सुक होते. त्यामुळे त्यांची काव्यविषयक दृष्टी परमार्थप्राप्तीच्या तुलनेने सदैव दुय्यमच राहिली. अशा अवस्थेत लौकिक जीवनात प्रतिष्ठा प्राप्त करून देणारे पांडित्यपूर्ण ग्रंथ किंवा रसिकरंजन करणारे काव्य यांचे लेखन त्यांचे कडून होणे असंभवनीय होते. शिवाय अध्यात्मविचार हा तत्कालीन समाजात प्रतिष्ठा पावलेला होता. तो मांडणारा व तशी वाटचाल करणारा स्वाभाविकपणेच समाजाच्या श्रद्धेचा, आदराचा विषय बनत असे. संत व समाज यांचा अध्यात्म-विषयक दृष्टिकोन मध्ययुगीन मराठी काव्याचे आध्यात्मिक स्वरूप घडविण्यास बऱ्याच अंशी कारणीभूत आहे. )

## महानुभाव पंथ

ज्ञानेश्वर पूर्वकालात आद्यशंकराचार्यांनी वैदिक धर्माचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न करून समाजाला नवी दिशा दाखविली; परंतु धर्माचा खरा गाभा लक्षात न घेता त्याच्या बाह्यांगावरच समाजाकडून अधिक भर देण्यात येऊ लागला. त्यामुळे कर्मकांडाचे प्रस्थ माजले. व्रत–वैकल्ये, मंत्र–तंत्र, नवस–सायास याकडे लोकांची प्रवृत्ती वाढली. उपासनेचे लौकिक फळ त्वरित प्राप्त व्हावे, अशी अपेक्षा वाढून, अशी फलप्राप्ती करून देणाऱ्या देव–देवतांची उपासना वाढीस लागली. प्रत्येक व्यक्ती स्वयंकेंद्रित आणि स्वार्थपरायण बनू लागली. समाजकल्याणाची जबाबदारी असणारे उच्चवर्णीयही याच चक्रात गुरफटले गेले. सामाजिक जीवनात सुबत्ता असली तरी आध्यात्मिक क्षेत्राबाबत प्रक्षोभ होता. 'चतुर्वर्ग चिंतामणी' या हेमाड पंडिताच्या ग्रंथात दोन हजारांवर व्रते सांगितली आहेत. त्या व्रत-पालनात गुरफटलेल्या समाजाला लौकिक वा आध्यात्मिक जीवनाची अंगे समृद्ध करण्यास अवकाश प्राप्त झाला नसावा.

(आध्यात्मिक क्षेत्रात विशिष्ट वर्णाव्यतिरिक्त इतरांना मोक्षाचा मार्ग खुला नव्हता. मोक्षमार्गाचे रहस्य सांगणारे ज्ञान संस्कृतच्या कडेकुलुपात बंदिस्त झाले होते. समाजातील मोठा वर्ग अशा ज्ञानासाठी उत्सुक, पण त्यापासून वंचित होता. अशा अवस्थेत या सर्वांना आपल्यात सामावून घेणारे, उदात्त व उदार तत्त्वज्ञान सांगणारे बौद्ध, जैन, लिंगायत, नाथ, महानुभाव, वारकरी यासारखे विविध धर्म-पंथ उदयाला आले. व त्यांच्याकडे समाजातील मोक्षमार्गवंचित वर्गाचा ओघ सुरू झाला. स्त्रिया वैश्य शूद्रादि वर्गही परमगती पावतील असे स्पष्ट प्रतिपादन करणाऱ्या

'गीते'चे स्वरूप ज्ञानेश्वरांनी विशद केले. 'इये मराठीचिये नगरी । ब्रह्मविद्येचा सुकाळु' करण्याची त्यानी प्रतिज्ञा केली. ही काळाची मोठी गरज होती त्यासाठी मराठी भाषेतच या पंथानी ग्रथरचना, निरूपण इ. कार्ये केली. सामान्यांच्या आध्यात्मिक उद्धाराचा कळवळा या प्रयत्नामागे निश्चितच होता. आर्थिक आणि वर्णभेदाधिष्ठित विषमता समाजाला पोखरून टाकीत होती. अशा अवस्थेत समाजाला समता, भूतदया, त्याग इ. तत्त्वांची महती पटवून देऊन स्वधर्माची जाणीव करून देण्याचे कार्य या पंथानी हाती घेतले.

बाराव्या शतकात उदयास आलेल्या महानुभाव पंथाने या दृष्टीने मोठे कार्य केले. या पंथास 'महात्मा' 'अच्युत' 'जयकृष्णी' 'भटमार्ग' परमार्ग' अशीही नावे आहेत. चक्रधर हे या पंथाचे संस्थापक होत. भडोच येथील मल्लदेव राजाच्या विशालदेव नावाच्या प्रधानाचा हा मुलगा. त्याचे मूळचे नाव हरपालदेव. पुढे त्याचे गुरु गोविंद प्रभु यांनी चक्रधर असे नाव त्याना दिले. महानुभाव पंथात कृष्णाला चक्रधर असे म्हणतात. त्या उपास्याचेच नाव उपासकाला मिळाले. पंथीय लोक चक्रधराना श्रीकृष्णावतारच मानतात. त्याना ११२ वर्षांचे दीर्घायुष्य लाभले. दत्ताच्या साक्षात्कारानतर पथीय तत्त्वज्ञानाच्या प्रचारास त्यानी प्रारंभ केला. त्याचे ५०० शिष्य व १३ शिष्या होत्या. श्रीकृष्ण व दत्त या दोन देवता मुख्य धरून या पथाने संन्यास मार्गावर भर दिला. स्त्री, शूद्रानाही सन्यासाची मुभा ठेवली. महानुभाव संप्रदायाचे मुख्य केंद्र ऋद्धिपूर हे होत. चक्रधरानंतर नागदेव, भावेदेव भास्कर व परशराम असे पथाचे चार आचार्य झाले. पुढे या पंथाचे तेरा आम्नाय (कुळी) निर्माण झाले.

गीता आणि भागवत हे ग्रथ या पथात पूजनीय मानले जातात. हा पथ द्वैती असून त्याच्याकडून 'गीते'चाही द्वैती अर्थ लावला जातो. कृत युगात हंसावतार, त्रेतायुगात दत्तावतार, द्वापारयुगात श्रीकृष्ण आणि कलियुगात चक्रधर असे चार अवतार महानुभाव पथीय मानतात. द्वारकाधीश कृष्ण, दत्तात्रय, द्वारावतीचे चागदेव राऊळ, गोविंद प्रभू आणि चक्रधर अशी त्यांची गुरु परंपरा आहे. विश्वाची जीव, देवता, प्रपच आणि परमेश्वर ही चारच तत्त्वे ते मानतात. त्याचा परमेश्वर नेहमी मनुष्यरूप धरून अवतार घेतो. मनुष्यरूपानेच देवाला प्राणिमात्राचे उद्धरण करता येईल अशी त्याची श्रद्धा आहे. प्रपच हा अनित्य, देवता नित्यबद्ध, जीव बद्धमुक्त आणि परमेश्वर हा नित्यमुक्त आहे; आत्मे अनंत आहेत आणि परमेश्वराचे अवतारही अनंत आहेत, जीवेश्वराचा संबंध स्वामी-भृत्यासारखा आहे, असे ते मानतात. प्राणिमात्राच्या उद्धरणाकरिता गर्भ, पतित व दवडणे असे तीन प्रकारचे अवतार परमेश्वर घेत असतो. श्रीकृष्ण हा गर्भाचा अवतार, मृतदेहात प्रवेश करून घेतलेला 'चक्रधरा'चा तो 'पतित' अवतार

व मूळ देहातील एखाद्या जीवास दवडून घेतलेला ' गोविंद प्रभू 'चा अवतार तो ' दवडण्या 'चा अवतार होय. महानुभाव व वारकरी यांच्या साध्य-साधनात फारसा फरक नाही. कृष्ण हेच दोघांचेही उपास्यदैवत आहे. सत्संग, गुरुसेवा, नामस्मरण हे मुक्तीचे मार्ग असे दोघांचेही मत आहे. मात्र भक्त हा कधीही भगवंत होऊ शकत नाही असे महानुभावाचे द्वैती मत आहे. साखर होण्याऐवजी तिची गोडी मुंगीच्या रूपाने घेण्यातील आनंदाची भावनाच या द्वैतमतामागे आहे. जीव हा अनादि आणि नित्य वस्तू असल्याने तो परमेश्वराशी संपूर्ण अद्वैत साधू शकत नाही, असे ते मानतात. वारकरी संप्रदायाने मात्र द्वैताकडून अद्वैताकडे, सगुणाकडून निर्गुणाकडे मुमुक्षूना मार्गदर्शन केले आहे.

चक्रधरानी वास्तव्य केलेली स्थाने या पंथात पूज्य मानली जातात. फलटण माहूर व ऋद्धिपूर ही या पंथाची तीर्थस्थाने होत. स्पृश्यास्पृश्यता व उच्चनीचतेच्या कल्पनांचा त्याग या पंथाने केला. स्त्रियांच्या मासिकधर्मांचा विटाळही त्यानी मानला नाही. या आत्यंतिक निवृत्तिवादी पंथाने सर्वसंगपरित्याग करून विजनवास पत्करण्याचा उपदेश केला. प्रपंच आणि परमार्थ यांच्या ओढाताणीत जीवन कंठणाऱ्या सामान्याना याचे उत्कट आवाहन त्यामुळे होऊ शकले नाही. वारकरी पंथात लोकोद्धाराची प्रेरणा होती, तर महानुभाव पंथ व्यक्तीच्या मोक्षाचा विचार करीत होता. चक्रधरानी आपल्या शिष्यांना कडक आचारधर्म सांगितला होता. ' स्वदेशु संबंधु त्याज्यः स्वग्राम संबंधु त्याज्यः संबंधिताचा संबंधुः तो विशेषता त्याज्य; ' चित्रीचीही स्त्री न पाहावी, इ. सूत्रातून तो प्रकट झाला आहे. भिक्षा केव्हा, कोठे, कशी मागावी, वास्तव्य किती, कोठे करावे अशा अनेकविध सूचना पंथानुयायाना देण्यात आल्या आहेत. त्यातून पंथाचा आचारधर्म प्रकट झाला आहे. वैयक्तिक मोक्ष प्राप्तीच्या वर्तुळात फिरत राहिल्यामुळे या पंथास वारकरी संप्रदायासारखे व्यापक व विराट स्वरूप प्राप्त झालेले दिसत नाही. वारकरी पंथातील सुलभ साहित्य आणि सामान्यापर्यंत पोचणारे त्याचे आवाहन त्या पंथास व्यापक बैठक देणारे ठरले. महानुभाव पंथानेही मराठी माध्यमाचा आग्रह धरून विविध प्रकारच्या साहित्यनिर्मितीस हातभार लावला. त्यासाठी समर्थ कवी व लेखकही लाभले. आपल्या बहुविध वाङ्मयनिर्मितीत महानुभाव पंथीयानी गद्य रूपात केलेली चरित्रवाङ्मयनिर्मिती हे एक मोठे वैशिष्ट्य आहे. त्या चरित्र ग्रंथांचे स्वरूप कसे निश्चित झाले आहे व त्यात कोणाचा, किती वाटा आहे, याचा शोध घेणे महानुभाव वाङ्मयाच्या अभ्यासकास उद्‌बोधक वाटेल.

## प्राचीन मराठीतील वाङ्मयप्रकार .

प्राचीन मराठीतील बरेचसे वाङ्मय स्फुट स्वरूपाचे आहे. भक्तिभावाभिव्यक्तिकरिता किंवा भाष्यात्मक ग्रंथाद्वारे विशिष्ट विचारधारा स्पष्ट करण्याकरिता

संतकवींनी साहित्य क्षेत्रात प्रवेश केला. संस्कृत वाङ्मयाचे शास्त्रोक्त अध्ययन केलेल्या पंडित कवींनी काव्यकसोटीचा विचार करून तशी साहित्यनिर्मिती केली. काही अनुकरणजन्य, तर काही उत्स्फूर्त असे या काळातील साहित्यनिर्मितीचे स्वरूप आहे. मराठीत वाङ्मयनिर्मितीचे आदर्श शास्त्रकाव्याची कसोटी लावून सिद्ध झालेले नव्हते. त्यामुळे चरित्र, बखर इत्यादी नवीन वाङ्मयप्रकार स्वतःचे रूप घडवीत साकार झाले. फक्त पुराणग्रंथाचे स्थूल स्वरूप त्याचेसमोर होते. वाङ्मयप्रकाराचाच केवळ धावता आढावा घ्यावयाचा झाला, तर प्राचीन मराठीत त्याची पुढील रूपे आढळतात. महानुभावीयाची **चरित्र, आत्मचरित्र, सूत्र-वाङ्मय, वचनोक्तिसंग्रह, न्याय–व्याकरण–छंद–कोश** इ. शास्त्रीय स्वरूपाची रचना, भास्कर, नरेंद्र, एकनाथ याची व वामन, रघुनाथ, मोरोपंत इ. पंडित कवीची **आख्यान कविता**, ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, गीतार्णव, यथार्थदीपिका इ. **भाष्यग्रंथ** ऋद्धिपूर वर्णन, पंढरी महात्म्य इ. **क्षेत्र–स्थल-वर्णने**, ज्ञानेश्वर ते निळोबापर्यंतच्या संतकवींचे **अभंग** व (शाहीरांच्याही) **गौळणी**, एकनाथाचे **जोहार, अर्जदास्त** व **भारुडे**, संत व अन्य कवींची **पदे, स्तोत्रे, आरत्या** व **संत चरित्रे, बखरी** व ऐतिहासिक **पत्रव्यवहार**, शाहीरांच्या **लावण्या** व **पोवाडे**, कीर्तनोपयोगी छोटी **आख्याने** इ. इ. या साहित्यप्रकारातील महानुभावीय चरित्रे, बखरी, ऐतिहासिक पत्रव्यवहार, एकनाथांचे अर्जदास्त हे वाङ्मय सोडले तर अन्य सर्व साहित्य पद्यमय आहे. धर्मग्रंथाचे पावित्र्यरक्षण, पाठांतर सुलभता इ. कारणानी ते निर्माण झाले असावे. इंग्रजी अमदानीतील गद्य वाङ्मय प्रकाराची विपुलता व विविधता आणि प्राचीन मराठीतील पद्य वाङ्मय प्रकार ही त्या त्या काळाच्या गरजेतून झालेली निर्मिती म्हणावयास पाहिजे. मुद्रण व्यवस्थेचा अभाव व तिची सोय हेही त्याच्या स्वरूपात बदल घडवून आणणारे एक कारण म्हणता येईल. परमार्थाकडून भौतिक जीवना-कडे मराठी समाजाचा कल वळताच साहित्याचा आशयही बदलला व अभिव्यक्तीचे नवे नवे प्रकार पुढे येऊन जुने प्रकार मागे पडत चालले. वैद्यक, ज्योतिष, अश्व-शास्त्र, गजशास्त्र इ. सारखे गद्यानुकूल विषयही पद्यबद्ध होण्याची पद्धत बंद होऊन व्यवहारोपयोगी विषयाना अनुकूल असे गद्याचे माध्यम प्राधान्याने वापरण्यात येऊ लागले. लालित्यपूर्ण शैलीतील भावोत्कट आशय काव्यरूपात अवतरू लागला.

थोर पुरुषाची चरित्रे, ऐतिहासिक घडामोडींचे चित्रण करणाऱ्या बखरी किंवा राजकीय व सामाजिक घटनावर प्रकाश टाकणारा पत्रव्यवहार याना अनुकूल असणारे गद्याचे माध्यम त्या त्यावेळीच स्वीकारण्यात आले. चरित्र व आत्मचरित्र वाङ्मयाचा विचार केल्यास काही स्फुट संतचरित्रे व आत्मचरित्रे पद्याच्या माध्यमातून लिहिली गेली. नाना फडणीसाचे अपूर्ण आत्मचरित्र गद्य-स्वरूपात उपलब्ध आहे. प्राचीन मराठीतील चरित्र वाङ्मयाचे दालन पुढील

रचनानी सजलेले आहे. १. महानुभावाची चरित्रे ( महेंद्र, नरेंद्र, परशरामकृत ) २. ज्ञानदेव चरित्र ( नामदेव, सच्चिदानंद, सत्यामळनाथ, श्रीधर व निरजन माधव.) ३. भानुदास चरित्र ( एकनाथ, विठ्ठल.) ४. एकनाथ चरित्र ( मुक्तेश्वर केशवस्वामी, कृष्णदास.) ५. संत सखू ( विठ्ठल. ) ६. तुकाराम ( गोपाळबुवा. ) ७. समर्थ चरित्र. ( दिनकर, गिरिधर, उद्धवसुत, आत्माराम. ) ८. गुरु चरित्र ( सरस्वती गगाधर. ) ९. नाभाजीची भक्तमाळ. ( प्रियादासाची टीका. ) १०. आत्मचरित्रपर–(अ) नामदेव, जनाबाई, कान्होपात्रा, तुकाराम, बहिणाबाई, कचेश्वर, निरजन माधव, नाना फडणीस, विठाबाई इ. ( आ ) ग्रथारंभी व शेवटी ग्रंथकर्त्या-कडून दिली जाणारी स्वतःविषयीची माहिती. ११. चरित्रात्मक बखरी–शिवाजी, सभाजी, राजाराम इ. ची. १२. खिस्ती चरित्रे. १३. जैन चरित्रे. १४. संत मालिका एकनाथ, मुक्तेश्वर, मोरोपंत, देवीदास, उद्धव चिद्धन इ. च्या. त्या सत मालिकातून साधुसंताचे पुण्यस्मरण करण्याचा हेतूच मुख्यत्वे आहे. त्याच्या स्थळ कालाचा निर्देश त्यात नाही किंवा कालक्रमाचा साक्षेपही नाही.

प्राचीन मराठीतील चरित्रे ही आचार्यांची गुरुचरित्रे किंवा संतचरित्रे आहेत. ‘ संत ही देवाची रुपडी ’ हा श्रद्धाभाव या चरित्र लेखनामागे असल्याने देवाइतकाच पूज्य भाव या सताविषयीही त्यात प्रकट झाला आहे. ‘ सगुण चरित्रे परम पवित्रें सादरवर्णावी ’ असे एकनाथानी आवर्जून सागितले आहे. निराकार, निर्गुण परमेश्वराचे साकार, सगुण रूप संताच्या द्वारे पाहता येत असल्याने त्याचे महात्म्य अनेकानी वर्णिले आहे. या संताचे गुणगान, त्यांच्या कृतींचे लीळांचे स्मरण म्हणजेच परमेश्वर स्मरण, ते ईश्वरभक्तीचे, दास्याचे साधन ही भूमिका. त्यामुळेच सत-जीवनचरित्राचे लेखन करताना चरित्र लेखकाची ही भक्तिभावनाच श्रद्धेने प्रकट झाली आहे. शिवाय प्राचीन मराठी वाङ्मय हे बहुताशी विशिष्ट धर्मपंथाधिष्ठित आहे त्यामुळे त्या त्या धर्मपंथ संस्थापकाच्या अनुयायाकडून पथसस्थापक, आचार्य किवा प्रमुख संत याच्या जीवनावर लेखन झालेले आहे. त्यात त्या विशिष्ट पंथाच्या तत्त्वज्ञानाचा, आचार धर्मांचा स्वाभाविक आविष्कार झाला आहे. त्यामुळे निर्लेप वृत्तीच्या चरित्रलेखनाची अपेक्षा अशा वाङ्मयातून पूर्ण होऊ शकत नाही.

## महानुभाव चरित्र वाङ्मय प्रेरणा व स्वरूप

मराटीच्या प्रारंभ काळात महानुभाव पथाने विपुल व विविध साहित्य निर्मिती करून मोलाचे कार्य केले आहे. या पंथाच्या गुरुकुळाची व आचार्यांची स्मृतिरूप चरित्रे लिहिण्यात आली आहेत. या पथाचे सस्थापक श्री चक्रधर यानी आपल्या अनुयायाकडून आपले नित्यस्मरण व्हावे असे सागितले आहे. स्वतःस ते श्रीकृष्णाचा अवतार मानीत व अनुयायाचीही तशीच श्रद्धा होती. वारकरी पंथी-यानीही भगवंताच्या नामस्मरणाचा महिमा आवर्जून सागितला आहे. नामस्मरणाने

परमेश्वराशी एकरूपता साधण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. महानुभाव पंथाचे परमेश्वर स्वरूपी संस्थापक मानवी अवतार धारण करून प्रत्यक्षात भक्तासमोर होते. त्याच्या केवळ नामाचेच नव्हे, तर त्याच्या जीवनातील विविध लीळा–क्रीडाचे, त्याच्या वास्तव्य–सन्निधान स्थानांचे, सबंधित वस्तूंचे स्मरण हे त्याच्या असंनिधानी साहजिकच पुण्यप्रद व त्या रूपाशी एकरूपता साधण्याचे साधन होते. सुदैवाने या थोर पुरुषाच्या सहवासात राहिलेल्या व्यक्तींनी त्याच्या या लीळा यथारूप सांगितल्या व त्या टिपून ग्रंथरूपाने मांडणारा महेंद्रासारखा चरित्रकारही लाभला. चक्रधराची प्रातःकालपासून रात्रीपर्यंतची दिनचर्या सांगणारे ' पूजावसर ' हे प्रकरणही अशाच श्रद्धा भावातून निर्माण झाले असून ते पथीयाच्या नित्यपठनात असते. स्वतः चक्रधर आपले गुरू श्री गोविंदप्रभु व अन्य अवताराच्या लीळा स्मरणात रंगून जात. श्री प्रभूच्या वस्त्राचे दर्शनही त्याची उदासीनता घालवून आनदरूप करीत असे. चक्रधराच्या या स्मरणभक्तीच्या आदेशाचे व आदर्शाचे पालन त्यांच्या अनुयायाकडून कटाक्षाने करण्यात आले. संबधित वस्तू वा स्थळाचे दर्शन घेण्याचा आग्रह स्वत. चक्रधरानीच वेळोवेळी आपल्या शिष्याना केला होता. चक्रधर, गोविंदप्रभु आणि नागदेवाचार्य याच्या पश्चात त्याचे स्मृतिरूप संनिधान टिकवून ठेवण्याचा प्रयत्न त्याच्या अनुयायानी केला व तो त्याच्या चरित्रग्रंथरूपाने साकार झाला. तीच महानुभाव चरित्रे होत.

या चरित्र–ग्रंथ–लेखनाची प्रेरणा कशी झाली हे सांगणारी ' इतिहास प्रकर्णा 'तील हकीकत अशी आहे : ' एक दी महीभटीं भटातें पुसिले : हा भटोः तूम्ही नीरंतर काइसयाचे मनन करीत असा : तुम्हासि केन्हळीही मननावेगळ्या न देखो, मग भटीं भणितिलेः सर्वज्ञ मज हीरवळी येहुनि ऋद्धिपूरा पाठवीलें: तै यातें सर्वज्ञे भणितलें: वानरेया येथौनि नीरोपीले वीचारः शास्त्रः अर्थः ज्ञान त्याचें श्रवणः मननः नीदीध्यासन करावाः तेही एक स्मरणाचि कींगा ॥ १ ॥ एथीचीं चरित्रें आठवीजेति आइकिजेति : उचारीजति : तेही एक स्मरणाचि की गा ॥१॥ ऐसे सर्वज्ञ मज नीरोपीलें होतें.

( चक्रधराच्या लीळांचे हे स्मरण लिखित स्वरूपात आले तर ते पथीयाच्या उपकारास येईल हे जाणून महेंद्रभटानी अशा लीळा-संकलनाचे कार्य हाती घेतले. चक्रधराशी संबधित अनेक व्यक्तीच्या गाठीभेटी घेतल्या. इद्रभटासारखा मनुष्य कृषिकर्म करीत असताना लीळाकथन करतो व महेंद्रभट त्या नमस्कारपूर्वक उतरून घेतात, हा प्रसंग त्याचा दृढ भक्तिभाव आणि चिकाटी दाखविणारी आहे. गदोनायकाच्याकडून लीळा मिळविता आल्या नाहीत, याची त्याना चुटपुट लागून राहते. लीळा संकलन करताना त्याचे जीवन जणू चक्रधरमय झाले होते. त्या लीळा गोळा कराव्यात, नागदेवाचार्यांना दाखवाव्यात. त्यानी ' हे श्रीमुखीचे शब्द

होति हे नव्हती ' असे सांगावे आणि अशा ' दृष्टिपूत ' लीळा काल व स्थल क्रमाने एकत्र बांधाव्या, अशा तऱ्हेने ' चक्रधर चरित्राची जडण घडण होत चालली होती.

चक्रधर, गोविंदप्रभु व नागदेवाचार्य यांच्या स्मृतिरूप चरित्रग्रंथांची रचना होत असताना चरित्रलेखनविषयक एक अपेक्षा आपातत: पूर्ण झाली आहे. चरित्रकाराने आपला दृष्टिकोन वाचकावर लादू नये, तर त्याचे केवळ आविष्करण करावे,[1] अशी अपेक्षा असते. चक्रधराशी जवळून वा दुरून संबंधित अशा व्यक्तींच्या स्मृती महेंद्रभटानी संकलित केल्या आहेत, त्या पंथीय आचार्यांकडून घासून पुसून घेतल्या आहेत. हे स्मृतिकथन करणाऱ्या व्यक्ती चक्रधरसंबंधित असल्यातरी त्यांनी स्वत:ला पडद्याआड ठेवले आहे. चक्रधरविषयक आदरभाव, भक्तिभाव अंत:करणात असला तरी त्यांचे वास्तव व्यक्तिचित्र उभे करण्याच्या आड तो आलेला नाही. अशी एकेक स्मृती चक्रधराच्या व्यक्तित्वाचा एकेक पैलू प्रकाशित करीत जाते. केवळ आत्मगौरवाने भरलेले वृत्तांतकथन येथे नाही. ते तसे नसावे ही चरित्रविषयक अपेक्षाही येथे पुरी होते.[2] चरित्रलेखनाला आवश्यक साधनसामग्री उपलब्ध झाली तर ते चरित्र अधिक नेटके व अधिकृत होऊ शकते. महेंद्रभटांना त्यासाठी केवळ स्मृति-संकलनावर भर द्यावा लागला आहे; परंतु त्याचा उपयोग त्यांनी अत्यंत कौशल्याने करून आपली योजकता दर्शविली आहे. चरित्रलेखक हा उत्तम संशोधकही असावा लागतो. उपलब्ध साहित्याची निवड, विश्लेषण करणे, त्याचा काल-स्थळक्रम ठरविणे, त्यातील सत्यासत्यता पारखणे, त्यांना तर्कसंगत दुव्यांची जोड देणे आणि ते वाचनीय, कलात्मक स्वरूपात मांडणे इ. गोष्टी त्याला कराव्या लागतात. या करीत असताना चरित्रकाराची परिश्रमशीलता कसास लागते. चरित्रविषयावरील श्रद्धा, औत्सुक्य त्याला कार्यप्रवण करीत असतात. थोर व्यक्तींची चरित्रे लिहिताना भक्तिभावातून निर्माण होणाऱ्या चमत्कारकथाही अंतर्भूत होण्याची शक्यता असते. वास्तव चरित्रलेखनासाठी अशा चमत्कार कथा बाजूला ठेवून त्यातील सूत्र फक्त लक्षात घ्यावे लागते.

चरित्रलेखनात इतिहास, व्यक्ति आणि वाङ्मय या तिन्ही घटकांना महत्त्व असते. ते चरित्र नायकाचे वास्तव चित्रही असावे आणि कलात्मक साहित्यकृतीही असावी. त्यादृष्टीने अनावश्यक व कलाहीन तपशील चरित्रकाराला गाळावा

---

1 A Biographer must never impose, but only expose–Strachey.

2. Biography should be illuminating, rather than informative–Strachey.

लागतो. चरित्रलेखनात मृत व्यक्तीचे स्मरण असते; परंतु ते करीत असताना त्याची विशिष्ट प्रतिमा ठसविण्याचा प्रयत्न झाला तर चरित्रलेखनात गौणता येते. चरित्रलेखक व चरित्रनायक याच्या व्यक्तिगत संबधांचा उल्लेखही अस्थानी ठरतो. वास्तवदर्शी चरित्रात ऐतिहासिक सत्याचे दर्शन घडावे. त्याच्याआड निष्ठा, आदरभाव, आत्म-निर्णय इ. येऊ नयेत, तसाच पूर्वग्रहही आड येऊ नये. अशा चरित्राना अधिक व्यापक प्रतिसाद मिळण्याची शक्यता असते.

स्मरणभक्तीच्या प्रेरणेतून निर्माण झालेल्या चरित्रात शाश्वत आणि अशाश्वत, भौतिक आणि आध्यात्मिक याच्या संदर्भात चरित्रलेखक विचार करू लागतो आणि त्यामुळे चरित्रनायकाचे व्यक्तित्व दुभंगते. त्याचा परिणामकारक ठसा उमटण्यासाठी एकसंघ व्यक्तित्वरेखाटनाची आवश्यकता असते. तसे न झाल्यास चरित्रलेखन दोषपूर्ण होते. पंथ संस्थापकाना अवतारी स्वरूप देऊन त्याच्याभोवती दैवी वलय निर्माण केले जाते आणि त्याच्यातील मानव विसरला जातो. अर्थात आपल्या थोर कर्तृत्वाने समकालीन समाजाहून आपले वेगळेपण अशा व्यक्तींनी सिद्ध केलेले असते. त्याच्या स्मृतीचा आदर करण्याची भावना यामागे असते. कोणत्याही काळातील थोर पुरुषाच्या व्यक्तित्वाचे मूल्यमापन समकालीन परिस्थितीच्या पार्श्वभूमीवरच करणे योग्य आहे. पर्वतशिखराची उची ही त्या पर्वताच्या व अन्य शिखराच्या उंचीच्या तुलनेनेच ठरवावी लागते, तसेच हे आहे; परंतु हे करीत असताना ते उंच शिखर त्या पर्वताचाच एक अंश, घटक आहे; त्याच दगड मातीचे ते बनलेले असते हे विसरून चालत नाही. म्हणून थोर पुरुषांच्या चरित्रात त्याच्या मानवी अंगाचे यथार्थ दर्शन घडावे, अशी अपेक्षा असते.[३] चरित्र लेखन ही एक बौद्धिक प्रक्रिया ( intellctrual art ) असल्याने भावनेचा बुद्धीवर पगडा बसताच चरित्रलेखन असंतुलित होण्याची शक्यता असते.

महापुरुषांचे चरित्रलेखन हे या दृष्टीने एक अवघड आणि जबाबदारीचे कार्य असते. त्याच्या चरित्राना एक साचेबंदपणा येण्याची शक्यता असते. मराठीतील काही संतचरित्राचा असाच एक साचा तयार झालेला दिसतो, परतु थोर पुरुषाचे कार्य असे साचेबंद असत नाही. स्वकर्तृत्वाने ते नवे मार्ग चोखाळतात. इमर्सनने म्हटल्याप्रमाणे 'एक महापुरुष जन्माला आल्यानतर विधाता त्या महा-

---

3. 'The pageantry of life is taken away; you see the poor reasonable animal as naked as ever nature made him; are made acquainted with his passions and his fallies; and find the demi-god man.'

—Drydon.

पुरुषाचा साचा ( Mould ) मोडून टाकतो.' त्यामुळे प्रत्येक महापुरुषाच्या व्यक्तित्वाचे पृथक्करण त्याच्या चारित्रात जाणवावे लागते. मानवी इतिहास अशाच थोर पुरुषांच्या कर्तृत्वाने घडलेला असल्याने त्याचे वास्तव दर्शन त्याच्या चारित्रात प्रकट व्हावे लागते. त्यासाठी भक्तिभाव, पूर्वग्रह, आत्यंतिक श्रद्धा, पारंपरिक आख्यायिका आणि चमत्कार कथा याची जळमटे दूर सारावी लागतात. नवी आणि वास्तव मूल्यमापनाची दृष्टी असावी लागते. ऐतिहासिकतेचे आणि गूढतेचे वलय दूर करून अजिंठा-वेरूळ मधील चित्र—शिल्पकृतीचा रसिकतेने आस्वाद घ्यावा, त्या प्रमाणे थोर पुरुषाच्या मूळ व्यक्तित्वाचे दर्शन त्याच्या चरित्रातून घेता आले पाहिजे.

महानुभाव पंथातील थोर पुरुषाची चरित्रे या दृष्टीने लक्षणीय आहेत. त्याचे स्वरूप आठवणींचे आहे. त्यातील प्रत्येक आठवण चरित्रनायकाचे व्यक्तित्व साकार करीत जाते. एखाद्या लेण्यातील शिल्पकृती तेथील पाषाणावर शिल्पकाराचे मारलेल्या एकेक छिनीने जशी घडत जाते, तसे या आठवणींचे स्वरूप आहे. गोविंदप्रभु, चक्रधर आणि नामदेव या महानुभावीय संताचे जीवनदर्शन या स्मृतींतून त्याच्या गुणदोषासह प्रकट झाले आहे. त्यात सत्यापलापापेक्षा वास्तवाचे कठोर दर्शन होते. गोविंद प्रभुचरित्रापेक्षा चक्रधराच्या 'लीळाचरित्राच्या बाबतीत हे अधिक खरे आहे. गोविंदप्रभूच्या चारित्रात-कदाचित त्याच्या उत्तरकालीन लेखना-मुळे काहीशी अद्‌भुतता व अवतारी पुरुषविषयक श्रद्धाभाव अवतरला आहे. 'लीळाचरित्रा'त चक्रधरांचे यथारूप चित्रण वास्तवाच्या पार्श्वभूमीवर झाले आहे. महेंद्रभटानी त्याच्याविषयींच्या स्मृतींचे सकलन करून, विस्कळित स्मृतींची काल-क्रमानुसार माडणी, जन्म व मृत्यू हे दोन टप्पे निश्चित करून केला, परतु मूळ कथन कोणतेही भाष्य न करता कायम ठेवले. त्यामुळे वाचकाला चरित्रविषयी-भूत व्यक्तीविषयी स्वत:चे मत बनविणे सोपे झाले. कोणाही थोर पुरुषांच्या विषयीच्या आठवणी आत्यंतिक कुतुहूल निर्माण करणाऱ्या असतात. दुसऱ्या व्यक्तीचे अंतरंग जाणून घेणे ही मनुष्याची स्वाभाविक प्रवृत्ती आहे. थोर पुरुषाच्या थोरपणाचा मागोवा अशा स्मृतींच्याद्वारे घेता येतो, परतु स्मृतींतून स्मृतिकाराच्या व्यक्तित्वाचा, त्याच्या अहकाराचा गडदपणा अधिक झाला, तर चरित्र नायकाचे व्यक्तिदर्शन धूसर होण्याची शक्यता असते.

महानुभाव चरित्रांतील स्मृती चरित्रनायकाच्याच व्यक्तित्वाभोवती फिर-णाऱ्या आहेत. स्मृतिकार तेथे केवळ निमित्तमात्र आहे. या चरित्रातील स्मृति-काराची ही चरित्रविषयाशी आत्मीयता ठेवूनही राखलेली अलिप्तता मूळ पुरुषाचे यथारूप दर्शन घडविण्यास साहाय्य करते. स्मृतिकार त्या त्या घटनाशी संबंधित असल्याने इतिहासकाराची तटस्थताही तो ठेवू शकत नाही, परंतु समकालीन

समाजेतिहासाचे दर्शन तो अभावितपणे घडवू शकतो. त्याच्या निवेदन शैलीत ताटस्थ्यामुळे येणारी नीरसता तर नसतेच, परंतु तिचे स्वरूप काहीसे कादंबरीच्या शैलीशी जुळणारे बनलेले असते. चरित्रनायकाचे स्वभावदर्शन घेण्यास ती वाचकाला मदतच करते. आत्मचरित्र आणि इतिहास या दोहोंशी निगडित असे या स्मृतींचे स्वरूप असते. स्मृतिकाराच्या नजरेने आपण चरित्रनायकाचे दर्शन घेत असतो.[४] 'लीळाचरित्रा 'दि ग्रंथातून समकालीन समाजाच्या सामाजिक, धार्मिक जीवनाचाही परिचय घडतो. त्याचप्रमाणे महदाइसेसारख्या शिष्यानी जिज्ञासूवृत्तीने विचारलेल्या प्रश्नामुळे चक्रधराच्या आत्मचरित्रावरही प्रकाश पडतो. महानुभाव चरित्रग्रंथातील स्मृती त्या त्या थोर पुरुषाच्या निकट सहवासात राहिलेल्या व्यक्तींच्या असल्याने त्याना पावित्र्य व प्रामाण्य प्राप्त झाले आहे. )

स्मृतिकथन करणाऱ्या व्यक्तींची चरित्र नायकाशी असणारी निकटता किंवा दूरता चरित्रनायकाचे सूक्ष्म वा स्थूलदर्शन घडविते. 'लीळाचरित्रातील' उत्तरार्धे विविध स्मृतींनी गजबजलेला आहे, तर पूर्वार्धे व एकांक यातील स्मृतींचे स्वरूप थोडे स्थूल आहे. त्यातील स्मृती प्रसंगविशेषी चक्रधराकडूनच समजावून घ्याव्या लागलेल्या आहेत. महानुभाव पंथाची आचार-विचार प्रणाली निश्चित होण्यास या स्मृतींची मोठी मदत झाली आहे. त्यातूनच पुढे 'सिद्धान्त सूत्रपाठ' व 'दृष्टान्तपाठ' हे ग्रंथ सिद्ध झाले. पथीयदृष्ट्या चक्रधराच्या स्मृती ह्याही दृष्टीने महत्त्वाच्या ठरल्या. पक्षीय आचारसंहिता विशिष्ट प्रसंगी चक्रधरानी कोणाशी कसे वर्तन केले व कोणता उपदेश केला याविषयींच्या स्मृतींच्या आधारे निश्चित होऊ शकली. त्यामुळे अशा स्मृतीचे संकलन व अंतर्भाव 'लीळाचरित्रा 'त कटाक्षाने झाला असावा. नागदेवाचार्यांचा चक्रधराशी उत्तर कालातच संबंध आलेला आहे. स्मृतिकथन करणाऱ्या बऱ्याच व्यक्ती त्याच्या परिचयाच्या होत्या. त्यास्मृतीतील कित्येक घटना नागदेवाच्या समक्षही घडल्या असण्याची शक्यता आहे. त्यामुळेच स्मृतिसंकलना नंतर त्याची अधिकृतता नागदेवाना विचारूनच महेंद्रभटांनी निश्चित केली. अशा स्मृतींत नागदेव व म्हाइंभट याच्या वैयक्तिक जीवनातील, एकेरी संबोधनाने सांगितलेल्या स्मृतींचाही अंतर्भाव झाला, हे विशेष होय. चक्रधरसंबंधित वस्तू वा व्यक्ती जशा पंथीयाना पूज्य, तशा त्याच्या स्मृतीही त्याना पूजनीय होत्या. हे 'वाक्पुष्पीं ईश्वरार्चन' होते. ते त्याचे पूजाद्रव्य पवित्र ठेवण्याचा त्यानी आटोकाट प्रयत्न केला.

---

4. 'Good memoirs are the history of a period seen through the eyes of some one who has been a participant in the events described'. ( Cassell's Ensyclopaedio of Literature. )

## म्हाइंभटांचे लेखनकर्तृत्व

महानुभाव पंथीय गोविंदप्रभु, चक्रधर इ. थोर पुरुषांची चरित्रे सिद्ध करण्याचे कार्य म्हाइंभटांनी केले आहे. ' स्मृतिस्थळा 'च्या बांधणीस नरेंद्र व परशराम यांचा हातभार लागला आहे. त्या दृष्टीने म्हाइंभटांना मराठीतील आद्य चरित्रकार मानले जाते. त्यांच्या या लेखनकर्तृत्वाविषयी अधिक विचार झाला पाहिजे असे वाटते. या चरित्रग्रंथाचे साहित्य त्यांनी परिश्रमपूर्वक जमविले याविषयी दुमत नाही. परंतु त्यांना केवळ संकलक म्हणणे हे

कारक वाटते. म्हाइंभटाच्या कर्तृत्वाविषयी श्री. रा. चिं. ढेरे म्हणतात, ' केवळ ऐकलेल्या ध्वनींना शब्दचिन्हांकित करणे, एवढेच त्यांचे काम नव्हते. एक तर त्याने स्वतःच अनुभवलेल्या लीळांचा निवेदकही तोच आहे. दुसरे म्हणजे जे ऐकले त्याचे शब्दांत ग्रथन करताना ते करणाऱ्याच्या वाणीचा स्पर्श त्याला झाल्यावाचून राहणे अशक्य आहे. ' श्रीमुखींचे शब्द ' मात्र जसेच्या तसे ग्रथित करायचे आणि अन्य सर्व प्रसंग मात्र जसे घडले असतील, तसे सजीव करायचे, ही त्याची पद्धती जाणवते. कारण लीळा सांगणाऱ्या प्रत्येकाला तो प्रसंग सजीव करता येईल असे नव्हे; परंतु तो ऐकत असताना म्हाइंभटाच्या दृष्टीसमोर मात्र तो तो प्रसंग तरळत असेल आणि त्या तरल दृश्याला तो निवेदकाच्या शब्दांतून मिळणाऱ्या सूचनांच्या आधारे आपल्या वाणीत पकडीत असेल. ' लीळाचरित्र ' वाचताना चाणाक्ष वाचकाला हे **अनुमानित सत्य** जाणवल्यावाचून राहात नाही. त्यामुळे ' लीळा चरित्रा 'च्या वाङ्मयीन महत्तेत म्हाइंभटाला परमश्रेयाचा अधिकारी मानावे लागते.[५]

म्हाइंभटाचे वाङ्मयीन कर्तृत्व अशाप्रकारे सिद्ध झाल्यास श्री. ढेरे यांच्या प्रमाणेच कोणाही अभ्यासकास आनंदच वाटेल; परंतु काही अन्यविशेषांचाही विचार झाला पाहिजे. ' लीळाचरित्रा 'ची बांधणी तीन विभागांत झाला असून त्यात निवेदकाच्या तीन तऱ्हा आहेत. ' एकांका 'तील आत्मवृत्तपर निवेदन हे मुख्यतः चक्रधरांचे आहे. ' पूर्वार्धा 'तील निवेदनात विविध व्यक्तींचा समावेश आहे. ' उत्तरार्धा 'त नागदेव हे चक्रधरांच्या निकट सान्निध्यात असल्याने प्रामुख्याने त्यांचे व त्यांनी परिष्कृत केलेले इतरांचे निवेदन आहे. अन्य भक्तांकडून ' नमस्करून ' घेतलेल्या लीळा म्हाइंभट नागदेवांना दाखवीत. त्यावील ' होये तें भटोबास मानिति : नव्हे तेथ म्हणति . हे श्रीमुखींचे शब्द नव्हेति : हे होती : ' लीळासंकलन करताना त्यांनी म्हाइंभटांनी ' ज्याचीये अनुभवीचीया त्या त्यातेचि पुसावीया अशी सूचना दिली होती. अशा साक्षेपाने या चरित्रग्रंथाची उभारणी

५. संतांच्या चरित्रकथा प्रस्तावना–पृष्ठ ४६.

झाली. पंथीय आचार्यांच्या इच्छेनुसार, आदेशानुसार आणि पंथीय उपासनेचा एक भाग म्हणून म्हाइंभटानी या स्मृति-सकलनाचे काम केले. पण त्याना ग्रथरूप देताना नागदेवाचा अधिकारी हात त्यावर फिरला आहे.

म्हाइंभटाच्या व्यक्तित्वाचा विचार केला, तर विद्वत्तेच्या अहकाराने दाटलेला, नागदेवाना सुटदेव, म्हणणारा, मठाचा व्यवहार व येणाऱ्या जाणाऱ्याचे आतिथ्य करणारा असा विचक्षण, व्यवहारदक्ष म्हाइंभट दिसतो. चक्रधराच्या सहवासात राहण्यापेक्षा गोविंदप्रभूंचा सहवास त्याने पसंत केला यात त्याची आपले व्यक्तित्व जपण्याची भावना तर नसेल ना? अर्थात चक्रधराच्या उपदेशाने, त्यांच्या प्रभावाने म्हाइभट खूप निवळला. नागदेवांना तो मानू लागला. चक्रधर गोविंदप्रभूंविषयी परमेश्वरसदृशभावही त्याच्या मनात निर्माण झाला, हे सर्व खरे असले तरी त्याच्या मूळ व्यक्तित्वातील स्वभावविशेषांचे दर्शन मधून मधून होत राहतेच. भावनात्मकतेपेक्षा चिकित्सकतेकडे त्याच्या स्वभावाचा कल आहे. जी भावनिक उत्कटता नागदेव म्हदाइसा याचे ठिकाणी आढळते, तितकी म्हाइभटाच्या ठिकाणी आढळत नाही. आपणास 'देव होईल का' या विचाराने मृत्यू समोर दिसत असताना, व्याकुळ झालेल्या म्हाइंभटाचे दर्शन घडते; पण त्यातही आपण केलेल्या अपकृत्याविषयीचा अनुतापच प्रत्ययास येतो. लीळा-संकलनाच्या कार्यात त्यानी दाखविलेली परिश्रमशीलता व श्रद्धा निश्चितच प्रशंसनीय आहे. ग्रथसिद्धीसाठी लागणारा साक्षेपही त्याचेकडे आहे. संकलित केलेल्या लीळा 'अन्वयी' लावणे, त्याच्या 'आदि' ठरविणे, त्यांची अधिकृतता तपासणे, इ. कामे म्हाइंभटानी चोखदळपणे, काटेकोरपणे केली असावीत. परंतु स्मृतिकथन करणाऱ्याच्या अनुभवाचा भावनात्मक प्रत्यय घडविण्यात म्हाइंभटांचा हात होता काय? 'स्मृती'तील प्रसंगनिर्मिती, अभिनयशीलता, संवादात्मकता यातील जिवंतपणा म्हाइंभटामुळे निर्माण झाला? की स्मृतिकाराचे व्यक्तित्व त्यात प्रति-बिंबित झाले आहे? 'स्मृती'तील भाषेचा ताजेपणा, त्या सांगितल्या गेल्या तशाच लिखितरूप पावल्या, म्हणून कायम राहिला की म्हाइंभटाचे लेखनगुण त्यात अवतरले? प्रत्येक स्मृतीच्या प्रारंभी येणाऱ्या शीर्षकस्वरूप 'आदी'मधील संस्कृत प्रचुरता व रुक्षता आणि लागलीच 'स्मृती'त आढळणारा साधेपणा व काव्यात्मकता यातील फरक जाणवणारा आहे. योजनापूर्वक, एकसंघ व एकहाती लेखन झाले असते, तर म्हाइंभटांचे पंडिती व्यक्तित्व लक्षात घेता, वैचारिकता व पाडित्य याचे दर्शन घडण्याची शक्यता होती. तसे ते झालेले नाही. या दृष्टीने महादाइसेच्या काव्यरचनेचा विचार करण्यासारखा आहे. श्री गोविंदप्रभूंना विवाहप्रवृत्ती झाली असता त्याप्रसंगी उत्स्फूर्तपणे तिने 'धवळे' गायिले. ते काव्य पूर्ण व्हावे असा आग्रह म्हाइंभट-लक्ष्मीधरभटानी धरला. पण 'गोविंद प्रभूंच्या वरप्रसादाने त्यावेळी आपण ते काव्य केले, आता कसे जमेल?' असे तिने म्हटले. तेव्हा म्हाइंभट-

लक्ष्मीधरभटानी म्हटले, ' तरि आम्ही शब्द घडवुनिः आणि तुम्ही गा. ' आणि अशा रीतीने ' धवळयां 'चा उत्तरार्ध तयार झाला.[६] यातील काव्याचा गाभा महदाइसेचा ! तो म्हाइंभटानी ' शब्द घडउ घडउ बांधिला. स्वतः म्हाइंभटानी स्वतंत्र काव्यरचना किंवा ग्रंथरचना केल्याचे दिसत नाही. ' चरणशरणपार ' इत्यादी पाच श्लोक व दहा आरत्या म्हाइंभटाच्या नावावर मोडतात अशी माहिती डॉ. वि. भि. कोलते यानी दिली आहे. ' एकुदी म्हाइंभट गीता वाखाणीत होते. आपणचि पदे करीती आणि आपणचि अर्थ करीति अशीही एक स्मृती आहे.[८] पाच श्लोक, दहा आरत्या व गीतेवरील भाष्याची आवड यातून घडणारे म्हाइं-भटाचे दर्शन फारशी अपेक्षा निर्माण करीत नाही.

' स्मृतिस्थळ'या नागदेव चरित्राच्या निर्मितीत नरेंद्र व परशराम याचा वाटा असल्याचे मान्य केले जाते. ' गोविंद प्रभुचरित्रा'चे कर्तृत्व आजवर महेंद्र भटास दिले जात असले तरी संकलन, संपादनाव्यतिरिक्त (व तेही अल्प प्रमाणात ) तेही आज मान्य केले जात नाही. डॉ. वि. भि. कोलते यानी याविषयी स्पष्टपणे म्हटले आहे, ' श्री गोविंद प्रभु चरित्राचा मूळ लेखक कोण असावा, याविषयी खुद्द महानुभाव लेखकात एकमत नाही.'[९] प्रा. पा. ना. कुलकर्णी यानी या चरित्राच्या कर्तृत्वाचा विचार करताना त्याचे लेखन उत्तरकालीन असल्याने त्यातील स्मृतींना आख्यायिकाचे स्वरूप प्राप्त झाल्याचे दाखवून दिले आहे.[१०] वास्तविक गोविंद प्रभूचेच शिष्यत्व म्हाइंभटानी स्वीकारले व त्याच्याच सान्निध्यात बराच काळ ते राहिले. त्यादृष्टीने गोविंद प्रभूंचे चरित्र त्याना अधिक साक्षेपाने, आत्मीयतेने लिहिता आले असते. त्या दोघाच्या संदर्भात बोलताना भटोबासानी

---

६. स्मृतिस्थळ - म्हाइभटीं रुक्मिणीसैंवर करणें ॥ एकुदीसु म्हाइभटीं महदाइसातें म्हणितलें समोरें रुक्मिणि सैंवर का न करा : महदाइसीं म्हणितलें : मज काइ करवैल तें गोसावीं वरु दीधला म्हणौनि स्फुरलें : म्हाइभटीं लक्ष्मीधरभटीं म्हणितलें ' तरि आम्हीं शब्द घडवुनि : ( आणिं ) तुम्हीं गा महदाइसीं मानिलें ' ( मग ) तेहीं शब्द घडउ घडउ पदें बांधिलीं ' आणि महदाइसीं गाइलीं . यापरी दुसरी माळ केली : ॥ १७४ ॥

७ श्री गोविंदप्रभु चरित्र : ( प्रस्तावना. ) या आरत्याही सर्वस्वी म्हाइंभटाच्या नाहीत; ' तेथ काही सिद्ध पदें योजिलीं : काहीं आपण गुंफिली . '

८. स्मृतिस्थळ प्रस्तावना ( वा. ना. देशपांडे )

९. श्री गोविंद प्रभु चरित्र ( प्रस्तावना. )

१०. नवभारत : ( एप्रिल १९६६. )

'म्हाइंभटातें प्रभुदास्यावेगळे जो दाखवी. तयासि मी महावाक्य वाखाणीन' अशी होड घातली होती.[11] या संदर्भात प्रा. पा. ना. कुलकर्णी म्हणतात, 'गोविंद प्रभु चरित्रात म्हाइंभटाचा संबंध असणाऱ्या एकंदर बावन्न लीळा आहेत. यापैकी एकीचेही स्वरूप आठवणीचे नाही. कर्तृत्व म्हाइंभटाचे असते तर स्वतःचा असा त्रयस्थपणे निर्देश त्याने केला नसता. दुसरी गोष्ट या बावन्न लीळात अठरा वासना आहेत. ज्या प्रसंगात म्हाइभट हजर आहे, त्याच्या निवेदनात असा मतभिन्नतेचा सूर एकदा नव्हे, अठरा वेळा निघावा याचाच अर्थ हे लेखन वा संकलन म्हाइभटाचे नसले पाहिजे. .लीळाचरित्र आणि गोविंद प्रभुचरित्र या दोन्ही कृती म्हाइंभटाच्या असत्या, तर त्याने पुनरुक्ती शक्यतो टाळली असती आणि जी घटना दोन्हीकडे सागणे आवश्यक वाटले असते तिची भाषा एकच राहिली असती.[12] प्रा. कुलकर्णी याचा निष्कर्ष 'गो. प्र. चरित्राचे कर्तृत्व म्हाइ-भटाकडे जात नाही' असा असून 'लीळाचरित्रातीलही त्याचेविषयीच्या स्मृतीत इतराचा हस्तक्षेप झाल्याचे त्यानी स्पष्ट केले आहे. 'गोविंद प्रभुचरित्रातील स्मृतीचे कथन करणाऱ्यात मुले, स्त्रिया, म्हाइंभट, महदाइसा, नागदेव, व्यापारी, गावकरी, कलावत अशा विविध व्यक्तींचा समावेश आहे 'लीळाचरित्रा'तील व्यक्ती आणि प्रसंग याची विपुलता व विविधता तर उघडउघड जाणवणारी आहे.

प्रा. व. दि. कुलकर्णी यानी आपल्या 'लीळाचरित्र: एक अभ्यास' या पुस्तकात 'लीळाचारित्रा'चे वाङ्मयीन विशेष मार्मिकतेने व तपशीलवार स्पष्ट केले आहेत. मात्र या 'लीळाचरित्राचा'चा लेखक म्हाइंभट अशी कल्पना करूनच त्यानी सर्व लेखन केले आहे. तथापि त्याच्या या विवेचनातूनच या लेखनातील अन्य व्यक्तिसंभवाची कल्पनाही न कळत स्पष्ट होत गेली आहे. 'लेखनावर तो (म्हाइभट) संस्कार करतो, ते कलादृष्ट्या परिष्करणाचे नसून 'प्रत्यक्ष' (Fact) जे आहे. ते बिनचूक नोंदले जावे एवढ्यासाठी, आणि एवढ्यापुरतेच!'[13] असे विधान ते एके ठिकाणी करतात, परतु लागलीच अन्यत्र 'लीळाचरित्रकार म्हाइंभट ह्यांना व्यक्तींच्या शरीरव्यापाराचे हालचालींचे, त्याच्या वृत्तींचे हुबेहूब चित्रण करण्याची मात्र हौस आहे. ती त्याची सहजशक्ती आहे; प्रकृती आहे' असेही

---

११. स्मृतिस्थळ २४७.

१२. अशा काही लीळाची तुलना मूळ लेखात पाहावी. (नवभारत · एप्रिल १९६६.)

यापुढील क्र. १३ ते २४ च्या संदर्भासाठी 'लीळा चरित्र : एक अभ्यास' या पुस्तकातील अनुक्रमे ३२, ५५, ५६, ५७, ५८, ५९, ७०, ७१, ७२, ८१ व ८२ ही पृष्ठे पाहावीत.

सागतात.[१४] वर्णनशैली वा शब्दयोजनेतील तोचवोपणा हा यादव कालीन मराठी बोली भाषेतील रूढ वर्णन संकेतातून येत असावा असे त्याना वाटते.[१५] ' लीळाचरित्रा 'चे वाङ्मयीन विशेष सागतांना प्रा. कुलकर्णी म्हणतात, ' संवाद ' हे लीळाचरित्रात व्यक्तिस्वभावदर्शनाचे एक सुंदर माध्यम झालेले आहे.[१६] श्री चक्रधराचे, त्याच्या गुरूचे, त्यांच्या शिष्यमंडळाचे आणि भक्तजनाचे मनोविकार अतिसूक्ष्मपणे या सवादात जणू मुद्रित झाले आहेत.[१७] . अस्सल, स्वाभाविक, गतिमान, वास्तव, सरळ संवाद हे या गद्यशैलीचे फार मोठे सामर्थ्य आहे.[१८] ग्रामीण बोलीत आणि बखर गद्यात आपणास वाणीचा हा गुण प्रकर्षाने आढळतो.[१९] ' लीळाचरित्र लेखन ' हा शब्दप्रयोग आतापर्यंत करण्यात आला आहे. पण वस्तुतः ते लीळाचरित्र **कथन** आहे. कहाणींचे स्वारस्य हे सांगण्यात जसे आहे. तसेच ह्या ' लीळा ' सागण्यातच त्याची खरी गोडी आहे.[२०] छोटी सुटसुटीत वाक्ये, त्याचे संक्षिप्त रूप, त्याची तडक गती आणि ठसठशीत रूप, कथनातील संवादमयता, संवादातील अभिनयानुकूलता, प्रत्यक्ष अभिनयावलंबित वाक्यरचना ध्वन्यनुसारी शब्दयोजना, सयमक तालबद्ध अशी शब्दाची स्थापना वाक्याची व वाक्यांशांची पुनरावृत्ती हे रचनेचे गुण, लेखनापेक्षा **कथनाशी** अधिक स्वाभाविक वाटतात. आवश्यकही असतात.[२१] लीळाचरित्र म्हणजे यथातथ्यकथन; यथातथ्यकथन म्हणजे लीळाचरित्र, यथातथ्यकथनाचे अथवा ' यथातथ्य चित्रणाचे, इतके विस्तृत, एकसंध, अव्यभिचारी, प्रत्ययकारक उदाहरण मिळणे सहसा कठीण आहे.[२२] लीळाचरित्रातील चक्रधरोक्त आत्मकथनाचा भाग सोडल्यास इतर भाग हा संकलनात्मक आणि निवेदनात्मक आहे.[२३] येथे आत्मक्रीडेचा, उच्चतर आत्मरतीचा आनंद ' स्मृतिचित्रा ' तील प्रमाणे या ' लीळाकथना 'त येऊ शकत नाही. आणि ते साहजिक आहे.[२४]

प्रा. व. दि. कुलकर्णी यांच्या वरील विधानातूनच म्हाइंभटाच्या नेमक्या लेखनकर्तृत्वाची कल्पना येऊ शकते. मराठीच्या प्रारंभ काळात जन्मास आलेल्या कथा-कहाण्यातील गद्यशैली आणि स्मृतीतील शैली यातील आत्यंतिक साम्य, जाणवण्यासारखे आहे. स्मृतिकथन करणाऱ्या व्यक्तीची संभाषणातील अभिनयात्मकता, संवादात्मकता, साधी, सोपी, सुटसुटीत, छोटी छोटी वाक्यरचना, लोकजीवनातील प्रचलित म्हणी व वाक्प्रचार इ. विशेष स्वाभाविकपणे या स्मृतींतून उमटले आहेत. त्याचे सर्व स्वरूप वास्तवदर्शी घडले आहे. ' यथातथ्यकथन ' हा त्याचा विशेष प्रा. कुलकर्णी यानाही जाणवला आहे. लेखनात येणारी विचार गर्भता, पूर्व योजना, जाणीवपूर्ण रचना याऐवजी कथनातील मुक्त, स्वाभाविक शैली त्यात उमटली आहे. म्हाइंभटाचा बराच काळ चक्रधरांच्या तुलनेने गोविंदप्रभु व नागदेव याच्याच सहवासात अधिक गेला. त्यामुळे चक्रधराशी संबाधत सर्वच व्यक्ती व घटना याशी म्हाइंभट परिचित असण्याची शक्यता नाही.,

'नामूलं लिख्यते किंचित्' ही या चरित्रलेखनामागची ठाम भूमिका असल्यानें चरित्रकाराच्या कल्पनाशक्तीस तीत अवकाश आहे असे वाटत नाही. नागदेवांचा मूळ शब्दयोजनेविषयीचा कटाक्षही ध्यानात घेण्यासारखा आहे. त्यामुळेच चक्रधराची भाषा आपले वेगळेपण दाखविते. अशाच तऱ्हेने 'लीळा चरित्रा'तील लीळाचे वर्गीकरण करून त्याचे कथन करणाऱ्या व्यक्तींची वर्गवारी केली, तर त्याचे सामाजिक व पंथीय स्थान जसें लक्षात येईल, त्याचप्रमाणे त्याच्या अभिव्यक्तीची पात्रता व पातळीही समजून येऊ शकेल. अर्थात अशा व्यक्तींचा नामोल्लेख स्वतंत्रपणे त्या त्या ठिकाणी करण्यात आलेला नसला, तरी स्मृती ज्याच्या संदर्भात आली आहे, तीवरून कल्पना करणे शक्य आहे. म्हाइंभटांनी आपल्या विलक्षण बुद्धीने, साक्षेपी वृत्तीने, नेटकेपणाने या सर्व लीळाची माडणी करून, त्या अन्वयी लावून, त्याच्या 'आदि' तयार करून त्यात एकसंधता व प्रवाहित्व आणले आहे. म्हाइंभटाच्या लेखनकर्तृत्वाविषयी परंपरित कल्पनानी भारून जाऊन विचार करण्याऐवजी उपलब्ध साहित्याचे परिशीलन करून त्याचे यथायोग्य स्थान ठरविण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. बागेतील विविधरंगी फुले निवडून त्याचा एकसूत्रात गुंफलेला आकर्षक हार परमेश्वराच्या गळ्यात भक्तिभावपूर्वक घालावा, त्याप्रमाणे म्हाइंभटानी हा स्मृतिरूप हार 'लीळाचरित्रा'च्या रूपाने गुंफून श्रीचक्रधर चरणी अर्पण केला आहे. त्या हारातील प्रत्येक फुलाचा गंध आणि रंग हा त्याचा स्वत:चा आहे! म्हाइंभटाची या चरित्ररचनेमागील श्रद्धाळू भूमिका लक्षात घेता त्याचा अस्थानी व अवास्तव गौरव त्यानाही आवडणार नाही, असे म्हणावे लागते.

## लीळाचरित्र-रचना काही विचार

'लीळाचरित्रा'दि ग्रंथांच्या वाङ्मयीन दृष्ट्या सिद्ध होणाऱ्या कर्तृत्वाविषयीचा विचार यापूर्वी केला. आता पंथीय ग्रंथातून याविषयी आढळणाऱ्या उल्लेखाचा येथे थोडक्यात परामर्श घ्यावयाचा आहे.

'लीळाचरित्र' लेखनाची प्रेरणा म्हाइंभटास नागदेवाच्या मननावस्थेतून झाली. त्यानी नागदेवाना 'तुम्ही सांगा आन (मी) लिहीन' असे म्हटल. म्हाइंभटाना 'ऐसे अवघे भटोबासीं कथन केले; तें महीभटीं सामासा लिहिलें.' 'लीळाचरित्रा'चे एकाक, पूर्वार्ध व उत्तरार्ध असे तीन भाग करण्यात आले. नागदेवाच्या मार्गदर्शनाखाली त्याची सारी घडण झाली आहे. चक्रधरांच्या उत्तरा-

युष्यातील चार वर्षे नागदेवानी त्याच्या निकट सहवासात घालविली होती त्यामुळे त्या काळातील स्मृती क्रमवार सांगणे त्याना शक्य झाले आहे. बाइसा व अन्य शिष्याकडून ' एकाका 'चा कळलेला भागही त्याना मुखोद्गत होता.[२५] बाइसा व नागदेव हे चक्रधराच्या सान्निध्यात नसतानाच्या आठवणी त्यानी संबंधिताकडून गोळा करण्यास सांगितल्या. नागदेवाना स्मृतिसंकलनाची ही कल्पना ' लिहिले तर मार्गासि उपयोग जाइल ' म्हणून आवडली. व स्मृतिकथनास स्वत पासूनच प्रारंभ केला. नागदेवाचार्य व म्हाइंभट वाजेश्वरी-ऋद्धिपुरी विजनवासात राहून नित्य एक प्रहर लेखन करावयाचे. नंतर दोघेही नगरात भिक्षा मागून उरलेल्या वेळात श्रीप्रभूचे सेवादास्य करावयाचे. अशा प्रकारे नागदेवानी सांगितलेल्या या लीळांचे लेखन सहा महिन्यात पूर्ण झाले. त्यानंतर नागदेवानी म्हाइंभटाना म्हटले, ' म्हाइंभटो ' जैं मी सर्वज्ञासी अनुसरला नाही : तैं जे लीळा वर्तलिआ तिया जे-आचिया अनुभविचेआ ते आते आते पुसाविया :' त्याप्रमाणे म्हाइंभटानी संबधित व्यक्तींच्या आठवणी अतिशय परिश्रमाने जमविल्या. नागदेव भट व बाइसा चक्रधराच्या सहवासात नसताना ज्या लीळा घडल्या त्या अशा प्रकारे संकलित झाल्या[२६]. इतिहासप्रकर्णातून ' लीळाचरित्र ' निर्मितीची सूत्ररूप माहिती अशा प्रकारे मिळते.

म्हाइंभटानी जमविलेल्या सर्व स्मृती पंथीय आचार्यांना ( नागदेवाना ) दाखवून ' दृष्टिपूत ' केल्या. मग ' उत्तरार्ध' पूर्वार्ध. दोनि विभाग केले.' [२७] ' स्मृतिस्थळा 'तील रचनाक्रमाचा उल्लेख ' पूर्वार्ध-उत्तरार्ध ' असा न होता

---

२५. ' भणौनि जैं लागौनि मी अनुसरला तैं लागौनि मज देखता जेआ लीळा सर्वज्ञाचिया वर्तलिया तिया मी अवाकितुचि ( मनन करीत ) असे : जैं मज पवाडु नसे सर्वज्ञाचिया सेवादास्यालागी कव्हणीकडे जावें तर जिये भक्तिजनें सर्वज्ञाजवळी असेति तेआंते येउनि पुसे : अन मी अनुसरलो नव्हतो तैं बाइसा देखतां जेआ लीळा वर्तलिया तिआ मिया सर्वज्ञातें पुसलिया . सर्वज्ञ प्रसंग प्राप्त निरुपिले ( इतिहास तेंही ) आवाकितुसे : आणि सर्वज्ञें जें निरुपिले परावर निरूपण तेंही आवाकितुचि असे : आणि अळजपुरींहोनि सर्वज्ञें बीजें केलें : तेथौनि प्रतिष्ठानपर्यंत जिआ लीळा वर्तलिया सर्वज्ञें प्रसगें भक्तिजनाप्रति सांगितलिया तिआही आठाविताुचि असे आणि सर्वज्ञें जें एकाकी राज्य केलें तिआ लीळा सर्वज्ञें भक्तिजनाप्रति सांधितलिआ तिया आठवितुचि असे : ( इतिहासप्रकर्णं )

२६. ' ऐसीया भटा अविद्यमानी बाइसा अविद्यमान जिआ लीळा तिआ माहिंभटीं जेथ जेथ सर्वज्ञ बीजें केलें होतें तेथ तेथ जाउनि लिहिलियाः ' ( इतिहास प्रकर्णं )

२७. स्मृतिस्थळ १४१.

' उत्तरार्ध-पूर्वार्ध ' असा झाल्याचे पाहून डॉ. शं. गो. तुळपुळे म्हणतात,[२८] याचे उत्तर हेच, की आधी ' उत्तरार्ध 'तयार झाला व ' पूर्वार्धा 'ची तयारी मागाहून झाली. परंतु म्हाइंभटानी त्याच्या आठवणीत ताजा असलेला चक्रधराच्या चरित्राचा ' उत्तरार्ध ' प्रथम हाती घेतला ही डॉ. तुळपुळे यांची कारणमीमांसा पटण्यासारखी नाही. नागदेवाचार्यांनीच ' उत्तरार्धा 'तील स्मृतिकथन प्रथम केले. त्यानंतर ' पूर्वार्धा 'तील नागदेवाचार्यांच्या अनुसरणापर्यंतच्या स्मृती विचारून संकलित करण्यात आल्या. चक्रधराच्या पूर्वायुष्याची कल्पना चक्रधरांनी भक्तजनाना सांगितलेल्या स्मृतींतून स्पष्ट झाली होती. अशा तऱ्हेने ' लीळा चरित्रा 'च्या रचनेत तिघांचा महत्त्वाचा वाटा आहे. १. एकांक—श्री—चक्रधर. २. पूर्वार्ध-म्हाइंभट. ३. उत्तरार्ध—नागदेव. या दृष्टीने पाहिल्यास ' एकांक ' हा आत्मचरित्राचाच एक भाग ठरतो आणि ' एकांक ' हे मराठीतील पहिले आत्मचरित्र व चक्रधर हे मराठीतील आद्य आत्मचरित्रकार मानावे लागतात.

' लीळाचरित्र ' रचनेतील म्हाइंभटांच्या कर्तृत्वाविषयीचे अन्य काही उल्लेख असे आहेतः—

१. **म्हाइंभटीं केली लीळेची शोधनी** . भटा दाखऊनी तीन्हीं रूपें . ।। ३३ ।।[२९]

२. **माहींभटबासी लीळावंद केला :** तो धाडीमाजी गेला सकळही ।। १ ।। .**लीळेचा संबंध माहींभटीकृत** : सकळही श्रुत हीराईसा ।। २ ।।[२९]

३ **प्रथम आरंभी लीळांचे शोधन । केले पूर्वजानें माहीभटी**[३०]

महानुभाव पंथात ' लीळाचरित्रा 'ची रचना म्हाइंभटानी केली, अशी समजूत असल्याचे डॉ. तुळपुळे सांगतात. त्या संदर्भात पंथीयांचेच वरील उद्‌गार म्हाइंभटाचे त्यातील नेमके कर्तृत्व उघड करतात. ' स्मृतिस्थळा 'त केवळ ' उत्तरार्ध-पूर्वार्ध ' रचनेचा उल्लेख आहे, एकांकाचा नाही. त्यातील स्मृती नागदेवापाशी होत्याच. शिवाय असेही म्हणता येईल, की ' एकांका 'तील स्मृती स्वतः चक्रधरकथित असल्याने त्या इतराना विचारण्याची फारशी आवश्यकताही

२८. ली. च. एकांक ( प्रस्तावना पृष्ठ ४ )

२९. कृष्णमुनी अन्वय स्थळ ( ओ. १३७ व १४३ ).

३०. राघव : चरित्र अराव. ( ह. ना. नेने : संशोधनलेखसंग्रह भाग २, पृ. ६९, ७५ ).

नव्हती. यामुळे ' लीळाचरित्रा 'तील ' एकाका 'च्या आत्मचरित्राची व ' पूर्वार्ध-उत्तरार्धा 'तील चरित्रस्वरूपाचीही निश्चिती होते.

म्हाइंभटांनी आत्यंतिक श्रद्धेने, निदिध्यासपूर्वक ' लीळाचरित्रा 'ची सिद्धता केली, हे त्याचे पर्थीयावर तसेच मराठीच्या अभ्यासकांवरही मोठे उपकार आहेत; परंतु ' म्हाइभटाचे लीळाचरित्र ' या प्रचलित कल्पनेतील सत्य पारखून ज्याचे श्रेय त्याला देणे हे वाङ्मयाभ्यासकाचे कर्तव्य आहे. महानुभाव पंथातील ' लीळाचरित्र ', ' गोविंदप्रभुचरित्र ', ' सिद्धान्तसूत्रपाठ ', ' दृष्टान्तपाठ ' या प्रमुख ग्रथांच्या लेखनकर्तृत्वाविषयी असणारे अनेक अपसमज वेळीच दूर होणे अगत्याचे आहे. या दृष्टीने महानुभाव पंथीय साहित्याचे थोर संशोधक डॉ. वि. भि. कोलते यानी चक्रधरांच्या लेखनकर्तृत्वाच्या संदर्भात केलेले विवेचन अतिशय महत्त्वाचे, साधार व मूलग्राही आहे.[31] त्या वाङ्मयाच्या अन्य संशोधक-अभ्यासकानी त्याचा विचार करणे अत्यंत आवश्यक आहे.[32] ' सूत्रपाठ ' व ' दृष्टान्तपाठ ' या ग्रथातील दार्ष्टान्तिकाचा भाग सोडला तर ती रचना प्रचलित समजुतीप्रमाणे केशवराजबासांची नसून निर्विवादपणे चक्रधराची आहे. त्याच्या स्फुट विचाराना एकसूत्रात आणून ग्रंथस्वरूप आणल्यामुळे महानुभाव पंथीयांनी उपरिनिर्दिष्ट ग्रथाचे श्रेय म्हाइंभट, केसोबास याना दिले आहे; त्याच्या स्वतंत्र निर्मितीचे नव्हे ! हा साक्षेप बाळगला नाही, तर वाङ्मयेतिहासातील अनेक अराजके शास्त्रपूत मानली जाऊन दुष्ट रूढी प्रस्थापित होण्याची शक्यता आहे. डॉ. कोलते यानी म्हटल्याप्रमाणे ' लीळाचरित्रा 'चा एकांक, सूत्रपाठ व दृष्टान्तपाठ या ग्रथांतील प्रमुख निवेदक श्रीचक्रधर हेच असल्याने त्याच्या निर्मितीचे श्रेय नि:संदेहपणे त्यानाच दिले पाहिजे. एरव्ही संकलक-सपादकालाच मूळ ग्रंथाच्या निर्मितीचे श्रेय देणे हे रूढिप्रियतेचे लक्षण मानावे लागेल.

## .. महानुभाव संत !

मध्यतरीच्या पाच-सहाशे वर्षांत महानुभाव पंथासंबंधी एक प्रकारची गूढता व त्यातून काही गैरसमज निर्माण झाले होते. त्याच्या निराकरणाचा

---

३१. सविस्तर माहितीसाठी श्री चक्रधर चरित्र प्रकरण ११ पाहावे.

३२. म्हाइंभटाच्या कर्तृत्वाबाबत डॉ. अ. ना. देशपाडे म्हणतात, ' लीळासकल-नात विश्वसनीयता आणण्यासाठी म्हाइंभटांनी घेतलेले परिश्रम लक्षात घेता, त्यानी श्री चक्रपाणी, श्री गोविंदप्रभु व श्री चक्रधर याच्या लीळांचे जे सकलन केलेलें आहे, त्याला ' आठवर्णांचा सग्रह ' असे सबोधणे समर्पक ठरणार आहे. [ प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड १ पूर्वार्ध पृष्ठ २८८ ].

जाणीवपूर्वक प्रयत्न पंथीयाकडून झाला नाही. मात्र या पंथाने निर्माण केलेल्या समृद्ध वाङ्मयसंपदेची जाणत्याना कुणकुण होती. त्याचमुळे राष्ट्रीय भावनेने भारल्या गेलेल्या एकोणीसाव्या शतकाच्या अखेरच्या काळातील विद्वानानी आपल्या इतिहासाच्या व वाङ्मयाच्या ठेव्याचा शोध सुरू करताच महानुभाव वाङ्मयाच्या संशोधनासही प्रारंभ झाला. लोकमान्य टिळकानीही त्याचे महत्त्व प्रतिपादिले. इतिहासाचार्य राजवाडे, 'सारस्वत'कार भावे यासारख्या विद्वानानी बुद्धिचातुर्य पणाला लावून, तर काही वेळा हिकमतीने या वाङ्मयाच्या सांकेतिक लिपीच्या किल्ल्या हस्तगत केल्या. महानुभाव महंताची समजूत घातली. त्याचा विश्वास संपादन केला. आणि हळूहळू महानुभाव वाङ्मयाचे समृद्ध भांडार मराठीच्या अभ्यासकाना खुले झाले. त्याची वाङ्मयीन श्रीमंती पाहून खऱ्या मराठी वाङ्मय-प्रेमींना हर्षाचे भरते दाटून आले. महानुभाव पंथीयानाही आपल्या पंथाविषयीचे गैरसमज नाहीसे करून स्वमत-प्रतिपादनासाठी ग्रंथप्रकाशनाची निकड पटली. त्यानी संशोधकाना लिपी समजावून दिली, हस्तलिखिते उपलब्ध करून दिली, प्रसंगी ग्रंथप्रकाशनाची जबाबदारी उचलली आणि 'महानुभाव' सारखे पंथाचे मुखपत्रही चालविले राजवाडे, वि. ल. भावे, भवाळकर, ह. ना. नेने, डॉ. य. खु. देशपांडे, डॉ. वि. भि. कोलते, वा. ना. देशपांडे इत्यादी थोर संशोधकानी महानुभावी वाङ्मयाची 'वाङ्मयी मूर्ती' शुद्ध स्वरूपात मांडण्यासाठी अत्यंत परिश्रम घेतले. डॉ. वि. भि. कोलते यानी महानुभाव पंथाचे तत्त्वज्ञान, आचार-धर्म सांगणारे, त्यांची लिपी प्रात्यक्षिकासह उलगडून दाखविणारे ग्रंथ लिहिले त्याच्या साहित्यकृतींची सुंदर संपादने केली. या अनुषंगाने आज महानुभावीय साहित्याचा शोध व बोध घेणे मराठीच्या अभ्यासकाना सोयीचे झाले आहे.

महानुभाव पंथाचे तत्त्वज्ञान, आचारधर्म व वाङ्मय याचा परिचय आज-पर्यंत प्रसिद्ध झालेल्या साहित्याने मराठी वाचकाना झाला आहे; परंतु पंथीय संताच्या जीवनाचा व कार्याचा परिचय घडविण्याची आवश्यकता होती. वारकरी आणि समर्थ संप्रदायातील संताचा परिचय महाराष्ट्राला जसा व जितका आहे, तसा महानुभाव संताचा मात्र नाही. श्री गोविंद प्रभु, श्री चक्रधर व श्री नाग-देवाचार्य याच्या जीवनावरील स्मृतिग्रंथ प्रसिद्ध असले तरी त्याची एकसंघ जीवन-चित्रे तयार झाली नव्हती. या चरित्रग्रंथात अनेक महानुभाव संताची व साहित्यिकाची स्मृतिरूप माहिती आली आहे. पण ती विस्कळीत असल्याने त्याचे एकसंध चित्र उभे राहात नाही. त्या दृष्टीने प्रस्तुत पुस्तकात श्री गोविंद प्रभु, श्री चक्रधर, नागदेवाचार्य, महेंद्रभट, महदाइसा व कवीश्वराचार्य भास्कर याची जीवनचित्रे साकार करण्याचा नम्र प्रयत्न करण्यात आला आहे. त्याच्या जीवनाच्या अनुषंगाने त्यानी लिहिलेल्या किंवा त्याच्याविषयीच्या वाङ्मयाचा मागोवा घेणे अधिक सोपे होईल. या 'महानुभाव संता'ची जीवने स्मृतिरूपाने साकार झालेली

असल्याने त्यांच्या व्यक्तित्वाचे अनेक आकर्षक पैलू त्यात साकार झाले आहेत. महानुभावाच्या चरित्रग्रंथांतील विस्कळित स्मृतिकण एकत्र करून या संताची 'वाङ्मयी मूर्ती' घडविण्याचा हा प्रयत्न आहे.

महानुभाव पंथात या सहाही संताचे स्थान फार महत्त्वाचे असे आहे. श्री गोविंद प्रभु व श्री चक्रधर हे पंथीय दृष्ट्या दोन अवतारी पुरुष, नागदेवाचार्य व भास्कर हे पंथाचे दोन आचार्य आणि महेंद्रभट्ट व महदाइसा हे पंथ संस्थापकाच्या निकट सहवासाचा लाभ झालेले व पंथीय दृष्ट्या मोलाचे कार्य करणारे संत आहेत. जीवनातील 'सत्' चा शोध घेणारे व आपल्या जीवनक्रमाने लोककल्याण साधणारे हे संत आहेत. त्यांच्या वैयक्तिक जीवनातील चढउतार, हर्षामर्ष याचा परिचय करून घेत असताना त्याच्यातील 'मनुष्य' जसा प्रतीत होतो, तसाच आत्यंतिक श्रद्धाभावाने प्राप्त झालेले त्याचे 'लोकोत्तरत्व' ही ध्यानी येते. अन्य पंथांतील साधु-संताच्या जीवनकथातील मानवी भावनाचे दर्शन सामान्य माणसाला त्यांच्याशी एकरूप होण्यास प्रवृत्त करते. महानुभाव संताचे जीवनही सामान्याना असामान्यत्वाकडे नेण्याची प्रेरणा देणारे आहे!

# २ : श्री गोविंदप्रभू

## हा इस्वर अवतारु होये

महानुभाव पंथसंस्थापक श्री चक्रधर यांचे गुरु गोविंदप्रभु हे पंथीयाच्या दृष्टीने परमेश्वरावतार होते. गर्भ, पतित आणि दवडणे या परमेश्वराने अवतार घेण्याच्या तीन प्रकारापैकी गोविंदप्रभूंचा ' दवडण्याचा अवतार ' होता. या अवताराने दवडलेला जीव वेडापिसा असल्याने त्याचे देहधर्म आणि स्वभावधर्मही स्वाभाविकपणेच या अवताराला स्वीकारावे लागले होते. त्याचे सर्व वर्तन ' मनुष्य व्यवस्थेस अन-सारखे ' होते. ते चालायचे शीघ्रतेने. बसायचे तर उकड, पायावर भार देऊन, पायावर पाय ठेवून. चालायचे तर ' गगनाची वास ' पाहात. धावणे दुडदुडु, बोलणे वेंभळ- ' मेली आए . मेली जाए ' असे शब्द नेहमी तोंडात असावयाचे. तोच शब्द पुन्हा पुन्हा बोलावयाचा. घ्यायचे तर एकदम आसडून. सेंगुळ वुडडे यासारखे पदार्थ द्यायचे म्हणजे टाकायचेच. नेसणे म्हणजे सोळा हाताचे वस्त्र निरीया घालून डोक्यावर त्याचा पदर घ्यावयाचा. उजवा भाग सोडून डाव्या अगावर पदर घ्यावयाचा. जे नेसायचे तेच पांघरायचे. त्याचे व्यक्तिदर्शन कसे होते ? ' मळवट : कुंकुम भरणे : माथा भाग जवादि भरणे : कर्णी सुकडी लावणे : पायी वाकि : गळा साखळ : भुकुटी तेल : वेणी : नाभिचुंबित खाड ( दाढी ) तथा स्मश्रु ' ' मूर्ति शामगौर होती, शरीराचे सौंदर्य ते ( ती ) नाही. वामनेत्र लावणे, वाम कनिष्ठिका वक्र करणे हे या मूर्तीचे आरीखपण होते. ''

महानुभाव पंथात गुंडम प्रभु किंवा गोविंद प्रभु या नावाने प्रसिद्ध असलेल्या या अवतारी पुरुषाचे आईवडिलानी ठेवलेले नाव ' गुंडो ' असे होते. अनंतनायक आणि नेमाइसा ही त्याच्या मातापित्याची नावे. रिद्धपुरापासून जवळच असलेल्या काटसरे गावचे ते कण्व ब्राह्मण. नेमाइसेला झालेली अनेक मुले दगावली म्हणून गोविंदप्रभूंचे नाव हे मूल तरी जगावे म्हणून ' गुंडो ' असे ठेवले. वर्षभरातच मातापिता इहलोक सोडून गेले. मामा आणि मावशी यानी त्यांना वाढविले.

सातव्या वर्षी मुंज झाली. तेव्हा उपाध्याने सांगितले ' गुंडो ! वों भवति भीक्षा देही : यणे शब्दे भीक्षा माग. ' तेव्हा गुंडो ' भीक्षा देही ' म्हणत; परंतु ओंकाराचा उच्चार मात्र करीत नसत. नंतर त्यांचे रीधपुरास आगमन झाले. बोपद उपाध्ये यांच्यापाशी त्यांचे वेदाध्ययन सुरू झाले. त्यांना एका दिवसात जे समजे, ते इतरांना महिना-महिना अभ्यास करून समजत नसे, इतकी त्यांची स्मरणशक्ती तीव्र होती. आपल्या गुरूसही ते कित्येक वेळा चुका सांगत. तेव्हा उपाध्ये म्हणत, ' म्हणता नायको वाचीता नायको . एकसरे नीगदिताचि आइकतो : गुंडो सामान्य नव्हे. हा इस्वर अवतार होईल, ' आणि गुरूची ही भविष्यवाणी खरोखरीच सार्थ ठरली.

शिक्षणसमाप्तीनंतर गोविंदप्रभु द्वारावतीस गेले आणि तेथे त्यांनी संन्यास घेतला. दुसऱ्या वेळी चांगदेव राऊळाकडून त्यांनी शक्तिस्वीकार केला आणि रिद्धपुरास येऊन जीवोद्धरणाचे कार्य त्यांनी सुरू केले. श्री चक्रधरांच्या देहात चांगदेव राऊळांनी प्रवेश केला असल्याने गोविंदप्रभूंच्या बाबतीत चक्रधर एकीकडून गुरु तर दुसरीकडून शिष्य होते, परंतु चक्रधरांनी आपली शिष्यत्वाची भूमिकाच अखेरपर्यंत ठेवली आणि आपल्या आचरणाने इतरानाही गोविंदप्रभूंचे माहात्म्य पटवून दिले.

गोविंदप्रभु हा एक उन्मनस्क आणि महानुभावीयांच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे ' आच्छादनीचा परहस्यावतार ' होता. त्यांच्या या अवतारित्वाविषयी वेळोवेळी अनेकांनी श्रद्धाभाव प्रकट केला होता. द्राविड देशीच्या एका ब्राह्मणास ' भविष्यपुराणा ' त ' रीधौरे गावात ईश्वर अवतार अवतरला ' असल्याचे वाचावयास मिळाल्याने त्यांची प्रचीती पाहण्यासाठी तो ब्राह्मण रिद्धपुरास आला व त्याचे समाधान झाले अशी आख्यायिका पंथीयांकडून सांगितली जाते. पंथाचार्य नागदेवानीही ' हा नव्हे देओ : रीधपुरी राज्य करीत असेति ' असाच श्रद्धाभाव व्यक्त केला आहे. स्वतः गोविंदप्रभूनीही कृष्ण–रुक्मिणी विवाहप्रसंगी आपल्यात व श्रीकृष्णात असणारी एकरूपता सुचविली होती. अवतारी पुरुषाचे अवतारीपण सामान्य जनांना पटावयाचे तर काही अद्‌भुताचे दर्शन त्यांच्या ठिकाणी घडावयास हवे अशी त्यांची अपेक्षा असते. ' चमत्काराशिवाय नमस्कार ' करण्यास सामान्य मनुष्य सहसा प्रवृत्त होत नाही, द्राविडी ब्राह्मणास आपले स्वरुप गोविंदप्रभूनी पुढील श्लोकात स्पष्ट करून सांगितले होते :–

नाहं मनुष्यो न च देवयक्षौ न ब्राह्मणक्षत्रियवैश्यशूद्रः ।<br>
न ब्रह्मचारी न गृही वनस्थो भिक्षुर्नचाहं निजबोधरूपः ॥

त्यांचे हे ' निजबोधरूप ' सामान्यांच्या आकलनापलीकडचे होते. त्यांच्या जीवनातील बिकट समस्या सुटण्यावर किंवा दैवी सृष्टीतील घटनांवर अशा पुरुषांनी

नियंत्रण ठेवून अन्यथा घडवून आणण्यावर थोर पुरुषाचे लोकोत्तरत्व त्याच्या दृष्टीने अवलंबून असते. अशा अलौकिक लीळा अवतारी पुरुषांकडून स्वाभाविकपणे तर भोंदू बुवाचेकडून सामान्याना दिपवून आपला प्रभाव टाकण्यासाठी होत असतात. गोविंदप्रभूचे वर्तन 'बाल समध पिशाच'वत् किंवा विदेही पुरुषाच्या आचरणास शोभणारे असे होते. त्याच्या आयुष्यात घडलेले अनेक चमत्कार त्याचे दैवी स्वरूप साकार करीत असले तरी गोविंदप्रभू त्याबाबत साक्षेपी होते असे म्हणता येण्यासारखे नाही. वेड्यापिश्याच्या देहधर्मानुसार आणि स्वभावधर्मानुसार त्याचे सारे जीवन घडत गेले. त्यात कदाचित् कोणास 'नागरपण' आढळणार नाही. पण सामान्य भूतमात्रांविषयी त्याच्या अंत:करणात भरून राहिलेली अथाग करुणा मात्र सर्वत्र आढळल्याखेरीज राहात नाही.

## राउळ माए · राउळ बापू : राउळ इस्वरु राउळ करीति ते काइ नव्हे ?

गोविंदप्रभूंच्या वर्तनात त्याच्या अलौकिक व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडल्याने भक्ताना वाटणारा आदरभाव हा थक्कितभाव होता : परंतु त्याची दुःखे निरसून टाकणारे अद्भुत प्रसंग मात्र गोविंद प्रभूविषयी भक्तिभावच निर्माण करीत आणि स्वाभाविकपणे त्याच्या मुखातून उद्गार बाहेर पडत, 'राउळ माए राउळ बापु राउळ इस्वर : राउळ करीति ते काइ नव्हे'. मायापित्याचे अंत:करण श्रीप्रभूंच्या ठायी त्याना आढळून यावयाचे आणि आपल्या व्यथा निपटून टाकणारा सखासोयराच त्याच्या रूपाने लाभल्याचा तृप्तोद्गार त्याच्या मुखातून निघावयाचा. श्री प्रभूचे चरित्र अशा अनेक चमत्कारकथानी भरलेले आहे. त्याच्याविषयीच्या या स्मृती म्हणजे कृतज्ञभावाची नोंदच होय. आपल्या गुरूच्या वासरासाठी इतर शिष्य डोक्यावर दोन दोन पेंड्या घेऊन येत असता गोविंदप्रभूची पेंडी मात्र अंतराळातून येताना दिसली. ( ३ ) ते झोपले असता त्याच्या देहापासून प्रकाश पसरल्याचे दिसले. ( ४ ) दामोदर नावाच्या एका लहान मुलाबरोबर ते खेळावयाचे. ते अकस्मात वारल्यामुळे त्याची आईबापे रडू लागली. तेव्हा श्रीप्रभूंच्या मनात 'अनुकंपा' उत्पन्न होऊन त्यानी जमिनीत पुरलेल्या त्याच्या प्रेतास काढून झाडून जिवंत केले. मृतबालक समजून मायपित्यानी त्याचा अव्हेर केला तेव्हा शेजारच्या एका म्हातारीस त्यानी ते मूल देऊन टाकले. तेव्हा तिला 'व्हाटीत पान्हावो आला.' तो पुत्र सतानीक झाला. ( ८ ) अळजपूर गावच्या एका ब्राह्मणाची फळती फुलती द्राक्षवेल त्यानी उपटली आणि वाळल्यानंतर ती लावली. 'तव ते तीसरा दीसीं फळीं फुलीं घडी मोडत आली.' ( २४ ) मुलाशी खेळत असता श्रीप्रभूंना त्यानी देवळात कोंडून घातले. नंतर पाहतात तर ते अदृश्य झाल्याचे दिसले. ( २७ ) देवळाच्या सादीत बसलेल्या एका मांजराकडे

(११५.) एकदा एक माळीण मोहाळु विकत बसली असता श्रीप्रभू तिथे गेले व मोहाळु तिच्याकडून सोलून घेऊन खाऊ लागले. त्यांचे दाम विचारून महेंद्रभट देऊ लागले. तेव्हा ती माळीण म्हणाली, 'आमुचा राउळीं मोहाळु आरोगीले : तु दामु काइसया देतासि ?' तिची ही श्रद्धा पाहून स्वाभाविकच 'म्हाइंभट उगेचि राहिले' (१७२.) एकाचा बैल चुकला तेव्हा श्रीप्रभूनी महारवाड्यामागे तो बसल्याचे सांगितले. तेथे जाऊन पहाता बैल आढळला. तेव्हा तो मनुष्य म्हणाला, "होती इस्वरु :' (२०८.) एका म्हातारीचा पुत्र तिच्यावर रागावून निघाला, तेव्हा गोविंदप्रभूनी त्याला समजावून परत पाठविला. (३०२.) त्याचा सहवास त्याचे गावातील अस्तित्व हे भाविकांना कल्याणप्रद असल्याची भावनाच यासर्व स्मृतीमागे असल्याचे दिसून येते.

## राउळ सांगति ते अन्यथा नव्हे :

अवतारी पुरुषाचे ठिकाणी वाचासिद्धी असते असा अनुभव भाविकाना येत असतो. गोविंदप्रभूची उक्ती आणि कृती ही भविष्यार्थसूचक ठरत असे. काही अनुभवानंतर लोकानी त्यांच्या कृतीचा विशिष्ट अर्थ लावण्यास सुरवात केली. एके दिवशी पाट, चौरंग, ताटथाळा अशा वस्तू श्री प्रभूनी घराबाहेर आणून ठेवण्यास सुरवात केली. लोक म्हणू लागले, राउळ आजिकाइ कुचिक देखत असेति ते नेणिजे : एवढ्यात आग लागून अवघा गाव जळाला आणि श्री प्रभूनी काढले तेवढे वाचले. (१७) एकाद्याच्या घरी कोणाचा मृत्यू व्हावयाचा असेल तर गोविंदप्रभू त्या घरी जाऊन अंगणात तिरडी तयारी करीत किंवा चोले वस्त्र पांघरून जात. (४१) केदाव नायकाचा गोठा झाडताना गोविंदप्रभूना पाहून त्यानी चौकशी केली तर बैल चुकल्याचे आढळले. (६८.) अळजपूरचा नेमाड पाडिया श्रीप्रभूंच्या दर्शनासाठी आला असता त्यानी त्याचे नाक, कान, डोळे, जातील असे सांगितले. त्यानंतर धाडी येऊन टेकिच्या रायाने नेऊन त्याचे डोळे काढले. स्मृतिकार म्हणतो, 'गोसावियाते वीनवीता तरि वाचते:' (६९.) तीकोपाध्याची बायको 'मरैलचि' इसे श्रीप्रभूनी सांगितल्यानंतर साप चावून ती वारली. (८१) तीकोपाध्येही त्यांचे अंगणात श्रीप्रभूनी काठ्याची कीडडी— केल्यानंतर ज्वर येऊन वारले. (८३.) एके दिवशी केशवनायकाच्या घोडवडी (तबेला) सी जाऊन गोविंदप्रभू म्हणाले, 'आवो हे सुटेल. हे न सुटे म्हणे: आवो हे सुटैलची म्हणे' एवढ्यात आग लागली आणि गोविंदप्रभूनी सांगितलेली घोडी तेवढी सुटली व बाकी सर्व जळाली. (२६८.) मानवी जीवनातील अपरि-हार्य दुःखाची वा संकटाची जाणीव अशा तऱ्हेने देऊन सामान्याच्या मनाची आध्यात्मिक तयारीच जणू ते करीत होते.

सामान्याना विलक्षण वाटणाऱ्या, क्वचित् अस्वस्थ करणाऱ्या अशा घटनामुळे एखाद्या व्यक्तीविषयी गैरसमजही होण्याची शक्यता असते. परंतु गोविंदप्रभूंच्या अवतारीपणाविषयी सश्रद्धाचा जसा विश्वास होता. त्याचप्रमाणे त्यांच्या निष्कपट, निरागस आणि अनासक्त स्वभावाचीही त्याना खात्री पटलेली होती. सर्व प्राणिमात्राविषयी त्यांच्या अंतःकरणात स्नेहभाव वसत होता. एकदा आउसेने तिच्या गुफेत निघालेला विंचू मारल्याचे पाहून गोविंदप्रभू तिजवर खूप रागावले. ( १९१ ) रंगीत वस्त्र नेसून आलेल्या आउसेस त्यानी ते बदलावयास लावले. ( १९२ ). एकदा म्हाइभटानी मोठ्या श्रद्धेने श्रीप्रभूसाठी साट आसूंचे मेघवणी पांघरावयाचे वस्त्र घेतले. तेव्हा ते ' कोपु नटले. ' ते वस्त्र त्यानी भुईवर घासले. आणि मोरीच्या चिखलात घातले. पायाने ते चिखलात कुसकरले. नागदेवाने म्हाइंभटास सांगितल्यानुसार त्याने शोकपूर्वक नमस्कार केल्यानंतर ते वस्त्र धुऊन श्रीप्रभूनी त्याचा स्वीकार केला. ( १७२. ) एकदा श्रीप्रभूना स्नान घालीत असताना म्हाइभटानी यज्ञोपवीतास चोखणी लावली. चांगले घासून धुतले आणि त्यांच्या हाती दिले. तर श्री प्रभूनी परत ते चिखलात घालून कुसकरले. ( २७४ ). एकदा स्नानानंतर त्याना चंदनाची भोरी करून अर्धचंद्र टिळा रेखून भागी जवादि भरली. तेव्हा ' आवो मेला जाय श्लेष्मा श्लेष्मा होय म्हणे ' असे म्हणून त्यानी ते सर्व पुसून टाकले. ( २९२ ).

अनासक्तबुद्धीचा आदर्शच अशा वर्तनाने ते अनुयायापुढे ठेवीत होते. सर्वांभूती समानभावाने पहाणे हा तर सर्वच थोर पुरुषाच्या व्यक्तित्वाचा विशेष असतो. गोविंदप्रभूही त्यास अपवाद नव्हते. कुणब्यापासून ब्राह्मणापर्यंत कोणाच्याही घरी ते भोजन घेत, पाणी पीत. त्याना सर्वत्र मुक्तद्वार असे. ( ६ ) एका तेलीणीचे पोर लाकाची भाकरी खात होते. ती आपल्या हातात घेऊन श्री प्रभू खाऊ लागले. तेव्हा तेलीण म्हणाली, ' राउळो ! राउळो हे भाकरी तेलीयाची ' तेव्हा श्री प्रभू म्हणाले, ' आवो मेली जाए : तेलीयाची नव्हे म्हणे हे लाकाची भाकरि : ' ( २९ ) मनुष्यनिर्मित भेदभावाच्या, स्पर्शास्पर्शतेच्या कल्पनाचे फोलपण ते अशा रीतीने दाखवून देत. एका गरीब म्हातारीने घरी तांदूळ नाहीत म्हणून राळ्याचा भात वाढला. तेव्हा श्री प्रभू म्हणाले, ' आवो मेली जायः सोनयाचा भातु म्हणे ' हे उद्‌गार ऐकल्यानंतर साहजिकच तिला धन्यता वाटली असली पाहिजे. ( ३० ) एका सामान्य स्त्री ( वेश्या )च्या पाठीवरील फोड आपल्या चरणस्पर्शाने श्रीप्रभूनी नाहीसा केला ( ४४ ). महारा—मांगाच्या घरी जाऊन, उतरंडी उतरून त्यात मिळेल तो पदार्थ ते आवडीने चाखत ( ४६, ४७ ) मातंग महाराप्रमाणेच दीक्षित ब्राह्मणाच्या घरी असणारा गोविंदप्रभूंचा हा सचार महाजनाना मानवत नसे. ( ४७. ) खाटकाच्या घरी जाऊन त्याचेकडील हाडामासांचे वजन ते करीत आणि उपाध्याच्या घरच्या रांजणात हात धूत. त्यांच्या या वर्तनाने

तेही म्हणाले, 'कोण ठावो—वरि राउळाते राखावे राउळा—वीण काइ कव्हणी ठावो असे!' श्री प्रभूंचे सर्वात्म स्वरूप अशाप्रकारे त्याच्या मनावर बिंबत असे. (४९.) एका वेडसर स्त्रीची चेष्टा करण्यासाठी कुणी तिला 'गोविंद प्रभूना ओवाळ म्हणजे ते चोळी देतील' असे सागितले. तेव्हा काजळ कुकू लेवून थाटाने येऊन तिने त्याना ओवाळले. गोविंदप्रभूनी तिचा भाव ओळखून महेंद्रभटाकडे पाहिले. त्यांनी तिला चोळी आणि दहा दाम दिले. (१५३.) वेस पडिताच्या छोट्या मुलीच्या तोंडातील आवळा मागून घेऊन श्रीप्रभूनी तो आवडीने खाल्ला. (१५७) एका ब्राह्मणाने त्यांच्याकडे येऊन स्वस्तिवचन केले आणि 'कन्या उपवर झाली असून विवाहासाठी द्रव्य नाही.' असे सागितले तेव्हा देवळाच्या उत्तरेस एके ठिकाणी अंगठ्याने उकरून दोन ओंजळी द्रव्य त्याच्या ओट्यात घातले. (९५.) दुःखिताचे आर्त जाणून त्याना सुखी करण्याचा प्रयत्न गोविंद प्रभु कसा करीत याची कल्पना अशा कित्येक स्मृतींवरून चागल्या प्रकारे येऊ शकते.

## इस्वरी काइ अवेवस्था असे ?:
## ऐसे काइ आवडत असे ?:

गोविंदप्रभूच्या ठिकाणी चागली विनोदबुद्धीही होती. त्यानी धारण केलेल्या देहस्वभावानुसार बालसदृश वर्तनही त्यांच्या हातून घडे आणि त्यामुळेही विनोदनिर्मिती होत असे. वाटेत आलेले कुत्रे आपणास चावेल म्हणून ते (आवो केकट खाइल म्हणे) घाबरू लागले (५९.) आपान वायु सरताना पृष्ठभागाला थाप मारून ते म्हणाले, 'मरतुं मरतुं फेंडि: बोंबातुसि कां' (१०१.) एकदा आबाइसा जेवत बसली असताना साखरेच्या डेऱ्यातून पसाभर साखर काढून श्रीप्रभूनी तिच्या ताटात घातली. तेव्हा 'म्हाइंभटो! धावा धावा असे ती ओरडली. (१२३.) स्नान करीत असता एक स्त्री म्हणाली, 'राउळ येते तरि माझी पाठि घासते' तेव्हा श्रीप्रभूनी तिची पाठ घासली आणि शेवटी तिच्या पाठीत धुमका मारून म्हणाले, 'मेली जाए: पुरे न म्हणे' (१२९.) एकदा महदाइसेस साप चावला, त्याचे विष श्रीप्रभूनी उतरविले आणि ते म्हणाले, 'आवो मेली जाए: माहादी सापें खादली म्हणे की माहादीया सापु खादला म्हणे' (१३१.) एकदा काडत असताना साधेने 'गोविंदु आइ: गोविंदु वाइ:' अशी ओवी गाइली. तेव्हा श्रीप्रभू म्हणाले, 'मर तु मर तुं (१७९.) याच साधेस आबाइसेने श्रीप्रभु पाक नासतील म्हणून राखण्यासाठी ठेवले होते. एवढ्यात श्रीप्रभू आल्याने ती ओरडू लागली. तव्हा उगाच का ओरडतेस म्हणून ते तिच्या मागे लागले. ती स्थूल असल्याने तिला पळता येईना. श्रीप्रभूनी 'पुढीले आगी श्रीकरे धरीले' आणि ते म्हणाले, 'आवो इळीया कापावे म्हणे: तळीव करावे म्हणे साबारे करावे म्हणे: खाडीव

करावे म्हणे राइते करावे म्हणे : बेलसरी घालावे म्हणे ! ' हे ऐकून आबाइसेला साधेने हाक घातली आणि तिने येऊन तिची सुटका केली. ( १८०. ) एकदा महदाइसेने तेलिणीकडून बाशिंग श्रीप्रभूंसाठी मागून घेतले. तेव्हा त्याना विवाहाची प्रवृत्ती झाली. तो एक खेळ त्याना करावयाचा होता. त्याची इच्छा वास्तव मानून इस्वर नायकाने आपली कन्या देऊ केली. ' आणि गोसावी कोपुं नटले ' विवाहाचे सर्व संस्कार करण्यात आले. कृष्ण—रुक्मिणी—विवाहप्रसंगी महदाइसेस काव्य रचण्याची त्यानी स्फूर्ती दिली. आपण स्वतः श्रीकृष्ण असल्याची सूचनाही त्यानी आपण रुक्मिणीच्या राउळी जेवल्याचे सागून दिली. ( २२४. ) श्रीप्रभू ज्याचेवर रागवत त्यास ' साणुबाइ या हो तुम्ही याते खा ' असे म्हणायचे एकदा साणुबाइच्या मठात स्वतःच जाऊन ते म्हणाले, ' ' आवो आता यातें खा ' आणि हसले. ( २५४. ) एकदा एका लहानपणीच्या मित्रास श्रीप्रभूनी धुमका हाणला. तेव्हा तो म्हणाला, ' हे काइ राउळ ! माते धुमकेंनि का हाणितले ! ' तेव्हा त्याच्याकडे हसत पाहून श्रीप्रभू म्हणाले, ' तू बोपा नव्हेस ? भोइया नव्हेस ? ( २५६. ) आपल्या बालमित्राच्या सहवासातील प्रसंगाचे स्मरणच जणू त्याना या निमित्ताने झाले होते.

बालकाची निरागसता त्याच्या बोलण्या-वागण्यात दिसून येते, तर बालकाशी खेळताना ते त्यातीलच एक बनत यात नवल नाही. त्यांच्यासमवेत लपंडावाचा खेळ खेळताना विनायकाच्या मूर्तीमागे ते लपून राहिले. मुलानी प्रथम पाहिले तेव्हा त्याना ते दिसले नाहीत. परत ' गुंडो ' अशी हाक मारताच ते तेथेच प्रकट झाले. ( १२. ) चिंचोऱ्याचा खेळ खेळताना त्यानी सर्व चिंचोरे जिंकले आणि नंतर ' होजे रे होजे रे ' म्हणून ते सर्व उधळून टाकले. त्यावर मुलाच्या झोंबी पडल्या. ( १३ ) विहिरींवर आंघोळीसाठी मुले व व गोविंदप्रभु गेले असता मुलाना पाण्यात बुचकळण्याचा खेळ त्यानी केला ' राउळो ! बुडाले : बुडाले ' म्हणून मुले ओरडत व त्याच्या कासेस लागत. (१५९.) वृद्धावस्थेत शिमग्याचा सण खेळण्याची त्याना प्रवृत्ती झाली. त्याच्या बालपणाचे स्नेही त्याच्यासमवेत खेळावयास आले. चार प्रहर रात्री त्यानी बाळकाचीया ऐसीया क्रीडा केली. चीखलु माती राख : शेन ऐसा खेळु केला . मग : कापुरु : कस्तुरि चंदन मळगे सेंदूर ऐसा खेळु जाला ( २८०. ) एकदा श्री प्रभू आडाजवळ जाऊन काठाशी उभे राहून आपले प्रतिबिंब पाहू लागले. आपल्याशीच बोलत, गोष्टी करीत. नखानी दाढी विंचरीत, हास्य करीत, आडात हात घालीत. आडाच्या काठावर लोंबता चरण ठेवीत. ' ऐसा खेळु करीति.' (२८८.) असाच खेळ त्यानी एकदा आरशासमोर उभे राहून केला व म्हणाले, ' आवो बोलते म्हणे गोष्टी करीते म्हणे : आवो हासते म्हणे : आवो नटते म्हणे : ' ( २९५. ) गावातील मुली वाळूसारा पूजीत असता त्याच्यामध्ये जाऊन त्यानी थोडा वेळ खेळ केला. ( ३०८. ) एकदा

गाईस स्पर्श करून, कुरवाळून पान्हा आणला. बाजूस बसून दोहण्याचा अनुकार केला. नंतर, ' आता पुरे ' हे वासरास होईल. ' आवो वासरू सौंडि साडि म्हणे ' म्हणोनि हास्य स्वीकारीति ( ३१६. ) एकदा राजणामध्ये त्यानी सूर्याचे बिंब पाहिले. ते आपल्या हातानी त्यानीं धरावयाचा प्रयत्न करतान्त्र पाणी हलले आणि बिंब दिसेनासे झाले. तेव्हा ते म्हणाले, ' आवो मेली जाय · यपेते (पळते) म्हणे : ' परत तोच खेळ त्यानी केला. हाताशी सूर्यबिंब आले नाही तेव्हा ' आवो मेली जाय : गेला गेला म्हणे ' म्हणोनि हास्य करीति ( २६०. ) एखाद्या मंदिरातील देवतेशीही त्यांचे संभाषण चालत असे. एकदा चंडिकापुरास गेले असता गणेश, चंडिकेच्या मूर्तींना त्यानी स्पर्श केला आणि म्हटले, ' आवो आवो मेली जाए तुं एथ आहासि म्हणे ' आणि तेथेच गाभाऱ्यात पहुडले ( ३१४. )

**ऐशी प्रसादाची नावे :**

थोर पुरुषांचा क्रोध, त्यांच्या शिव्या हा प्रसादस्वरूप मानण्याची भाविकाची भूमिका असते. गोविंद प्रभूंच्या मुखात असे काही शब्द वरचेवर येत. पण त्यातील निष्कपट भावच त्यातून व्यक्त होत असे. महदाइसा आबाइसेचा वाद ऐकून त्यानी महदाइसेस ' माहादी फेंदी दर्भेयाची दर्भी ' अशी शिवी हासडली. एकदा रागावले असताना ' आवो मेली जाए रुड मुड खापराखोड : माती मीळ म्हणे ' ऐसीया सवीया देति ( १३७ ) एकदा नागा राउळाची बहीण श्रीप्रभूंना भेटावयास आली. त्यावेळी ते झोपले असता तशीच त्याच्याजवळ गेली. तेव्हा ते जागे झाले व ' कोपु नटले, ' म्हणाले ' आवो मेली जाए बोडीकारी बोसारी बोचकवडी बोचकवडी होए म्हणे, ' ( १४० ) एक महात्मा व महात्मी सरिवीणा घेऊन आली व त्याना विविध राग गायले. तेव्हा श्रीप्रभू म्हणाले ' मर तू बोडी मोसारी आणि तीये उगीची राहिली. (१४१) स्त्रीवेषात आलेल्या एका महात्म्यास श्रीप्रभु म्हणाले, ' आवो ! मेला जाए बोडीकारू मोसारी ? पंचकवडीया: ' आवो मेला जाए जाए फेडि फेडिना म्हणे, : त्याने तो वेष टाकून दिला, तेव्हा त्याना संतोष झाला. (१४५) पाडव्याच्या दिवशी नगरस्त्रिया श्रीप्रभूंना ओवाळावयास येत. तेव्हा एकीस ओवाळताना ते म्हणाले, ' आवो पुश्चळी पुश्चळी होय म्हणे : ' तेव्हा स्वाभाविकच ' ते लाजीली (व) पळाली : ' ( १५२ ). इतरेजनाना चमत्कारिक वाटणाऱ्या या शिव्या भक्तजनांना ओव्यासारख्या वाटत. आपल्या अनुयायाना प्रसंगविशेषी गोविंदप्रभू विशिष्ट नाव ठेवीत व त्याच नावाने बऱ्याच वेळा त्याना संबोधीत. कोथळोबा हे अंगाने स्थूल, मोठे-धाटे होते. त्याना ते ' आवो कोथळा कोथळा होय म्हणे ' म्हणावयाचे. ( १९४. ) इस्वरनायक पुष्कळ पाणी प्यावयाचे. त्याना ' पाणिसंबळा ' म्हणावयाचे. त्याचे डोके मोठे असल्याने ' थोरू सीसा ' असेही ते त्याना म्हणत. श्रीप्रभूंच्या अशा तऱ्हेच्या नामकरणाबाबत

' ऐसी प्रसादाची नावे गोसावी ठेविली अशी भाविकांची भावना होती. २४८. म्हाईभटाना त्यानी ' चारू वारू ' हे नाव ठेवले होते. २५०. या नामकरणामागे श्रीप्रभूंची कौतुकाची, संतोषाची भावना असे.

गोविंदप्रभू रागावले म्हणजे ' आवो मेला जाए वोले दांडेवारि सीस लावावे म्हणे ' असे उद्गार काढावयाचे. ६३. त्याना भेटण्यासाठी दामूर्त आला असता थोड्या वेळाने त्यास त्यानी जाण्यास सांगितले. एकदोनदा सांगूनही तो गेला नाही तेव्हा रागावून जवळच्या एका नारळाने त्यास श्रीप्रभूंनी मारले. तेव्हा तो घरी गेला. हा प्रकार पाहून भक्तजन घाबरले नागदेव व म्हाइंभट दामूर्तीच्या घरी त्याच्या चौकशीकरता गेले. तेव्हा तो म्हणाला ' श्रीप्रभू ' आताच माझ्याकडे येउन गेले. माझ्या कपाळास स्पर्श करून म्हणाले, ' आवो मेला जाए : दुखवला म्हणे. ' माझे सर्व दुःख त्यानी निरखून टाकले. स्वाभाविकच त्या दोघानां मोठे सुख झाले अशी होती गोविंदप्रभूंची भक्तजनांविषयीची कणव. १०९ एक गृहस्थ गाडीत गूळ भरून विक्रीसाठी बाजारात आला होता. तेथे जाऊन श्रीप्रभूनी गुळास हात घातला, तेव्हा त्याने त्याचा हात धरला त्यामुळे श्रीप्रभु रागावले. पायाने तो गूळ विध्वंसिला. मातीत मिसळला. गूळ वाटल्याने महाजनापाशी गाऱ्हाणे नेले. तेव्हा महाजन म्हणाले, ' राउळांचा गावो राउळ समर्थ तू आधीच त्याना गूळ घेऊ दिला असतास तर तुला दुप्पट लाभ झाला असता. अजूनही जाऊन त्याना विनंति कर. मग त्याने येऊन त्याना विनविले. तेव्हा त्यास दुणा लाभ झाला ( १७३. ) भक्तजनाच्या आचरणात शैथिल्य नसावे या बाबतीतही त्याचा कटाक्ष असे. एकदां म्हाइंभटाची स्त्री देमाइसा व कोथळोबा पायावर पाय ठेऊन तांदूळ काडीत होते. ते पाहिल्यानंतर म्हाइंभटाच्या मनात विकल्प निर्माण झाला. एवढ्यात श्रीप्रभु तेथे आले व कोथळोबास म्हणाले, ' आवो मेली जाए पायावरुनि पाओं फेडि फेडि फेडि ना म्हणे ' ( १९७ ) कोथळोबाचे अंतःकरण त्यानी जाणले होते. म्हणूनच एके दिवशी म्हाइंभटाची समजूत घालून ते म्हणाले, ' आवो मेला जाए : कोथळा तैसा नव्हे म्हणे ' म्हाइंभटाने ते ऐकून त्याना दंडवत घातले. तेव्हा श्री प्रभु म्हणाले, ' आवो मेला जाए : कोथळोबासि घाल म्हणे ' म्हाइंभटाने कोथळोबास दडवत घातले आणि त्याचे ' वोखटे नीरपौनि फेडीले ' ( १९८ ).

भक्तजनाना प्रसाद म्हणून श्री प्रभु जे द्यावयाचे त्याचे मोल त्यांना विशेष वाटे. एकदा आपली हलणारी दाढ काढून त्यानी ती साधेला प्रसाद म्हणून दिली. ( १७५ ). एकदा नखे काढीत असता तीच साधेस दिली. तेव्हा तिने ती चिरकुटात घालून गळयास बाधले. ( १७६ ). इतरेजनाना तांबुलाचा प्रसाद मिळत असल्याचे पाहून साधे मनात म्हणाली, ' मी पोपीनि प्रसादा चुकत असे.' तिचा हा मनोर्थ

जाणून गालात धरलेली एक फोड श्री प्रभूंनी तिला प्रसाद म्हणून दिली. ( १७७ ). साधे या शिष्येविषयीचे त्याचे ममत्व अनेक स्मृतीतून दिसून येते.

गोविंदप्रभूंना खाण्यापिण्यात मोठी रुचि होती. त्यांना आवडणारे अनेकविध पदार्थ तयार करून घालण्यात भक्तांनाही मोठा आनंद वाटे. महदाइसेने पाककलेतील आपले कौशल्य पणास लावून श्री प्रभूंना संतुष्ट केले होते. आहाराच्या बाबतीत त्यांचा चोखंदळपणा असला तरी संयम मात्र नव्हता. त्यामुळे त्यांच्या आहाराला खादाडपणाचे अतिरेकी स्वरूप प्राप्त होत असे. त्यांच्या जीवनाचा अंतही अशा खादाडपणामुळे 'बहिरतीचा उपद्रवो' होऊनच झाला होता. म्हाइंभट व श्री प्रभु यांची प्रथम भेट या दृष्टीने लक्षात घेण्यासारखी आहे. त्याने येताना श्री प्रभूंसाठी गूळ आणला होता. त्याचा स्वाद त्यांनी कसा घेतला पहा. 'मेला जाए : आता होये म्हणे : म्हणौनि श्रीकरीं गुळु घेतला : श्रीमुखीं घातला : खावों लागले : आवो मेला जाए' गोड आहे म्हणे . म्हणौनि दुसरेनि श्रीकरें भेली श्रीमुखीं घातली : आणि आरोगु लागले . ते श्रीमुखुनि ओघळु नीगेति : ते खाड माखे : दोंदावरि गळे : ऐसा गुळु आरोगीला .' तेव्हा आबाइसेने त्यांना म्हटले, 'जी जी : पुरे कीजो : पोटु दुखैल :' असे म्हणून गुळाची दुरडी तिने आत नेली. ( ९७ ). नवचंडीसाठी कुमारी बोलविल्या होत्या. तेथे जाऊन गोविंदप्रभूंनी पाक चाखला. 'हे गोड आहे. हे नाही, हे आंबट, हे खारट, हे आळणी' असे म्हणून यथोचित आरोगणा केली. ( ११८ ). एकदा कणीक मवार न झाल्याने पोळ्या निबर झाल्या होत्या. तेव्हा 'हे पींढे पींढे होय म्हणे' असे ते म्हणाले ( १४७ ). सुकल्या भाजीत आलेले गवतही त्यांनी दाखविले. ( १४८ ). मैळभटाचे घरी ते गेले. तेव्हा 'तुप भातु . वळीयाचे आंबट : ऐसीं आरोगणा झाली.' तेवढ्याने समाधान न होऊन 'आणिक घाली म्हणे : मग आणीक आन्न वाढीले. मग थोडे आणि चवळेयाचें वरण तुप सेवटीं दुधभाताची आरोगणा जाली . ऐसी यथोचीत आरोगणा केली.' ( २०१ ). बोरे विकावयास आलेल्या माळणीकडील बोरेही ते आरोगीत. ( २१६ ). एकदा मधुकाकडी खाण्याची इच्छा त्यांना झाली. तेव्हाही रौरीच्या माळ्यास तसे स्वप्न पडून तो मधुकाकडी घेऊन आला (२१८). चैत्र वैशाखात गव्हाच्या ओंब्या खाण्याची आणि भाद्रपदात आंबा खाण्याची त्यांना इच्छा झाली. नागदेव, म्हाइंभटासारख्या भक्तांनी प्रयत्नपूर्वक त्या त्या वस्तू त्यांना आणून दिल्या. ( २१९ ). वाग्याची भाजीही त्यांना अशीच वाढण्यात आली. ( २२२ ). एकदा सर्व भक्तजन भुकेले असताना श्रीप्रभु एका गुन्हाळावर गेले. तेथे एकाने पाटीभर तीळ आणले होते. नंतर घागरभर काकवी आणली. तीळ काकवी एकत्र कालवून त्यांनी प्रसाद केला भक्तजनांनी दोन दोन घास घेतले. तेव्हा श्री प्रभुंनी 'डोळो डोळो' असे समाधानाचे उद्गार काढले. (२३९.) खातियाच्या घरात श्री प्रभु गेले असता त्यांना ताटामध्ये 'चारोळिया गोडंबीया :

उततियाचे कूट : खोबरेयाचे रवे : गुळु : साखर  ऐसे खाजे एकत्र करून चाढण्यात आले. तेव्हा त्याना समाधान झाले. ( २०४ ).

महदाइसा ही महानुभाव पंथातील कवयित्री. गोविंदप्रभूंच्या सेवेत तिने बराच काळ घालविला. श्रीप्रभूच्या स्वभाव वैशिष्ट्यांची तिला चागली पारख होती. तिने एकदा पासवडीची पाटी वाळत घातली होती. ती कोणीतरी नेली. श्री प्रभुनी गमतीने म्हटले ' आवो मेली जाए : पाटी चोरें नेली म्हणे : ' तेव्हा महदाइसा म्हणाली, ' गोसावी नेवों कसी दीधली ? ' हे ऐकून गोविंदप्रभु हसू लागले. ( ८६ .) आहारात धरबंद नसल्यामुळे त्याना उदरव्यथेचा त्रास वरचेवर होई. त्यावेळी महदाइसा शेगडी पेटवून शेक देत असे. ( ८७ ). महदाइसेने एकदा त्याना धिरडे करून घातले, तर तो ' आहीता ' असल्याचे गोविंदप्रभूनी सागितले. तेव्हा त्याना हवे असलेले धिरडे सुगरणपणाने तिने करून घातले. ( ८८. ) त्याच्याकरिता गरम अमृतफळेही तिने केली. ( ८९. ) गोविंदप्रभु ज्या वाटेने जात त्या वाटेवर झाडून, सडा टाकून महदाइसा चौक रंगमालिका भरीत असे. ( ९०. ) महदाइसेप्रमाणेच नागदेव आणि म्हाइंभटही अनेक दिवस श्रीप्रभूचे सेवादास्य करीत होते. चक्रधराच्या निर्याणानंतर श्रीप्रभूंच्या सान्निध्यात त्याच्या अहभावनेचा आणि ममत्वाचा निरास होऊन सेवावृत्ती व नम्रता अंगी बाणली. म्हाइंभटाचे ठिकाणी व्यवहारदक्षता होती. त्यामुळे रिधपूरचा मठ विकत घेण्याची व्यवस्था त्यानी केली. मठात येणाऱ्या भक्तजनाची व्यवस्थाही ते पाहात. श्रीप्रभूंना ओवाळण्यास येणाऱ्या स्त्रियाना एखादे वस्त्र आणि द्रव्य देण्याचे कामही ते करीत. उत्तम वस्त्रे व अन्न याबाबत असणारा त्याचा चोखंदळपणा श्रीप्रभूंच्या सहवासात कमी होऊन ' रेंदेया चेंदेया दरू भरिजे ' हे सूत्र त्यानी अंगी बाणविले.

## गोसावी कळेसि रूप केले

गोविंदप्रभूंच्या अवतारी स्वरूपाचे दर्शन भक्तजनाना अनेक प्रसगातून घडे. त्याचा चोखंदळपणा अनेक बाबतीत दिसून येई. त्याचप्रमाणे अनेक वस्तूची, कलाची परीक्षाही ते चागल्या प्रकारे करू शकत. गोविंदप्रभू नरसिंहाच्या चौकात बसले असता एक नाच चालला होता. नाचताना नाचणीचा ताल चुकला हे कोणाच्या ध्यानात आले नाही. परंतु श्री प्रभूंच्या ते लागलीच लक्षात येऊन ते म्हणाले, ' आवो मेली जाए : चुकली म्हणे एथ चुकली ' ते ऐकून ती नाचणी म्हणाली, ' जी जी : चुकलीये जी : माझीए कळे प्रमाण कव्हणीचि नेणे जी, ते गोसावी जाणीतले जीः माझेया दैवभाग्यासि उदो जालाः जे गोसावी माझीये कळेसि रूप केले. ' आपली परीक्षा करणारा जाणकार तिला त्याच्या ठायी आढळला. ( १०७. ) नृत्यपरीक्षेप्रमाणेच अश्वपरीक्षाही त्याना चांगली अवगत होती. करड मळ्यानजीक घोडे विकणारे हेडाउ उतरले होते. श्री प्रभू तेथे गेले आणि

घोडे पाहात म्हणू लागले, ‘ हा घोडा नीळा पाचासेयाचा हा गागा हा कुमैतुः हा बोरू : हा सरंगा : हा अस्व जातिचा . हा गजु : हा खरू आवो मेली जायः या तीनींचि जाति : चौथी नाही म्हणे : ’ हेडाउनी दंडवत घालून त्याना तूपरोटी दिली. ती आरोगणा करून श्री प्रभू तेथून गेले. ( १६१. ) केसवनायकाने विहीर खणली पण पाणी लागले नाही : श्री प्रभू तेथे गेले असता आपले दुःख त्याने श्री प्रभूंना सांगितले, तेव्हा एके ठिकाणी उजवा पाय आपटून तेथे त्यानी खणावयास सांगितले. ‘ मग तेथे खाणीतले : आणि जळात पाणी लागले. ’ ( १६४ ) सोन्याची पारखही श्रीप्रभूंना चागली होती. म्हाइंभट बाजारात नानवट्ट ( नाण्यांचा व्यवहार ) करण्यास बसत. तेथे जाऊन श्रीप्रभु बसले व काही नाणी काढून ‘ हे वाकट ’ हे खोलट : हे तुक मठ : होए : होए : हे नव्हे . ’ असे म्हणत काही वेळ त्यांनी खेळ केला. (३०५), सोवन्यांच्या जवळ जाऊन-कसवटी घेऊन तीस सोने लावीत. ‘ हे बावनकस. हे अठेचाळीस कस ’ अशी कसोटी पहात. ताजव्यात घालून वजन करीत ‘ हे पुरले हे न पूरे ’ असे म्हणत. ‘ गुंज वाल : जउ : तोळी दुतोळी : मासा ’ असा खेळ करीत आणि निघून जात. (३०६).

## गोविंदप्रभू आणि चक्रधर

रामयात्रेच्या निमित्ताने बाहेर पडलेले चक्रधर परमेश्वरपुरास आले आणि येथे श्री प्रभूकडून त्यानी ज्ञानशक्ती स्वीकारली ( लीचए ७, ). एकदा श्रीप्रभूंनी चक्रधराना चात्याच्या सूत बडविण्याच्या मोगरीने पृष्ठ भागावर तीन घाव दिले. तेव्हा बाइसा ओरडली ‘ वडीले बाबेनि धाकुटा मारिला. ’ चक्रधर मात्र आपल्या गुरूस म्हणाले, ‘ श्रीकरू दुखविती जी . पुरो दीजो जी . ‘ मग श्री प्रभूनी मोगरी टाकली : आपल्या गुरुविषयींचा चक्रधराचा आदरभाव विलक्षण होता. त्याची जपणूक करण्याविषयी ते फार जागरूक असत. श्रीप्रभूंच्या सान्निध्यात असताना स्वतःकरिता पूजा ते घेत नसत ( लीचपू. भा. २. पृ. १२ ). श्रीप्रभूना त्यानी एक वस्त्र प्रदान केले. ते नंतर बाईसेने धुळीने भरले म्हणून झाडले तेव्हा चक्रधर म्हणाले, ‘ हे रज कैसे हे ब्रह्मादीका दुर्लभ की ’ (लीचपू. भा. २, पृ. २० ).

## गोविंदप्रभूंचे वृद्धत्व व देहान्त

वयोमानानुसार गोविंदप्रभूंना वृद्धत्व आले. डोके मान हात थरथर कापू लागले. जेवलेले अन्न पचेनासे झाले आणि ‘ बाहीरितीचा उपद्रो ’ सुरू झाला. आबैसादि भक्त जनानी ‘ वोखद स्वीकरीजो जी ’ अशी विनंती केली ती नाकारून ते म्हणाले, ‘ आवो आता जाइजैल म्हणे : ’ त्याचे हे निरवानिरवीचे भाषण ऐकून नागदेवानी काकुळतीस येऊन श्री प्रभूना विचारले, ‘ श्री चक्रधरानी आम्हास तुमच्या स्वाधीन केले. आता आपण जायचे म्हणता. तरि आमते कवणासि

नीरोवींले जी : ' तेव्हा गोविंदप्रभू म्हणाले, ' आवो मेला जाए : ते आवघी तुज नीरोवीली आणि तुते श्रीदत्तात्रयप्रभु नीरोवीले '. चक्रधरानी आपल्या पंथाची धुरा वाहणारा समर्थ शिष्य म्हणून नागदेवाची निवड केली होती ती गोविंदप्रभुनीही सार्थ असल्याचे या उद्गारानी दाखवून दिले. धय संवत्सरी भाद्रपद वद्य चतुर्थीच्या दिवशी गोविंदप्रभुनी इहलोकातून प्रयाण केले.

**" माझे माहेर गेले : "**

गोविंदभूच्या या विलक्षण जीवनातही त्याच्या परम कारुणिक मनाचे दर्शन घडविणारा एक स्नेहबंध अस्वस्थ करणारा आहे. सर्व भूतमात्रावर स्वाभाविक स्नेहदृष्टी सर्वच महात्म्यात असते, परंतु अनाथ पोरक्या जीवांच्या जीवनात त्याच्या स्नेहपूर्ण शब्दाना आणि कृतींना फार मोठे स्थान असते. हे थोर पुरुष म्हणजे अशा दुबळ्या जीवाची ' श्रीमते माहेरे ' असतात. त्याच्या लौकिक आणि पारलौकिक सुखदुःखाची काळजी असे महात्मे वाहात असतात. गोविंदप्रभूना पितृस्थानी मानणारी एक लेक त्याच्या जीवनातील मानवी अंगाला स्पर्श करून जाते. पित्याचे हे कृपाछत्र नाहीसे होताच, वृक्ष कोसळताच वेली निराधार व्हाव्यात तशी ती विव्हळ झाली. त्याच्या या अलौकिक स्नेहसबधाचे दर्शन घेण्यासाठी ते प्रसग मुळातूनच वाचणे अगत्याचे आहे.

एके दिवशी अंगणात फेऱ्या घालत असताना श्रीप्रभु म्हणाले, ' लेकि जावाइ येईल. चीरचोळी घ्या. ' ही श्रीप्रभूंची मानसकन्या म्हणजे सावळापूरच्या एका ब्राह्मणाची सून. तिला कोणी मायबाप, भाऊ बहीण नव्हते. तिला मोठा सासुरवास व्हायचा. एके दिवशी तिच्या नवऱ्याने तिला खूप मारले आणि शिव्या घातल्या. ' चालती हो ' म्हणाला, तेव्हा ती रागाने निघताच नवऱ्याने विचारले, ' तू कुठे निघालीस ? '

ती म्हणाली, ' मी आपुलिया माहीयरा जाति असे. '

' कुठे आहे तुझे माहेर ? '

' हे नव्हे का रिधपुरात '

' तेथे कोण आहे '

' राउळ आहेत ना. असे म्हणून ती निघाली तेव्हा तिच्या समवेत हिचा पतीही निघाला.

आज गोसाव्याची कोणती लेक येणार याचा म्हाइंभट विचार करीत आहेत, एवढ्यात ही आली. गोसाव्यानी श्रीप्रभूनी लेकीस खेवदिली. ती त्याच्या गळयात मिठी मारून रडू लागली. नंतर आबाइसेने- तिला उटीले . न्हाणीले : जेउ

घातले पाच दिवसपर्यंत ती राहिलि नंतर म्हाइंभटानी तिच्यासाठी चीरचोळी घेतली. जावईबापूसाठी पासवडी घेतली. आणि नंतर उभयता परत गेली. पुन्हा एकदा ती आपल्या या मानस पित्यासाठी धिरडी आणि वाडगाभर तूप घेऊन आली. ती इतकी छान झाली होती की वाडग्यात धिरडी बुडवून ते ती खाऊ लागले. शेवटी आबाइसेने धिरड्याची दुरडी बाजूस काढली तेव्हा त्याचे खाणे थाबले. आपल्या पित्याची आवडी पुरविणारी ही त्याची वेल्हाळ बाळा होती. ( १५६ ) तिच्या जीवनातील माहेराच्या अन्यायाची पोकळी आपल्या अति स्नेहाळ वृत्तीने गोविंदप्रभूनी भरून काढली होती. ही दु:खार्त लेक आपल्याकडे येणार हे त्यांच्या प्रज्ञाचक्षूना आधीच जाणवले असल्याने तशी सूचना त्यानी म्हाइंभटादिकाना देऊन ठेवली होती

सावळापुरास गोविंदप्रभूंच्या निजधामगमनाची वार्ता गेली. पाणवठ्यावर गेलेली ही लेक वार्ता ऐकताच तेथेच घागर ठेवून दु:खाक्रात होऊन आली. ' ते दुखे करूनि ' डोळा काइ देखेना. आवघी वाट बापाकारणे रडीजे ' इकडे गोविंदप्रभूंच्या सर्वांगास चदन लेप देऊन फुले घातली होती. मुखी ताबूल घातला होता. नवा रेशमी शेला पांघरविला होता. नागदेव, म्हाइंभटानी त्याचा देह चिंचेतळी नेला व खड्डा खणू लागले. एवढ्यात ' पैलाकडौनि गोसावियाची लेकि आली. ' तिने श्री प्रभूची कीडडा पाहिली आणि तिने धाडकन जमिनीवर अंग टाकले. तिला मूर्च्छा आली. तेव्हा नागदेव म्हाइंभटानी धावत येऊन तिला सावध केले. ती हालल-विल्हळी रडू लागली. श्रीप्रभुंच्या देहावर अंग टाकून ' माझे माहेर गेले ' म्हणून मोठ्या आलापाने रडू लागली. तिचे हे दु:ख पाहून नागदेव म्हाइंभटाचे अंत:करणही दु:खाने व्याप्त झाले. सर्व भक्ताना मोठे दुःख झाले. नागदेव म्हाइंभट म्हणाले, ' हे साचोकारी गोसावियाची लेकी होए. ' नागदेव म्हणाले, ' आमते लाळिले : इस्वरू ऐसी प्रतीति आम्हासि एवढे दुख नाही. '

श्री प्रभूचा निक्षेप केल्यानंतर सर्वजण परत निघाले. तेव्हा आपल्या सोबत नागदेव म्हाइंभट गोसाव्याच्या लेकीलाही नेऊ लागले; परंतु ती येईना. माहेर-पणाची चीरचोळी त्यानी देऊ केली, पण तीही तिने घेतली नाही. ती म्हणाली, ' आता काई घेईन ? काई माझे माहेर आहे ? ' आणि परत निघून गेली. श्रीप्रभूंच्या निक्षेपाच्या ठिकाणी पुढे महाजनानी देउळी केली. ( २२५ )

गोविंप्रभूंचे व्यक्तित्व हे असे बहुविध आहे. त्याच्या वेडातही एक संगती आहे. त्याचे अंतर्याम प्रेमभावपूरित आहे. रंजल्या गाजलेल्याच्या पाठीवरून त्याचा दयार्द्र हात अनाहूतपणे फिरतो. अंतरीच्या दैवी शक्तीचा बडिवार माजवून स्वतः-भोवती तेजोवलय निर्माण करण्याची भावना त्याच्या जीवनात कोठेही आढळत

नाही. श्री चक्रधर, नागदेव, म्हाइंभट, महदाइसा यासारख्या महानुभाव पंथातील थोर व्यक्तींनाही खिळवून टाकण्याचे सामर्थ्य या बाह्यतः वेड्याबागड्या वाटणाऱ्या पुरुषात होते! त्याची वाचासिद्धी सामान्यांच्या मार्गदर्शनासाठी असे. त्यांच्या शिव्या म्हणजे भक्तजनावर होणारा पुष्पवर्षावच होता. मातंगापासून दीक्षितापर्यंत होणारा त्याचा मुख्य संचार त्याच्या समभावाचे दर्शन घडवितो. परमार्थाच्या रंगात रंगलेले श्रीप्रभू लौकिक वर्णाश्रमांच्या चौकटी जुमानीत नाहीत. वादविवादात तत्त्वनिरूपणांत गढलेले श्री प्रभु आपल्याला आढळणार नाहीत. पण त्यांच्या जीवनातील अनेकविध प्रसंग अत्यंत बोलके, सूचक आणि क्रांतिकारक असे आहेत. त्याच्या अंतरंगाचा शोध जितक्या आत्मीयतेने, जिव्हाळ्याने घ्यावा, तितके ते ते अधिकाधिक प्रत्ययकारीच आढळते. त्यांचे व्यक्तित्व हे बाह्यतः एक कोडे वाटले, तरी त्यातील ' थोर कणवे 'चा धागा आपल्या हाती लागताच ते उलगडू लागते आणि बहुचित्रदर्शकाप्रमाणे ते हृद्य आणि मनोरम वाटू लागते.

# ३ : ‘ सर्वज्ञ ’ चक्रधर

‘ गौर श्रीमूर्ति . लाव कान विसाळ नेत्र ’ अशी सौंदर्यलक्षणे असलेले श्री चक्रधर हे महानुभाव पथाचे संस्थापक होत. त्याचे हे ‘ वेधवंती ’ रूप अनेकाना आकृष्ट करीत असे. स्त्री-पुरुष सारेच त्याच्या ह्या व्यक्तित्वाने भारून जात. ‘ स्त्रियापुरुषाच्या ऐसा वेधु नाही ’ असे त्याचे आकर्षक रूपसौंदर्य होते. चक्रधर हा दैवी अवतार असल्याची पथानुयायाची श्रद्धा आहे. ‘ आमुचे गोसावी साक्षात श्रीकृष्ण चक्रवर्ति ’ अशी त्याची भावना होती. भोळ्या प्रापंचिकाच्या उद्धार करण्याकरिता त्याचा अवतार होता. ‘ यापरी परमेश्वरू श्री चक्रधरू जीवाते उद्धरती ’ ( लक्षण स्थळ . भाष्य सूत्र ६६ ) आणि ही प्रतीती आलेले भक्त-जनही अनेक होते. स्वत श्री चक्रधरानीही आपले हे अवतारी स्वरूप अनेक-वेळा स्पष्टपणे सागण्याचा प्रयत्न केला. ‘ सीधु रे सीधु ’ परी सीधाते कोण्ही देखेना . ’ ( ली. च. ए. ४७ ) ‘ हे तुमचे नव्हे . याचे नव्हे : हे कन्हणाचेंही नव्हे : ’ ( ली. च. ए. ४५ ) ‘ एथ जातिकुळ नाहीं : खुंटदावें नाहीं ’ ( १६ ) महानुभाव पंथीयाना पूजनीय असलेल्या पंचकृष्णामध्ये श्री चक्रधराचा अंतर्भाव होतो. त्याचे लौकिक स्वरूप अनेकविध चढउताराचे, चमत्काराचे आणि दैवी सामर्थ्याचा प्रत्यय देणारे असे आहे.

## चक्रधरांच्या जीवनाची रूपरेषा :

भावी काळात महानुभाव पंथाचे संस्थापक व अवतारी पुरुष म्हणून सर्व-प्रसिद्ध झालेले चक्रधर याचे मूळचे नाव हरपाळदेव. गुजरातेतील भरवस राज्याचा राजा मल्लदेव याच्या विशाळदेव या प्रधानाचा हा मुलगा. शके १११६ ( सन ११९४ ) मध्ये याचा जन्म झाला. हरपाळदेव बावीस वर्षाचा असताना झालेल्या सिंघण यादवाच्या स्वारीत याने युद्ध केले. त्यानंतर झालेल्या आणखी एका स्वारीतही तो लढला. त्याच्या पत्नीचे नाव कमळाइसा. तारुण्याच्या काळातच त्याला द्यूताचे व्यसन जडले होते. वयाच्या सव्विसाव्या वर्षी अल्प आजाराने तो

अकस्मात निधन पावला. त्याचवेळी फलटणचे चागदेव राऊळ यानी त्याच्या देहात प्रवेश केला अशी कल्पना आहे. मृत हरपाळदेव जिवंत होऊन पत्नीसमवेत पुन्हा त्याने कालक्रमणा करण्यास सुरुवात केली. चांगदेवानी हरिपालाच्या मृत-देहांत प्रवेश करून अवतार स्वीकार केला. त्याचे सर्व देहस्वभाव त्यानी स्वीकारले. कमळाइसाने विचारलेल्या एकातातील विहरणाच्या खुणाही त्यानी सागितल्या आणि माता माल्हनी देवीचीही खात्री झाली की ' आपुलाचि कुमर जियाला ' चक्रधराच्या जीवनातील परिवर्तनाचा कालखंड येथूनच सुरू होतो.

पत्नी कमळाइसेशी द्यूताचे पैसे देण्याच्या निमित्ताने झालेला संघर्ष चक्र-धराच्या मनात लौकिक प्रपचाविषयी आत्यतिक विरक्ती निर्माण होण्यास प्रेरक ठरला. गोपाळमंत्राच्या परंपरागत दीक्षेमुळे ' गोपाळन्ही आण ' घेण्याची त्याना सवय जडलेली होती. द्यूताचे पैसे देण्याकरिता दागिन्यांची मागणी त्यानी केली, तेव्हा कमळाइसेने नकार देताना ' गोपाळन्ही आण ' घातली. त्यामुळे घरादाराचा त्याग करून श्रीचक्रधरानी रामटेकच्या यात्रेस जाण्याचा निर्णय केला. मातेने पुत्र-प्रेमामुळे त्याला बाहेर पडण्यास विरोध केला, पण शेवटी काही सेवकाना चक्रधरा-समवेत देऊन त्यानी रामटेकच्या यात्रेस त्याना परवानगी दिली. त्या सेवकानाही चुकवून चक्रधर जे निघाले ते ऋद्धिपूर येथे आले. तेथे असताना श्रीगोविंदप्रभु या सिद्धपुरुषाचे शिष्यत्व त्यानी पत्करले, श्रीगोविंदप्रभूंनी त्याना पराशक्ती दिली व त्याचे 'चक्रधर' असे नामाभिधान केले. यानंतर सालबर्डीच्या डोंगरात चक्रधरानी बारा वर्षे मौनावस्थेत तपश्चर्या केली. तपश्चर्येनंतरच्या काळात त्यानी देशसंचारास प्रारंभ केला. या संचारात त्यांना काटोल येथे उधळीनाथाकडून चयस्तंभिनी विद्येची प्राप्ती झाली. या परिभ्रमणात वरंगळ भागातील एका घोड्याच्या व्यापाऱ्याच्या हंसाबा नावाच्या मुलीशी त्याचा विवाह झाला; परंतु नतर एका अवधूताच्या दर्शनाने परत विरक्ती उत्पन्न होऊन त्यानी देशाटन सुरू केले. एलिचपूर येथील रामदरणा या सस्था-निकाशी पुढे त्याची गाठ पडून त्याच्या उमादेवी या मुलीशी चक्रधराचा विवाह झाला. काही काळानंतर विरक्तवृत्ती निर्माण होऊन चक्रधरानी चंद्रभागेत बुडी मारली. ते बुडाले असे कळल्यामुळे दुःखातिरेकाने उमादेवी मरण पावली. परतु चक्रधर मात्र परतीरावर पोचले होते. त्याना उमादेवीच्या निधनाची वार्ता कळताच त्यानी सर्वसंगपरित्याग केला. व विदेहावस्थेत ते भटकू लागले. ( त्याच्या या तिसऱ्या विवाहाबाबत सशोधकात मतभेद आहेत. ) विरक्तावस्थेत भटकत असताना ' मार्गी चालवेयाची प्रवृत्ति नाही : ' काट्यात केशकलाप गुंफत. ते वाऱ्याने किंवा एखाद्या मनुष्याने काढावेत तेव्हाच निघावयाचे. शरीर ओरखडले जाई. काटे रुपत. रक्ताचे बिंदू निघत. ' ते साहाज पन्हरेयावरी मानुकुली तैसी मीरवति ' ते सोन्यावर माणिक शोभून दिसावे तसे दिसत. या एकाकी परिभ्रमणात त्याना भाडारेकर, रामदेव ऊर्फ दादोस, नागूबाई व बोणेबाई हे शिष्य मिळाले.

भोगावतीच्या तीरावर त्याना श्रीदत्तात्रेयाचे दर्शन झाले. त्यानतरच्या काळात त्यानी संन्यासदीक्षा धारण करून धर्मप्रचारार्थ आपले आयुष्य वेचले. चक्रधराचा हा एकांक काळ सपल्यानंतर त्याच्या पुढील आयुष्याचे पूर्वार्ध व उत्तरार्ध असे दोन भाग होतात. पूर्वार्ध नागदेवाच्या अनुसरणाने संपतो व नागदेवाच्या अनुसरणापासून चक्रधराच्या निर्वाणापर्यंतचा काल उत्तरार्ध मानला जातो. पैठण हेच त्याच्या कार्यक्षेत्राचे प्रमुख केंद्र असावे असे दिसते.

चक्रधराच्या निकट सहवासातील व्यक्तींनी सागितलेल्या आठवणी आणि महदाइसेसारख्या जिज्ञासू शिष्येने विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देताना स्वतः चक्रधरानी टाकलेला आपल्या पूर्वायुष्यावरील प्रकाश यामुळे चक्रधरांचे दर्शन शक्य आहे. चक्रधरविषयक श्रद्धाभाव ‘ लीळा चरित्रा ’तील स्मृतींतून प्रकट होत असला, तरी वास्तवाच्या पार्श्वभूमीवरच त्याचे कथन झाले असून नागदेवासारख्या आचार्यांनी त्याची पारख केली आहे, हे लक्षात घेता त्याचे चरित्रविषयक मोल अधिकच वाढते.

## चक्रधरांचे रूपसौंदर्य

सामान्यांपासून असामान्यापर्यंत चक्रधराच्या विद्वत्तेने, अवतारित्वाने जसे आकृष्ट केले, त्यात त्याच्या रूपसौंदर्याचाही वाटा फार मोठा होता. त्यांच्या शारीरिक लावण्याचा उल्लेख भक्तांनी अनेकदा श्रद्धाभावाने केला आहे. चक्रधराच्या भेटीस आलेला राहीनायक म्हणतो, ‘ आग उघडे घालि गाजी : डोळेयां हो देइजो पारणेः ’ ( पू. भाग १ : १२९ ) ‘ अया : कैसे सौंदर पुरुषु : साक्षात गोरक्षनाथुः ( पू. भा. १ : १७६ ) असे उद्‌गार जोगी आणि जोगिणीने काढले. पुष्कळ राजकुमर पाहिले, पण ‘ ऐसे सूंदर्ये कव्हणी ठाइं नाही ’ ( उ. भा. १ ६१ ) असे एका राउळालाही वाटले. चक्रधराची ‘ बत्तीस लक्षणी श्रीमूर्ती ’ होती. महदाइसेलाही ‘ कैसे गोसावीयांचे डोळे बरवे ’ ( उ. भा. २ ३७७ ) अशी प्रतीती आली होती. ‘ कैसा जोगिया बरवा ’ असे यादवराजालाही वाटले होते. गोसाव्यांची श्रीमूर्ती पाहणारा सारंगपंडित म्हणाला, ‘ द्वापरी श्रीकृष्णचक्रवर्तीचिए श्रीमूर्ति वेध ध्वनिघेता न पुरेचि ते आता घेति असेति. ’ ( उ. भा. २: ३२५ ) सामान्य स्त्रियानाही त्याच्या रूपाचा अभिलाष निर्माण झाला होता. ( उ. भा : २ ३२८. ) गोसावि आंगी टोपरे कासीत असताना महदाइसा म्हणाली, ‘ आमचे गोसावी कैसे नागर ’ ( उ. भा. २ : ३६१ ) अशा तऱ्हेने चक्रधरांच्या रूपसौंदर्याचा ‘ एक नरनारी समानचि वेधु ’ होता. ( उ. भा. २ : ३६८. )

## चक्रधरांचे व्यक्तित्व

सामान्याना चक्रधराच्या रूपसौंदर्याने प्रथमदर्शनी प्रेम निर्माण झाले तरी अज्ञान्याप्रमाणेच ज्ञानी पुरुषानाही चक्रधरांचा सहवास हवाहवासा वाटे तो त्याच्या

अंगभूत गुणांमुळे! समाजाचे अंतरंग जाणून त्याच्या दुःखावर फुंकर घालणारा, आपले अवतारी स्वरूप लपवून, सामान्यातील एक होऊन राहणारा, अन्य देव-देवता व थोर पुरुष याच्याविषयी आदरभाव ठेवणारा, आपल्या शिष्याच्या सुप्त गुणांना पालवी फोडणारा, आपल्या गुरुत्वाचे ओझे वाटू न देता शिष्याशी मोकळे-पणाने हास्यविनोद, क्रीडा करणारा हा थोर महात्मा होता. द्यूताच्या निमित्ताने त्याच्या जीवनात जे परिवर्तन घडले तेव्हापासून त्याच्या ठिकाणी तीव्र विरक्ती निर्माण झाली. अवस्था स्वीकार केला, त्यानंतरच्या जीवनातही विवाहप्रसंग घडले तरी तितक्याच निर्लेप वृत्तीने त्यानी त्या बंधनांचा त्यागही केला. वैयक्तिक जीवनातील त्याची ही निर्भय वृत्ती असली तरी लोकजीवन सुखी करण्याकरिता आपल्या सबंध आयुष्यात त्यानी प्रयत्न केला. साधुपुरुषाची नम्रता आणि साधी सरळ वृत्ती त्याच्या ठिकाणी होती. राजपुरुषाकडून त्याना सत्काराची वा व्यक्तिमाहात्म्य वाढविण्याची अपेक्षा नव्हती, म्हणून महादेवराव यादवाची भेटही त्याना घतली नाही. आपापल्या भक्तिभावानुसार विविध दैवताच्या उपासना करणाऱ्याची हेळणा करणे त्याना आवडत नसे. म्हणूनच भटव्यासास उद्देशून ते एकदा म्हणाले, 'वैरीयाचा देवो जाला तरी काइ दगडें फोडावा' (पू. भा. १ : १८५.) आपेगावी गेले असता त्यानी विज्ञानेश्वरास देवविडा वाहिला. 'दोहीं श्रीकरीं लिंग सरीशीले' (पू. भा. २ : ३०२.) त्याच्या ठिकाणच्या असंग्रही आणि निरिच्छ वृत्तीमुळेच त्याना वाटमारीचे भयही वाटत नव्हते. आपल्या शिष्या-संबंधीही त्याची हीच भावना असे. जाणाऱ्या किंवा त्याचेजवळ राहणाऱ्या शिष्याविषयी त्यानी अशीच परखड वृत्ती दाखविली. आपले गुरुपण वाढविण्या-साठी शिष्याना आपल्या नादी लावण्याचा प्रयत्न करणाऱ्या अन्य तथाकथित गुरूपेक्षा चक्रधरांची ही वृत्ती अधिकच प्रभावशाली वाटते. आपल्यावरील गुरूची विशेष कृपा दर्शविण्यासाठीं चक्रधराजवळ 'एकान्त' मागणाऱ्या दादोसला ते म्हणाले, 'एथ कोण गा लोकान्तु असे?' (उ. भा. १ १) नागदेवाची संसारग्रस्त पत्नी चक्रधराकडे येऊन तिने अपशब्द उच्चारले तरी तिच्या अंतरंगाची व्यथा ते जाणतात. चोळी-कापड देऊन तिची ते पाठवणी करतात व नागदेवासही 'प्राणिया एकु वाट पाहात असे' (उ. भा. १ : ३०) असे सांगून तिच्या समवेत पाठवितात. बंधनमुक्त झालेल्या गदोनायकाला भेटून ते त्याची इच्छा पुरवितात. (उ. भा. २ २३१.) आपण नसल्यामुळे भटोबासाला एकटे वाटेल या भावनेनेही ते व्यथित होतात. असे त्याचे अंतःकरण करुणामय होते. मठावर घाला घालणाऱ्या चोरांना उद्देशूनसुद्धा ते 'मुनीए आलेगा' असे शब्द वापरतात. (उ. भा. २ . ४३५.) त्याच्या रूपसौंदर्याने भाळलेल्या सामान्य स्त्रियाची त्याना कीव येते.

सर्व जीवमात्रांवर सारखेच प्रेम करणाऱ्या चक्रधराच्या ठिकाणी स्त्री-पुरुष, स्पृश्यास्पृश्य असा भेदभाव नव्हता. त्याच्या सौंदर्याने आकृष्ट होऊन जवळ आलेल्या चांभाराला त्यानी जवळ केले ( एकाक १२ ). स्मशानवस्त्र घेणाऱ्या चक्रधरांना विरोध करणाऱ्या एका महाराला नंतर मोठा पश्चात्ताप झाला. ( एकांक ६० ) जोगेश्वरी असताना तिथे मातग आले. त्यानी चक्रधराच्या दर्शनाचा धरलेला आग्रह त्यानी पुरविला. ( उ. भा. १.५७ )

चक्रधराचा अनेकविध विषयाचा अभ्यास फार चांगला होता आणि भाषाप्रभुत्वही मोठे होते. ते मूळचे गुजराती; परंतु ' ते मऱ्हाठी अनवरत बोलत असेति ' असे गणपती आपयो म्हाइंभटाला सागतो. ( उ. १११. ) संस्कृत भाषेत चर्चा करणाऱ्या म्हाइंभटास त्यानी स्वाभाविक संस्कृतमध्ये अधिकारवाणीने चर्चा करून निरुत्तर केले. निरूपणाच्या व अन्यही काही प्रसंगी चक्रधराच्या मुखातून संस्कृत सुभाषिते व वाक्यांश स्वाभाविकपणे प्रकट होत आणि त्याच्या मूळच्या भाषेला प्रौढता आणि गोडवा प्राप्त होत असे. त्याची मातृभाषाच गुजराती असल्यामुळे गुजराती वाक्ये ही त्याच्या बोलण्यात येत. चिंचाएरचा एक गुजर आला असता त्याच्याशी त्यानी गुजरातीत भाषण केल्याने त्याला मोठे समाधान वाटले. गोसाव्याचे डोळे किती वरवे म्हणणाऱ्या महदाइसेस ते म्हणाले, ' बाइ गुजरात म्हणीतलें तें डोळेयाचे दीप कीं : ' ( उ. भा. २ ३५८,३७७. ) बारा वर्षे क्षेत्रसन्यास घेतला आणि जेथे वस्ती केली तेथील देवतेचे नावही न जाणणाऱ्या व्यक्तीबद्दल त्यानी गुजरातीतूनच एक दाखला दिला. ( उ. भा. २ २९६—२९७ ) जालंधर गोविंदचंद आणि लुइपाइ याच्याविषयीच्या कथांतूनही गुजराती भाषेचा अवलंब मुक्तपणे केला आहे. ( उ. भा. २: ४०६—७. )

संस्कृतातील अध्यात्मग्रंथ, श्रुति-स्मृति-पुराणे याचाही त्याचा व्यासंग चागला होता. भगवद्गीता हा महानुभाव पंथाचा प्रमाणग्रंथ. त्यातील तत्त्वज्ञानावर आधारित विवेचन अनेकदा चक्रधर करीत. समकालीन अन्य पंथाचे तत्त्वज्ञान, त्याचे ग्रथ याचाही त्याचा चागला अभ्यास होता. सकल विद्या, औषधी याचा त्याना परिचय होता. ( उत्त० ४५५ ) अश्वपरीक्षा ते उत्तम करीत. वज्री ( वारि तुरग ) तयार करण्याची कलाही त्याना अवगत होती. पाषाणाच्या अनेकविध जाती ते जाणत ( उ. भा. २.८८ ) नृत्यकलेचेही त्याना प्रेम होते. जोमाइसेला लाकाचे ढीडरे आवडायचे, पण ते तिला पचत नसल्याने चक्रधरानी तिला नृत्य करावयास सागितले. ( पू. भा. इ. २०८ ) एकदा चक्रधर चांगदेवाकडे गेले असता तेथे पेरवणाइत पेरवणे ( नृत्य ) करण्यास आले. नाचणी कास घालूनी आली. त्याची कला पाहून चक्रधराना आनंद झाल्याचे पाहून त्याना मोठे समाधान वाटले. जाताना त्यानी म्हटले, ' जी जी इतुले दीस कला पोरटिया जालिया होतिया :

आजी सकाळचे माहेर भेटले' (पू. भा. १:२०) चक्रधराना ग्रहनक्षत्राचेही चांगले ज्ञान होते. शुक्र नक्षत्राची माहिती त्यानी उपाध्याना एकदा दिली. (पू. भा. २.२१९.) किमयाशक्तीचीही त्यांना कल्पना होती. 'पिवळी दाढी' म्हणजे 'तांबेयाचे सोने कीजे' आणि 'पांढरी दाढी' म्हणजे 'कथीलाचे रूपे' अशी माहिती ते नाथोबांना देतात. (पू. भा. २.२१५) शेतीचेही ज्ञान त्याना होते. एका शेतात नागदेवाने सहज नागर धरला असता त्याला वोरंभा फुटेनासा झाला. तेव्हा चक्रधरांनी कटिप्रदेशी फुटा वेढिला आगच्या वाह्या वर केल्या. 'श्रीकरी तुता घेतला : रुंभणयापासि दोरू धरिला मग गोसावी बैल थापटिले चास उजूचि नेले: मागुते आणिले." तेव्हा तो कुणबी म्हणाला, 'अवधेया वाहावळाचा बापु जालासि :" (उ. भा. २ ३२७) एकदा ढोरेश्वराकडे जात असताना चक्रधरामागून भक्तजनांची मादी येत होती. पिंपळेश्वराकडून येणाऱ्या काही ब्राह्मणानी चक्रधराना पाहून 'हे श्री चागदेवो राउळ : हे काइ जाणेति' असे उद्‌गार काढले. तेव्हा तत्क्षणी चक्रधरानी उत्तर दिले, 'हे सकळ सीद्धांताचा मतितार्थ जाणे' तेव्हा ते उगेंचि राहिले. (उ. भा. २ ३७९)

गावच्या संन्याशाला परगावाहून आलेल्या एका संन्याशाने उधाणीत हरविले. त्याचे पुस्तकभांडार, मळा, वाडी, वृत्ती गेली. त्या वेळी चक्रधरांनी त्यास स्फुरण देऊन विजयी केले. त्याचे मठापत्य त्यास परत मिळाले. (एकाक : ५०) काळदासभटाने संस्कृतात उत्तर देताच त्याचेशी त्याच भाषेत त्यानी उत्तर दिले.- (पू. भा. २ : २७६)

**क्रीडा**

आपल्या शिष्यासमवेत विविध प्रकारच्या क्रीडा करण्यात चक्रधराना मोठा आनंद वाटत असे. गोपाळाशी त्यानी 'रानभेरियाचा खेळु' केला. (एकाक ३१) चक्रधर त्यांच्या पाठीवर बसले म्हणजे गोपाळांना परमसुख होत असे. वडनेरा येथे 'गोपाळ हो' हें दुसी होईल : तुम्ही ग्राहीक होआ' असे म्हणून त्यानी क्रीडा केली. डखले या शिष्याशी याच भावनेने ते क्रीडा करतात. (पू. भा. १ : ९७.) एकदा 'वीळीचां वेळी 'अगणात त्यानी' भक्तजनासि खेळु मांडीला : उघडी श्रीमूर्ती . त्याते डवचीति एराते डवचीति ऐसा खेळ सरे ना :' (पू. भा. १ : ६४) नादोऱ्यात असताना त्याना जळक्रीडेची प्रवृत्ती झाली. ते 'गंगे आतु रिगाले: यराते डोंचळिति : यराते डोंचाळिति : ऐसा खेळु केला :' (पू. भा. १ ११२) एकदा एकादशी दिवशी चक्रधराना बाइसेने केळी दिली. ती खाण्यासाठी त्यानी सोभागास जवळ बोलविले. 'आ करा : चांग आ करा:' म्हणताच त्यानी आ केला. पण चक्रधर केळी सोलून, वाटीतील साखर माखायचे, त्याच्या तोंडा-जवळ न्यायचे व स्वतःच खाऊन टाकायचे. त्याना चक्रधर आपणास चाळवितात

असे वाटले. पण शेवटी त्यानी धायवरि केळी खावर्वाली (पू. भा. १ १२४) गोसाव्याच्या जाण्यायेण्याच्या मार्गावर गार होती. ती पाहून ते म्हणाले, 'रामाचे वानरसैन्य रिगे : तरि गारि बूजे ' हे ऐकताच सगळे जमले व ती गार त्यानी बुजवून टाकली. (पू. भा. १ : १८३) संगमेश्वरी गेले असता तेथील गुरवाने दिलेल्या महाळुगाच्या फळाने त्यानी लुडिक्रीडा (फेकाफेकीचा खेळ) केली. (पू. भा. २ ' ३५५) होळीचे दिवशी होळी जवळ जाऊन 'हो जेरे हो जेरे' म्हणून त्यानी राख उधळली. नतर 'राख माती चीखलु ऐसे पाहारू एकु सीपणे जाले.' (उ. भा. १ २१) चादण्यात खेळण्याची त्याना वरचेवर प्रवृत्ती व्हायची. एकदा भटोबासाना घोडा बनवून, त्याच्या पाठीवर बसून ते छीनपापास गेले. (उ. भा. १ १३२) एकदा साधेशी त्यानी जलक्रीडा करण्याची व एकमेकावर पाणी उडविण्याची इच्छा व्यक्त केली. (उ. भा १ . १४५.) नदीच्या पलीकडे दगड फेकण्याची पैज त्यानी भटोबासाशी लावली. तेव्हा चक्रधराचे गुंडे पलीकडे, तर भटोबासाचे पाण्यात पडत. (उ. भा. १ १८०) हरि नाएकाकडे त्याना पूजा आरोगण झाल्यानंतर त्याचेकडे सारीपाट पाहून तो खेळण्याची त्याना इच्छा झाली. फासे होती घेताच 'गोसावी सारी खेळो जाणती' हे सर्वांनी ओळखले. त्यानी 'उठाउठी तीनि फळी जींतली.' तेव्हाना एक म्हणाले, 'जी जी : रावो जींतो एइल : परि देवो जींको ' न एकी' (उ. भा. २ ३०५.) एकदा उदयाचा पूजावसर झाल्यानंतर त्यानी जात्यंधाचाही खेळ करून दाखविला. (उ. भा. २ ३१३)

## विनोदी वृत्ती

जीवनाचे स्वरूप आपल्या चिंतनशील स्वभावाने शिष्याना पटवून देत असताना त्याच्या लौकिक जीवनातही चक्रधरानी रस घेतला. मनुष्यदेह धारण केल्यानंतर त्याच्या सर्व प्रवृत्तांशी ते एकरूप झाले. थोर पुरुषांनी प्रापंचिकाच्या जीवनातील विसंगती दाखवून विनोद निर्माण केला असला तरी प्रापंचिकाची प्रपंच–परमार्थातील ओढाताण हा त्याच्या करुणेचाच विषय होता. चक्रधरानी आपल्या शिष्य परिवारातील व्यक्तींसी केलेल्या क्रीडातून, त्यांना ठेवलेल्या टोपण-नावातून त्याची हीच प्रवृत्ती आढळून येते. बोणेबाईच्या गुंफेत एकदा एक चोर शिरला. त्याची चाहूल लागताच बोणेबाई ओरडली. तेव्हा चोरलेल्या पदार्थांची मोट (गाठोडे) अगणात टाकून तो पळून गेला. एवढ्यात चक्रधर आले. सारे पदार्थ मिळाल्याचे पाहून व उलट चोराची जाडी (कांबळे) राहिल्याचे पाहून चक्रधर म्हणाले, 'बाइ : तरि उपराठा चोरुचि नागवीला मा : ' (एकांक : ६४.) बोणेबाई जेव्हा त्र्यंबकेश्वराच्या यात्रेस निघाली, तेव्हा चक्रधरानी तिला 'यालागि इतुला पैसा त्रीयंबकु घेउनि या ' असे सांगितले. (पू. भा. १ १.)

भिंगाये देवीच्या देवळाकडे गेले असता विष्णुभट उपाध्याची भेट झाली. गाढवाचे ओरडणे ऐकून विष्णुभटही तसेच ओरडले. तेव्हा सर्वज्ञ म्हणाले, 'हे काइ गा : 'जी जी : हा पंचम वेद :' (पू. भा. २. १६४.) एकदा इंद्रभटाने सांगितल्यावरून साधेने लाडू केले. ते दुरडी भरून इंद्रभटाने गोसाव्याना आणून दिले. पण ते फुटेनात. तेव्हा गोसावी म्हणाले, 'पुष्कळ सुरगणी पाहिल्या, परि कोण्ही सुरगणीचे लाडू सात पाच मुसळे मेळउनि फोडीले नाहीति' : (पू. भा. : १ : १०६.) एकदा विहरणाला गेले असता एक आंब्याचे झाड आंब्यानी लहडलेले पाहून शिष्याना आश्चर्य वाटले. ते कोणी खात नसत. ते खाल्ले म्हणजे ज्वर येई. म्हणून ते मीठ-मोहऱ्यानी भरून या वर्षीचे दुसऱ्या वर्षी खात. अशा त्या आंब्याना उद्देशून चक्रधर म्हणाले, 'हा आंबा संसारूमोचकू :' शिष्यानी 'संसार मोचकू म्हणजे काइ' असे विचारले. त्या वेळी चक्रधर म्हणाले, 'आंबा खाइजे : आणि संसारापासौनि मूचीजे :' (पू. भा. २ . २१७.) त्याच्या कंठाला ऊ डसलेली पाहून ते म्हणाले, 'एय सकेशीयाचा उपद्रो देखीला गा : कें विढार घेतले असे :' (पू. भा २ २५५.) भुतानंदाच्या एका लेकीने दुरडीभर पुऱ्या आणि तूप आणले. तेव्हा चक्रधरांनी भुतानंदेला 'उभ्याने पुऱ्या खा व मर्गजेस वाकुल्या दाखवा' असे सांगितले. तसे करून भुतानंदेने पुऱ्या खाल्ल्या. शेवटचा घास खाताना चक्रधर म्हणाले, 'हे काय भुतानंदा, तुम्ही एवढ्या चांगल्या, श्रेष्ठ आणि उभ्याने पुऱ्या काय खाता आणि देवतेला वाकुल्या काय दाखविता' हे ऐकताच ती लाजून आत गेली. (उ. भा. १ : १८) शिमग्याच्या दिवशी शिंपणे खेळताना मळके वस्त्र नेसलेल्या, विरळ दाताच्या, तोंडातून तांबूल बाहेर येणाऱ्या कामाइसेस ते म्हणाले, 'इतुकेयामध्ये सोवासीनि बाइ मीरवे गा .' (उ. भा. १ : ३२) एकदा आउसा चक्रधराना म्हणाली, देव कथानेही प्राप्त होत नसेल तर मला जखीण करून टाका.' तेव्हा चक्रधर भटोबासास म्हणाले, 'पाहिलेस ! जखीण होऊन मेंढे बोकड खाण्याची इच्छा दिसते हिची.' तेव्हा ती म्हणाली, 'होका जी : जगन्नाथा तरि नको' (उ. भा. १ ३८.) एकदा मातीकाम होत असताना सारंगपाण्यास त्यानी माती वाहण्यास सांगितले. 'श्रीनाथा म्हणून ते माती वाहू लागले, तेव्हा चक्रधर त्याना म्हणाले, 'जगन्नाथ म्हणालास तर आणखी माती वाहशील.' (उ. भा. १ : ४७) एकदा पूजावसर झाल्यानंतर गोसाव्यानी नाथोबा व नागदेव याच्यात झुंज लावली. नाथोबाला त्यानी भटोबासास बाहेर घालवण्यास सांगितले व भटोबासाना 'तू बाहेर स्वतःला घालवू देऊ नकोस' म्हणून सांगितले. मोठी गमत आली व शेवटी हा खेळ त्यानी पुरा करण्यास सांगितले. (उ. भा. १ १०५) नाथोबा व भटोबास यांची डोकी भिडवून त्यानी त्याना बराच काळ त्याच स्थितीत ठेवले. (उ. भा. १ : १३३) एका

जोग्याने चक्रधरांना काही ‘ जोगु जागता काय ’ असा प्रश्न विचारला. ‘ नाही ’ म्हणताच त्याने उपहास केला. तेव्हा नाथोबाने त्याला फराफर ओढून पाण्यात नेले व बुचकळले. ( उ. भा. १ : २२० ) परस नायकाला एकदा स्तीति प्राप्त झाली, तेव्हा ते वारले असे समजून सर्वांनी रडारड केली. स्मशानात नेऊन अग्नी दिला. ऊब लागताच त्याची स्तीति भंगली. इकडे लोक परत येऊन रडत चक्रधरांना हकीकत सागू लागले. ‘ आणि गोसावी हास्य केले . ’ लोकांना वाटले. गोसाव्यानीच मृतास जिवंत केले. ( उ. भा. २ : २५३ ) डखले या शिष्याची त्यानी जिवंतपणीच ‘ कारट ’ क्रिया ‘ अंत्य क्रिया ’ करविली. तेव्हा दाइंबास उद्देशून ते म्हणाले, ‘ भोजेया देखिलें गा : डखलेयासि कैसी नोवरकळा साजति असे. ’ ( उ. भा. २ : ३३१ ) अस्पर्श स्थितीत असलेल्या उमाइसेच्या कपाळी आपला अंगठा लावून चक्रधर म्हणाले, ‘ माझ्या अंगठ्याला तू विटाळ केलास. आता हा लोणारा नेयावा लागैल गा : केदारा नेयावा न गैल ‘ मलिनाथा नेयावा लागैल. ” ( उ. भा. २ : ३३६ ) दैनंदिन जीवनातील अनेक प्रसंगातून स्वाभाविकपणे आपले तत्त्वज्ञान शिष्याच्या मनावर ते कसे बिंबवीत याचे हे एक चांगले उदाहरण आहे. गुरुत्वाच्या अधिकारवाणीपेक्षा सहानुभूतिपूर्ण विनोदातून मिळणारी ही शिकवण प्रभावी ठरत असावी यात शंका नाही.

## एथ मरण आलेल्या काइ मरण असे

सर्व प्राणिमात्राविषयी अथांग करुणा भरून राहिलेल्या चक्रधरानी अहिंसेचा पुरस्कार करावा हे स्वाभाविक होय. एका घाबरलेल्या सशाचे पारध्यापासून केलेले संरक्षण या दृष्टीने महत्त्वाचे आहे. ‘ हा गा ए रानी असति : पाणी पीति . यातें तुम्हीं कां मारा ? ’ ( एकांक : २३ ) असा प्रश्न त्यानी त्या पारध्याना विचारला. घोडाचुडीच्या शिष्यांनी गावाला आग लावल्याचे पाहून भूतहिंसा झाली म्हणून त्यानी त्याना दोष दिला. ( एकांक : २० ) कृतीने तर नाहीच, पण शब्दानेही कुणाचे अंतःकरण दुखावणार नाही इकडे चक्रधर पूर्ण लक्ष देत. ‘ प्रियवक्ता होआवे ’ हा आदर्श त्याच्यापासूनच घेण्यासारखा होता. एके दिवशी गुंफेत निघालेली इंगळी कोणास चावेल म्हणून मारून बाहेर टाकावयास निगालेल्या आउसेस सर्वज्ञांनी म्हटले‘ ‘ सर्वा भूता अभए देयावें की ’ ( उ. भा, १ : ३९. ) छीनपापीस असताना एक गुंफा बांधण्यासाठी चिखलाची गारी केली होती; पण ती सर्व मुग्यानी भरलेली पाहून चक्रधरांनी दुसरी गारी करण्यास सांगितले. ते म्हणाले, ‘ एथची सेवा ते भूतां अविरोध करावी कीं गा : ’ ( उ. भा. १ ७१ ’ एकदा सायंकाळचा पूजावसर झाल्यानंतर गोसाव्याच्या ओट्यावर विंचू निघाला. तो त्यानी वस्त्राने धरून बाहेर टाकण्यास बाइसेस सांगितले. ( उ. भा. १ : २०५. )

## नामकरण

आपल्या शिष्याना विशिष्ट संदर्भानुसार विनोदी नावे ठेवण्याची चक्रधराना आवड होती. गुंफा बांधण्यासाठी झाडावर चढून फाटे काढणाऱ्या नागदेवास ते ‘ वानरेया ’ म्हणत. दाईंबाने मर्दना करताना भोजराजाची गोष्ट सांगितली. त्याचे नाव त्यानी ‘ भोजा ’ ठेवले ( उ. भा. २ : ३८३. ) नाथोबासानी नाथो कोरोच्या घरी आलेल्या मंडळिकाची हकीगत चक्रधराना सांगितली. तेव्हा ‘ तो तेथिचा मडळिक : तुम्ही एथिचे मडळीक ’ असे म्हणून ‘ मंडळीक ’ या नावाने त्याला ते सबोधू लागले. ( उ. भा. २ ३८४. ) मार्कंडाने सर्वज्ञाचे दर्शन घेतल्यानंतर त्याने आपले नाव ‘ भास्कर ’ असल्याचे सांगितले. तेव्हा सर्वज्ञ म्हणाले, ‘ भानु भास्करू तेजू मार्कंडः राणदेवीचा कातु ’ अशी पाच नावे ठेवून मार्कंड या नावाने ते त्याला बोलावू लागले. ( उ. भा. २ ३८५. )

**दु:खशमन**—व्याधिग्रस्ताना दु:खमुक्त करण्यासाठी चक्रधर झटत. त्याना विविध उपाय सुचवीत. पानु नायकाला वारा अजिबात सहन होत नसे आजूबाजूस शेगड्या ठेवून तो बसे. त्याला शेगड्या काढून ठेवण्यास सर्वज्ञानी सागितले. त्यावेळी त्याला सुखाची झोप आली. नंतर आगावरील जाडी पासोडी क्रमाने काढून टाकण्यास सांगितले आणि त्याचे व्यथाहरण झाले ( पू. भा. २ २२२. ) एके वेळी पानुनायकाने म्हटले, ‘ वायु गेला : पर दीपन नाही. ’ त्याला उपाहार तयार करण्यास सागून सर्वांसमवेत त्याला वाढले. रात्रीही त्याला खूप भूक लागली. अशा प्रकारे गोसाव्यानी त्याला दीपनशक्ती दिली. ( पू. भा. २ २२३ ) ललिताइसा नावाच्या स्त्रीच्या पायास काळस्फोट झाला असता चक्रधरांनी तो फोडून त्यात पीक घातली. त्यामुळे तिची व्यथा नाहीशी झाली. एरव्ही ती जगली नसती. ( पू. भा. २७५ )

**आहार**– श्री चक्रधर हे आहाराच्या बाबतीत गोविंदप्रभूंइतके चोखंदळ नसले तरी त्याना सात्विक श्वेत उपाहार आवडत असल्याचे दिसते. या श्वेत उपहारात तादुळाचा भात, तांदुळाची खीर, घाऱ्या, अमृतफळे, खांडवे, दहिवडे, कालवण, दूध, दही इ. चा समावेश असे. गोंड लोकांची भात शिजवण्याची पद्धतही त्याना अवगत होती. ‘ वेळवाच्या काडोऱ्यात तादूळ घालून डांबीर व सेगमाती लावून अग्नीत घातला जाई ’ ( एकांक : २२. ) रावसगावी गेले असता त्यानी ‘ पाणीभातु बाबुळसेंगा ’ असे आरोगण केले. ( एकाक ७३. ) भोगनारायणी असताना त्यानी दूधकरट पाणीभाताची आरोगणा केली. ( पू. भा. १ : २. )

**कथाकथन**–विशिष्ट तत्त्वसूत्र शिष्याच्या मनावर बिंबविण्यासाठी प्रापंचिकाच्या जीवनातील दृष्टान्त साध्या, सोप्या पण आकर्षक पद्धतीने सागण्याची

चक्रधराची पद्धती होती. ' ऐसी कुहिली अविद्या: परि तेही न संडवे ' हे सूत्र त्यानी एका मोळीविक्याच्या दरिद्री जीवनाचा व त्यातील विषयसेवनाच्या इच्छेचा दृष्टान्त देऊन मार्मिकपणे सांगितले आहे. ( उ. भा. २ ३९३. ) कथाकथनाची त्यांची हातोटी त्यानी सांगितलेल्या कावळा–चिमणीच्या सर्वप्रसिद्ध कथेतही लक्षात येते.

**चक्रधराची चौपदी**– उमाइसेला गाता येते हे ऐकल्यानंतर चक्रधरानी तिला गाण्याचा आग्रह केला. महदाइसेनेही ' तु गासील तरि बाबा गाइल ' असा आग्रह केल्यानतर उमाइसेने म्हटले,

" बापु रे मोरी अवस्था लो जाहा जावों ताहां आपुसरीसा तनें कोई न करी. मोरी चींता : "

—यावर चक्रधरानी धनाश्री रागातील चौपदी गाइली ( उ. भा. २ ३११ ) त्याची ती चौपदी अशी आहे '—
मूळस्थानीं भीड बांधो हो जोईं : जेंविना काळकळाइ : गुरुवचने बोडियाणा दृढ बाधो : जेंविना चचळ होई ।। ध्रु. ।। गोरक्षी हो : सुनिबधो स्थिरु होइ : जेणे तुम्ही ज.या . सोपरि मारो . वैरु आनु नाहीं कोई ।। १ ।। पांचै पंचाएन: पांचै जान हो : धावति आन आन स्थानीं उन्मनीं कारणे नीज मुनी लीन : ना ते मारिएले नीजस्थानीं ।। २ ।। पवन पूरो मन स्थीर करो चद्रा मीळावो भानु : आयागमन यें दुष नीवारो बूधि राखों आपणा ।। ३ ।। भाटीं जाता नीवारो हो भीडो बाइ बोउजाई अलख नीरंजनी लेकर हो भावा ना भाव होइ ।। ४ ।।

चक्रधराची ही चौपदी ऐकून सारे भक्तजन त्याच्या चरणी लागले.

हरिदेव पंडित गीता-पुराणाचे श्रवण करून निर्माण होणाऱ्या शंका चक्रधराना विचारीत. एकदा चक्रधरानी त्याना ' गोपाळ मंत्रा ' चे भेद विचारले. त्यानी दहा वीस आहेत, पण मी दोन चार जाणतो ' असे सागितल्यानंतर सर्वज्ञानी त्या गोपाळमत्राचे सातहजार भेद असल्याचे सागितले तेव्हा ' द्वापरीचे ते हे गोसावी ' अशी त्यांना प्रतीती आली. ( पू. भा. १ १२. ) आपदेवोभटाला प्रल्हादविद्येची प्रतीती अशाच एका प्रसंगाने सर्वज्ञानी आणून दिली. ( पू. भा. १ ४९. )

## गोविंदप्रभु आणि श्रीचक्रधर

श्री गोविंदप्रभु हे चक्रधराचे साक्षात गुरु. त्यानीच त्याचे 'चक्रधर ' हे नामकरण केले. आपल्या या विदेही अवस्थेतील गुरुविषयी चक्रधराच्या अंत:करणात

अपार श्रद्धा होती. त्याचा नामोच्चार करण्यात, त्याच्या संबंधातील वस्तूना स्पर्श करण्यात, ऋद्धिपूरची वार्ता भक्तजनाकडून ऐकण्यात त्याना अतीव सुख वाटे. आपली गुरूची व पथसस्थापकाची भूमिका ते अशा वेळी विसरून जात व नम्र शिष्याची भूमिका स्वीकारीत. गोविंदप्रभू असतील तेथे आपल्या गुरुत्वाचे पवाडे कोणी गायिलेले त्याना खपत नसे त्याना आवडतील त्या वस्तु, खाद्यपदार्थाविषयी चक्रधर आस्थापूर्वक चौकशी करीत. रामयात्रेला निघालेल्या हरपाळदेवानी सेवकाना चुकवून परमेश्वरपूर गाठले. तेथे 'गगनाची वास' पाहणाऱ्या, आपल्याशीच बोलणाऱ्या, श्रीप्रभूपासून चक्रधरानी ज्ञानशक्तीचा स्वीकार केला. (एकांक ७) ऋद्धिपुराचे दर्शन होताच वहाणा काढून त्यानी नमस्कार केला. शिष्यानी जयजयकार केला. श्रीप्रभूंचा महिमा गात ते गेले. गोविंदप्रभूंना खेव देऊन त्यांच्या चरणांची धूळ मस्तकी घेतली. त्यांचे आरोगण पाहण्यातही चक्रधरांना धन्यता वाटे. चक्रधराना गोविंदप्रभूनी चाव्याच्या मोगरीने पृष्ठभागावर तीन घाये दिले. तेव्हा बाइसा ओरडली, 'वडिले बाबेनि धाकुटा बाबा मारिला' तेव्हा चक्रधरानी तिला 'उगी असा' म्हटले. त्यानी गोविंदप्रभूची पूजा केली व निऱ्या करून एक वस्त्रदर्शन केले. ते त्यानी निराकरिले. त्या वस्त्राची बाइसेने धूळ झटकली. तेव्हा चक्रधर म्हणाले, 'हे रज कैसे, हे ब्रह्मादीका दुर्लभ कीं' बाइसेला सागून माषान्न, वडे इ. करवून श्रीप्रभूंना अर्पण केले. तेच त्यानाही आरोगण होई. भैरवाच्या मूर्तीशी "हा कान, हा डोळा, हे नाक, हे निडळ' असे म्हणून केलेला खेळ निश्चल बसलेल्या चक्रधरांशीही केला व 'हा देवो देवो तु' असे म्हटले. ऐसा देवें देवो प्रकाशिला (पू. भा. १: ३३, ३४, ३५, ३६, ३७) एकदा श्रीप्रभूचा महिमा सांगत असताना सारंगपंडिताने श्रीप्रभूंच्या दर्शनाची इच्छा प्रकट केली, ती चक्रधरानी पूर्ण केली. हे दर्शन कसे होते? 'नाभिचुंबित खाड : मोकळे केसकलाप मोकळा कासोटा उत्तरासगी धोत्र हास्य करीत टाळी वात गगन अवलोकित . खाडवी चुरीत श्याम श्रीमूर्ति ऐसे श्रीप्रभु माळिया वरौनि बीजे करिति " (पू. भा. १ ५२) अशीच परसनाएकास गोविंदप्रभूंच्या दर्शनास जाण्याची इच्छा झाली. त्यानी चक्रधराकडे परवानगी मागितली. 'तुम्ही परमेश्वरपुरास जाणार आणि मी अडवेन' हे कसे शक्य आहे?' त्यानी काही सूचना मात्र केल्या. 'ऐसियांचि निगावें पेणोवेणां जावे. उपेगें न करावें श्रीप्रभूचे दर्शन घेयावे समोर न बैसावे वाडवेळु श्रीचरणावरि माथा ठेउनि नमस्कारू न करावा देवतेसि निरोधु होए.' (पू. भा. २ २०२) परमेश्वरपुरास जाऊन आलेल्या महदाइसेस चक्रधरानी मोठ्या उत्सुकतेने विचारले, 'बाई तेथे गेलींति : मग काइ करा.' तेथील हकीगत ऐकत असताना चक्रधर मधून मधून प्रश्न विचारायचे. अधिक स्पष्टीकरण करायचे. शेवटी ते म्हणाले, 'श्रीप्रभूची सेवा ते अदृष्ट सेवा' (पू. भा. २ ३५२) नागदेवासही त्यानी श्रीप्रभूची

अशीच हकीगत विचारली. अत्यंत आदरपूर्वक त्यानी ती ऐकली. 'श्रीप्रभु ते निर्गुण ब्रह्मः श्रीप्रभु ते निर्मुक्त वस्तु : श्रीप्रभु ते आत्माराम' असे त्यानी शेवटी निरूपण केले. (पू. भा. २ : ३५६.) भटोबासालाही त्यानी मुद्दाम एकदा ऋद्धिपुरास गोविंदप्रभूंकडे पाठवून दिले. (उ. भा. १ : २) श्रीप्रभूंचे वस्त्र त्याची उदासीनता घालवीत असे. सर्वांगास त्याचा स्पर्श करण्यात चक्रधराना धन्यता वाटे. ते वस्त्र इंद्रभटास देताना देवपूजेआधी एक पुष्प त्या वस्त्रास वाहण्यास त्यानी सांगितले. (उ. भा. १ . १५,१२६).

श्रीप्रभूंच्या सेवेत अंतराय पडू नये याचीही चिंता चक्रधरांना असे. एकदा हंसराजा परमेश्वरपुराहून त्याना भेटण्यास आली. तेव्हा 'तू आलीस तर तेथे कोण' असा प्रश्न त्यांनी तिला केला. आबाइसेला त्यानी श्रीप्रभूंकडे पाठविले. आणि श्रीप्रभू तुझी सेवा आगिकारतील असे सांगितले. (उ. भा. २ : २७६) एक भक्तजन श्रीप्रभूंच्या दर्शनास जाताना 'ते विदेही पुरुष' असल्याचे व त्याना अज्ञात असे काही नसल्याचे त्यानी सांगितले. (उ. भा. २ : ३०६) एका विद्वानानी चक्रधराना त्याचे गुरु कोण असा प्रश्न केला. तेव्हा चक्रधरांनी दिलेले उत्तर सस्मरणीय आहे. ते म्हणाले, 'गुरु कव्हणी नेणिजे : श्रीप्रभुची थाप एकि घेतली' ते हे आठउनि असे.' (उ. भा : २ : ३८७)

## गुरु-शिष्य संबंध

आपल्या गुरूविषयीचा श्रद्धाभाव, आदरभाव जसा चक्रधरांच्या ठिकाणी होता, तसेच आपल्या शिष्याच्या, अनुयायाच्या सबधींचे प्रेमही अपूर्व होते. त्याच्या हिताची काळजी वाहताना त्याची मायपित्याची भूमिका असे. तर त्याच्याशी हास्यविनोद करताना जणु मित्रत्वाचा स्नेह जागृत होत असे. शिष्याच्या वैयक्तिक जीवनाला उंच पातळी प्राप्त करून देण्याकरिता आणि पंथाच्या प्रतिष्ठेची जपणूक करण्याकरिता त्यांना बऱ्याच वेळा अप्रिय पण पथ्यकर उपदेश करावा लागत असे. आपल्या अपत्याच्या सुखाची काळजी वाहणारी माता त्याला क्वचित् ताडनही करते; तशी चक्रधराची भूमिका होती. नवविचारप्रवर्तन करणाऱ्या या पथप्रवर्तकाने विचार आणि कृती या बाबतीत कटाक्षाने शिस्तपालनावर भर दिला होता. शिष्यपरीक्षा प्रसगोपात्त ते करीत असत. त्यांच्या निकटवर्ती शिष्याना तर अशा अनेक अग्निदिव्यातून पार पडावे लागले. म्हणूनच त्याच्या विचारसरणीचा काटेकोर पुरस्कार करणारा पथाचा पहिला आचार्य नागदेवाच्या रूपाने लाभला. अज्ञ आणि तज्ञ अशा दोन्ही प्रकारच्या शिष्याना प्रसंगोचित उदाहरणानी आपले तत्त्वज्ञान त्यानी समजावून सांगितले. नेणत्या कर्मनिष्ठाचा बुद्धिभेद न करता त्यांच्यातील एक होऊन चक्रधरानी त्याना नवी दृष्टी प्राप्त करून दिली.

देमाइसा आडवांगी बसली असता 'बाइ : गुरु देवासि पाठी दाखउ नये ' ती निघताना सर्वज्ञ म्हणाले, 'बाइ एथ येवों आवडे तेधवा येइजे' (पू. भा. १:१८) गोसाव्याची गौर मूर्ति हळदीने गोरी झाली, तशी माझ्या अंगाला लाव, म्हणून हट्ट धरणाऱ्या धानाईला चक्रधरानी गोष्ट सागितली. 'साळैचे घर मेणाचे : काउळेयाचे घर सेणाचे ' पाउसाळीं काउळ्याचे घर पुरे जाए. साळैंचे वाचे ' मग ती उगी झाली. (पू. भा. १ २३) आपणासमवेत झोपणाऱ्या चागदेवभटाच्या अंगावर ते जाडीचा पालव घालतात. (पू. भा. १ : ३२) चागदेवभटास आपल्या आईच्या भेटीस जाण्याची आज्ञा देताना ते म्हणाले, 'दीसामध्ये हे वेळा दहावीस आठवीजे परि दिवसू वंध्यू जावों नेदीजे' (पू. भा. १ ७०) एकदा नागदेवभटानी आपल्यास संहिता क्रमु यावा अशी इच्छा प्रकट केली. 'हे होईल हो ' या सर्वज्ञाच्या अशीर्वादाने त्याना वेदज्ञान झाले. त्याचे नंतर 'पदकर नागदेवोभट' असे नाव झाले. (पू. भा. १ . ७३) गदोनायकाच्या सुटकेसाठी चक्रधराकडे रिक्त हस्ताने आलेल्या सारंगपंडितास त्यानी 'रिक्तहस्तेन न पश्येत् । राजान दैवतं गुरुम्' अशी ताकीद दिली. (पू. भा. १ : ७५) अनंतचतुर्दशीस भटोबासाकडून अनंत करवून पूजा करणाऱ्या आबाइसेस सर्वज्ञ म्हणाले 'अनत तो काइ सुताचा बाइ . अनंत तो काइ एवढा अनंतु तो अनत की ।।' (पू. भा. १ : १२७.) गोसाव्याची माळ आपल्याला मिळेल का असा मनोरथ करणाऱ्या गोंदोच्या गळ्यात त्यानी आपली माळ घातली. (पू. भा. १ १३३.) एका पर्वणीच्या वेळी अपार लोक स्वामींच्या दर्शनास आले. त्याना दीठीची प्रवृत्ती झाली. तेव्हा आबाइसेने दीठि उतरली. (पू. भा. १ १३४.) परमाणुभव देवाकडे जाऊन त्याचे नाव विचारणाऱ्या पद्मनाभिदेवाने त्याला 'तुमचा अनुभवो काइ प्रमाणु यतुका' असे म्हटले. तेव्हा त्याने त्याला बाहेर काढले. चक्रधरानीही त्याला आत येऊ दिले नाही, अगाला शेण माती लावून त्यानी परमाणुभवदेवाची त्याला क्षमा मागावयास लावले. (पू. भा १ . १७४.) पद्मनाभींची माता गौराइसा त्याला बोलावण्यास आली. त्या वेळी चक्रधर म्हणाले, 'आम्ही पद्मनाभीस बोलावले होते काय? हा एथ असावा ' ऐसी काइ एथ चाड पडली असे?' (पू. भा. २ · २००) शिष्यसग्रहाने आपला महिमा वाढविणाऱ्या गुरूंच्या तुलनेने चक्रधराचे हे निःस्पृह वर्तन अधिकच परिणाम करून जाते. एकदा लखुबाइ झाडीत असताना दादोसच्या अगावर धूळ गेली. तेव्हा भटोबासाच्या व तिचा वाद झाला. त्या वेळी सर्वज्ञ म्हणाले, 'जन्ही नावडतीचा जाला : तन्हीं वोटें कोण्हासि दाखउं नये ' (पू. भा. २ २३५) भटोबास व तीकवनाएक याच्या वादात तीकवनाएकाना गोसावी असे म्हणाले तर 'मी डोई बोडूनि धोत्र फाडूनि उतरापंथे जाए' अशी प्रतिज्ञा केली. त्या वेळी गोसाव्यानी तिकवनाएकाचे मानले. (पू. भा. २ २४९) गंगेवर

स्नानास गेलेले भक्तजन सध्या करून आले. पण त्यानी टिळे लावले नव्हते. तेव्हा सर्वज्ञ म्हणाले. 'मंडळिका निच अवधेया टिळा उगाळुनी दीयावा येथ तीर्थवास जाणवावा :' (पू. भा. २ ३३७.) मठातील हा विधी पुढे मंडळीकाकडेच सोपविण्यात आला. बऱ्याच उशीरापर्यंत झोपणाऱ्या उमाइसेस त्यानी एकदा बाक्ताडन केले. ते म्हणाले, 'बाइ धायतव खाइजे : पाहे तव ते निजीजे' (पू. भा. २ . ३४८.) खडकुलीस असताना बाइसेने हुरडा करून त्यात साखर घातली. तेव्हा गोसाव्यानी त्याचा प्रसाद करून तो सर्वांना वाटला. (पू. भा. २ : ३५८) भेटीस आलेल्या लुखदेवाची, आपलेपणी त्याच्या कुटुंबपरिवाराची ते अगत्याने चौकशी करतात. (उ. भा. १ | ३, ४) गोसाव्यांच्या दर्शनाला एक स्त्री आली. बाहेर पडताना त्याच्या डोक्यास दारवंटा लागल्याने बाइसाने शिव्या घातल्या. तेव्हा गोसावी म्हणाले, 'बाइ प्राणिये एथ आलेया जळता जावें तरि निवावें कोठे . (उ. भा. १ : ७४.) छिन्नस्थळी असताना गोसाव्याच्या समोवती असणाऱ्या स्त्रिया पाहून त्यानी अपशब्द काढले तेव्हा गोसावी कोपले – ते म्हणाले, 'हा तुमचा काइ जीउ आणि याचिया काइ जीउलिया तुमते आन देवो राखिता : आणि याते आन देवो राखिता ऐसें काइ येथ असे:' (उ. भा. १ : ८५) विहरणास गेल्यानतर खेळताना पाइ दगड लागून गोविंद पडला. तेव्हा गोसावी धावत तेथे गेले व दुखावलेल्या गुडघ्यावर त्यानी फीक घातली. त्या वेळी सारगपडित म्हणाले, 'शरपजरी पडलेल्या भीष्माच्या समाचारार्थ श्रीकृष्ण गेले, तसा हा प्रसंग शोभतो.' यावर सर्वज्ञ म्हणाले 'काइ गा पाड्या पाडित्य कीजताए : (उ. भा. १ ८६) देहगावच्या एका ब्राह्मणाच्या पाच विधवा मुली होत्या. त्यावरून त्यास लोक 'पाचराडा आला असे म्हणत. तो गोसाव्याच्या भेटीस आल्यानंतर त्यानी त्याला 'तुमच्या पाचगंगा ठीक आहेत, ना' असा प्रश्न विचारला. त्याने त्याला मोठे समाधान झाले. (उ. भा. १ : ८९) श्राद्धास गेलेल्या नागदेव, नाथोभटाना चक्रधरानी मठात येऊ दिलें नाही. 'तुम्ही गुरव ना ब्राह्मण, लोकाच्या श्राद्धाच्या जेवणास का जाता?' असा प्रश्न त्याला विचारला व राजमठावरून उड्या घालण्याची शिक्षा त्याना दिली. (उ. भा. १ १०७) एक गरोदर अनाथ बाई गोसाव्याकडे आली व मठाची झाडलोट करून राहू लागली. तिच्या बाळंतपणाची सर्व व्यवस्था गोसाव्यानी नाथोबा व बाइसाकडून करविली. (उ. भा. १ : १३५) मार्कंडाची चोरीची सवयही चक्रधरानी उघडकीस आणली व बाइसेस सागितले. 'बाइ ऐसा असें मार्कंड तो नीको नव्हे : हा दवडा' यावर बाइसेने त्याला शिव्या घातल्या. (उ. भा. १ : १८१) तहानलेल्या दादोसाठी राणाइसा पाणी आणावयास गेल्याचे पाहून एकट्या स्त्रीला तशा ठिकाणी पाठवू नये. 'स्वयं दास्यं तपस्विनाम्' असे चक्रधरानी सागितले. (उ. भा. १ २०८) भटोबासाच्या भेटीस आलेल्या

नारोबाचे पायातील काटे काढून, पाय धुऊन त्याला जेवावयास वाढण्यास चक्रधरांनी भटोबासास सांगितले. ( उ. भा. १ २१७. )

दुर्लभा बाइसेचे घामेजलेले अंग धुताना त्याच्या काखा उघड्या पाहून चक्रधर म्हणाले, ' बाइ : लज्जारूप धर्म तो स्त्रीयासि रक्षण : ' ( उ. भा. १ : २२६ ) डागरेश नावाच्या कुत्र्यास ' जा ' म्हणताच त्याने उठून चक्रधरास प्रदक्षिणा घातली व गंगेच्या ओहळात देह ठेवला. त्या वेळी चक्रधर म्हणाले ' तुम्हापासि वरि हें सुनें चाग : जें एथिचेनि वियोगे जिवो न सकेचि: ' ( उ. २ : २१४ )

## उपदेश

विशिष्ट प्रसंगी सहज सभाषणातूनच चक्रधराच्या मुखातून तत्त्वसूत्रे प्रकट होत असत. त्याचे साधे पण अर्थगर्भ शब्द श्रोत्याच्या अंत:करणात पक्केपणी उमटत असत. एकदा विहरणास जाताना एक उघडे महात्मे पाहून भक्तजन म्हणाले ' कैसा विरक्त ' तेव्हा चक्रधर म्हणाले, ' यक कीर्ति लागौनि वैराग्य : यक विखयालागि : एक सतेव : सतेव वैराग्य ते निके : ज्ञानेंवीण वैराग्य : ते काइ करावें बापीया ।। ' ( पू. भा. १ : १७१ ) इंद्रभटाला एकदा उपदेश करताना ते म्हणाले, ' वेरीयाचा देवो जाला तरि काई दगडें फोडावा ' ( पु. भा. १ १८५. ) गदोनायकाने ताट भरून अलंकार आणले. अपार द्रव्याने मला ईश्वर प्राप्त होईल का असा प्रश्न विचारला. तेव्हा सर्वज्ञ म्हणाले, आणखी कशानेही ईश्वरप्राप्ती होणार नाहीं. अनन्यगतिक होऊन ईश्वरास शरण जावे तेव्हाच तो मिळेल.' ( उ. भा. २ · २४२. ) रात्रीच्या वेळी दूध घेऊन येणाऱ्या नाथोबास स्थिती झाली आणि त्याने हाक घातली, त्यामुळे नगरात खळबळ माजली. तेव्हा चक्रधर त्याला म्हणाले, ' तुम्हीं महात्मे की गा : तुम्ही चतुर्विधा भूतग्रामा अभय देयावें की गा : ' ( उ. भा. २ : ३२१. ) प्रारंभी विरक्त पण नंतर चक्रधराना विसरून गेलेल्या छर्दोबास डोक्यावर पाळणा कडेवर लेकरू, शेळी, स्त्री असा वाटेने जाताना पाहून चक्रधर म्हणाले, ' संगास्तव ऐसे जाले : म्हणौनि : स्तीति वृत्तिअधीना न व्हावे · एका झाडाची सवे न व्हावी : एका स्थानाची सवे न व्हावी ' ( उ. भा.२ ३५३. ) चक्रधराच्या दर्शनाला आलेल्या पण गर्दी पाहून नमस्कार न करता परत गेलेल्या एकाइसेस चक्रधर म्हणाले, ' बाइ : एका पोरिया कारणे साता-पांचाचा सासुरवासू साहीजे : मा एसना : वीश्वाचा पति परमेश्वरु : तेणेंसी घरणें माडीलें असे : तरि जगाचा सासुरवास साहीजे की : ।। ' ( उ. भा. २ २६५. ) अवकाशास जाऊन येणाऱ्या आउसेने चक्रधरांना नमस्कार केला नाही, तेव्हा ते तिला म्हणाले, ' मनिचे

अभिलाष नीवर्तले तरि ' शुचि अशुचित ये दोन्ही नाहीं की : ' ( उ. भा. २ ४२७. ) एकदा महदाइसेने चक्रधराना आपण संन्यास देतो म्हणाला होतात तो निरूपावा असा आग्रह केला. त्या वेळी चक्रधरांनी तिला केलेला उपदेश लक्षणीय व त्याच्या शैलीचा एक उत्तम नमुना आहे. ते म्हणाले, ' बाइ : उरा इतुकेया पाणियातु रीगौनि उर्धबाहो होउनि मग फोकरिजे : संन्यस्तोऽहं : सन्यस्तोऽहं : बाइ : तो काए सन्यासु . संन्यासु तो ऐसा कीं जे राग द्वेष काम क्रोध मद मत्सर याचा त्याग : याचि नावे संन्यासु कीं बाइ ये दशे कार्यसंन्यासु आति : ' ( उ. भा. २ ४३०. )

## ' अवतारी चक्रधर '

चक्रधराचे पाडित्य, भाषाप्रभुत्व विद्वानांना आकृष्ट करीत; तर त्याची सर्व प्राणिमात्राविषयीची करुणावृत्ती, निःस्पृहता आणि विरक्तता, सामान्याचे दुःखनिरसनाची इच्छा यामुळे सामान्याना त्यांच्या विषयी ओढ निर्माण होत असे. त्याच्या रूपाची आणि वाणीची वेधशक्ती सामान्याना, असामान्याना, स्त्रियाना आणि पुरुषाना खिळवून टाकीत असे. पंथप्रवर्तन करून नवा मार्ग दाखविणाऱ्या चक्रधराच्या या लौकिक स्वरूपाबरोबरच त्याच्या ठिकाणच्या अलौकिकत्वाचेही दर्शन वेळोवेळी होत असे आणि म्हणूनच एक ' अवतारी पुरुष ' असा श्रद्धाभाव भक्तजनाचे ठायी दृढ झाला होता. आध्यात्मिक आणि आधिभौतिक तापाचा परिहार चक्रधराचे कडून ज्याचा ज्याचा झाला, ज्यांना ती प्रतीती आली त्यानी तर स्पष्टपणे चक्रधरांना परमेश्वरावतार म्हटले व मानले. महानुभाव पंथाच्या अवतारी पुरुषाच्या ' पंच कृष्णा 'च्या मालिकेत चक्रधरांचे स्थान महत्त्वाचे आहे. त्याच्यातील दैवी सामर्थ्याची प्रतीती जसजसी येत गेली तसतशी त्याना ' सर्वज्ञ ' ' ईश्वर ' ' देव ' अशी अभिधाने भक्तजनाकडून मिळत गेली. प्रारंभीच्या काळात चक्रधरानी स्वमुखाने याविषयी काही सांगितल्याचे दिसत नाही. नंतरच्या काळात त्यानी भक्तजनाच्या प्रतिक्रिया विनयाने सांगितल्या आहेत; तर शेवटी शेवटी त्यानीही प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे स्वतःचे अवतारी स्वरूप सूचित केले. काही ठिकाणी तसे स्पष्टपणेही सांगितले. ज्याना त्याच्या अद्‌भुत सामर्थ्याची प्रतीती आली किंवा ज्यानी त्यांचे हे सामर्थ्य जाणले, त्याना वाच्यार्थाने त्यांचे स्वरूप सागण्याची आवश्यकता नव्हती; परतु भाविकाना तसे उघड सांगितल्याखेरीज समाधान नसल्याने अखेरीस स्वतः चक्रधराना आपले स्वरूप स्पष्टपणे सागणे आवश्यक झाले असावे.

चक्रधराच्या जीवनातील स्थित्यंतराचे अवलोकन केले तर असे दिसून येते की प्रारंभीच्या काळातील त्यांच्या जीवनातील आमूलाग्र परिवर्तनाने ते बव्हंशी

अंतर्मुख झाले होते. श्रीगोविंदप्रभूंचे शिष्यत्व स्वीकारल्यानंतर आणि श्री दत्तात्रेय-प्रभूंचे दर्शन झाल्यानंतर त्यांच्यातील सिद्धावस्था प्रकट झाली आणि अधिकार-वाणीने ते समाजाला उपदेश व मार्गदर्शन करू लागले. ' लीळाचरित्रा 'च्या उत्तरार्धात प्राधान्याने त्यांच्या उपदेशाच्या अनेकविध स्मृती समाविष्ट झालेल्या आहेत. प्रारभीचे अपरिग्रही, एकान्तवासी चक्रधर आता शिष्यसमुदायात आणि लोकांतात राहू लागले. बाधली सोडविण्याचे आणि बुडती काढण्याचे कार्य त्यानी प्रारंभिले. लोकस्थितीचे सूक्ष्म अवलोकन, मौनावस्थेतील चिंतन, गुरूचा आशीर्वाद यातून प्रस्फुरित झालेले तत्त्वज्ञान त्यानी सागण्यास सुरुवात केली.

चक्रधराच्या अवतारी स्वरूपाचे आणि दैवी सामर्थ्याचे दर्शन घडविणाऱ्या अनेकविध लीळा भक्तजनानी सांगितल्या आहेत. ' एकाका 'त एका म्हातारीच्या गुरे राखणाऱ्या मुलाचा ज्वर चक्रधरानी स्वीकारला आणि तिची चिंता दूर केली. ( ३३ ) वाघाच्या पिलांशीही काही वेळ त्यांनी खेळ केला. त्याच्याकडे दृष्टिक्षेप करताच ती पिले त्याच्यापुढे मौळी टेकून बसली. ( ४१ ) गोसाव्याना नेहमी पाणिपात्र देणारी वामन पैंद्याची पत्नी निवर्तली, तेव्हा स्मशानात जाऊन त्यानी तिला जिवंत केले. ( ४३ ). एकाकातील विदेहावस्थेत ते उकिरड्यावर पहुडायचे आणि गरम राख अंगावर टाकली तरी त्याना छान झोप लागावयाची. ( ४८ ) वटेश्वरी असताना रात्री दोन सर्प झुजत झुजत त्याचे वक्षःस्थळावर पडले. ते दोन्ही हातानी धरून त्यानी फेकून दिले. ( ५७ ) अटीतटीने झुजणाऱ्या दोन रेड्याचा रोख चक्रधराच्या अवलोकनाने निवर्तला व ते दोघे दोन मार्गांनी निघून गेले. ( ६८ ) गोसाव्यानी अचाट वेधवती स्वीकारल्यानंतर कित्येक राजे व थोर पुरुष त्याच्या दर्शनास येऊ लागले. महदाश्रम आणि ब्रह्मसानू याना हे आवडले नाही. त्यानी विषमिश्रित फोडी शिष्याकडून चक्रधरांना खावयास दिल्या, पण त्याचा काही परिणाम झाला नाही. तेव्हा चक्रधराच्या या विरोधकानाही पटले, की हे ' ईश्वर पुरुषु होति : दृष्टी पुडा बीख न व्हाये ' : ( पू. भा. १ : ६० ) ब्रह्म-सानूने पुन्हा एकदा स्वतःच्या हाताने विषप्रयोग केला, पण तोही वाया गेला. ( पू. भा. १ : ६१ ) भिंगारी असताना लक्ष्मीदेवाची भूतबाधा त्यानी नाहीशी केली. ( पू. भा. १ : १६० )

एकदा भटोबासास पाटशिवणी करावयास सांगून चक्रधर पळत सुटले ते अचानक अदृश्य झाले व थोड्या वेळाने प्रकट झाले. ( पू. भा. २ : २२८ ) पोट दुखणाऱ्या गौराइसेस कंठीचे पवीत ( जानवे ) उदरी बांधावयास दिल्यानंतर तिची सुलभ प्रसूती झाली. ( पू. भा. २ : २३६ ) सर्पदंश झालेल्या एका माळ्यास त्यांनी मृत्यूच्या तडाख्यातून सोडविले. ( उ. भा. १ १० ) आउसेने एका कुत्र्यास दगड मारताच ते केकाटले, तेव्हा चक्रधरानी आपले मस्तक दाबून

धरले. त्या वेळी तिने प्रश्न केला, 'सूनें हाणितलेया आपण मुकुट धरिला. तरि आपण काइ सर्व व्यापका होइजैल :' सर्वज्ञ म्हणाले, 'होइजैल : मा नाएका ' (पू. उ. भा. १.५०) जिव्हारोग झालेल्या एका माळिणीस त्यांनी रोगमुक्त केले. (उ. भा. १ : ६०) एकदा निरूपण करीत असताना खळाळाचा आवाज येत असल्याने निरूपण प्रवेशन होईना. त्यावेळी त्यानी आउसेस खळाळावर वस्त्र अंथरण्यास सांगितले. त्यानंतर आवाज येणे थाबले. वस्त्र काढल्यानतर परत तो सुरू झाला. त्यावेळी गमतीने चक्रधर म्हणाले, 'हे आउसेचें सामर्थ्य गा.' (उ. भा. १ : ८१) देवद्रोणी एकटेच चक्रधर गेले असता देवताकडून त्याची पूजा होत असल्याचा चमत्कार चद्रदेवाने पाहिला (उ. भा. १ ८३) पाठकाचे भाचे उपासनी हवन करीत असताना यज्ञकुंडातून गोसाव्याचा 'बरवा श्री करू नीगाला, (उ. भा. १ १०१) एकदा मध्यरात्री मठावर दुर्गाच्या पाळीवर चक्रधर उभे राहिले असताना त्याचेपासून प्रकाश पडलेला रेदू नायकाने पाहिला. त्याला आश्चर्य वाटले. (उ भा. १ . ११०,) गळनॉबास ते गेले असताना निंबाच्या ठिकाणी असणारे भूत त्यानी नाहीसे केले. (उ. भा. २ : २५२) वामदेवाला त्यानी एकदा भूतसृष्टी दाखविली. (उ. भा. २ २८४.) श्रीमुखींचे तांबूल उंबरठ्यावर घातले असता त्याला अंकुर फुटल्याचे पाहून सारगपंडित म्हणाला, 'जी जी गोसावीयाचा ठाइं सकळ बीद्या असेति.' (उ. भा. २ ३५६.)

## भविष्याची चाहूल

श्री गोविंदप्रभु आणि चक्रधर या उभयता-गुरुशिष्यांना चागले अतर्ज्ञान होते. भविष्याची चाहूल त्याना आधीच लागे आणि तशी पूर्वसूचनाही ते देऊन ठेवीत. भक्ताच्या मनात चाललेल्या व्यवहाराचीही ते अचूक कल्पना देत आणि त्यामुळे सर्वांनाच मोठे आश्चर्य वाटे. देमाइसेने एकदा म्हटले, 'ऐसे गा आमचे गोसावी आपुले ईश्वर्ये जाणों नेदिति,' (भा. २ ' २०३) एकदा आपलो जुगारात हरला, तेव्हा त्याची आई रागावल्याने तो गोसाव्याच्या दर्शनास आला. त्याला कावरा बावरा पाहिल्यानतर महादइसा म्हणाली, 'कारे बा ऐसा' तेव्हा चक्रधर म्हणाले, 'बाइ : हा जूं खेळिनला जूं हारविले : याची माता कोपली' (पू. भा. २ २४५) चक्रधराशी बोलताना महादइसा चातुर्याने त्याच्या पूर्व-जीवनाची माहिती करून घेई. त्यावरून तिची खात्री झाली की आपले गोसावी म्हणजेच द्वारावतीकर चागदेव राउळ! ही गोष्ट तिने आबाइसेला सागितली पण दुसऱ्या दिवशी 'तैशास्थानी तैशीया तैसीया गोष्टी न कीजति की' असे चक्रधरानी तिला सागितले. त्याना आपले बोलणे समजल्याचे पाहून महदाइसेस आश्चर्य वाटले. (पू. भा. २ २५०) एकदा पारावर बसले असताना जवळच्या कोनटेयाकडे

बोट दाखवून चक्रधरानी 'एथें एका रायाचे नवघट द्रव्या असति' असे सांगितले. (पू. भा. २ : ३१६.) एकदा इंद्रभटास त्यानी 'गावात काय विशेष वार्ता ?' असे विचारले. त्यावर तो 'काही नाही जी' म्हणाला. तेव्हा चक्रधर म्हणाले, 'वार्ता कैसी नाही : राज्यांतर जाले : रामदेवो रावो राजीं बैसला : आमणदेवो खाली उतरीला : देवगीरी पालटीली' हा नव्हे लोकु पळतु असे : जा. वार्ता शोधा.' इंद्रभटाने शोध केला तेव्हा गोसाव्यांनी सांगितलेली वार्ता खरी असल्याचे त्याला आढळले. (पू. भा. २ ३४३.)

## चक्रधर : चांगदेव राउळ

आपल्या ठिकाणचे 'ईश्वरत्व' कित्येक प्रसंगी चक्रधरानी आपल्या शिष्याना जाणवून दिले. एकदा उपाध्यासमवेत गंगातीरावरून जात असताना त्याची सावली जळात पडली, त्याबरोबर तळींची जळचरे वर आली. ज्या वेळी श्रीकृष्ण यमुनातीरावरून जात तेव्हा पाताळगत जळचरे त्यास पाहण्यासाठी वर येत असे ते वेधाचार्य होते' असे चक्रधरानी सांगितले. (पू. भा. २ २९०.) विरोधकाची निंदानालस्ती कानावर आली तरी ते स्वस्थ राहात. (पू. भा. २ २९४.) तीकवनायकाच्या घरचे श्राद्धाचे जेवण आधी ब्राह्मणाना वाढल्याखेरीज त्याने गोसाव्याना दिले नाही. महदाइसेने जरी त्याना ईश्वर मानले तरी तो तसे मानावयास तयार नव्हता. यावर चक्रधर म्हणाले, 'बाइ' हे काइ ब्राह्मण : की क्षेत्री की वैश्य : की शूद्र : हे नेणिजे की बाइ' त्याच्या या उद्‌गारातील मर्म लक्षात न आल्याने तीकवनायकास आपले 'जैत्य' झाले असे वाटले. (पू. भा. २ : २४८.) एकदा विहरणावरून येताना सत्यादेवीच्या देवळात ते गेले. तेव्हा तेथील चाट्यानी त्याना 'चांगदेवो राउळो या चांगदेवो राउळो या'' असे म्हटले. (पू. भा. २ ३११.) चक्रधरांचा भव्य सत्कार व स्वागत वल्हेग्रामीच्या लोकानी केले. त्यांचा जनमानसावरील प्रभाव लक्षात येण्याच्या दृष्टीने हा प्रसंग संस्मरणीय आहे. त्या गावच्या लोकानी घरोघरी सडे-समार्जन केली. चौक रंगमालिका भरल्या. गुढ्या उभारल्या. वेशीच्या दारावर तोरण बांधले. असे सारे नगर शृंगारले. सुवासिनींनी त्याना ओवाळले. त्याच्या थाळ्यात गोसावी आपल्या जवळचा विडा घालीत. एकाचा विडा एकास देत. (पू. भा. २ : ३०४.)

## लोकापवाद

चक्रधराच्या सिद्धावस्थेतील समभाव ध्यानात न आल्याने त्याच्या चारित्र्याविषयी लोकप्रवाद निर्माण झाले. आत्यंतिक विरक्तीने सर्वसंगपरित्याग करून, राजवैभव आणि अनुरक्त पत्नीचा त्याग करून बाहेर पडलेल्या चक्रधराचे पूर्वजीवन लक्षात घेऊन लोकप्रवाद निर्माण झालेल्या प्रसंगाचा विचार झाला पाहिजे असे

वाटते. त्याच्या रूपसौंदर्याचा अभिलाष धरणाऱ्या स्त्रियांनाही त्यानी परतवून लावले होते आणि त्याच्या शरीरात प्रवेश करणारे चागदेव राउळ हे तर कामाइसेच्या वासनापूर्तीचा प्रसंग टाळण्याकरिता देहमुक्त झाले हेही लक्षात घेतले पाहिजे. नागनाथाच्या देवळात चक्रधर असताना सायंकाळचे वेळी एक स्त्री त्यांची अभिलाषा धरून आली, तेव्हा त्यानी तिला आत येऊ दिले नाही. ती रात्री बाहेरून मोठ्याद्या रडू लागली, तरीही ते बाहेर गेले नाहीत. ( उ. भा. २ : ३५२. ) पुत्रप्राप्तीच्या इच्छेने आपल्या वडील व धाकट्या पत्नीस चक्रधराकडे पाठविणाऱ्या ठाकुराची इच्छाही त्यानी पूर्ण केली नाही. आउसा ही त्याची शिष्या विरक्त, स्त्रीपुरुषभाव नष्ट झालेली अशी होती. तिचा हा भाव पारखण्याकरिता गोसाव्यांनी काही गोष्टी केल्या. चौबाराहून वृधा संगमास ते आउसेच्या पाठीवर बसून गेले. लोकाना त्याचे हे वर्तन चमत्कारिक वाटले ( उ. भा. २ : ४२१. ) जळते स्मशान विझविण्यास त्यानी नागदेव आणि आउसा याना सांगितले. ती भिऊ लागली. तेव्हा तिचे वस्त्र हिरावून त्यानी तिला स्मशानात बसविली. तिचे भय नाहीसे झाल्यावर तिच्या अंगावर 'फाळुके घाला गा' असे त्यानी सागितले. भटोवासानी मग तिला वस्त्र दिले. ( उ. भा. २ ४२२ ) काही नग्न मुलींना विवस्त्र होऊन क्षेमालिंगन देण्यास त्यानी आउसेस सागितले. आणि तिला नग्न नृत्यही करण्यास सागितले. ( उ. भा. २ : ४२३, २४ ) त्यानंतरच्या एका प्रसंगी चक्रधर नागदेवास आउसेबाबत म्हणाले, 'देखिले गा वानरेया पोरी आउवेसि मी स्त्री ऐसी : बूधिही नाही : पुरुषु ऐसीचि बूधि : स्त्रीत्व हे उच्छेदौनि गेले.' ( उ. भा. २ : ४२६ ) यादवाच्या राजघराण्यातील स्त्रियाही चक्रधराच्या भजनी लागल्या होत्या. 'एक नरनारी समानचि वेधु' अशी चक्रधराची अवस्था होती. ब्रह्मचारी देवाच्या गुंफेपुढील अंगणात सडा घालणाऱ्या स्त्रीनं त्याना क्षेमालिंगन दिले. सारंगपंडिताची पत्नी उमाइसा हिची चक्रधरावर दृढ श्रद्धा होती. याचे सारगपंडितास वैषम्य वाटे. त्याची मुलगी धानाइसा हिला खेळविण्यात, तिला गोष्टी सागण्यात चक्रधराना आनंद वाटे. हेमाडपतांची परित्यक्ता पत्नी देमती ही चक्रधराच्या भजनी लागल्यामुळे त्याच्या मनात द्वेष निर्माण झाला. एका तेलीणीच्या खाटेवर चक्रधराचे झोपणे किंवा साधेला जलविहारासाठी बोलाविणे या गोष्टीही लोकांच्या प्रवादाला कारणीभूत ठरल्या. त्याच्या रूपसौंदर्याने अनेक स्त्रिया आकृष्ट होत, याचा चक्रधरांना खेद वाटे. त्यानी 'प्राणियासि यातेंही देखौनि विकारू भोगूं आवडे' असे उद्गार याच दृष्टीने काढले. त्याच्या समवेत बाइसा, महदाइसा सारख्या वृद्ध स्त्रिया असल्या तरी लोक भकतील याची चक्रधराना जाणीव होती. 'तुम्ही सात बाइया : हे एकले बोडिकेः तरि लोकविरुद्ध की ' असे त्यानी स्पष्टपणे सागितले होते. चक्रधराना लोकप्रवादाची जाणीव होती आपले चारित्र्य निष्कळंक राहावे यासाठी ते घेत असलेली

काळजी त्याच्या अनेक उद्‌गारातून प्रकट झाली आहे. आदर्श गुरुमूर्ती आपल्या विचारांप्रमाणेच आचारातही साकार करण्याचा त्यानी प्रयत्न केला. त्याच्या शिष्यानीही लोकप्रवादाच्या या स्मृती मोकळेपणाने, श्रद्धाभावाने सांगितल्या आहेत. त्या घटना स्मृतिगत होईपर्यंतच्या काळात चक्रधराविषयीचे किल्मिष लोकमानसातून नाहीसे होत चालले होते असा याचा अर्थ आहे.

## अवयवछेद व उत्तरापंथे गमन :

चक्रधरांची लोकप्रियता वाढू लागल्यानंतर विरोधकानी त्याना वेळोवेळी छळण्याचा, त्याना नष्ट करण्याचा प्रयत्न सुरू केला. समाजात व राजकीय क्षेत्रात प्रमुख स्थानी असलेल्या व्यक्तींचा यात पुढाकार होता. एके दिवशी काही सैनिकानी चक्रधराच्या मठावर हल्ला केला, तेव्हा नागदेव त्याच्याशी ढालतरवारीने झुंजू लागले. गोसाव्यानी त्याला त्यापासून परावृत्त केले. सैनिकानी मठातील साहित्य लुटले आणि 'हेमाडपंतानी बोलावणे पाठविले आहे' असे सांगून गोसाव्यांना ते पैठणास घेऊन गेले. त्याच्या वियोगाने दु:खित झालेल्या बाईसाने नदीत देह-विसर्जन केले. पैठणास त्याच्यावर स्त्रियाना वेध लावण्याचा आरोप ठेवण्यात आला. सारंगपंडिताने स्वामींच्या विरुद्ध साक्ष दिली. आणि शेवटी शिक्षा म्हणून चक्रधराचा कावसेनाच्या देवळात अवयवछेद करण्यात आला. नाक कापण्यात आले. स्वामींनी ही लीळा स्वीकारल्यामुळे त्याच्या शिष्याना स्वाभाविकच दु:ख झाले. याचा बदला घेण्याची भावना दिसताच 'तुम्हा मारिता पूजिता समानचि होआवा की गा ' असा त्यानी त्यांना उपदेश केला. स्वत:च्या कृतीने विरोध-काचे कृत्य त्यांनी पराकोटीच्या उदारतेने पोटी घातल्याचे दिसून येते. त्याच्या सुंदर श्रीमूर्तीची ही विटंबना शिष्यांना सहन होत नसे. त्यामुळे 'मुख उजळ करावे' असा आग्रह त्यानी स्वामींजवळ धरला. शेवटी तीन दिवसाचा एकान्त पत्करून स्वामींनी अवयवस्वीकार केला, तेव्हा शिष्याना मोठा आनंद झाला. पण चक्रधरानी आता प्रयाणाचा मनोमन निश्चय केला होता. त्यामुळे तसे सूचक उद्‌गार त्याचे मुखातून वारंवार निघू लागले. आपल्या म्हाइंभट-महदाइसा-सारख्या शिष्याना त्यांनी बोलावून घेतले. आपले विरोधक आता केवळ अवयव-छेदावर संतुष्ट राहणार नाहीत याची त्याना कल्पना असावी. त्यामुळे पंथीय कार्याच्या दृष्टीने त्यांनी निरवानिरव सुरू केली. उपदेश केला. नागदेवास पंथाच्या आचार्यपदी स्थापिले. विरोधक अर्थातच स्वस्थ बसले नव्हते. राजापर्यंत चक्रधर-विषयक तक्रारी त्यानी पोचविल्या आणि शेवटीं चक्रधराचे 'वोखटे' करण्याची आज्ञा झाली. महदाइसेस चक्रधर म्हणाले, 'हे आपणयाते राखों न शके मा : तुमते काइ राखैल?' (उ. भा. २ ४६३.) शिष्याना त्यानी 'वचनरूप परमेश्वरा'ची आठवण दिली. (उ. भा. २ ४७६.) शेवटी त्याच्या कल्पनेप्रमाणे

' रायाचा हाकारा ' आला. शिष्याना त्यानी गोविंदप्रभूंकडे सोपविले. त्यांची दाढी पैठणकडे गेली. तेथे हातियाळेच्या तळयावर मारेकऱ्याकडून त्याचा शिरच्छेद झाला अशी आख्यायिका आहे. तर दुसरी आख्यायिका अशी आहे— राजसेवकानी मारहाण केल्याने भटोवास ' ना जी : हें जण पाहावेना ' असे म्हणून निघून गेले. चक्रधरानी आउसेस सांगितले होते, ' आता हें म्लेच्छामध्यें असैल . उत्तरापथें गमन त्याप्रमाणे त्यानी उत्तरापंथे गमन केले. बींझा डोंगराच्या घाटावर त्याना गंगातीरींचे चाटे भेटले ते महदाइसाचे भाचे होते. तेथून ' गोसावी उत्तवीए वीजें केलें ' ते म्लेंच्छात राज्य करीत असल्याच त्या चाट्यानी स्वामींच्या भक्त-जनाना सांगितले. त्यामुळे सर्वांना दुःख झाले. भटोवास म्हणाले, ' आता असं-निधानीं सर्वज्ञें म्हणीतले ते करावे ' ( उ. भा २ ४८८. ) त्याप्रमाणे नागदेवानी चक्रधरानी सोपविलेली पंथकार्याची धुरा उचलली.

## प्रधानपुत्राचा पंथप्रवर्तक

एका प्रधानपुत्राच्या पंथप्रवर्तक झालेल्या थोर व्यक्तीच्या जीवनाचा हा थोडक्यात आलेख आहे. ऐहिक जीवनातील सुखोपभोगात यथेच्छ डुंबणाऱ्या या व्यक्तित्वाला परमेश्वरी स्पर्श होताच ते अंतर्बाह्य बदलून गेले. हरपाळदेवाचा उभयदृश्यावतारी चक्रधर बनला. चांगदेव राउळाच्या हरपाळदेवाच्या शरीरातील प्रवेश हा त्या शरीरधारी व्यक्तीचे देहधर्म घेऊनच झाला;' पण त्या दिव्यात्म्याच्या वास्तव्याने पूर्वीची देहकळा बदलून तिने परमार्थाकडे वाटचाल सुरू केली. विलासी प्रधानपुत्राच्या जीवनाला वळण देणारा प्रसंग घडून त्याच्या ठिकाणी आत्यंतिक विरक्तता निर्माण झाली. एकाकी निःसंगिता त्याने स्वीकारली. देह व प्रपंच-विषयक भान सुटले. एकाकी भ्रमणाची अवस्था सुरू होऊन अंतर्बाह्य जग आणि मन यांच्या युद्धाचा प्रसंग सुरू झाला. श्रीगोविंदप्रभु यांच्या उपदेशाने व श्रीदत्त-दर्शनाने जीवितकार्याचे भान आले आणि ' उरलो उपकारापुरता ' या अवस्थेतील चक्रधराचे पंथप्रवर्तनाचे कार्य सुरू झाले.

## चक्रधरांची परिणत अवस्था

चक्रधरांच्या ' लीळाचरित्र ' या जीवनचरित्राचे पंथीय पद्धतीने एकाक, पूर्वार्ध व उत्तरार्ध असे तीन भाग मानण्यात येतात. व स्मृतींचे विशिष्ट टप्पे त्या अनुक्रमाने मांडण्यात येतात; परंतु चक्रधराच्या एकूण जीवनाचा विचार केला तर प्रधानपुत्र हरपाळदेव, चांगदेव राउळाच्या देहप्रवेशाने पुनर्जन्मित व एकाकी भ्रमण करणारा हरपाळदेव, गोविंदप्रभूंच्या उपदेशाने व श्रीदत्तदर्शनाने जीवितध्येय गवसलेला चक्रधर आणि अधिकारवाणीने जीवनाचा नवा मार्ग दाखविणारा पंथप्रवर्तक चक्रधर अशा त्याच्या जीवनाच्या चार अवस्था स्पष्ट होतात. एकाक

सोडला तर त्यांच्या आयुष्यातील अखेरच्या आठ वर्षांच्या कालखंडातील स्मृतींचाच समावेश प्राधान्याने 'लीळाचरित्रा' त झाला आहे. ही या तेजस्वी व्यक्तित्वाची परिपक्व अवस्था होती. यात तारुण्यातील प्रक्षुब्धता, साधकाची शंकितावस्था आणि ध्येयसिद्धीची उत्सुकता यातील खळबळ नाहीशी होऊन एक स्थिर, शांत व परिणत व्यक्तित्व सामान्यांच्या मार्गदर्शनाकरिता सिद्ध झाले होते. त्यामुळेच त्या व्यक्तित्वाचा एकारलेपणा नाहीसा होऊन त्यात संपन्नता आणि विविधता आलेली दिसते. नितळ, स्वच्छ, प्रसन्न आणि उदार अंतःकरणाची अवस्था प्रत्ययास येते. नवीन जीवनमार्ग सांगत असताना त्यांचा अहंकार नाही किंवा ममत्व नाही. उच्च पातळीवरील आध्यात्मिक विचारांची जडता त्यांच्या निरूपणात किंवा व्यक्तित्वात नाही. परमेश्वराचे हालते, चालते—बोलते स्वरूप त्यांच्या रूपाने भक्तांसाठी प्रकट झाले होते. मातेजवळ जाण्यात बालकाला वाटणारी निर्भयता चक्रधरांच्या भक्तांनाही प्राप्त झाली होती. आपल्या वर्तनातील स्निग्धतेने आणि वत्सलतेने भाविकांना त्यांनी आकृष्ट केले होते. त्यांचे रूपसौंदर्य हा सामान्यांना वेधून घेणारा गुणविशेष असला तरी त्यांच्या गुण आणि विचारसौंदर्याने भक्तजनांना त्यांचे-ठिकाणी खिळवून टाकले होते. चक्रधरांना कोणापासून काही मिळवावयाचे नव्हते. काही संग्रह करावयाचा नव्हता की व्यक्ति वा स्थान याविषयीची आसक्तीची भावनाही त्यांच्या ठिकाणी नव्हती.

आपल्या दीर्घ अशा आयुष्यात घेतलेल्या अनेकविध अनुभवांनी, चिंतनाने, तपस्येने त्यांच्या ठिकाणी बहुश्रुतता आली होती. नवविचारप्रदानाचे सामर्थ्य प्राप्त झाले होते. जीवनाकडे पाहण्याचा एक निकोप दृष्टिकोन प्राप्त झाला होता. त्यामुळेच त्यांचे संथ, स्निग्ध, संयमी, विरक्त असे व्यक्तित्व साकार झालेले होते. त्यामुळेच त्यांच्याकडून आत्मविश्वासपूर्ण मार्गदर्शन होत होते. सामान्यांना प्रभावित करणारा विद्वत्तेचा शब्दबंबाळ डौल त्यांच्याजवळ नव्हता. त्यांच्या दैनंदिन जीवनातील संभाषणातून साध्या, सोप्या पण अमृतगर्भ्यांनी भरलेल्या शब्दांतून जीवनाचे नवदर्शन घडविणारा चैतन्यप्रवाह उमडून बाहेर पडत होता. सामान्यांच्या जीवनातील समस्यांना त्यांचा स्पर्श होताच त्या उलगडून सोप्या होत होत्या

गोविंदप्रभु आणि चक्रधर या गुरु-शिष्यांच्या जीवनचरित्राचा अभ्यास केला तर गोविंदप्रभूंच्या चरित्रात चमत्कारांचे धुके अधिक तर चक्रधरचरित्रात त्यांची मूर्ती वास्तवाच्या प्रसन्न सूर्यप्रकाशात चमकत असलेली दिसते. त्यांच्या तपस्येने, जीवनानुभवातून प्राप्त झालेल्या ज्ञानाने त्यांच्याकडून घडलेल्या गोष्टींना भाविकांनी चमत्कारांचे स्वरूप दिले असावे. त्यांच्या ठिकाणी दैवी सामर्थ्य असल्याची प्रतीती अनेक स्मृतींतून येते; पण त्यांचा तार्किक उलगडा करण्याची शक्यता चक्रधरचरित्रात जितकी आहे, तितकी गोविंदप्रभूंच्या चरित्रात मात्र नाही. थोर पुरुषांच्या अतर्क्य घटनांचा अर्थ लावता न आल्यामुळे सामान्यांना त्यांचे

ठिकाणी ईश्वरावतारित्व दिसू लागते. लोक आपल्याला 'ईश्वर,' 'देव' असे म्हणत असल्याचा उल्लेख स्वत: चक्रधरानीच प्रसंगोपात्त केला आहे. चांगदेव राउळाच्या तेजाने भारलेले आणि तपस्येने व गुरुकृपेने उजळलेले चक्रधरांचे व्यक्तित्व दैवी सामर्थ्याच्या वलयाने शोभून दिसते.

## सर्वस्पर्शी व्यक्तित्व

ज्या सामान्यांचा उद्धार करावयाचा त्यांच्या सुख-दुःखाशी, भाव-भावनांशी चक्रधर एकरूप झाले होते. आपल्या गुरुत्वाच्या भूमिकेचे दडपण त्यानी कोणावर पडू दिले नाही. त्यांचे मोकळे सर्वस्पर्शी व्यक्तित्व यामुळेच सर्वांना हवे हवेसे वाटे. त्यांची कलेचे मर्म जाणणारी रसिकता, पंडिताचा दंभ नाहीशी करणारी विद्वत्ता, जीवनसूत्रे यथारूप सांगणारी संभाषणातील मार्मिकता, अनेकविध भाषांवरील त्यांची प्रभुता, सर्व भूतमात्राच्या ठिकाणची समानता, गुरु-शिष्य संबंधातील ताण नाहीशी करणारी क्रीडाप्रियता आणि मुद्रेवर स्मित उमटविणारी मिस्किल विनोदप्रियता यानी पुष्ट झालेले हे सुसंस्कृत व्यक्तित्व होते. शिष्यांविषयीचे प्रेम आणि त्यांच्या जीवनाला आकार आणणारी शिस्त देणारे, पण आपल्या गुरूविषयी आत्यंतिक श्रद्धाभाव जपणारे असे हे व्यक्तित्व होते.

नवपंथप्रवर्तन करीत असताना लौकिक जीवनाचा विचारही स्वाभाविकपणेच चक्रधराना करावा लागला. आपल्या कोमल, प्रेमळ वाणीने त्यानी अनेक माणसे जोडली, विरोधकांच्या विरोधाची धारही चक्रधरांच्या स्निग्ध वागण्याने बोथट झाली. ईश्वरावतारी पुरुषांकडे भाविकांचा ओढा असला तरी विद्वज्जन त्यांचेकडे आकृष्ट होतीलच असे नाही. चक्रधरांच्या नवविचारप्रदानाच्या सामर्थ्यामुळेच अनेक संस्कृतभाषाकोविदही त्यांचे अनुयायी बनले. त्यांच्या या सामर्थ्यामुळेच तत्कालीन लब्धप्रतिष्ठितांचा विरोध चक्रधराना सहन करावा लागला. त्यांच्या आचारविषयक सूत्रात प्रकट झालेली विचाराची उंची आजही जाणवणारी आहे.

चक्रधरांनी नवसंप्रदायाची उभारणी केली, तरी त्यांचा लौकिक प्रपंच त्यानी उभारला नाही. त्यांची स्वत:ची राहणी अत्यंत साधी होती. गुजराती मातृभाषा असलेल्या, संस्कृतावरही प्रभुत्व असलेल्या चक्रधरानी आपल्या विचार-प्रदानाकरिता लोकभाषा मराठीचा स्वीकार केला आणि मराठीत अभिजात ग्रंथनिर्मितीची प्रेरणा दिली. विषयबहुळ असलेल्या अन्य प्रदेशाचा त्याग करून सात्त्विक महाराष्ट्रात असण्याचा उपदेश केला. तारुण्यात अनेक ढाढाळांत रमणाऱ्या 'वानरेया' नागदेवाचा, त्याच्यावर अनेक संस्कार करून, पंथाचा आचार्य बनविला. मोक्षाचा मार्ग सर्वांसाठी मोकळा असल्याचे दाखवून सामान्यांच्या जीवनात त्यानी आध्यात्मिक धग आणि रंग निर्माण केली.

♠ ♠

# ४ : वेधवंती नागदेव

'तूं प्राणियांते अनिष्टापासौनि काढौनि इष्टी लाविता आचार्यो की :' अशा तऱ्हेचे गौरवपूर्ण उद्‌गार महानुभाव पंथाचे संस्थापक श्रीचक्रधर यानी ज्यांच्याबद्दल काढले ते श्रीनागदेवाचार्य ही महानुभावपंथांतील एक प्रभावी व्यक्ति समजली जाते. कोणत्याहि नव्या धर्माची किंवा पथाची संस्थापना संस्थापकाच्या विभूतिमत्त्वावर बरीचशी अवलंबून असते. त्याला योग्य अनुयायी मिळाले नाहीत, तर त्या तत्त्वप्रणालीचा जनमानसात प्रसार होऊं शकत नाही व अशा तऱ्हेचे पंथ वाढण्याऐवजी खुरटून जातात. त्या दृष्टीने पंथसंस्थापकाचा दृष्टिकोन लक्षात घेऊन त्यानुसार पावलें टाकणारा विवेकी अनुशासक लाभला तर त्या पंथाची भरभराट होऊं शकते. धार्मिक, राजकीय, सामाजिक कोणत्याहि संघटनेची तात्त्विक व संघटनात्मक अशीं दोन अंगें असतात. तात्त्विक भूमिका ती संघटना अस्तित्वात येतानाच ठरलेली असते. ती कार्यवाहींत आणण्याचें कार्य संघटकाना करावयाचें असतें. या दृष्टीने मूळ पंथसंस्थापकानंतर अधिकारारूढ होणारी व्यक्ति पंथीय तत्त्वज्ञानाचे बारकावे जाणणारी, विवेकशील, चारित्र्यसंपन्न आणि तितकीच व्यवहारकुशल असावी लागते. 'मराठा तेतुका मेळवावा । महाराष्ट्र धर्म वाढवावा' असा रामदासानी आपल्या अनुयायाना जो आदेश दिला तोच शब्द बदलून कोणत्याहि पंथीयास देता येईल. 'सामर्थ्य आहे चळवळीचें । जो जो करील तयाचें' असेंहि रामदासांनी सांगून ठेवलें आहे. महानुभाव पंथाचे आद्याचार्य श्रीनागदेवाचार्य याच्या ठिकाणी या गुणाचा आढळ झाल्यामुळेंच त्या पंथाचे संस्थापक श्रीचक्रधर यानी त्याच्याबद्दल गौरवाचे उद्‌गार काढले.

चक्रधराच्या निरंतर सान्निध्यात असल्यामुळे त्याच्या शिकवणीचा तर नागदेवावर परिणाम झालाच, पण दैनंदिन व्यवहार सांभाळतांना पंथाच्या एकंदर स्वरूपाचीहि त्याना पूर्ण कल्पना आली. चक्रधराची सर्व प्रकारची सेवा ते करीत असत. पूजावसराच्या प्रत्येक समयीं त्याची उपस्थिति असे. कित्येक वेळा ते

निरूपणहि करीत, चक्रधराच्या विश्वासाला ते पूर्ण प्राप्त झाले होते. म्हणूनच एकदा चक्रधर त्याना म्हणाले, ' तुझेंनि मुखें अशास्त्रीय न नीगे की : ' चक्रधराचें तत्त्वज्ञान त्यानीं पूर्णपणें आत्मसात् केलें होतें. यासंबंधीं बोलताना चक्रधर एकदा बाइसाला म्हणाले, ' हा काइ आपुलें बोलैल : हा एथीचेंचि बोलेल की ' नागदेवाना आपल्या स्वामींच्या अंतरंगाचीहि चागलीच ओळख झालेली होती. फिरावयास जाताना किंवा येताना चक्रधर नागदेवाच्या खाद्यावर हात ठेवून चालत. चक्रधराना कोठे जावयाचें आहे, त्याना निरूपणाची इच्छा आहे की नाही हेंहि नागदेव अचूकपणें ओळखत. चक्रधरहि आपल्या पथाच्या भावी आचार्याला जणू प्रात्यक्षिक पाठ देत होते. रात्रीच्या वेळीं ते खास नागदेवाकरिता आणि बाइसाकरिता प्रवचन करीत, पण नागदेवाना वरचेवर ' जाड्य ' येत असे. प्रवचन चालू असतानाच नागदेवाना झोप येऊ लागावयाची. अशा वेळी स्वतः चक्रधर किंवा बाइसा त्याच्या तोंडावर पाणी मारून त्याना जागं आणावयाचे !

महानुभावपथात प्रवेश करण्यापूर्वी नागदेव अनेक ' ढाढाळा 'त ( व्यसनात ) गुंतलेला असे. तो नेहमी ' आडवी वेणी ' बाधी व ' मोकळा कासवटा ' सोडून हिंडत असे. पण दादोसमुळे त्याची व चक्रधराची भेट झाली. प्रथम भेटीतच चक्रधराचा ताबूलप्रसाद ग्रहण केल्याबरोबर त्याला स्थित्यानंद प्राप्त झाला. पुढे तो एकसारखा त्याच्याकडे येऊ लागला व शेवटीं त्याने सन्यासदीक्षा घेतली. चक्रधराच्या निधनानंतर नागदेवाचार्य काहीं दिवस गोविंदप्रभूंच्याहि सान्निध्यात होते. या दोघांहि गुरूंची सेवा त्यानी मनोभावे केली. गोविंदप्रभु त्याना ' हरिमा ' म्हणत, तर चक्रधरानी त्याचें नाव ' वानरा ' असें विनोदाने ठेवलें होतें. चक्रधरां-साठीं गुफा तयार करण्याकरिता या झाडावरून त्या झाडावर चढून त्यानी द्रुतगतीने फाटे मोडले. त्या प्रसंगीं चक्रधराच्या मुखातून कौतुकाने ' वानरेया ' असे उद्गार निघाले. गुरूंनी अशी वेगवेगळी नावे ठेवली असली तरी नागदेवा-चार्य स्वतःला ' भटो ' म्हणवून घेत असत. यामध्ये त्याची लीनता प्रकट होते. महानुभावपंथाला नागदेवाचार्यांनी दिलेल्या वळणामुळे या पंथास कित्येक वेळां ' भटमार्ग ' असेहि संबोधले जाते, हे या सदर्भात लक्षात ठेवण्यासारखे आहे.

## वेधवंती नागदेव

संघटनकौशल्य नागदेवाचार्यांत मूर्तिमंत होते. पाडित्यप्रदर्शनाकडे त्याचा ओढा नव्हता किंवा ती त्याची वृत्तीच नव्हती हे चक्रधराच्या निरूपणप्रसंगी त्याना येणाऱ्या जाड्यावरून ओळखता येईल. असे असले तरी त्याच्या ठिकाणी व्यवहार-चातुर्य व माणसे जोडण्याची कला चागल्याच प्रमाणांत होती आणि त्यामुळेच म्हाइभट, गोपाळ पंडित, दामोदर पंडित, केसोबास, भास्करभट्ट यासारखे संस्कृतज्ञ विद्वान् त्यांनी आपल्याभोवती गोळा केले होते. इतरांना आकर्षित करून

घेण्याची त्याची ही जी शक्ति होती, तीवरूनच त्याना 'वेधवती नागदेव' असे अभिधान प्राप्त झाले होते. लोकसंग्रह करण्याची त्याची ही वृत्तीच महानुभाव पथाच्या प्रसाराला पोषक ठरली. त्याचे बोलणे अत्यंत वेधक होते. त्याच्या 'वेधवंती' या विशेषणाचे स्पष्टीकरण करणारी एक स्मृति अशी आहे. 'भटोवास भिक्षे जाति : भटोबासाचा शब्द गुजरध्वनि घोळिला उमटे : शब्द आइकिलेयां रडतें लेकरू हावरें साडि तोंडिचें स्तन साडूनि भटोबासाकडे पाहों ठाकें : कव्हणि दु ख भोगीता आपुलें दु ख वीसरे : एका दर्सनें प्रसस्ती होती . भाडे ते असति तयाचे रोख जाति मग उभयें गंगातीरें भटोबासातें 'वेधवती नागदेवोभट' म्हणति : यैसी प्रसीधि :' (२१) भिक्षेच्या वेळीं ऐकूं येणाऱ्या नागदेवांच्या आवाजानें रडणाऱ्या मुलाचे रडे थाबे, दु खित आपले दुःख विसरे, भाडणाऱ्याचा राग नाहीसा होई, अशी त्याची 'वेधवंती' मूर्ति होती. हे नाव किती रूढ झाले होते याचे प्रत्यंतर काही स्मृतींतून येते. एकदा काळे कृष्णभट याना लोकानी चोर समजून पकडले. पण 'हे वेधवंती नागदेवभटाचे नव्हेति ?' असे पढून त्यांनी त्याना सोडलें. (३०) रामदेवराव यादवांची राणी कामाइसा रामदेवरावास म्हणते, 'आम्ही वेधवंती नागदेवभट गुरु करूं.' (१४६.) त्याची उक्ति आणि कृति जशी 'वेधवती' होती. त्याचप्रमाणे मूर्तीहि आकर्षक होती. त्याची 'झळझळित' मूर्ति पाहून एका ब्राह्मणाने त्याना तुम्ही त्रिकाळ स्नान करता काय ? असे विचारले. त्या वेळी नागदेवानी दिलेले उत्तर मार्मिक आहे. या प्रसंगींची स्मृति अशी आहे 'भटो तुमाचि मूर्ति झळझळित दिसे तरि काइ तुम्ही त्रीकाळ स्नान करीता ' यावर भटोबास म्हणाले, 'गगनिं तारागणें झळकताती : तें काइ : त्याचे मदिर झळकत दिसते : कि आतु (ल) आहे तें झळकताये :' तेव्हा तो म्हणाला, 'ना भटो आतु आहे तें झळकताये :' यावर भटोबासीं म्हणितलें, 'तैसे माझेया मंदिरात वस्तु आहे ते झळकताये :' हे ऐकून त्याने भिक्षा केली. (१०२.)

## चक्रधर व नागदेव

नागदेवचार्यांच्या हृदयमंदिरात झळकणारी ही वस्तु त्याना परमेश्वरस्वरूप असणाऱ्या 'चक्रधरा'खेरीज दुसरी कोणती असणार ? ध्यानी, मनी, स्वप्नी चक्रधराचेच स्वरूप ते पाहत होते. मठात झोपलेले असताना उवऱ्याचे उसे करून ते झोपायचे. प्रभातकाळी लौकरच उठणारे चक्रधर त्याचे जाड्य त्याच्या वक्षःस्थलावर पाय ठेवून नाहीसे करीत. तेव्हा तो पाय नागदेवाचार्य मस्तकी धारण करीत, आलिंगत, चुंबत. शेवटी बाइसाला सागावे लागे, 'भटो, बाबांना उशीर होतो आहे.' मग ते सोडत. त्याची चक्रधराविषयीची भक्ति अजोड आहे. कित्येक वेळा काही भविष्यसूचक वाक्ये नागदेवाचार्य बोलत. त्याचे प्रत्यंतर आल्यानंतर

लोकाना आश्चर्य वाटे. त्यानी ते आश्चर्य व्यक्त केल्यास नागदेवाचार्य म्हणत, ' हा गा . श्रीचक्रधराचेनि प्रसादें इतुलें (ही) नेणें : ' स्वतःकडे लघुत्व घेण्याची वृत्ति व चक्रधराविषयीची प्रगाढ श्रद्धाच या ठिकाणी व्यक्त होते. नागदेवाचार्य मनकवडेहि होते. चक्रधरांना गोविंदप्रभूंचे वस्त्र अत्यंत प्रिय होते. त्याच्या दर्शनाने, स्पर्शाने ते आनंदित होत. ही गोष्ट नागदेवाचार्यांना माहीत होती. म्हणून काही वेळा श्रीचक्रधर उदास दिसू लागले म्हणजे त्यांची उदासीनता नाहीशी करण्याकरिता त्यांच्यापुढे नागदेवाचार्य गोविंदप्रभूंचे वस्त्र ठेवीत (ली. च. उत्त. १२४). चक्रधरावरील त्याच्या या आत्यंतिक श्रद्धेचें प्रत्यंतर आजारीपणाच्या स्मृतीवरूनहि येतें. एकदा नागदेवाचार्यांना ताप आला. पंडितबासानी एक खाट आणून त्यावर चागले आथरूण घातले आणि नागदेवाचार्यांस म्हटले, ' भटो, यावरि निद्रा करावी.' त्याप्रमाणे नागदेवाचार्य त्या खाटेवर झोपले. तिसऱ्या दिवशीं नागदेवाचार्यांनी विचारले, ' मला ताप येऊन किती दिवस झाले ? ' पंडितबास म्हणाले, ' तीन दिवस झाले.' आपल्याला ज्वर का यावा याबद्दल त्यानी सिंहावलोकन केले. आपल्या पूर्वचरित्रात काही उणीव आहे की काय हे जणू त्यानी पाहिले. केशोबासानी विचारले, ' भटो, काही भीतिदायक नाही ना ? ' तेव्हा नागदेवाचार्य म्हणाले, ' ना गा पडिता नाही. ' हे ऐकून सर्वांना सुख झाले. नंतर नागदेवाचार्य म्हणाले, ' आता कोणी बोलू नका. स्वस्थ रहा. मी गोसाव्याच्या ( चक्रधराच्या ) लीळा आठवीन.' असे म्हणून काही वेळ ते निवात बसून राहिले .. आणि मग एकदम ' हा मी चक्रधराचा वानरा म्हणौनि अग मोडूनि उठले.' ' श्रीचक्रधरू ' म्हणून मोठा शब्द करून उठून वसले. ' इतुलेनि निशेष ज्वरनिवृत्ति जाली. ' ( २५७. )

## चक्रधर आणि नागदेव

पंथाच्या या प्रथमाचार्यांचे व्यक्तित्व अनेक सस्कारानी त्याचे गुरु चक्रधर यानी घडविले होते. चक्रधरांचे नागदेवावर आत्यंतिक प्रेम होते. त्याच्या निष्ठेची परीक्षा त्यांनी अनेकदा घेतली होती. नवे काही सागायचे असेल, त्या वेळी नागदेव आपल्याजवळ असावा अशी त्याची इच्छा असे. तो नसेल तर ते अस्वस्थ होत, इतका नागदेवानी चक्रधराचा लोभ संपादन केला होता. या उभयताच्या सबधाच्या लीळा अत्यंत हृद्य अशा आहेत. प्रारंभी दादोसचा शिष्य असणाऱ्या नागदेवाने चक्रधरांपाशी राहावयाचे ठरविले. तेव्हा दादोसचे चक्रधराना ' त्याला आपल्याजवळ ठेवू नका, तो अनेक धाडाळाचा आहे, असे सागितले. तेव्हा चक्रधर म्हणाले, ' येथे राहील त्याला मी पाठवीत नाही ' आणि जाईल त्याला ठेवून घेत नाही. ' हे ऐकून दादोस गप्प राहिले. (उ. भा. १ . १. ) नंतर चक्रधरानी नागदेवास रिधपुरास पाठविले. परंतु चक्रधराचा वियोग त्याला

असह्य झाल्यामुळे त्यानी त्याला परत बोलावून घेतले, तेथून आल्यानंतर नागदेव 'लेकरू फुंदे ऐसे फुंजो लागले.' तेव्हा सर्वज्ञ म्हणाले, 'उगे असा गा वानरे या दुख न करा : आता एथौनि तुमचे केंधवाही पाठविजेना :' असें म्हणून त्याच्या पाठीवर त्यानी हात फिरविला. (उ. भा. १ २) नागदेवाच्या मनातील चागल्या पदार्थाची आसक्ती अद्यापि दूर झालेली नव्हती. एकदा मठातील जेवणात टौळातिल तेल घालून खाताना त्याना ओकारी आली. तेव्हां चक्रधर म्हणाले, 'वानरेसा महात्मके कीं गा : तुम्हासि घृणात्यागु होआवा कीं गा' (उ. भा. १ ६) एके वेळी नागदेवास तूपपोळी आणि चण्याच्या डाळीचे वरण जेवण्याची इच्छा झाली. ती चक्रधरानी जाणून पूर्ण केली. (उ. भा. १ २३.)

गोसाव्याच्या भेटीस आलेल्या एका ब्राह्मणास मोठे दु ख झाले. तसे आपणास का होत नाही असे नागदेवानी विचारले. तेव्हाच चक्रधर म्हणाले, 'यांसि पातलेपण नाही गा . तुम्हासि पातलेपण आले असे :' (उ. भा. १ २५.) एकदा निरूपणांत 'देव कथानेही प्राप्त होत नाही.' असें ऐकल्यानंतर नागदेवास मोठे दुःख झाले. तेव्हा चक्रधरानी सांगितले, 'असे रडल्याने देव प्राप्त होणार आहे का ? ऐसे चर्चीजे पुसोजे : मग अनुष्ठीजेः तैं होईल की ' (उ. भा. १ २६) मळके वस्त्र नेसून मातीकाम करणाऱ्या नागदेवास पाहून चक्रधर एकदा बाइसास म्हणाले, 'बाइ नखाग्रापासौनि केसाग्रावेन्ही सूळबूळित वीकारें भरला असे : परि पोरु सीहाणा उमटों नेदी . वेडीयाचे वीकार प्रकटति : सिहाणियाचे आच्छदिति ' (उ. भा. १ ९६.)

एकदां अंगात ज्वर असलेल्या नागदेवास चक्रधरानी नीवाशास पाठविले. पण पाठोपाठ त्याच्याकरितां त्यानी शिदोरीही पाठविली. तोवर घाम घेऊन नागदेवाचा ज्वर गेला होता व भूकही लागली होती. (उ. भा. १ १०८.) उपाहाराचे साहित्य आणण्यासाठीं गेलेल्या नागदेवास उशीर झाला. त्याच वेळी चक्रधरांना निरूपण करण्याची प्रवृत्ती झाली आणि ते नागदेवाची आतुरतेने वाट पाहू लागले. एकदा नागदेवानी त्याचा लोभ संपादन केला होता. (उ. भा. १ : १०९.) चादण्या रात्री विहरण करणे चक्रधराना आवडत असे. अशी त्यांना एकदा प्रवृत्ती झाल्यानंतर ते नागदेवाच्या पाठीवर बसून छीन्न पापास गेले. (उ. भा. १ : १३२.) नागदेवाची ते अनेक वेळा गमत करावयाचे . एकदा डोंबग्रामी असता चक्रधरानी एकीकडे नागदेव व दुसरीकडे अन्य भक्तजन असे करून झुंज लावली. त्यात नागदेवास बराच मार खावा लागला. शेवटीं चक्रधरानी 'काइ गा । वानरेया दुखवलेति ' असें म्हणून, हात धरून त्याला उठविले. (उ. भा. १ १४०.) एकदा नागदेव गगेच्या कांठावर गेले असताना त्याना

स्थिति झाली. तेथील एका पिंपळाच्या पारावर ते वसले. तेव्हां चक्रधरानी आपल्या भक्तजनांना त्यांचेवर गुंडे मारण्यास सागितले. त्या सर्वांचे गुडे नागदेवानी चुकविले. 'आता तुला कोण राखेल' असें म्हणून शेवटी चक्रधरानी स्वत च हाती गुंडा घेतला. त्याबरोबर 'आता माझा श्री चक्रधरु राखैल :' म्हणून नागदेवानी उडी मारली व ते त्याच्या चरणी लागले. (उ. भा. १  १४१.)

गोसावी लोण्यास गेले असता तेथील देवळाचा गुरव पूजा करून जात होता. त्याला 'अरे गुरवा, उभा राहा' या शब्दात नागदेवांनी हाक मारली. तेव्हा चक्रधर म्हणाले, माहात्मेनी प्रीयक्तेया होआवे :' आणि गुरवाला ते म्हणाले, 'राणे हो : तुमचिए गावीं ब्राह्मणाची घरे थोडी : तरि तुम्ही अग्रगण्य होआवे: (उ. भा. २:२३५.) गंगेकडे गेले असता वाटेत भटो बासाना महादेव पाठक भेटले. भटोबासाशी उधाणी करीत दारवठ्यावर येऊन ते स्वस्थ राहिले. भटोबासाना चक्रधर म्हणाले, 'का बोलत नाहीस ?' यावर नागदेव म्हणाले, 'हे विद्वास. यांचेशी मी काय बोलणार ? मी काही शास्त्र जाणतो काय ?' तेव्हा चक्रधर त्याना म्हणाले, 'बोल तुझा मुखोंहुनि अशास्त्रिए न निगे :' त्यानुसार बोलून भटोबासानी महादेव पाठकास गप्प केले. (उ. भा. २ : २७५.) गोसावी निरूपण करीत असताना बाईसेनें नागदेवास घागरभर पाणी भरून आणण्यास सागितले. त्यामुळे नागदेव चरफडले. लोणार तीर्थावरून घागर भरून आणताना मात्र त्याना वाटले, बाईसेने हे पाणी काय आपले अग धुण्यासाठी आणण्यास सागितले ? हे तर गोसाव्यासाठी.' असा त्याना अनुताप झाला. परत आल्यानंतर त्यानी गोसाव्याना दंडवते घातली. तेव्हां ते म्हणाले, 'वानरेया : तुम्ही जे होउनि गेले ति तें नव्हे : आलेति तें होए' (उ. भा. २  २७९.) चक्रधराना नेण्याकरिता नेण्याकरिता हेमाडपंताचे पाइक आले, तेव्हा नागदेवांनी वोडण खांडेयानी त्याच्याशी दोन हात केले, पण चक्रधरानी त्याना परावृत्त केले. (उ. भा. २  ४३५)

आपली अवतारसमाप्ति करण्याचे चक्रधरानी ठरविल्यानंतर त्यानी नागदेवाना आचार्यपदी स्थापून त्याप्रमाणे त्याना संबोधण्यास व उपदेश करण्यास सुरुवात केली. 'एथौनि वानरेसा वीचारशास्त्र चरितार्थु . तुम्ही उपदेशा अधिकार्ये :' असे सागितले. (उ. भा. २ . ४७४.) नागदेवांनी यापूर्वीच शिष्यत्व पत्करले असते तर त्याना अधिक काही देता आले असते असे चक्रधरांना राहून राहून वाटत असे. (उ. भा. २  ४७५.) एकदां नागदेव आलेले पाहताच चक्रधर त्याना उद्देशून 'आचार्ये हो : या  ' असे म्हणाले. 'आपण आचार्यांना नरक सागितला,' असें नागदेवानी म्हणताच चक्रधर म्हणाले, 'तैसा तुं परतारकु आचार्या नव्हेसि कीं गा : तू प्राणियाते अनिष्टापासौनि काढुनि इष्टी लावीता आचार्या

कीं गा : ' (उ. भा. २ ४७७.) सर्वज्ञानी एकदा नागदेवापासून पाचासातांना बोध होईल असे म्हटल्यावर नागदेव म्हणाले, ' आपणापासून एक दोघांना आणि माझ्यापासून पाचासातांना बोध हे कसे काय ? ' हे ऐकून त्यांचा अहंकार नाहीसा करण्यासाठीं चक्रधर म्हणाले, ' हा गा देता काइ तुं : देतें तें आणिक असे कीं अधिकरणा तें अधिकरूनि परमेश्वरूचि उद्धरीति : ' (उ. भा. २ : ४७८.) नागदेवाना आचार्य मानल्यानंतर एकदा महदाइसेने चक्रधराना ' गोसाव्याच्या प्रसादाचे दोन भाग करून अर्धा नागदेवास व अर्धा इतराना वाटल्यास पाप होईल काय ' असे विचारले. तेव्हा चक्रधर म्हणाले, ' पाप नव्हे : परि अविधि होए : ' (उ. भा. २ . ४७९.) चक्रधर एकदा नागदेवाविषयी बोलतांना म्हणाले, ' आपण गेल्यानंतर बापूडे वानरें आतां एणेवीण एकलें असैल हृ ऐकून भटोबास रडू लागले. तेव्हां चक्रधर म्हणाले, ' वानरेया : रडिजेना कीं गा : रडिलेया काजळी पडे : ' (उ. भा. २ : ४८०.) चक्रधरविषयक आत्यंतिक प्रीतीमुळेंच नागदेवाची स्थिती त्याच्या वियोगाच्या कल्पनेने दयनीय होत असे. चक्रधरानी आपले प्रयाण सूचित करताना एकदा नागदेवास म्हटले, ' वानरेया : लगीन घडी वर्तेति असे गा . ' हे ऐकताच लोळण घेऊन नागदेव रडू लागले. त्याचे सात्वन करताना चक्रधर म्हणाले, ' ऐसे रडिजेना कीं गा वानरेया रडता काजळी पडे वचनरूप परमेश्वरु तो तुम्हा जवळीचि असे कीं गा : ' (उ. भा. २ ४७६.) नागदेवाच्या रूपाने आपल्या सर्व अनुयायानाच चक्रधरांनी हा सात्वनपर उपदेश केला होता. चक्रधर व नागदेव ही जणु दोन अभिन्न व्यक्तिमत्वे होतीं.

अशा तऱ्हेने चक्रधराचा पंथ चालविण्याला योग्य असा मनुष्य चक्रधरानीच जणू निवडला होता.[१] दादोस व चक्रधर या दोघानाहि नागदेवाचार्य हा आपला शिष्य व्हावा असें वाटत होतें. यावरून त्याच्या ठिकाणच्या अपूर्व गुणाचा आढळ त्या दोघानाहि झालेला असला पाहिजे. साहजिकच चक्रधराच्यानंतर नागदेवाचार्य हे महानुभावपंथाचे आचार्य बनले. गुरूच्या सान्निध्यात अखंड भक्तीत रममाण झालेले नागदेवाचार्य आता पंथप्रसाराकडे आस्थापूर्वक लक्ष देऊं लागले. हेंहि चक्रधराचे पवित्र सेवाकार्य आहे अशी त्याची भावना होती. ते एके ठिकाणीं म्हणतात,

---

१ ' श्रीचक्रधरस्वामी परमेश्वरावतार असल्यामुळे मृत्यूवर त्याचे नियंत्रण असणे स्वाभाविक आहे. नागदेवाचार्यांचा मृत्यु त्यानी चुकवला होता असे महानुभाव लोक मानतात. नागदेवाचार्यांच्याकडून पंथाचे कार्य त्याना करवून घ्यायचे होते. त्यासाठी त्यांना जिवत ठेवायचे होते, म्हणूनच त्यानी हे केले ' (प्रा. कोलते ' श्रीचक्रधर-चरित्र, १२७.)

'गोसावी मातें म्हणितलें . येथौनि वानरेयातें अधिकरण कीजैल' (१११.) अर्थात् प्रचारकार्य करताना पंथाचा पाया बळकट करताना त्यानी आपल्या ठिकाणचे संघटनाचातुर्य व तदनुषंगिक गुण प्रकट केले असल्यास नवल नाही.

## 'पायवणि घ्यायचे तर देवाचे घ्या :'

'अत्युर्ध्वी पदिं थोरही बिघडतो' ही उक्ति अनेकाच्या बाबतीत सत्य ठरलेली आपण पाहतो. पण साधुत्वाचे महत्त्वाचे लक्षण जो विनय किंवा नम्रता हा गुण नागदेवाचार्यांच्या ठिकाणी पुरेपूर होता. आपले अकारण स्तोम माजविले जाण्यानेहि त्यांना दुःख होत असे. एकदा एका गृहस्थाने नागदेवाचार्यांची सुवर्णपुष्पानी पूजा केली. मूल्यवान् वस्त्रे दिली. धूपारती मंगलारती करूं लागले. तेव्हां नागदेवरावाचे डोळे पाण्यानी भरले. 'दु.ख कां करता' म्हणून विचारतां नागदेव म्हणाले, "असतीपरि ते काये माझेया बापासि विहिली?" (४०.) त्याच्या दर्शनासाठी येणाऱ्याना ते आपल्याला साष्टांग दंडवत घालू देत नसत किंवा पायावर डोके ठेवू देत नसत. ते म्हणत, 'हा गा ऐसीं दंडवतें गोसावीयांचेया (चक्रधराच्या) श्रीचरणा कीजेति' (१२८.) एके वेळीं आकाइसाने त्याच्या पायांवर डोके ठेवून नमस्कार केला, तेव्हा नागदेवाचार्य रागावले. ते म्हणाले, 'तुला मी एकदा सांगितल, दोनदा सांगितले, तरी तूं ऐकत नाहीस' असे म्हणून त्यानी तिला बाहेर घालविली. तेव्हा तिने पंडितबासास सांगून युक्तिवाद केला. 'चक्रधरांशी संबंधित सर्व वस्तु पूज्य' असें जर तुम्ही म्हणता तर तुम्हाला नमस्कार करणे योग्यच आहे. हे ऐकल्यानंतर त्यानी तिला नमस्कार करण्यास परवानगी दिली. (१३०.) आणखी एका प्रसंगी एका गृहस्थाने नागदेवाचार्यांचे पाय धुऊन पायवणिं तीर्थ म्हणून प्राशन केलें. तेव्हा नागदेवाचार्य म्हणाले, 'पायवणिं घ्यायचे तर देवाचे घ्या.' तेव्हा तो म्हणाला, 'देवाचे म्हणूनच आम्ही घेत आहोत.' हे ऐकल्यानतर 'भटोबास उगेचि राहिले' (१२७.) या स्मृतींतून भक्ताची नागदेवाविषयी व नागदेवाची चक्रधराविषयींची श्रद्धा उत्कटत्वाने प्रत्ययाला आल्याखेरीज राहत नाही. नागदेवाचार्य स्वतःला 'भटो' म्हणवून घेत, यात त्याच्या मनाचा मोठेपणाच दिसून येतो. त्याचे शिष्य प्रत्येक खेपेस नागदेवाचार्यांचा 'भटो' 'भटो' म्हणून उल्लेख करीत. ते ऐकून एका ब्राह्मणास फार आश्चर्य वाटले. त्याने नागदेवाचार्यांस "तुमचे शिष्य तुम्हाला 'भटो' असे का संबोधतात?" म्हणून विचारले. तेव्हां नागदेवाचार्यांनी त्याला स्पष्टच सांगितले, 'ना हें याकरवि आम्हीचि म्हणवीतों' (१२६.) त्याचा हा साधेपणा, नम्रता, निरहंकारी वृत्ति, त्याच्या मृत्यूच्या वेळींहि प्रकट झाली. मृत्यूसमयी हात जोडून त्यानी सर्वांची क्षमा मागितली. ते म्हणाले, 'गोसावियाचा व्यापारु चालवितां कोण्हा माझें वेंकास गेलें असैल तरि तुम्ही

समस्तीं क्षेमा करावीं  यैसे म्हणौनि जये केले ' ( २५९. ) अंतकाळींहि आपण चक्रधरांचीच सेवा म्हणून पंथप्रसाराचे कार्य केले, ही भावना त्यांच्या ठिकाणी होती !

## भक्तांच्या गुणांची पारख

गुरुविषयक अतीव श्रद्धेबरोबरच नागदेवाचार्यांचे शिष्यावरील प्रेमहि अपूर्व होते. माणसाची पारखहि त्यांना चांगली असे आणि सभोवतालच्या माणसांतील गुणाची योजना कुठे करावी हे जाणणारे ते दुर्लभांपैकी एक योजक होते. शिष्याच्या अंगच्या गुणाची त्याना जाणीव होती व योग्य त्या प्रसंगी उघडपणे ते त्याची प्रशंसाहि करीत असत. परमेश्वराची प्राप्ति करून घेण्याच्या मार्गात गायन निषिद्ध मानले जाई. दामोदर पंडिताना गायनकला अवगत होती. एके वेळी त्यांचे गायन ऐकून नागदेवाचार्य त्याना म्हणाले, ' पंडिता आजिलागौनि तू गीत गावों नको गा गोसावीं वारीलें असें  गीत विरवो म्हणौनि : ' ( ८९. ) या प्रसगानतर पुन्हा एकदा दु:खभरल्या स्वरात दामोदर पडितानी केलेली चक्रधराची आळवणी ऐकल्यानतर नागदेवाचार्य संतुष्ट झाले आणि म्हणाले, ' पडिता आजिलागौनि तुज गीत गावेया अनुज्ञा गा . ' ( ९० )

एके वेळीं पंडितबास, केशवबास नागदेवाचार्यांशीं चर्चा करीत होते. त्याच्या विद्वत्तेने ते प्रसन्न झाले व म्हणाले," माझें शास्त्र म्हाइभटा लक्ष्मीधरभटाचेंनि नुजळेचि  तें पंडिता केशोदेवासि चर्चा करीता उजळलें : यैसे तोखले " ( ६८. ) महंताच्या चुकीच्या आचारावर हिराइसा नेहमी टीका करून त्याना योग्य मार्गाची जाणीव करून देत असे. तिच्याबद्दल बोलताना नागदेवाचार्य म्हणतात, ' हीराइयें विरक्ताची कसवटी गा इचा कसवटीं उतरला तो विरक्त . ' ( २४१. ) कवीश्वरबासाची ते ' शृंघारीया कवी ' म्हणून प्रशंसा करतात ( २४२. ) भास्करभट्ट बोरीकर याचे नाव त्यानी ' कवीश्वर ' असे ठेवले होते ( ५५. ) ' लीळाचरित्रकार ' महेंद्रभट गोविंदप्रभूच्या सेवेत सदैव निमग्न असे. त्या दास्याच्या सबधाबद्दल नागदेवाचार्य एकदा म्हणाले, ' म्हाइभटातें प्रभुदास्यावेगळें जो दाखवी  तयासी मी ' महावाक्य  वाखाणिन ' ( २४७. ) आपल्या शिष्याच्या सद्गुणाची त्याना इतकी खात्री असे की कित्येक वेळा त्याच्याविषयीच्या कौतुकाने ते पैजेचीही भाषा बोलत असत. केशोबास, पंडितबास, राघोभट नेहमी शास्त्रविषयक चर्चा करीत असावयाचे. हे पाहून नागदेवाचार्य म्हणाले, ' केशव पंडित रामातें शास्त्र-संवादेंवीण जो उठिता . बैसता रिकामेया दाखवील . तयासि होड करीन गा ' ( २५३. ) त्याच ठिकाणीं त्या तिघाच्या एकात्मतेबद्दल ते म्हणतात, ' एकि मूर्ति त्रय भागा : राम : पडित  केशवव्यास : ' महानुभावीय सुप्रसिद्ध कवीयित्री महदाइसा इचे निधन झाले. त्या वेळी ' म्हातारी धर्मरक्षक  प्रीतिरक्षक : सुहृदत्वें दु:खनिवेदु ' अशा तऱ्हेचे प्रशंसेचे उद्गार त्यानी काढले.

## ' दृष्टीचिये आळवीं राखा '

शिष्याच्या सुखदुःखाकडे ते मातेच्या अंतःकरणाने पाहत. त्या सर्वांत बंधुभाव राहावा, कुणाची आबाळ होऊ नये, त्याचप्रमाणे ते स्वत मुळे दुखावलेहि जाऊं नयेत, याकडे त्याचे विशेष लक्ष असे. रामदेव नावाचा त्याचा एक शिष्य एकदा भिक्षेकरिता निघाला. जाताना त्याने नागदेवाचार्यांना क्षेमालिंगन दिलें. त्या वेळीं नागदेवाना त्याचे अंग गरम लागले. तशाहि स्थितींत तो भिक्षेस निघाला. त्याच्याविषयीच्या काळजीने नागदेवांचे अतःकरण गलबलले. त्याची काळजी वाहण्याकरिता त्यानी पंडितबासाना व केशोबासांना पाठविले. ते म्हणाले, ' तुम्ही यातें दृष्टीचिये आळवीं राखा ' त्याचप्रमाणे ते एकदा रामदऱ्यास गेले असता एका भक्ताने त्याना भोजनास बोलविले. त्याच्यासोबत पंडित व केशोबासहि होते. परंतु तिथे त्याची उपेक्षा होऊन त्या दोघाना जेवण मिळाले नाही. ही गोष्ट लक्षात येताच नागदेवाचार्य रागवले व त्यानी आधी त्या दोघाची व्यवस्था करावयास लावले ( ६३ ). आपल्या भक्तातील वितुष्टहि त्यानी कित्येक वेळा नाहींसे केले. डिंडोरी गोविंद पडित आणि अपर रामदेव ' या एकमेकाचा विरोध नागदेवाचार्यांनी फेडिला ' असे एक स्मृति सागते ( ६४ ). कित्येक वेळा शिष्याकडून चुका होत. पण तिकडे दुर्लक्ष करून नागदेव त्याच्या डोक्यावरील दडपण कमी करीत. एकदा भक्तजनाची भोजनाची पगत चालली असता एकाने उष्टे अन्न नागदेवाच्या ताटात घातले. एकाने ही गोष्ट त्याच्या नजरेस आणली. त्या वेळी ते म्हणाले, ' सौजन्ये दोष नाही ' आणि ' ते उगेचि राहिले ' ( २७ ). देयाइसानेहि एक वेळ नागदेवाना आपल्याकडे भोजनासाठी बोलाविले. परंतु वाढताना तुपाऐवजी चुकून करडईचे तेल तिने त्याना वाढले. नागदेवाचार्य काही बोलले नाहींत; परंतु ही गोष्ट लक्षात येताच तिच्या जिव्हारीं लागून राहिली. तेव्हा नागदेवाचार्य तिला म्हणाले, ' करडेल वैसा काहीं मी स्वादु जाणे तरि रूपैचि आन. ' ( ९३ ). यात भक्ताना सावरून घेण्याबरोबरच इद्रियाचे चोचले न पुरविण्याची विरक्ताची वृत्तीहि दिसून येते.

शिष्यानाहि आपल्या आचार्यांच्या नवनीतसदृश अंतःकरणाची पूर्ण कल्पना होती. त्याच्याविषयी शिष्याना सदैव आदरयुक्त भीति वाटत असे. एके वेळी जेवताना नागदेवाचार्यांची करवती ( लाकडी भाडे ) ठेवण्यात आली नव्हती, तेव्हा ती त्यानी स्वत घेतली. यासंबंधी एक स्मृति म्हणते, ' येरा दैन्य जालें : मग सागाति सावध वर्तती : ' ( ३८ ). त्याच सुमारास मोठा दुष्काळ पडला व त्यामुळे शिष्याना भिक्षा मिळणें कठीण होऊ लागले. भिक्षेहून आल्यानंतर त्याची भिक्षेची झोळी पाहण्याचा नागदेवाचार्यांचा क्रम असे. नागदेवाचार्यांना आपल्याला भिक्षा मिळत नाही, हे पाहून वाईट वाटूं नये, म्हणून शिष्य झोळीच्या तळाशी

चिथ्या घालीत. पण एके दिवशी नागदेवाच्या ध्यानांत ही गोष्ट आली आणि नागदेवाचे अतःकरण दुःखे फुटो आले. त्यानी त्या महताना दंडवत घातले आणि यापुढे आपल्याकडे भिक्षा घेण्याची त्याना विनती केली. मठात स्वयंपाक करवून त्याना रोज जेवण देण्याची त्यांनी व्यवस्था केली. ' यापरी भटोवासाचे द्रव्य उपयोगा गेलें : तव सुकाळ जाला मग नेघनि : ' ( १०७. )

## मार्गरक्षणाची काळजी

समाजाला मार्गदर्शन करणाऱ्या व्यक्तीला वैयक्तिक रीत्या काही पथ्ये पाळावी लागतात. द्रव्य आणि स्त्री याच्या मोहाने अनेक तपस्वी योगभ्रष्ट झालेले आपण पाहतो. नागदेवाचार्यांना द्रव्याचा प्रथमपासून तिटकारा होता. खेइभट नावाचा एक गृहस्थ नागदेवाचार्यांकडे दीक्षा घेण्याकरिता आला. येताना आपल्या वाटणीचे सर्व द्रव्य त्याने सोबत आणलें होते, ते त्याने नागदेवाचार्यांना अर्पण केले. त्याबरोबर त्यानी ते आपल्या पायाने दूर लोटले आणि म्हटले, ' मी काइ एकाधा चोळीका माहात्मा ' मा हें आणिलें . ( ९९ ). त्याच्या मनातील तिरस्कार या शब्दातून चागल्या रीतीने व्यक्त झाला आहे. महानुभाव पथ अप्रिय होण्याला अनेक कारणे घडली. त्या पंथांत माजलेला अनाचार हेहि एक कारण सागितले जात. पण स्वतः नागदेवाचार्य या बाबतींत फार दक्ष होते. आपल्या ' मार्गाच्या ' रक्षणाची त्याना सदैव चिंता असे. एकदा एके गावी केशोबास अटनाकरिता गेले असता तेथील एका महाजनाची मुलगी त्याच्यावर लुब्ध झाली व तिने केशोबासाना मोहात पाडण्याचा प्रयत्न केला, पण तेथून कशीबशी सुटका करून घेऊन ते नागदेवाचार्यांकडे आले व घडलेली सर्व हकीगत त्यानी त्याना सागितली. हे केशोबास प्रथमपासूनच विरक्त होते. नागदेवाकडे ते आल्यानंतर त्याच्या संबंधियानी त्यांना परत घरी नेले. पण तेथे त्या लोकाना त्याच्या विरक्तवृत्तीचा पूर्ण पडताळा येऊन त्याच्यावद्दल ' माझा केशव शुकयोगींद्र की गा : ' ( १३ ). अशा तऱ्हेचे धन्योद्गार काढले होते. तेव्हा केशोबासांनी अशा मोहाच्या प्रसंगी स्वतःची जबाबदारी ओळखून जे वर्तन केले, त्यामुळे पंथावरील एक मोठे किटाळ टळले असे नागदेवाचार्यांना वाटले आणि म्हणूनच ते म्हणाले, ' केशवदेनि मार्गातें रक्षिलें गा :' ( १०३. ) याच प्रसगी नागदेवानी त्याच्यावरहि एका जोगिणीने एका देवळांत आणलेल्या प्रसंगाची हकीगत प्राजलपणें सागितली व त्यातून स्वतःची सुटका कशी करून घेतली तेहि सांगितले. केसोबासाच्या प्रसंगानंतर तसा प्रसग पुन्हा ओढवू नये म्हणून त्यानी ' एकलेया अटन न करावें गा : ' ( १०६, ) असे सागितले व भिक्षेला जाताना तीन-चार जणानी मिळून जावें असा आदेश दिला.

## व्यवहारी नागदेव

कुशल संघटक म्हणून नागदेवाचार्यांचा उल्लेख केला आहे; अर्थातच ते कल्पनेच्या जगात वावरणारे नव्हते हे ओघानेच आले. व्यवहाराच्या भूमिकेवर ते भक्कम पाय रोवून उभे होते. इंद्रभट नांवाच्या एका गृहस्थास चक्रधरांनी एक रेशमी वस्त्र दिले होते. म्हाइंभटाने गुरुकुळासाठी त्याच्याकडून ते मागितले. परंतु तो म्हणाला, ' आम्ही नेदूंचि. ' म्हाइंभटानी ही हकीगत नागदेवाना सांगितली. ती ऐकून नागदेव रागावले. म्हाइंभटासारख्या विद्वानाने ते मागावे आणि इंद्र-भटाने देऊं नये म्हणजे काय ? ते म्हणाले, ' फुटा काइ त्याचेया बापाचा ! तो गोसावी असेखा गुरुकुळाचेया हेतु दीधला असे : ' ते स्वतः इंद्रभटाकडे गेले व तडजोडीने त्यांतील अर्धे वस्त्र प्रसाद म्हणून त्यांनी पंथात आणले. नंतरचे अर्धे वस्त्रहि कालांतराने पंथात आलें ( ६९ ). नागदेवाचार्यांनी एकदा गौराईकडून तूप विकत घेवविले तेव्हा दोन पळया शिल्लक राहिलेले तूप गौराईने ' महात्म्या '-करिता मागून घेतले. ते नागदेवाचार्यांना आवडले नाही. त्यानी ते तूप सांडावयास सांगितले. ते तिला म्हणाले, ' हें महात्मेपण विकणें म्हणा ' ( ८२ ). आणखी एका प्रसंगी नागदेवाचार्यांच्या व्यवहारी वृत्तीचे मोठे मार्मिक दर्शन होते. एकदा मठात कांहीं कारणामुळें मोठे जेवण होते. स्वयंपाक करण्यासाठी चार ' रुके ' देऊन एक ब्राह्मणी नागदेवाचार्यांनी बोलविली. जेवणे झाल्यानंतर गौराईने त्या बाईस शिल्लक राहिलेल्या मांडपुऱ्या दिल्या. ते नामदेवाचार्यांनी पाहिले. ती निघून गेल्यानंतर ते गौराईस म्हणाले, ' इयेसि तरि मीयां च्यारि रुके देवविले : तुवा मांडे का घातले : हेचि माझे महात्मे खाते तरि देवातें आठवावेया दक्ष होते : ' ( ११० ). अर्थातच तेव्हापासून त्याना न विचारता कोणी काही घालीनातसे झाले.

शिष्यांच्या वागणुकीवर त्यांची चांगली नजर असे व योग्य त्या प्रसंगी ते त्याना वाक्ताडनहि करीत. केशोबास-पंडितबास याना विजनात चर्चा करताना त्यांनी पाहिले. तेव्हा त्यानी ' सिक्षापण ' केलें. ते त्या दोघांना म्हणाले, ' सर्व काळ जरि चर्चाचि करावीं तरि देवातें केधवा स्मराल : ' ( १२४ ). अर्थात् असे ' सिक्षापण करतांना शिष्यांत साहजिकच ते स्त्री-पुरुष असा भेद करीत नसत. एकदा बाइसा भाजी निवडीत बसलेली होती. निवडताना काहीं पाने व देठ तिने टाकून दिले होते. ते नागदेवाचार्यांनी वेचले व बाइसाच्या हातात आणून देऊन ते तिला म्हणाले, ' अर्ध कूर्पी : अर्ध सुपीं ऐसे का करीता वो हेंचि माझे महात्मे खातिल तर स्मरणिं दक्ष होतील ' ( २१२ ).

नागदेवाचार्यांच्या व्यवहारी वृत्तीचे दर्शन अशा स्मृतींतून होत असले तरी त्याना रसिकतेचे किंवा विनोदाचे वावडे होते, असे नाही. एके वेळी काळे

कृष्णभट यानी गोकुळातील उद्धवागमननावर पदे केली. ती ऐकून नागदेवाचार्य तन्मय झाले. सामरस्यामुळे त्याच्या तोंडून उत्स्फूर्त उद्‌गार बाहेर पडले– ' कृष्णा: तेन्हळि काइ तू तेथचि होतासि : ' ( ११४ ). एकदा थंडीच्या दिवसात नागदेवाचार्यांनी सकाळी लौकरच जेवण घेतले. त्यानंतर बैठकीवर समोर शेगडी ठेवून ते हात शेकीत बसले होते. तेवढ्यात एक ब्राह्मण दर्शनासाठी आला. नागदेवाचार्यांच्या अंगठीस चुकून एक शीत चिकटून राहिल्याचे दिसले. तेव्हा ती गोष्ट त्याच्या निदर्शनास आणण्याकरिता तो म्हणाला, ' भटो हें काइ सीता : ' यावर नागदेवाचार्य म्हणाले, ' होये सीत लागे तेन्हाळे सीत उदक लागे तेन्हळि उदक ' असे म्हणून त्यानी हातावर उदक घेतले. या ठिकाणी ' शीत ' शब्दावर त्यानी केलेला श्लेष ध्यानात घेण्याजोगा आहे.

## मराठी प्रेम व ग्रंथसंपादन

आणखी एका कारणामुळे नागदेवाचार्यांचे नाव मराठी वाचकाच्या चागले लक्षात राहिलेले आहे. ते म्हणजे त्याची मराठी भाषाविषयक कामगिरी. महानुभाव वाङ्मयाचे दालन नव्यानेच सर्व वाचकाना उपलब्ध झाले आणि त्यामुळे आपल्या समृद्ध प्राचीन वाङ्मयाची मराठी वाचकाना कल्पना आली. महानुभाव पथाचे संस्थापक श्रीचक्रधर यानी ' महाराष्ट्री असावें ' व ' मराठी भाषेंत ग्रंथरचना करावी ' असा आदेश आपल्या अनुयायाना दिला होता. ज्ञानेश्वर-एकनाथादि कवि वैयक्तिक रीत्या संस्कृताभिमान्याच्या आक्षेपाना कृतीने उत्तरे देत असले तरी महानुभाव पंथाने साधिक रीत्या केलेले वाङ्मयीन कार्य मराठी भाषेची थोरवी सिद्ध करण्यास साहाय्यकारी ठरले आहे. या पंथात महेंद्रभट, केसोबास, भास्करभट यासारखे सस्कृतज्ञ पंडित होते. त्याना सस्कृत भाषेंत ग्रंथरचना करणे अवघड नव्हते-नव्हे काहींनी केलीहि; परंतु नागदेवाचार्यांनी त्याना वेळीच हटकून आपल्या गुरूच्या आदेशाची जाणीव करून दिली. नागदेवाचार्यांच्या मराठी प्रेमाच्या कथा आता चागल्याच प्रचलित झालेल्या आहेत. एकदा पंडित केशोबासांनी नागदेवाचार्यांना संस्कृत भाषेत प्रश्न केला. तेव्हा नागदेवाचार्यांनी म्हटले, ' तुमचा अस्मात् कस्मात् मी नेणे गा : मज श्रीचक्रधरें निरूपिली मन्हाटी ' तियाचि पुसा ' मग तिहीं मानिलें ' ( ६६ ). परंतु नागदेवाचार्यांना सस्कृत भाषेचे ज्ञान नव्हते असा याचा अर्थ नाही. केसोबासांच्या ' रत्नमाला ' या सस्कृत ग्रथात ' देउळवाडा '-ऐवजी ' हनुमंतवाडा ' असा शब्द केसोबासानी घातला होता. तिथे नागदेवाचार्यांनी त्याना सुधारणा सुचविली. संस्कृत ' रत्नमाले ' प्रमाणेच ' उद्धरण ' हि संस्कृतमध्ये बांधण्याची केसोबासानी एकदा इच्छा प्रदर्शित केली. तेव्हा नागदेवाचार्य भावनापूर्ण स्वरात म्हणाले, ' नको गा केशवदेया येणे माझीया म्हातारीया नागवतिल : ' ( १६ ). परंतु संस्कृत ' रत्नमाले 'ची प्रशसा करावयासहि ते

चुकले नाहीत. ते म्हणाले, ' भले केलें केशवदेया : गोसावीयाचीया अमोघ लीला बाधलीया : तुवा थाक्पुर्ष्पी ईश्वरार्चन केलें ' ( १४. )

श्रीचक्रधराच्या लीलाचे संकलन त्यानी महेंद्रभटाकडून करवून घेतले. पण त्याचे संपादन नागदेवाचार्यांनी केले. उत्तरार्ध जवळजवळ त्यानीच सांगितला. योग्य शब्दाची निवड करून नको ते शब्द त्यानी गाळले. ' रत्नमाले 'तील सुधारणेचा उल्लेख वर आलाच आहे. नागदेवाचार्यांच्या विचाराने केसोबासानें ' प्रकरणान्वय ' लाविला. ' जें जेथचें तें तेथींचें माझेनि विचारें लावावें गा असे नागदेवानी त्याना सागून ठेवले होते. तोच प्रकार ' दृष्टान्तप्रकरणा 'चा ! (१७ ).

अशा प्रकारे महानुभाव पंथाला व वाङ्मयाला प्रतिष्ठा प्राप्त करून देणाऱ्या नागदेवाचार्यांचे निधन साप्रदायिक मतानुसार भाद्रपद वद्य द्वादशी शुभकृत नाम सवत्सरे शके १२२४ ला झाले. बत्तिसाव्या वर्षात त्यानी पथात पदार्पण केले. चार वर्षे चक्रधराच्या सहवासात व त्यातीलहि चार महिने गोविंदप्रभूंच्या सहवासात त्यांनी घालविले. चक्रधराच्या निधनानंतर गोविंदप्रभूंच्या सान्निध्यात ते चौदा वर्षेपर्यंत राहिले. त्यानंतर १६ वर्षे त्यानी पंथप्रचार केला. अशा रीतीने ६६ वर्षांचे आयुष्य त्याच्या वाट्याला आले.

## ' भटोबासांचें बोलणें ईश्वर वाणी की '

नागदेवाचार्यांबद्दल त्याच्यानंतरचा पंथाचा आचार्य केसोबास यांचे उद्गार नागदेवाचार्यांबद्दल त्याना व पथीयाना वाटणाऱ्या श्रद्धेचे द्योतक आहेत. एकदा कवीश्वरवास व नागदेवाचार्य याच्यात धर्मवार्ता चालली असता बरीच चर्चा झाली. तेव्हा केसोबास कवीश्वरांना म्हणाले, ' भटोबासाचें बोलणें ईश्वर वाणि की तें आइकिलें तैसें सिरसा नमस्करूनि घेयावें : ' ( २३७ ).

श्रीचक्रधराच्या निधनानंतर महानुभाव पथाची धुरा वाहणे हे अतिशय अवघड व जोखमीचे कार्य होते. मुसल्मानाची सैन्ये आता दक्षिणेत येऊन पोचली होती. त्याचा तत्कालीन सथ समाजजीवनावर परिणाम होऊ लागला होता. हिंदूंच्या धार्मिक श्रद्धास्थानावर मुसलमानाकडून कठोर प्रहार होऊ लागले होते. अशा स्थितींत महानुभाव पंथीयाचीहि ससेहोलपट होऊं लागली. नागदेवाचार्यांना अनेक वेळा स्थलातर करावे लागले. या अस्थिरतेच्या काळातहि पंथप्रसाराचे व बळकटीचे काम त्यानी चालूच ठेवले होते. या पंथाची रचना त्यानी इतकी दृढ केली की, नंतरच्या आचार्यांना फक्त ती गादी चालविण्याचेच कार्य उरले. नागदेवाचार्यांच्या जीवनांतील विविध घटनाकडे आपण सहज दृष्टिक्षेप केला तरी प्रत्येक प्रसंगी प्रकट होणारा त्याचा आत्मविश्वास आपले मन भारून टाकतो. सद्यःस्थितीला पालाण घालून भविष्याकडे रोखलेली त्याची पारदर्शी नजर आपल्याला स्तिमित करते.

त्यांचे सारे भावविश्व चक्रधराभोंवती केंद्रित झाले होते. त्याच्या व्यक्तिमत्त्वाची आणि तत्त्वज्ञानाची नस त्यांच्या चागल्या परिचयाची होती. आपल्या पूजनीय श्रद्धास्थानाचे वैचारिक लोण त्यानी अत्यत काळजीपूर्वक पुढीलापर्यंत पोचविले.

नागदेवाचार्यांबद्दलच्या विविध स्मृति वाचीत असतांना नागदेवाचार्य आपल्यासमोर एक माणूस या नात्याने उभा राहतो. अतीव श्रद्धा, निदिध्यास याच्या जोरावर एक सामान्य माणूस आकाशाला व्यापून राहणारे व्यक्तिमत्त्व कसे संपादू शकतो याचा हा एक आदर्श आहे. नागदेवांचे हे व्यक्तित्व हळूहळू व्यापक होत गेले आहे. नागदेवाचार्यांबद्दलच्या श्रद्धेच्या भावना स्मृतिकाराच्या शब्दाशब्दातून पाझरत गेल्या आहेत. परंतु नागदेवाचार्यांच्या व्यक्तित्वाचे अवास्तव स्वरूप त्यानी कोठेहि दाखविलेले नाही. नागदेवाचार्यांनी एक माणूस या नात्याने जे जीवित व्यतीत केले, ते आपल्या साध्याभोळ्या पण अंत करणाच्या गाभ्यातून निघालेल्या रसाळ शब्दात त्यानी माडले आहे. सर्वसामान्य माणसाच्या नजरेला नागदेवाचार्यांच्या व्यक्तित्वाचे जे पैलू जसे दिसले ते तसेच आणि काही तर त्यांच्याच शब्दांत आपल्यासमोर आलेले आहेत. म्हणूनच रागलोभादि सामान्य माणसाचे विकार ज्याच्या ठिकाणी आहेत अशा नागदेवाचे चित्र आपोआपच आपल्यासमोर साकार झाले आहे. आडवी वेणी बाधून, मोकळा कासवटा सोडून पूर्वाश्रमात नाना ढाढाळात रमणारा, गुरूच्या शब्दाखातर पुरात उडी घेणारा, हल्लेखोराना हातात तलवार घेऊन उत्तर देऊ पाहणारा, शिष्याच्या स्वभावदोषावर कडक टीका करणारा आणि दुष्काळातील त्याच्या हालानी विरघळून जाणारा, व्यवहारी वृत्तीने अधिक अन्न न देणारा आणि भाजीचे देठहि राखून ठेवणारा, पंथ बदनाम होऊ नये म्हणून स्त्री-पुरुषसंबधाबाबत दक्षता बाळगणारा, काही वेळा विरोधकाचा तीव्र उपहास करणारा अशा नागदेवाचार्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या लहानमोठ्या, भल्याबुऱ्या छटा स्मृतिकारानी निःसंकोचपणे आपल्यासमोर ठेवल्या आहेत सामान्य माणसाच्या भावना असूनहि असामान्य व्यक्तिमत्त्व संपादन करणारा एक माणूस या दृष्टीने, वाचकाला त्याच्याशी आपले जवळचे नाते आहे असे वाटते ते यामुळेच !

# ५ : आद्य मराठी कवयित्री : महदाइसा

## धवळे निर्मिती

एके दिवशी भक्तजन भिक्षेकरिता गेले होते. तेव्हा एक तेलीण वधुवराकरिता बाशिंगे नेत होती. तिला महादाइसेने म्हटले, ' अग तेलीणी, एक बाशिंग आमच्या गोसाव्याकरिता दे. ' तेव्हा तिने आणखी एक चागले बाशिंग केले आणि गोसाव्यांच्या श्रीमुगुटावर बाघले. तेव्हा गोविंदप्रभू म्हणाले, आवो मेली जाय : कांकण वाध म्हणे : डाउ बांधाया म्हणे ' हळदी उटावे म्हणे : तुरें वाजवावे म्हणे : तुपे पऱ्हावे वाहायावे म्हणे बौने करावे म्हणे : मांडौ घालावा म्हणे : ', आणि तशी तयारी सुरू झाली. ईश्वरनाएकाने आपली कन्या देऊ केली. सर्वांना जेवणावळ घातली. मग महादाइसेने धवळे गायले. गोसावी तिला म्हणाले, ' आवो मेली जाय : गाए गाए म्हणे ' महदाइसने विचारले, ' काइ गावो जी ? ' गोसावी म्हणाले, ' आवो कृष्ण रुक्मीणी गाय म्हणे तुरया थाट गाय म्हणे ' आणि महदाइसेला स्फूर्ति झाली. इतुकेन रुक्मीणी स्वयंवर गावोंचि लागली. ' नीरुता लागला जीवीः' हे कडावं गाइल.

मराठीतील आद्य कवयित्रीपदाचा मान मिळविणाऱ्या महदाइसेची काव्यनिर्मिती अशी उत्स्फूर्त झाली. तसे पाहिले तर मराठीतील स्त्रीकाव्यधन हे असेच उत्स्फूर्त आहे. परमदैवताची आज्ञा, आवडता विषय, अनुकूल वातावरण यामुळे तिच्या वाणीला नवे तेज चढले आणि ' रुक्मिणी-स्वयंवर ' या काव्याचा जन्म झाला. तिच्या काव्यश्रवणाने गोविंदप्रभूही तन्मय झाले. ते तहानभूक जणु विसरून गेले. आपण रुक्मिणीच्या राउळी ' जेवलो ' असे त्यांनी सांगितले. चार दिवस रुक्मिणी-स्वयंवराचे गाणे झाले आणि मग गोसाव्याची प्रवृत्ति भंगली. महदाइसेने गाइलेले हे गीत म्हणजे ' धवळे ' होत. लग्नात वरा ( धवा ) विषयी गायचे गीत असा त्याचा अर्थ.

## महदाइसेचे व्यक्तिमत्त्व

महानुभाव पंथातील श्री चक्रधर आणि गोविंदप्रभु या दोन दैवतांच्या जीवनात महत्त्वाचे स्थान पटकाविणारी महदाइसा ही अशाच आकर्षक व्यक्तिमत्त्वाची स्त्री होती. महानुभाव पंथाचा आद्य आचार्य नागदेव हा तिचा चुलतभाऊ. त्याची आई आबाइसा व बहीण उमाइसा यांनीही महानुभाव पंथाची दीक्षा घेतलेली होती. वास्तविक रामदेव विद्यावंत किंवा दादोस हा या घराण्याचा गुरु, परंतु त्याच्यामुळेच या सर्वांना श्री चक्रधराचे दर्शन व प्रसाद लाभला. महदाइसेने आपले शिष्यत्व पत्करावे अशी दादोसप्रमाणे चक्रधराचीही इच्छा होती, परंतु दादोसने त्यात खूप अडथळे आणले. द्वारावती वाराणसी अशा क्षेत्री त्याने तिला पाठविले परंतु तेथे गेल्यानतर 'उदकासारिखी उदके : पाषाणासारिखे पाषाणः झाडासारखी झाडे : माणूस' याचा प्रत्यय येऊन तिला मोठे दुःख झाले आणि तिने तेथेच जातिगोतांना आणि दादोसला तिलांजली दिली आणि ती सर्वभावाने चक्रधरांना अनुसरली.

महदाइसा हे काही तिचे मूळचे नाव नव्हे. तिचे खरे नाव रूपाई. 'महदाइसा' हे नाव तिच्या पणजीवरून चक्रधरानी ठेविले. तिची पणजी भविष्य सागे. तिने अनेक विद्वानाना वादांत जिंकले होते. ती मोठी 'प्राज्ञ' बाई होती. महदाइसेच्या ठिकाणची बुद्धिमत्ता, रसिकता पाहून चक्रधरानी म्हटले 'महादेवरायाची ती महदाइसा आणि तू आमची महदाइसा. केसोबासाने आपल्या 'रत्नमालास्तोत्रम्' या सस्कृत काव्यात महदाइसेचे 'महदंबा' असे पुढें नामकरण केलें. श्रीचक्रधरांच्या सहवासात आल्यानतर ती त्याना अनेक प्रश्न विचारून आपली जिज्ञासापूर्ति करून घेत असे. ब्रह्मानुभूती, आत्मज्ञान, कुलधर्म अशा अनेक गहन प्रश्नावर चक्रधरानी महदाइसेशी अनेक वेळा चर्चा केली. यामुळे 'म्हातारी : जीज्ञासक : म्हातारी चर्चक : म्हातारी एथ काही पूसतचि असे :' अशी चक्रधरांनी तिची प्रशंसा केली.

महदाइसा चक्रधरांना प्रसंगानुसार काही प्रश्न विचारी व चक्रधर त्याची उत्तरे देत असत. त्याची स्मृती जागृत करून त्याच्या पूर्वायुष्यातील अनेक हकीगती महदाइसेने जाणून घेतल्या आणि त्यामुळे पंथीयांना आपल्या दैवताच्या अनेक 'लीळांची' अधिकृत माहिती मिळाली. महदाइसेच्या जिज्ञासू आणि साक्षेपी वृत्तीने चक्रधरानी कळी खुलत असे आणि आपले अंतःकरण ते तिच्यापुढे उघडे करीत असत. यात चक्रधराचा महदाइसेवरील विश्वास जसा व्यक्त होतो, त्याच्याप्रमाणे तिचा अधिकारही ध्यानात येतो. म्हाइंभटांनी संपादित केलेले 'लीळाचरित्र' 'एकाका' नतरच्या विस्तृत हकीगती देते; परतु तत्पूर्वीच्या काळात श्री चक्रधर एकटेच परिभ्रमण करीत असत आणि त्या काळात हकीगत सागणारी

व्यक्ती उपलब्ध नव्हती. त्यामुळे चक्रधरानी स्वतःच काही सांगितले तर ते शक्य होते. परंतु स्वगौरव आणि आत्मनिवेदनाचा भाग चक्रधराना आवडण्यासारखा नव्हता. अशा स्थितीत प्रसगानुसार महदाइसेने त्याच्याकडून काही हकीगती मिळवल्या. त्यात कालाचे आणि स्थळाचे अंतर बरेच मोठे आहे. तथापि मिळव-लेल्या माहितीमुळे चक्रधराचे पूर्वायुष्य समजण्यास फार मदत होते यात शंका नाही. आणि म्हणूनच महदाइसेसारख्या 'चर्चक' स्त्रीचा स्वतः चक्रधरांनी गौरव केला.

## चक्रधर आणि महदाइसा

महदाइसा ही नागदेवाची चुलतबहीण आणि रामदेव दादोसची शिष्या. तिने वेळोवेळी विचारलेल्या प्रश्नामुळेच चक्रधराचे पूर्वजीवन काहीसे प्रकाशात आले. पंथीय तत्त्वज्ञानाची आचारसंहिताही अशा प्रश्नोत्तरातूनच निश्चित होत गेली. तिने विचारलेले प्रश्न व चक्रधरानी दिलेली उत्तरे नेमकी व मार्मिक अशी आहेत. एकदा महदाइसेन मासोपवास केल्याने काय होते असा प्रश्न केला. तेव्हा 'पाप व पुण्य दोन्ही होते. आत्मापीडे तेणें पाप होए : व्रत कीजे तेणें पुण्य होय असे चक्रधरांनी उत्तर दिले. (पू. भा. १ १४३.) व्रत केल्याने जीवाला पीडा होऊन जीव पळभर मांसभोजन करतो, म्हणून पाप होते, असे एकदा चक्रधरांनी महदाइसेस सागितले. (पू. भा. १ १४४.) एकदा देह गेल्यानंतर काय होते व श्राद्ध केल्यास ते पितराना पावते का असेही प्रश्न तिने विचारले. (पू. भा. २ २५७, ५८.) एकदा चक्रधरानी ब्रह्मानुभूती कोणाही जीवाला नाही म्हटल्यावर महदाइसा म्हणाली, 'गोसावी ब्रह्म होए : आणि आम्ही होय : आणि आम्ही अनुभवित असों नव्हे', यावर सर्वज्ञ म्हणाल, 'ऐसें तरि तुम्ही अनुभवदेव म्हणाः' (उ. भा. २ · २६७.) 'आत्मज्ञान ते कैसे' असा प्रश्न महदाइसेने पुराण ऐकून आल्यानंतर चक्रधरांना केला. तेव्हा 'मृत्यंचे धर्म जीवंताप्रति कैसे साधावे बाइः' असे चक्रधर म्हणाले. (उ. भा. २ : २६८) पुन्हा एकदा पुराण ऐकूण आल्यानंतर 'कलियुगाच्या शेवटी असे असे होणार म्हणतात ते खरे का' असा प्रश्न तिने चक्रधराना विचारला. तेव्हा कलिधर्माचे भीषण चित्र त्यानी रगविले. 'एकमेकाचिया धांसा झोंबतील बापू पुता पाठिमोरा टाकैल' आणि हे दुःख 'अरि एर्थाचिया होइजे' तर नाहीसे होईल असे त्यांनी सांगितले. (उ. भा. २ . २९८.) एकदा भिक्षेस गेली असता महदाइसेने 'अवघा लोकु : खाता : जेविता : लेइला : नेसला डोल्हारेयावरि बैसला : ऐसा देखिला :' तेव्हा हे सारे शोचनीय असे तिला वाटले. तेव्हा चक्रधर तिला उप-रोधाने म्हणाले, 'बाई : तुम्ही राजकुमरे कीं' (उ. भा. २ : ३०४.) 'लवणाख्याना'ची माहिती महदाइसेस सागताना एकदा चक्रधरानी 'संसारू

हा दीर्घ स्वप्न गा : ' हे सूत्र सांगितले. (उ. भा. २ ४०१.) 'विठ्ठल वीरु हा कृष्ण चक्रवर्तीचा अवतारु म्हणतात ते खरे का ? ' असा तिने प्रश्न विचारल्यावर अभंगात ज्याचे नाव 'वीठो रुक्मीणि घालतात त्या विठ्ठलाची हकीगत चक्रधरांनी सांगितली. (उ. भा. २ : ४११.) वेळोवेळी महदाइसेने जिज्ञासापूर्तीसाठी विचारलेल्या अशा प्रश्नांनी चक्रधरांची विविध मते व पूर्वचरित्र समजण्यास मोठे साहाय्य झाले, यात शंका नाही.

**महदाइसेची काशीयात्रा**

महदाइसेचा प्रारंभीचा गुरु रामदेव दादोस याच्या आग्रहावरून तिने काशीयात्रा करण्याचे ठरविले. चक्रधरांना ही गोष्ट पसंत नव्हती. या संदर्भातील स्मृती महदाइसेच्या अंतःकरणात निर्माण झालेली उपरती आणि चक्रधरांच्या ठिकाणी जडलेली तिची दृढ श्रद्धा यावर प्रकाश टाकणाऱ्या आहेत. वाराणसीस जाण्यापूर्वी तिने चक्रधरांना त्यांच्या इच्छेप्रमाणे श्वेतउपहार तयार करून खाऊ घातला. (उ. भा. १ १२५.) वाराणसीस जाताना चक्रधर तिला म्हणाले, 'वाइः तीर्थक्षेत्रें अमोचकें : ईश्वर संनिधान मोचक : ' पण दादोसाच्या सांगण्या-प्रमाणे तिने जाण्याचे ठरविले. तेव्हा चक्रधर म्हणाले, 'ताकाची माशी ताका-वेगळी जाताए तैसी म्हातारी संनिधाना बाहीरी घालिजताए : ' (उ. भा. १: १२७.) महदाइसा वाराणसीहून प्रथम परमेश्वरपुरास आली व तेथून ती चक्रधराकडे आली. तेव्हा चक्रधरांनी परमेश्वरपुरीच्या कापडियांनी आत घ्यावे असे म्हटले. ते तिच्या जिव्हारी लागले व गोसावी आपल्यावर उदास असल्याचे तिने बाइसेस बोलून दाखविले. वाराणसीहून परत आल्यानंतर उमाइसेने महदाइसेसंबंधी सांगितलेली हकीगत तिच्यात घडलेल्या परिवर्तनाची कल्पना देणारी आहे. वाराणसीस तिला वेगळे काही आढळले नाही. 'उदकासारिखे उदक पाषाणासारिखे पाषाण झाडासारिखी झाडें : माणुसें : ' हे पाहून ती धाय मोकलून रडू लागली. आघोळ करून तिने जातिगोत्र, तीर्थक्षेत्र आणि दादोस यांना तिलांजली दिली. काशीहून आणलेल्या पाण्याच्या कुप्या व वाळू तिने चक्र-धरांच्या चरणी अर्पण केली. त्यानंतर अंतर्मुख होऊन बसलेल्या महदाइसेस नागदेव चेष्टेने म्हणाला, 'महदाइसा आता मल्लिनाथास किंवा केदारास जाण्याची चिंता करीत असावी ' तेव्हा चक्रधर म्हणाले, 'आता म्हातारी तैसी नव्हे गा आता म्हातारी आन एक होउनि आली असे . या म्हातारीएसी तेथीचेनि वीश्वेश्वरे तारक ब्रह्म उपदेशु केला ' (उ. भा. २ ३४८.)

**अमोल चक्र**

महदाइसा व चक्रधर यांच्यातील भक्त–गुरु–परमेश्वर या नात्यावर अनेक स्मृतींतून प्रकाश पडतो. महदाइसेचा चक्रधरविषयक निष्ठा व भक्तिभाव प्रकट

होतो. एकदा महदाइसेने अत्यंत भक्तिभावाने चक्रधरांना एक वस्त्र अर्पण केले. ते प्रेमपूर्वक स्वीकारून चक्रधर म्हणाले, 'हे वस्त्र आन लेख लाहे यासि कव्हणी मोल करून नेणे :' (पू. भा १ : १९०.) यानंतर काही दिवसांनी ते तिला म्हणाले, 'हे तुझे वस्त्र मी किती दिवस पांघरले. आगी शिवली, ती घातली. आता ही आगी वानरेयास (नागदेवास) देऊ. त्याप्रमाणे नागदेवाने ती घेतली व अंगात घातली, त्यामुळे महदाइसेस मोठे सुख झाले. (पू. भा. २ : २२६.) एकदा महदाइसेने चक्रधराना उडीदाचे वडे करून घातले, मग स्वतःला पोटशूळ असल्याने तिने घेतला नाही. गोसाव्यानी तिला आपल्या ताटातील विडा दिला. त्यामुळे तिला तो खाता आला व तिच्या ठिकाणी दीपनशक्तीही निर्माण झाली. (पू. भा. २ : २४२.) दिवाळीचे दिवस जवळ येताच तो सण साजरा करण्याची इच्छा महदाइसेने व्यक्त केली. तेव्हा 'दिवाळसण सर्वांनाच करावा' असे चक्रधरानी सांगितले. तिने पाण्याचे साहित्य, चिकसा, तेल इ. आणून चक्रधराना जसे मर्दन-मार्जन केले, तसेच अन्य भक्तानाही केले. अन्य भक्तजन सोंडेच्या तळी जाऊन गोसाव्यांच्या उदकाने न्हाले. पूजावसर करून महदाइसेने मग सर्वांना ओवाळले (पू. भा २ : २६२.) चक्रधरानी एकदा खाऊन टाकलेल्या केळीच्या साली माशा बसतील म्हणून महदाइसेने त्यांना न विचारता काढून टाकल्या. तिच्या या अपराधाबद्दल चक्रधरानी तिला त्या हाताने तीन दिवसपर्यंत कोणताही व्यवहार न करण्याची शिक्षा दिली. तिनेही तीन दिवसपर्यंत तो हात गळ्यात बांधून ठेवला. (उ. भा. ३ : २६०) महदाइसा सोजीचे काम गाणे गात चांगले करीत असे. एकदा चक्रधराच्या स्तुतीचे गाणे ती गात होती. ते ऐकून 'अशा ओव्या आपल्या बापास, भावास गाव्यात' असे चक्रधर तिला म्हणाले यावर महदाइसा म्हणाली, 'जी जी गोसावीचि भाऊ गोसावीचि साजणी गाते.' (उ. भा. २ : २६१.) एकदा गोसाव्याच्या हातची सुपारी पडून गडबडत गेली मठ सारवणाऱ्या महदाइसेच्या हातास ती लागताच तिने ती तेथूनच त्याचेकडे फेकली, पण नंतर तिला पश्चात्ताप झाला. 'गोसावींया लागतें तरि काइ करितीयें जी :' म्हणून ती दुःख करू लागली. (उ. भा. २ : २६५.) पुढे एकदा रामदेव दादोसकडून बोलावणे आले, तेव्हा सोंडीवरून पडल्याचा बहाणा करून ती विव्हळू लागली. आणि तिने जाण्याचे टाळले. नंतर चक्रधरानी 'तू कशी पडलीस ते दाखव' असे म्हणून तिची गंमत केली. (उ. भा. २ : २६६.)

### म्हातारी एथ काही पुसतचि असे

चक्रधराच्या निर्याणापूर्वीच्या स्मृती अशाच हृद्य आहेत. महदाइसेचे वडील वायनायक निधन पावले, तेव्हा तिला मोठे दुःख झाले. 'समाचारास जाण्याने तेवढा वेळ ईश्वराचा विसर पडेल' असे तिला वाटले. यावर चक्रधरानी 'मग

माझे तसे काही घडले तर काय कराल ' असे विचारले. तेव्हा ' गंगातीरावर गोविंद गोविंद म्हणत राहू ' असे तिने उत्तर दिले. (उ. भा. २ ४६३.)) बाइसा गेल्यानंतरच्या काळात चक्रधराच्या स्नान—भोजनाची आबाळ होत होती. तेव्हा महदाइसेने डेराभर पाणी तापवून त्याना मर्दना-मादने केले आणि ' बाइसा पूजावस्वर करीत असे मी करीत जाईन ' असे म्हणून तिने दडवते घातली. ('उ. भा. २ ४६५.) एकदा महदाइसा जेवीत असताना तुपाचा डाव घेऊन चक्रधर तिला वाढू लागले. तेव्हा तिने निराकरिले. तरी त्याचीच आज्ञा असल्याचे तिने सागितले. तेव्हा चक्रधर म्हणाले, ' पोरे हो : तुमचेयाकडौनि तुम्हासि काइ न व्हावें एथौनि तुम्हा सकळे होआवे की : ' नंतर तिने तूप घेतले. (उ. भा. २ ४६९.) स्त्रियाच्या संपर्कामुळे लोकांकडून पुढे चक्रधरावर अनेक आरोप होऊ लागले. त्याचा अवयवछेदही झाला. त्या वेळेपासून महदाइसेसारख्या त्याच्या शिष्या व नागदेवही जपून राहू लागले. त्या अन्यत्र राहू लागल्या. परंतु एकदा दर्शनासाठी पहाटेच्या वेळी महदाइसा दाराबाहेर उभी असल्याचे पाहून नागदेव तिच्यावर रागावले व ' अवघे वोखटे तुम्हीच केले ' असे म्हणाले. त्यावर चक्रधरांनी तिला तिकडेच बिऱ्हाड घेऊन येण्यास सांगितले; पण नागदेव काही बोलले नाहीत. त्या चक्रधरांनी उपदेश केला. ' तुमच्यात परस्परे प्रीति व्हावी. आता म्हातारीची तुला गरज पडणार आहे. शिवेचा दगड देवत्व पावावा, तसा नागदेव एथचिया जवळिका आन जाला असे. ' तेव्हा महदाइसेने ' गोसावीं नागदेवो आपणयासमान केला ' ऐसें पोटी अवधारिले. त्यावर सर्वज्ञ म्हणाले, ' परम प्रीती कीजे : परि वीसीष्ट बुद्धि न कीजे बाइ प्रीति वीखो होईजे : ' (उ. भा. २ ४७१.)

महदाइसेच्या जिज्ञासू वृत्तीमुळे चक्रधराना नेहमीच काही वेगळे सांगावे लागे. या दृष्टीने महदाइसा व नागदेव याच्यातील तफावत दाखविणारा एक प्रसंग घडला. एकदा महदाइसेने चक्रधराना ' ज्ञान जाल्या वरि प्रेमासी उपावो असे: ' असा प्रश्न विचारला. तसा उपाय असल्याचे चक्रधरानी तिला सागितले. ' हे आपणास गोसाव्यानी कसे सागितले नाही ' असे नागदेवानी विचारताच चक्रधर म्हणाले, ' तुम्ही कधी विचारले? विचारले असते तर सागितले असते. ' ' म्हातारी जी ज्ञासक म्हातारी चर्चक : म्हातारी एथ काहीं पूसतचि असे : हें ऐसें तुम्हासीचि स्फुरावें की गा . ' आणि शेवटी ते नागदेवास म्हणाले, ' आता एथौनि तुम्हासि आचार्य होआवे लागेल : हें तुमचें लागे ' (उ. भा. २ : ४७३.) महदाइसेसही त्यानी तिच्या कर्तव्याची एकदा जाणीव स्पष्टपणे दिली. महदाइसेने आजवर महात्म्याची, दादोसाची सेवा केली म्हणजे विषयाची सेवा केली असे त्यानी सागितले. अनुसरणाच्या बाबतीत तिच्या हातून घडलेल्या प्रमादाची त्यानी तिला कल्पना दिली. तेव्हा महदाइसेने ' मेलियें जी ' असे

उद्गार काढले व ती त्याना अनुसरली. त्यांचेकडून तिने संन्यासदीक्षा घेतली. (उ. भा. २ ' ४८२.)

चक्रधराच्या निर्याणापर्यंत त्याच्या सेवा–दास्यात महदाइसा गढून गेली होती. चक्रधर जावयास निघाले, तेव्हा महदाइसेने त्यांना विचारले, 'आता आपली भेट कधी?' तेव्हा गोसावी म्हणाले, 'आता भेट नाही. आता तुम्हा नवेयासि भेटी?' तिने विचारले, 'ते कसे?' चक्रधरानी सांगितले, 'आम्ही बारा वर्षांनंतर नव्याने तुम्हाला भेट देऊं.'

## पंथीयांशी नाते : नागदेव व महदाइसा

चक्रधर निघून गेले आणि नागदेवही कुठे दिसेना. व्याकुळ होऊन तिने गोविंदप्रभूंना विचारले. तेव्हा त्यानीं तिला भानखेड्यास जाण्यास सांगितले. चक्रधराच्या निर्याणानंतर त्यांच्या वियोगाने नागदेव विव्हळ होऊन इतस्ततः भटकत होता. तो शेवटी राणेडोंगराजवळ सापडला. त्याला आपल्या पाठकुळीवर बसवून तिने गावात आणिले. त्याचे ओळवे झाडले. दूध आणून बोळ्याने पाजले. नतर तो सावध झाला. ती त्याला गोविंदप्रभूकडे चलण्याचा आग्रह करते. तेव्हा नागदेव म्हणतो, 'माझा देवो तो श्री चक्रधरु ओ :' तेव्हा महदाइसा म्हणाली, 'नागदेवा तूते गोसावी श्रीप्रभूसि निरोविले असे की : आणि मज तुज निरोविले असे की :' तेथून हळूहळू ती दोघेही चालत निघाली. 'चक्रधर द्या ओ म्हणौनि हाती भिक्षा मागो. तेव्हा महदाइसा म्हणे 'बा देवेवीण पीसा जाला बा :' आणि गोविंदप्रभूंनी त्याला आपल्याकडे राहण्याची अनुज्ञा दिली. नागदेव पुढें चौदा वर्षे त्यांच्या सान्निध्यात राहिला.

नागदेव हा महदाइसेचा चुलतभाऊ. त्याची भावविवश वृत्ती तिने चांगलीच ओळखली होती. गुरुविरहाने वेडापिसा झालेल्या नागदेवाला गोविंदप्रभूंकडे आणून तिने नागदेवावरच नव्हे तर पंथावरच मोठे उपकार केले आहेत. बहिणीच्या नात्याने काही वेळा ती त्याला दटावत असली तरी पंथाचा आचार्य म्हणून त्याचा अधिकार ती जाणत होती आणि तशा प्रकारचा मान ती त्या त्या वेळी देतही असे. श्रीचक्रधराचा नागदेवावरील लोभ आणि विश्वास ती जाणून होती. पंथसंवर्धनाचे काम नागदेवच अतिशय चांगल्या तऱ्हेने करू शकेल, हे चक्रधरानी ओळखले होते म्हणून वेळप्रसगी वेगवेगळे दृष्टान्त देऊन त्यानी आपले तत्त्वज्ञान त्याला सुगम करून सांगितले होते. अर्थात् महदाइसा ही विश्वासाला पात्र होती हे खरे असले तरी नागदेवाच्या ठिकाणी चक्रधराना आपला भावी वारस दिसत असल्याने त्याला तयार करण्याची वेगळी पद्धती त्यांनी अवलंबिलेली होती. महदाइसा आणि नागदेव दोघेही एकमेकाचा अधिकार जाणून होती. त्यातून पुन्हा

नागदेवाचे पूर्वायुष्य नाना ढाढाळात रमण्यात गेले असल्याने महदाइसेविषयी त्याच्या मनात एक प्रकारची आदरबुद्धी प्रथमपासूनच होती. आणि आपल्या भरकटत चाललेल्या जीवनाला तिनेच वळण लावले, अशी एक तिच्याविषयी कृतज्ञतेची भावना त्याच्या अंत:करणात होती. आपल्या अत्यंत प्रिय व्यक्तीत तो तिची गणना करीत असे आणि शपथ घेताना तो आपल्या गुरुकुळाबरोबरच महदाइसेचीही शपथ घेत असे. ' रत्नमाला ' कर्त्या केसोबासाने एकदा नागदेवाला ' तुम्ही ' रुपैची 'ची आणि ' पाचास्या ' गुरुकुळाची आण का वाहता ' असा प्रश्न विचारला. तेव्हा नागदेवानी सांगितले, '.. आणि रुपैया भानखेडाहूनि आणिले : कडीये खादीये घेऊनि श्रीप्रभूचेया दर्शना नेले. नेसवीले : पागुरविले. येसणे सायास केले : श्येते गोसावी मज निरोविले : म्हणौनि मी रुपैयेचि आण वाये : ' हे ऐकून केसोबासाचे समाधान झाले.

महदाइसाही त्याच्या या प्रेमाला तितकीच पात्र होती. कृष्ण-द्रौपदीच्या बधु-भगिनीच्या प्रेमाची आठवण करून देणारा एक प्रसग या दोघाच्या जीवनात एकदा घडला. एकदा नागदेवाच्या पायांत केसतोड्र निघाला. तेव्हा महदाइसेने प्रसादाचे वस्त्र फाडून पानकापड करून तो बांधला. तेव्हा भटोबासांनी ( नागदेवानी ) विचारले, ' अग, प्रसादाचे वस्त्र कसे फाडलेस ? ' यावर महदाइसा म्हणाली, ' नागदेया प्रसादें प्रसाद बाधीजतायें ' हे ऐकल्यानंतर साहजिकच नागदेव अवाक् झाले. बधू असला तरी आचार्य म्हणून तिच्या ठिकाणी आदरभाव होताच. या दोन्ही भावनाचे दर्शन या प्रसगात फार चांगल्या तऱ्हेने होतें. आणखी एकदा ' पर्व असलेल्या दिवशी ' महदाइसेने ' काई करावे ' असा प्रश्न नागदेवास केला. ' परमेश्वर स्मरणात सदा पर्व असते : तेव्हा दुना जाप्य करावा. दुनि प्रसादसेवा करावी ' असे त्यांनी सांगितले. तेव्हा ते महदाइसीं नमस्करुनि मानिलें.

एक वेळ नागदेव विडा घेत होते. महदाइसेने त्याच्या हातची पाने काढून घेतली व फेकून दिली. आणि ती म्हणाली, ' नागदेवा, देवावीण झिजणे ते हेंच काय ? मा पाने कैसी खाणे " ऐसी कोपली. साहजिकच नागदेव काही न बोलता स्वस्थ राहिले. नंतर महदाइसेनेच उत्तम पानाचा विडा करून त्याना दिला. तो त्यांनी घेतला आणि म्हटले, ' रुपै त्यावेळी हातचीं पाने काढून घेतलीस, आणि आता काय म्हणून देतेस ? ' यावर महदाइसा म्हणाली, ' पोरे हो तुमचेयाकडौनि तुम्हांसि काही न व्हावे तुम्हा एथौनि सकळै होआवे की : मग आता माझिया प्रीती घेया : ' आणि नागदेवांनी मुकाट्याने विडा घेतला. अधिकारावरील व्यक्तींनी स्वतः उपभोगाची इच्छा बाळगू नये. भक्तजनानी प्रेमपूर्वक दिल्यास त्याचा स्वीकार करण्यास हरकत नाही, हेच या प्रसंगाने महदाइसेने दाखवून दिले.

महदाइसेच्या ठिकाणी काव्यशक्ति मूळचीच होती. एके दिवशी सहज कोण्या निमित्ताने तिने पुढील ओव्या गाइल्या. ' नागदेवाचेया खाद्यावरि करु : राजा : चक्रधरु बीजें करी ॥ १ ॥ सोनेसळा सेला : नेसला माल्गठी : म्हादया आला भेटी : प्रभुचीये ॥ २ ॥ ' या दोन ओव्यात नागदेवाच्या खाद्यावर हात ठेवून जाणाऱ्या चक्रधरांचे आणि म्हाइंभटाच्या गोविंदप्रभूकडील आगमनाचे स्मरण आहे. नागदेवानी ह्या ओव्या ऐकल्या आणि म्हटले, ' नाथाची नाथवाणी : आणि रुपैचि सिद्धवाणी अशी त्यांनी तिची प्रशंसा केली. धर्मरक्षणातील तिचा जागरुकपणाही त्याना पटलेला होता.गाणे गाऊन भिक्षा मागणे महदाइसेच्या दृष्टीने निषिद्ध होते. एके बाईने एके ठिकाणी ' रुक्मिणी स्वयंवर ' रात्रीच्या वेळी म्हटले. दुसऱ्या दिवशी महदाइसा तिथे गेली असता तिथल्या लोकानी तिला काही गीत गाण्यास सांगितले. तेव्हा ती लागलीच म्हणाली, ' आम्ही गीत नेणो : ' तेव्हा त्या लोकांनी आदल्या दिवशी आलेल्या स्त्रीची हकीगत सांगितली. तिला तो प्रकार आवडला नाही. नंतर ती बाई महदाइसेला भेटली. परतु महदाइसेने तिच्याशी बोलणे बद केले. ही हकीगत ऐकून नागदेवाचार्यांना मोठे समाधान झाले. ते म्हणाले, ' म्हातारी माझेया धर्मासि रक्षण गा : ' काही काळानंतर ती स्त्री आल्यानंतर त्यानी तिला ' सिक्षापण केले '. या प्रकारानंतर कोणी कोठे गीत गाईनासे झाले.

नागदेवाच्या महदाइसेविषयीच्या भावना उत्कटत्वाने व्यक्त करणारा प्रसंग तिच्या देहावसानाचा आहे. तिची श्रीचक्रधरावरील शेवटच्या क्षणापर्यंतची श्रद्धाही या प्रसंगातून दिसून येते. स्मृतिकाराने या प्रसगाचे वर्णन असे केले आहे — नौगावी असताना महदाइसेचे देहावसान झाले. एके दिवशी तिला ' खाङ्क-निमित्ते अशक्ति उपनली ' ते ऐकून निंबाहुन नागदेव मुद्दाम आले. ते काही उपाययोजना करीत होते. तेव्हा महदाइसा म्हणाली, ' नको नागदेवा : मी वाचेना : ' भटोबासानी विचारले, ' रुपै : देवो आठवतो : '

ती म्हणाली, ' हो नागदेवा . आठवतो : '

नागदेवानी म्हटले, ' कैसा आठवतो आइ : '

तेव्हा महदाइसा म्हणाली ' श्री मुकुटावरि फुटा ( रेशमी वस्त्र ) :

वारी तुरग वज्रघडित असति ' असे म्हणून बेलापूरची क्रीडा तिने सांगितली.

यावर नागदेव म्हणाले, ' रुपै : देहपर्यंत उचीत स्मरण न चुकसीचि : पहिलेया दीसापासौनि सेवटील दीसपर्यंत देवो तो तुवाचि आठवीला ' आणि भटोबासांसि दुख उपनले. त्याला आपल्या ठिकाणची उणीव जाणवली असावी.

यानंतर महदाइसेचे देहावसान झाले. तिचा नौगावींच निक्षेप केला. या प्रसंगी भटोबास म्हणाले, 'म्हातारी धर्मरक्षक : प्रीतिरक्षक : सुहृदत्वे दु:ख-निर्वेदु' त्याच्या या उद्‌गारात त्यांच्या तिच्या विषयींच्या सर्व भावना एकवटल्या आहेत.

**महदाइसा व इतर भक्त**

विजनात जाऊन एकान्तसाधना करणाऱ्या स्त्री-पुरुष भक्तावर महदाइसेची चांगली नजर असे. त्याच्या चुका ती त्यांच्या दृष्टीस आणून देई. एका बाईस तर तिने नागदेवापुढे सिक्षापण केले. तिनेही दंडवत करून आपली चूक कबूल केली. म्हाइंभटालाही तिने एकदा दटावले. म्हाइंभट एके प्रसंगी विजनाचे ऐवजी एका मळ्यात दिसला. त्याच्याशी धर्मवार्ता करताना महदाइसा म्हणाली, 'ईश्वर-विरह्या पुरुषाची येतंय वीजनें नव्हति यै सलागा पुरुषांचीं वीजने' तिचे हे परखड उद्‌गार म्हाइंभटानेही मानले. 'रत्नमाला'कर्ता केसोबासाने एके दिवशी बराच वेळ निद्रा केली. ते पाहून महदाइसा म्हणाली, 'हां गा केशवदेवा जया एकु वैरी तो देहा निद्रा न करी : मां तुम्हां चौदावैरी असति अशेष देवता-चक्र वैरी असता कैसे निजता' असा मूलभूत प्रश्न तिने विचारला. प्रसंग आणि व्यक्तिपरत्वे ती योग्य त्या शब्दांत जाणीव करून देत असे. महदाइसेच्या या प्रश्नाने केसोबासास राग तर मुळीच आला नाही, उलट त्याला मोठे सुख वाटले.

ध्यानी, मनी, स्वप्नी, श्री चक्रधराचे चिंतन महदाइसेकडून होत असे. चक्रधराव्यतिरिक्त इतर दैवताची पूजा अर्थातच तिला आवडत नव्हती. 'चक्र-धर' असा शब्द तिच्या कानावर पडला तरी तिला मोठे सुख होत असे. आपलो हा महदाइसेचा जाऊ. त्याला श्रीचक्रधराचा सहवास घडला होता, परंतु ते गेल्या-नंतर मात्र नित्याप्रमाणे त्याची देवदेवताची आराधना सुरू झाली. एकदा सहज अटनाच्या निमित्ताने ती त्याच्या घरी गेली. ती सारी दैवते पाहताच 'श्रीचक्रधरू' असे म्हणून ती लागलीच तेथून निघाली. तिचा तो घोष ऐकताच आपलोला आपल्या चुकीची जाणीव जाली. त्याने ती सर्व दैवते पाटीत घातली व पाण्यात सोडून दिली. नंतर ती दोघे बहीण-भावंडे नागदेवाकडे आली. त्याच्याकडून आपलोने बोध घेतला. तेव्हा महदाइसेला मोठे समाधान झाले. आणखी एका प्रसंगी महदाइसा व आइसा भिक्षेकरिता गेल्या होत्या. त्यांना पहाताच वाटेत एका मुलाने 'श्री चक्रधरु' असे म्हटले. ते ऐकताच महदाइसेला मोठा आनंद झाला. तिने त्याला झाडून पुसून कडेवर घेतले आणि आलिंगिले. तिचे हे कृत्य पाहून आइसेला आश्चर्य वाटले. तिने तिला विचारले, 'अग हे काय?' तेव्हा महदाइसा म्हणाली, 'सृष्टीमध्ये देवो दुर्लभ : का देवाते आठवी तो दुर्लभ :' त्याला खाली ठेवून मग तिने भिक्षा मागितली.

## रुपैची सिद्धवाणी :

महदाइसेच्या काव्यशक्तीवरील विश्वासामुळेच नागदेवानी ' रुपैची सिद्धवाणी ' अशी तिची प्रशंसा केली होती. गोविंदप्रभूंनी तिची ही सिद्धवाणी वाहती केली. आणि भक्तिभावाने ओथंबलेले सहजस्फूर्त ' रुक्मिणी स्वयंवर ' काव्य निर्माण झाले. विवाहप्रसंगी गाइलेला भाग हा त्याचा पूर्वार्ध आहे. त्याचा उत्तरार्ध निर्माण करण्याचे श्रेय म्हाइंभट लक्ष्मीधरभट याचेकडे जाते, असे म्हणतात. त्यांनी महदाइसेला ' समोरे रुक्मिणी स्वैंवर ' का करीत नाहीस असा प्रश्न केला. तेव्हा ती म्हणाली, ' मज काइ करवैल : तै गोसावीं वरु दीधला म्हणौनी स्फुरले : ' हे ऐकल्यानंतर त्या दोघांनी म्हटले तरि आम्हीं शब्द घडउनि : ( आणि ) तुम्ही गा : ' ते महदाइसेने मानले. ही स्मृति म्हटते, ' मग तेही शब्द घडउं घडउं पदे बांधली . आणि महदाइसी गाइली : यापरी दुसरी माळ केली. ' या ठिकाणी महदाइसेने काढलेले उद्‌गार हे तिचा विनयभाव दर्शवतात. तिच्या ठिकाणची काव्यशक्ती संपली होती, असे वाटत नाही. रुक्मिणी-स्वंवरच्या सुरुवातीच्या आणि शेवटच्या भागात रचनेच्या दृष्टीने मोठाच फरक जाणवतो. पूर्वार्ध हा रचनेच्या दृष्टीने मुक्त तर उत्तरार्ध घोटीव वाटतो. रचनेचा सांक्षेपीपणा उत्तरार्धातच अधिक आहे. महदाइसेच्या या काव्याला थोडे नागर स्वरूप देण्याचा हा म्हाइंभटाचा प्रयत्न असावा. महदाइसेसाठी म्हाइंभट, लक्ष्मींद्रभट या दोघानी उत्तरार्ध लिहिला, असे सागून त्याना त्याचे निम्मे श्रेय देण्याचा प्रयत्न होतो, परंतु यामुळे महदाइसेच्या काव्यशक्तीबद्दल अविश्वास व्यक्त होतो, असे वाटते. महदाइसेच्या अबद्ध रचनेला ठाकठिकीचे स्वरूप त्यानी दिले, असाच अर्थ ' तेही शब्द घडउं घडउं पदे बाधली ' या वाक्यावरून निघू शकतो. पळताना, कांडताना, झोपाळ्यावर बसल्या असताना आमच्या स्त्रियांनी रचलेल्या काव्याचे भाडार मराठीत विपुल आहे. चक्रधराच्यासाठी सोजी काडताता महदाइसेने सहजपणे पुढील ओव्या गाइल्या—

> गोमतीए तीरी निळेया गूढरा : राजेया . गुजरा . कृष्णराया १
> नीळा गुढरु राजा गुजरू माणीकी मंडपी : श्री चक्रधरू २
> गोमटे माजीटे आरव कुंडीचे राजेया डोंडीचे चक्रधरा ३
> गोरे अंग बाहीया . डवरीया चदने श्रीचक्रधरा झणे दीठी होए ४
> बापु म्हणे की भाइया . माझेया साजणी गोत तो साजणीचाही यावो ५

तिच्या काव्याची स्फूर्तिस्थाने नाहीशी झाल्यामुळे तिचे मन त्याच्या रचनेत रमत नसावे. एरवी खऱ्या अर्थाने काव्य जगणारी अशी ती स्त्री होती. तिच्यासंबधीचा हा विश्वास नागदेव, म्हाइंभट, लक्ष्मींद्रभट आणि गोविंदप्रभू या सर्वांनी

मोकळेपणे प्रकट केला होता. तिच्या रसाळ वाणीतून स्रवणारे काव्य वाचायला आणि ऐकायला सारेच उत्सुक होते. काही जणांच्या ठिकाणी उमलणाऱ्या कवित्वाला महदाइसेच्या सान्निध्यात बहर येत असे. नाईकबाई या नौगावच्या अधिकारी स्त्रीने गोसावी कसे होते असा प्रश्न विचारून त्याचे वर्णन महदाइसेकडून ऐकले व भिक्षा केली. आणि ती 'महदाइसापासि अनुसरली.' तिची महदाइसेवरील श्रद्धा अपूर्व होती. तिच्या ठिकाणी सुद्धा काव्यशक्ती होती. तिने एकदा 'अप्राप्तिपर' पदे करून महदाइसेला म्हणून दाखविली. त्यामुळे 'महदाइसा तोखली'. ही तिची पदेही श्रीकृष्णभक्तिपर आहेत. तिच्या अंत:करणातील श्रीकृष्ण भेटीची ओढ दर्शविणाऱ्या एक-दोन ओव्या अशा आहेत. 'विपरीत हे प्रेमाचे पिसें : वेधली मेणौनि कैसी मानसें दु:प्राप्त जो सीद्धा सायासें तया मी कैसे देखो इच्छी ॥ १ ॥ सेवा ना श्रद्धा भावो ना भक्ति खावणि नाही चित्तवृत्ती : आता तो जीवपति केवि पावे ॥ २ ॥ प्रकृती लागले हे पापीये मन : एकाती करू म्हणे तयाचे ध्यान तवं हे दाखवी आनें आन तेणे माझे मन श्रमताये ॥ ३ ॥

महदाइसेच्या ठिकाणी खऱ्या कवीला आवश्यक असणारी भावुकता आणि सहृदयता तर होतीच, परंतु निकोप अशी सौंदर्य दृष्टीही होती. चक्रधराचे साजिरे रूपडे पाहिल्यानंतर तिला मोठे सुख होत असे. चक्रधरांबद्दल बोलताना 'आमचे गोसावी कैसे नागर' किंवा 'कैसे गोसावी याचे डोळे डोळे बरवे अी' अशा तऱ्हेचे उद्गार स्वाभाविकपणे तिच्या मुखातून बाहेर पडत. परमेश्वराचे सुंदर श्रीमुख पाहून वेधणारी ती अति भक्त होती. गोविंदप्रभू ज्या वाटेने जात त्या वाटा ती झाडायची, त्यानंतर सडा घालायची, चौक रगमालिका भरायची आणि अशा प्रसन्न वातावरणात गोविंदप्रभूही सतुष्ट व्हायचे. आपल्या अंगच्या गुणाचा परमेश्वराला संतुष्ट करण्यासाठीच तिने वापर केला.

## गोविंदप्रभूंच्या सान्निध्यात—

चक्रधर आणि नागदेव याच्या सहवासातील महदाइसेपेक्षा गोविंदप्रभूंच्या सान्निध्यातील महदाइसेच्या व्यक्तिमत्त्वाचे एक वेगळेच मनोज्ञ दर्शन आपल्याला घडते. एक प्रतिभावंत आणि प्रज्ञावत, आदर्श भक्त आणि पंथानुयायी अशा स्वरूपात आपल्याला तिचे दर्शन यापूर्वी घडते; परंतु गोविंदप्रभूंच्या सान्निध्यात मात्र स्त्रीच्या ठिकाणी असणाऱ्या अगभूत गुणाचा प्रत्यय येतो. त्यांच्या सहवासात ती अधिक मोकळी आणि म्हणूनच अधिकच मानवी वाटते. त्यांच्या सहवासात ती हंसते, रुसते, रागावते. त्याना न्हाऊ माखू घालते. त्याच्या आवडीचे पदार्थ करून त्याना घालते. जणु फारां दिवसानी माहेरी आलेली ती मुलगी होती. बापलेकीच्या नात्याचे या दोघाचे वर्तन मनाला सुखविते. चक्रधराशी बोलतांना तिने

एकदा म्हटले होते ‘ जी जी : गोसावीन्चि बापु : गोसावीन्चि माऊ ! गोसावीचि साजणी गोत : ’ गोविंदप्रभूच्या बाबतीतही तिची हीच भावना होती.

महदाइसा चांगली सुगरणही होती. वेगवेगळे पदार्थ ती मोठ्या कुसरीने करावयाची. काशीयात्रेला जाण्यापूर्वी तिने चक्रधराना ‘ तादळाचा भात, तादळीची खीर, दहिवडे ’ यासारखे पांढरे पदार्थ करून ‘ श्वेतउपाहार ’ खाऊ घातला. त्याप्रमाणे गोविंदप्रभूनाही एके प्रसंगी तिने सांगितले, ‘ मी आज तुम्हाला घिरडे करून घालणार आहे. कोठे जाऊ नका. ’ हे ऐकून गोविंदप्रभूनाही मोठा आनंद झाला. जेवणाचे वेळी आसन तयार करून ताट ठेवले. परतु ताटातील घिरडे पाहून गोविंदप्रभू म्हणाले ‘ अग, हे घिरडे नव्हे . हा अहीता आहे ! ’ असे म्हणून ते रागावले. तेव्हा समजावणीच्या सुरात महदाइसा म्हणाली. ‘ अहो, याला गंगातीरावर घिरडे म्हणतात, तुम्ही वऱ्हाडात अहीता म्हणत. ’ तरी पण अहीता आण म्हणून गोविंदप्रभूनी लकडा लावला. हा तर महदाइसेच्या कसोटीचा क्षण होता. पण पाकक्रियेत ती तशी हार जाणारी नव्हती. तिने क्षणभर विचार केला आणि तिला काही स्फुरले. तिने मग ‘ दुधाआतु सोजी घातली ते काला-वली भींडे यासि तुपाचा गोळा दीधला : वरि लोंगाकृत घातले' वरि एका मीरींया लवंगाची पुडी घातली, मग दुसरीकडे उलथीले आणि काढिले ताटात घातले तेव्हा गोविंदप्रभू संतुष्ट झाले. ते म्हणाले ‘ अवो गोड असे म्हणे ’. दुसऱ्या एका प्रसंगी तिने गोविंदप्रभूंना अमृतफळे खाऊ घातली. कांबळ्यांतून गाळलेले व नुकतेच कढविलेले तूप व गरम अमृतफळे याचा आस्वाद घेतल्यानंतर गोविंदप्रभू सतुष्ट झाले महदाइसेने एकदा लाडू करून वाळत ठेवले होते. गोविंद-प्रभू तेथे गेले आणि ‘ अग, ह्या, लाडवात गूळ पुरला, यात नाही. हा मोकळा झाला. हा बरा नाही. ’ असे म्हणून क्षणभर त्यानी तिथे खेळ केला.

स्त्रीसुलभ मत्सराचा भाग महदाइसेच्या ठिकाणी होता. आबाइसा ही महदाइसेची प्रत्यक्ष चुलती. पण गोविंदप्रभूची सेवा करीत असताना महदाइसेची तिच्याशी वागण्याची वृत्ति काही सरळ नव्हती. गोविंदप्रभूसाठी महदाइसेने एक वस्त्र घेतले होते. जुने झाल्यानतर पूजावस्त्राचे वेळी आबाइसा ते नेसली. ते पाहिल्यावर महदाइसेचा संताप अनावर झाला. ती म्हणाली, ‘ हे काय ? आमचे वस्त्र ही कशी नेसली ? ( हिने ते नेसण्यापेक्षा ) ते आमच्या गोसाव्याच्या पायाखाली किंवा जात्या, पाटा मुसळाखाली गवसणी म्हणून राहिल. णेतेरे होईल. ’ तिचे हे शब्द ऐकताच आबाइसेने ते नेसूचे वस्त्र टाकून दिले. गोविंदप्रभूंनी म्हाइभटा-कडून चांगली वस्त्रे आणवून तिला नेसावयास दिली. तेव्हा आबाइसा म्हणाली, ‘ मला वस्त्र कश्याला ? मला गोसावीच पांघरूण आणि गोसावीच अंथरूण ? ’ गोविंदप्रभूनी तिला ‘ वरमाय हो ’ म्हटले. नागदेवानी या मागची भूमिका सांगि-तल्यावर महादाइसेला फार दुःख झाले.

उमाइसा ही नागदेवाची वहीण व आबाइसेची मुलगी. ती व महदाइसा या दोघीना गोविंदप्रभूंची सेवा करीत असताना पाहून आबाइसेला त्याची सेवा करण्याची इच्छा झाली. आपली इच्छा तिने व्यक्त केली. 'त्या दोघीनी देव हिरावून घेतला' असे म्हणताच त्यानी सेवेची परवानगी दिली. महदाइसेला मात्र तिच्या वागण्याबद्दल शिव्या खाव्या लागल्या. गोविंदप्रभूंनी तिला आपल्या ठेवणीतील एक शिवी हासडली. 'माहादी फेंदी दर्भेयाची दर्भी!'

या दोन्ही प्रसंगात गोविंदप्रभूनी आबाइसेला सावरून घेतल्याचे दिसून येते. तिचा पति माधवभट हा मृत्यु पावल्यानंतर त्याच्या मुलांचा साभाळ वायेनायकानेच केला आणि आबाइसा गुंप्पा बाधून राहू लागली. तिच्याकडे तिचा गुरु दादोसचे येणे जाणे असे. तिच्या व दादोसच्या संबंधाबद्दल नागदेव व उमाइसा या तिच्या मुलातच मोठे गैरसमज होते. त्यामुळे आबाइसेचा दुस्वास उमाइसा व महदाइसा करितात; यामागे मत्सरापेक्षा पूर्वग्रहच बलवत्तर होता असे म्हणावे लागेल. आबाइसा आणि दादोस याच्या संबंधाप्रमाणेच चक्रधराच्या सेवेत दादोसने आणलेल्या अडथळ्यामुळे त्याच्याविषयी एक अढी महदाइसेच्या मनात होती. एके दिवशी गोविंदप्रभूस न्हाण्याची इच्छा होताच महदाइसेने त्याच्या मस्तकावर तेल घातले. तेव्हा गोविंदप्रभू रागावले. हे पाहून दादोस महदाइसेस म्हणाला 'अग रुपै, गोसाव्याचा यामुळे प्रवृत्तिभंग होईल. तू नरकात लोटणारे कृत्य करते आहेस.' गोविंदप्रभूंच्या रागावण्याने अस्वस्थ झालेली महदाइसा दादोसचे हे बोलणे ऐकून संतापाने म्हणाली, 'दादो, तुम्ही गप्प बसा. फाटका पाय मध्ये घालू नका.' गोसावी उदास जाले ते एक आणि तुम्ही कोपला ते दुसरे? शेवटी गोविंदप्रभूंची समजूत घालण्यात तिने यश मिळविले. तिने सोनाइसा आणि नागदेव याच्या मदतीने कढत पाण्याने, अंगभर तेल लावून न्हाऊ घातले.

या मायलेकींचे संबंध कसेही असले तरी गोविंदप्रभूंकडून त्याना वागविण्यात कोणताही दुजाभाव होत नसे हे स्पष्ट होते. महदाइसेला वेळप्रसगी आपल्या स्वभावानुसार शिव्या त्यानी हासडल्या असल्या तरी प्रेमापोटीच त्या निर्माण झालेल्या होत्या, हे सहज ध्यानात येते. आपल्या मिस्कील स्वभावानुसार त्या दोघात काहीवेळा हास्यविनोदही होत असे. एकदा पासोडीची पाटी महदाइसेने वाळत घातली होती. ती कुणीतरी नेली. महदाइसा तिचा शोध करू लागली. तेव्हा गोविंदप्रभु म्हणाले, 'आवो मेली जाए पाटी चोरे नेली म्हणे' यावर महदाइसा म्हणाली, 'जी जी . गोसावी नेवो कैसी दिधली?' तिचा हा प्रश्न ऐकून ते खो खो हसू लागले.

एके दिवशी भल्या पहाटे महदाइसा पाणी आणण्याकरिता गेली. तांब्या कळशी भरून घेऊन येताना वाटेत तिला साप चावला. तशीच कावड घेऊन

ती आली, परंतु रायागणात आल्यानंतर मात्र मूर्च्छा येऊन ती खाली कोसळली. गोविंदप्रभूंना हे कळताच तिच्याकडे गेले व त्यांनी सापाचे विष निरपून टाकले. महदाइसा सावध झाली आणि तिने गोविंदप्रभूंना दंडवत घातले. तेव्हा गोविंदप्रभू मिस्किलपणे म्हणाले, 'आवो मेली जाए : माहादी सापें खादली म्हणे : की म्हादीया सापु खादला म्हणे : ' (माहादीला साप चावला की माहादी सापाला चावली ?)

## लोककाव्यसौंदर्य

महदंबेच्या धवळ्यात तिचे श्रद्धायुक्त अंतःकरण भरून राहिले आहे. त्यामध्ये एक शांत तेज अखेरपर्यंत तेवत राहिलेले दिसते. उत्स्फूर्तपणे निर्माण झालेले हे काव्य असल्याने त्यात रचनेची ठाकठिकी दिसणारी नाही पण योग्य त्या ठिकाणी मार्मिक विनोदाने आणि आकर्षक उपायांनी तिने त्यांत चटकदारपणा निश्चित आणला आहे. स्त्रीजीवनात महत्त्व पावलेल्या अनेक गोष्टींचा उल्लेख तिच्या छोट्याशा काव्यात झालेला आहे. तिच्या वाचनाची वा बहुश्रुतपणाची उदाहरणे फारशी आढळली नाहीत, तरी 'धवळे' पूर्वार्धातील ६१ व्या कडव्यातील 'सर्वांगी न देखो तुमचा कातु देखियलें जें अंग तेथौनि न ढळतीचि लोचन : रुपें आगाधु गोविंदराणा : ' ६१ :

अशा ठिकाणी 'गाथा सप्तशतीतील' पुढील श्लोकाचे स्मरण झाल्या-वाचून राहात नाही.

> जस्स जहं विअ पठमं तिस्सा अङ्गम्मिणिवडिआ दिठ्ठी
> तस्स तहिं चेअ ठिआ सवङ्ग केण विण दिठ्ठम् ॥ २३४ ॥
>
> [ यस्य यत्रैव प्रथमं तस्या अङ्गे निपतिता दृष्टिः ।
> तस्य तत्रैव स्थिता सर्वाङ्गं केनापि न दृष्टम् ॥ ]

'तिच्या ज्या अवयवावर दृष्टि पडते तेथेच ती खिळून राहते. (दुसरी-कडे पहावयाचे भानच राहात नाही.) यामुळे तिचे संपूर्ण सौंदर्य कोणीच पाहिलेले नाही.'

अर्थात् अशा तऱ्हेच्या कल्पना लोकजीवनातही परंपरेने चालत आलेल्या असणे शक्य आहे.

# ६ : आद्य मराठी चरित्रकार : महेंद्रभट

## चरित्रे-जुनी व नवी

मराठीमध्ये अलीकडच्या काळात निर्माण झालेली चरित्रे व आत्मचरित्रे लक्षात घेतल्यास त्यात एक वाङ्मयप्रकार लिहिला जात असल्याची जाणीव दिसून येते. त्यात एक प्रकारचा नेटकेपणा आणि लालित्य येत चालले आहे. तो एक माहितीपर प्रबंध न होता एकाद्या ललित कलाकृतीचे स्वरूप त्याला येत चाललेले दिसते. अर्थात अशा चरित्र-आत्मचरित्राचे आकर्षण त्या वर्ण्यभूत व्यक्तीप्रमाणेच लेखकाच्या रसाळ व चटकदार शैलीनेही निर्माण होऊ शकते. अशी चरित्रे वा आत्मचरित्रे एकाद्या व्यक्तीने स्वतःच्या नजरेतून निर्माण करण्याने त्याला कित्येकदा सर्वस्पर्शी स्वरूप येऊन शकत नाही. यासाठी वर्ण्य व्यक्तीच्या जीवनाविषयी अधिकाराने, तितक्याच जिव्हाळ्याने माहिती देणाऱ्या, आठवणी सांगणाऱ्या व्यक्तींच्या मतांचाही विचार करणे अगत्याचे असते. प्रमाणावर आधारित अशी चरित्रे लिहिण्याचा प्रघात आधुनिक काळात रूढ झाला आहे. तथापि प्राचीन मराठी वाङ्मयातील संतांची वा ऐतिहासिक थोर पुरुषांची चरित्रे पाहिल्यास त्यात अद्‌भुताचा प्रभाव अधिक आढळतो. दंतकथा आणि आख्यायिका यांचा आधार दूरच्या काळातील लेखकास कित्येकदा घ्यावा लागतो, परंतु समकालीन कवींना किंवा शाहिरानाही वर्ण्य व्यक्तींचे माहात्म्य वर्णून सांगताना त्यात अद्‌भुततेचा भाग आणल्याखेरीज राहवत नाही, हे विशेष. अर्थात अशी संतचरित्रे लिहिणाऱ्यांचा उद्देश त्यांचे गुणगान करावे हाच असतो. संतकोटीतील व्यक्तींचे माहात्म्य सांगताना साहजिकच त्यांच्या जीवनात दैवी चमत्कार दाखविण्याकडे कल राहतो. ऐतिहासिक पुरुषांची चरित्रे रेखाटताना त्यांच्या आश्रयाला राहिल्याने स्वामीभक्तीचा भाग साहजिक येतो. त्यांच्या पराक्रमाने प्रभावित वीररसाला पोषक प्रसंग शोधले जातात. आणि अशी माहिती बऱ्याच वेळा ऐकीव स्वरूपाची असते. त्यामुळे अशा चरित्रांना विश्वासार्ह स्वरूप प्राप्त होऊ शकत नाही. त्या दृष्टीने त्या

त्या काळात अशा घटनांची नोंद ठेवणे अत्यंत जरूरीचे असते. त्या व्यक्तींच्या सहवासात आलेल्या व्यक्तींच्या स्मृतींना म्हणूनच महत्त्व असते. अर्थात कित्येक वेळा अशा आठवणी सांगत असताना स्वतःचे मोठेपण सिद्ध करण्याचा प्रयत्न जाणता वा अजाणता कित्येकांकडून होत असतो. परंतु अशा तऱ्हेचा कोणताहि हेतु उराशी न बाळगता जे कथन केलेले असते त्याला साहजिकच महत्त्व येते. महानुभाव वाङ्मयातील ' लीळाचरित्र ', ' स्मृतिस्थळ ' किंवा ' गोविंदप्रभूचरित्र ' अशा ग्रंथांचे या दृष्टीने मोठे महत्त्व आहे.

## चरित्रकार

महानुभाव पंथातील थोर पंडित महेंद्रभट यास मराठीतील आद्य चरित्रकार असे म्हटले जाते आणि त्याच्या या पदवीवर अधिकार सांगणारा दुसरा कोणी अद्यापि पुढे आलेला नाही. महेंद्रभटाने आपल्या पंथातील थोर व्यक्तींच्या आठवणी संग्रहीत करण्याचे अमोल कार्य केले आहे. या आठवणी सांगणाऱ्या व्यक्ती समाजातील वेगवेगळ्या थरातील आहेत. त्या विशिष्ट संदर्भात आणि विशिष्ट ठिकाणी त्यांचा संबंध आला त्या हकिगती ससंदर्भ देण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला आहे. या हकिगती त्यांच्या स्वतःच्याच शब्दांत देऊन महेंद्रभटाने त्यांच्या भावना आणि बोलीभाषेचे स्वरूप समजावून घेण्यास मोठी मदत केली आहे. या स्मृतींना प्रामाण्य येण्याकरिता त्या त्याने अधिकारी व्यक्तींकडून किंवा संबंधित जाणत्याकडून संशोधित केल्या आहेत. यावरून आणि महानुभाव पंथाचा शब्दप्रामाण्यावरील विश्वास लक्षात घेता या स्मृती अधिकृत स्वरूपाच्या आहेत, असेच म्हटले पाहिजे.

## पूर्वजीवन

म्हाइंभट हा अत्यंत बुद्धिमान् तसाच श्रीमान् होता. या दोहोंचा समन्वय झाल्याने साहजिकच अहंकाराचा पगडा त्याचे ठिकाणी मोठा होता. तो विलक्षण तीक्ष्ण बुद्धीचा होता. बिकट परीक्षा देऊन त्याने ' प्रभाकर ' नावाची विद्या हस्तगत केली आणि ' निर्वीरमुर्वीतलम् ' अशा थाटात पायात गवताच्या वाक्या आणि हातात दिवसा मशाल घेऊन तो हिंडू लागला. चक्रधराची प्रथम भेट झाली तर नमस्काराच्या बाबतही तो ताठ राहिला. गोविंदप्रभूंना अनुसरल्यानंतरही तो स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाला विसरू शकला नाही. नागदेवासारख्यांना तो ' सुंटदेव ' म्हणत असे; परंतु त्याच्या ठिकाणचा अहंभाव चक्रधरांनी तसेच नागदेवाचार्यांनी चांगलाच ठेचला. स्वतःच्या बुद्धिमत्तेचा गर्व बाळगून तो स्वतःला ' योगभ्रष्ट ' म्हणवून घेई. पण नागदेवाचार्यांनी त्याला म्हटले, ' योगभ्रष्ट तव माझीये दसेचा नव्हे. मा तुमचीये दसेचा काई होईल. ' ( १९ स्मृ. स्थ. ) म्हाइंभटाच्या ठिकाणचा बुद्धिमान पुरुष नेहमी जागृत असे. तो एकदा पोथी वाचीत बसला

होता. शेजारी बसलेल्या एका गृहस्थाने दोन चार शब्द ऐकून 'अबद्ध' असे म्हटले. तेव्हा म्हाइंभट म्हणाले, 'तोंड अबद्ध तरि वाचिजाये : पोथी अबद्ध तरि फाडिजाये' (१७२-स्मृ. स्थ.) त्याचे बुद्धिचापल्य साध्या प्रसंगातून सुद्धा चमकून जाते. गावात भिक्षा करून नदीवर पाण्यासाठी म्हाइभट गेले. वाळवटातील विहिरीवर लोक पाणी भरीत होते. तेथे एक विद्वास होता. त्याने म्हाइंभटाकडे पाहून म्हटले, 'शूद्रस्य शुभं नास्ति'. हे ऐकताच म्हाइभट ताड्दिशी म्हणाले 'ब्राह्मणस्य विशेषतः' आणि हे ऐकून साहजिकच तो चिडला. म्हाइंभटाचा मूळ पिंड विद्वान पंडिताचा. त्यामुळे चर्चा, वादविवाद करावेत, पंडितांना जिंकावे आणि नेतेपद मिळवावे ही भावना त्याच्या ठिकाणी नेहमीच असे. गोविन्दप्रभूंना किंवा नागदेवाचार्यांना भेटण्याकरिता अनेक विद्वान किंवा चर्चोत्सुक लोक येत असत. अशा वेळी चर्चेसाठी म्हाइंभटाची योजना होत असे. अशा चर्चेत हरलेले अनेक लोक पुढे पंथास अनुसरले. संस्कृत भाषेवर त्यांचे चांगलेच प्रभुत्व होते. त्यामुळे चक्रधराशी वादविवाद करताना त्यानी संस्कृतात बोलावयास सुरुवात केली. त्यावरोबर चक्रधरानीही संस्कृतात उत्तरे दिली. ती ऐकून म्हाइंभटाचा भ्रमनिरास झाला. आणि त्यानी चक्रधरांना अनुसरण्याचे ठरविले.

### चक्रधर आणि म्हाइंभट :

नागदेवाप्रमाणेच म्हाइंभटाविषयीही श्री चक्रधराना विशेष आस्था होती असे अनेक स्मृतींवरून दिसून येते. त्याने गोविंदप्रभूंचे शिष्यत्व स्वीकारलेले असले तरी तो आपल्या सान्निध्यात असावा असे चक्रधराना वाटत असे. म्हाइंभटाची व चक्रधरांची भेट त्याच्या विजिगीषु वृत्तीतून झाली होती. पाच दर्शने आणि प्रभाकर विद्या शिकून आलेला म्हाइंभट गणपति आपयोच्या सागण्यावरून चक्रधराकडे उधाणीसाठी येतो. 'ते मऱ्हाठी तरि अनावरत बोलत असेति :' हे गणपति आपयोचे उद्‌गार ऐकून 'तर मी संस्कृतात बोलेन' असे म्हाइंभटाने दर्पयुक्त उद्‌गार काढले. ज्ञानाच्या अहंकाराने भरलेल्या म्हाइंभटाशी चक्रधरानी मराठीत आणि संस्कृतात चर्चा केली. तेव्हा, शेवटी म्हाइंभटास 'हा ईश्वरु ऐसी प्रतीति आली' (उ. भा. १ ११३.) त्याच्यातील ही अहंभावना संपूर्ण नष्ट झाली नव्हती. एकदा भटोबासादि भक्तजन काम करीत असताना म्हाइंभट आले. गोसान्याचे दर्शन झाल्यानंतर ते म्हणाले, 'एकु गोसावी ईश्वरु : एरु अवघे सुंटदेव' त्यानंतर चक्रधर व नागदेव यांचा वादविवाद झाला. त्यावेळचे भटोबासाचे ज्ञान पाहून म्हाइंभटास 'बुधि आली'. त्यानतर येतील त्यावेळी ते भटोबासास नमस्कार करू लागले. (उ. भा. १ १३७.) पुढे एकदा सर्वज्ञानी सागितल्यावरून म्हाइंभटास आणण्यासाठी भटोबास सराळयास गेले. (उ. भा. २ . ४६२.) ईश्वरपुरास जाताना हंसाबेसही त्यांनी म्हाइंभटास पाठविण्याचा

निरोप दिला. (उ. भा. २ ४५३) त्याप्रमाणे ते एळी येथे आले. त्याना चक्रधरानी श्रीप्रभूंकडे अनुसरण कसे केले याविषयीची माहिती विचारली. म्हाइंभटानी चक्रधर जवळ असूनही गोविंदप्रभूकडे जाण्याचे कारण 'आपले श्वशुर त्याचे जवळून आपल्याला घेऊन जातील' असे वाटल्याचे सांगितले. तेव्हा चक्रधर म्हणाले, 'चालता बोलता देवो तो दुर्लभ की गा इतुके दीस : तुम्ही तेथ होतेति : तोंचि जरि एथ असतेति आन एक होतेति ' यावर म्हाइंभट म्हणाले, 'श्री प्रभु-अवतार आणि ईश्वरदास्य मोचक म्हणून आपणच सांगितल्याने मी तेथे गेलो.' (उ. भा. २ . ४५६.) चक्रधरांच्या मनात म्हाइंभटानी आपल्या-कडे शिष्य म्हणून राहावे अशी इच्छा असल्याचे या स्मृतीतून जाणवते.

एकदा चक्रधरानी भटोबासांना 'पर तें द्रव्यसाध्य' असे सांगितले. 'पण आपल्याजवळ द्रव्य नाही' असे भटोबास म्हणाले. यावर 'तू उभा ठाकलास तरी पुरे. सीधीते एथौनि नेइ जैल' असे चक्रधरानी सांगितले. यावर तेथेच असलेल्या म्हाइंभटानी 'आपल्याजवळ द्रव्य आहे' असे म्हटले. तेव्हा चक्रधर त्यांना उद्देशून म्हणाले, 'यासि संनिधान चरितार्थ जालें असे : तुम्हासि सनिधान चरितार्थ होआवे असे .' (उ. भा. २ ४५९.) एकदा चक्रधरानी म्हाइंभटांसाठी गीतेतील दोन श्लोकांचे विवरण केले आणि म्हटले, 'तेथौनि (रिधपुराहून) या मग तुम्हासी गीता वाखाणि जैल .' (उ. भा. २ ४६१)

चक्रधरांना जिज्ञासू चर्चक भक्ताची विशेष आवडी होती. म्हणूनच महदाइसा, म्हाइंभट याचे त्याना विशेष कौतुक वाटे. एकदा म्हाइभटास बोलावणे पाठविल्याचे चक्रधरानी सांगितल्यानंतर महदाइसेने विचारले 'ऐसा कोणु दैवाचा : भाग्याचा ब्राह्मणु . त्यावर चक्रधर तिला म्हणाले, 'बाइ : ब्राह्मणु कैसा नीका असे : जया तया अर्था आइतचि असे एथ जव होता : तवं पुसतचि, होता : तुम्ही देखतीति तरि तुम्हा सुख होते : (उ. भा. २ ४६६.) म्हाइभटाच्या व्यक्तित्वाचे वेगळेपण चक्रधरांनी तेव्हाच ताडले होते. त्याला संस्कारित करण्याची त्याना मोठी ओढ लागून राहिलेली होती.

लक्ष्मीधरभट आणि म्हाइंभट हे दोघेही संस्कृत पंडित आणि मित्र होते. एकदा या दोघानाही चोरानी अडविले. तेव्हा म्हाइंभटाने 'ज्वरो वा शस्त्रो वा' असे संस्कृत वचन म्हटले. हे ऐकताच त्या चोरात हृदयपरिवर्तन झाले. आणि 'अरे हे विद्वास' असे म्हणून त्या लोकानी त्याना सोडले. या दोघाच्याही बुद्धि-मत्तेबद्दल नागदेवाचार्योना मोठा आदर होता. इंद्रभटाकडे म्हाइभटांनी चक्रधर-प्रसादाचे वस्त्र मागितले; पण त्याने ते दिले नाही. हे ऐकून नागदेवाचार्यांना राग येऊन ते म्हणाले, 'म्हाइंभटासारिखे पात्र मागे आणि न दीजे :' याचा अर्थ काय ? शेवटी त्यानी स्वतः जाऊन ते वस्त्र आणले.

## गोविंदप्रभूंचे शिष्यत्व

स्वतःच्या ज्ञानाच्या अहंकारामुळे चक्रधराच्या प्रथम भेटीत म्हाइंभटाने त्याना साष्टांग नमस्कार केला नाही. चक्रधराचा व त्याचा सुरुवातीस मराठीत वादविवाद सुरू झाला, पण चर्चेचे गाडे त्याने त्याने संस्कृतमध्ये नेले. तेव्हा अस्खलित संस्कृतमध्ये चक्रधरांनी त्याला उत्तरे दिली. तेव्हा त्याच्या 'ईश्वरी' स्वरूपाची त्याला जाणीव होऊन त्याने त्याला दंडवत घातले. नागदेवाच्या ज्ञानाबद्दल म्हाइंभटाच्या मनातील कल्पना चक्रधरानी काही प्रसंगाने नाहीशा केल्या. आणि चक्रधर नागदेवाची अद्वैत चर्चा ऐकून म्हाइंभटाचा अहंभाव दूर होऊन त्याने नागदेवाला प्रणिपात केला. एवढेच नव्हे तर चक्रधराच्या निर्वाणानंतर नागदेवाचे आचार्यपद त्याने एकनिष्ठपणे स्वीकारले. चक्रधराच्या व्यक्तिमत्त्वाने प्रभावित झालेल्या म्हाइंभटाने शिष्यत्व स्वीकारले ते मात्र गोविंदप्रभूंचे. चक्रधराना अनुसरण्याचा विचार असतानाही तो गोविंदप्रभूंकडे गेला. याची एक मजेशीर हकिगत आहे. प्रातर्विधीसाठी गंगेवर गेलेल्या म्हाइंभटाच्या हातातील मातीचे ढेकूळ पाण्याने विरघळू लागले. आणि त्यावरून आयुष्याच्या नश्वरतेची त्याला खात्री पटली. सर्व निरवानिरव करून जावे असा त्याचा विचार मागे पडला आणि आता याक्षणीच अनुसरावे म्हणून तो निघाला. आप्तेष्ट जवळच असल्याने पुन्हा मोहाचा क्षण नको म्हणून जवळच्या चक्रधराकडे न जाता ऋद्धिपुरास असलेल्या गोविंदप्रभूंकडे तो आला आणि त्यांचे शिष्यत्व त्याने पत्करले. चक्रधर त्यांना 'परमेश्वरावतार' मानीत हे त्याला माहित होते. गोविंदप्रभू आणि म्हाइंभट यांचे गुरु शिष्यत्व हा जणु एक विधिसंकेतच होता. उंची वस्त्र पांघरलेला म्हाइंभट सराळ्याहून निघाला. वाटेत एका ब्राह्मणाला ते वस्त्र देऊन त्याने घोंगडी घेतली. सात दामाचा गूळ घेऊन चौकशी करीत तो ऋद्धिपुरास आला. 'म्हाइया येणार' याची गोविंदप्रभूंना कल्पना होती. तो येण्यापूर्वीच ते म्हणाले होते '.. म्हाइया येइल म्हणे : गुळु आणील म्हणे ' आणि शेवटी म्हाइया गूळ घेऊन आला. त्याने श्रीचरणी दंडवत घातले, परम भक्ताची भेट प्रभूंनी मोठ्या आवडीने स्वीकारली :' "श्रीकरीं गुळू घेतला : श्रीमुखीं घातला खावों लागले आवो मेला जाए : गोड आहे म्हणे . म्हणौनि दुसरेनि श्रीकरें भेली श्रीमुखीं घातलीं : आणि आरोगु लागले : ते श्रीमुखुनी ओघळ नीगेति : ते खाडमाखे : दोंदावरि गळे : ऐसा गुळु आरोगीला : "...मग म्हाइभट गोसावियाचे सेवा-दास्य करू लागले.

परमेश्वरावतारी गोविंदप्रभूंची सेवा म्हाइंभटांनी मोठ्या श्रद्धेने आणि एकनिष्ठपणाने केली. चक्रधरांनी पुरस्कारिलेल्या पंथीय तत्त्वज्ञानाचा पुरस्कार किंवा प्रचाराचे कार्य त्याने केल्याचे दिसत नाही. चक्रधर नागदेवांशी वागताना भक्ति भावनेपेक्षा विकल्प निर्माण होण्याची शक्यता कदाचित त्याला वाटली असावी

आणि म्हणून त्याच्या विषयीचा आदरभाव कायम रहावा आणि गुरुसेवाही मनोभावे करता यावी या दृष्टीने त्याने गोविंदप्रभूंचे सेवादास्य स्वीकारले असावे. शिक्षण आणि घराण्याचे उत्तम संस्कार झालेला म्हाइंभट गोविंदप्रभूंची काळजी वाहू लागला. गोविंदप्रभूंकरिता उत्तम श्वेत आहार त्यांना द्यावा, उत्तम मौल्यवान वस्त्रे द्यावीत अशी त्याची मनापासूनची इच्छा असे. परंतु यामागे जी अहंभावना असे ती गोविंदप्रभूंच्या चटदिशी लक्षात येई आणि त्याच्या कृतिमागील वैयर्थ्य दाखविण्याकरिता गोविंदप्रभू त्याने आणलेली वस्त्रे चिखलात घालीत. अशाच प्रकारे म्हाइभटांने ' चोखणे ' लावून यज्ञोपवीत धुतले तेव्हा गोविंदप्रभूंनी केला.

गोविंदप्रभूंचे अलौकिकत्व म्हाइंभटासारख्या भक्ताला पटले तरी सर्वसामान्य माणसांना त्याच्या चमत्कारिक वागण्याचा अर्थ कळणे अवघड होई. कित्येक वेळा स्वतः म्हाइभटानाच अशा लोकांना काय वाटेल याची मोठी काळजी लागून राही. अशा वेळी त्या त्या व्यक्तींचे सांत्वन करण्याचा, समजूत काढण्याचा, किंवा नुकसानभरपाई देण्याचा प्रयत्न करीत असत. म्हाइंभटाच्या या प्रयत्नामागील हळुवार भावना ध्यानात घेण्याजोगी आहे. हा थोर पुरुष गोविंदप्रभूपुढे किती विनयाने वागतो हे पाहिले म्हणजे त्याच्या मृदू आणि भाविक अंतःकरणाची साक्ष पटल्याखेरीज रहात नाही. दामूर्त नावाच्या एका भक्तावर रागावून गोविंदप्रभूंनी त्याला नारळ हाणला व निघून जाण्यास सागितले. संधी मिळताच नागदेव आणि म्हाइभट त्याच्या समाचारासाठी जातात, परंतु त्यांच्या आगमनापूर्वीच गोविंदप्रभू त्याच्याकडे येऊन गेल्याचे त्यांना समजते. भक्तावर क्षणात रागावणारा आणि त्यांच्या दुःखानी व्यथित होऊन त्याचे सात्वन करण्यासाठी धावणारा गुरु आपल्याला लाभला यामुळे साहजिकच त्यांना धन्यधन्य वाटले. गोविंदप्रभू एकदा वोडणझडप्याच्या घरी गेले. तो परगावी गेला होता. त्याच्या घरात शिरताना त्याच्या पत्नीने गोविंदप्रभूना अडविले, तेव्हा तिला बाजूस करून ते आत गेले आणि ' उतरंडीचे डेरे दोंदोसि धरुनि उतरीति : समोर आणिति : आणि माजिघरी फोडीति . तीळ ' तादूळ : गहु : जोहळे : उडीद : चवळे : ऐसे आवघे एकत्र केले ' अशी त्याची क्रीडा सुरू झाली. एवढ्यात वोडणझडप येताना दिसला. ' आणि भट म्हाइंभट भेओ लागले ' ' कसे होईल पा ? ' अशी चिंता निर्माण झाली. पुढे जाऊन त्यांनी सागितले ' वोडणझडपहो ! तुमचेया घरासि राउळे बीजें केले असे : ' तेणे म्हणीतले ' माझे दैव भाग्य : ' आणि त्याने पत्नीला बोल लावून गोविंदप्रभूंची यथाशक्ती सेवा केली. सर्वांचे त्याच्या समवेत जेवण झाले भोजनाबरोबरच गोविंदप्रभूबद्दलचा भक्ताचा भोळा भाव पाहून त्याची अंतःकरणेही तृप्त झाली.

गोविंदप्रभू वेळीअवेळी कोणताही पदार्थ वा फळे मागत आणि ती ती वस्तू स्मरणात ठेवून म्हाइंभट कोठूनही कोणत्याही प्रकारे मिळविण्याचा प्रयत्न

ग्रंथ, ... वि: ...
क्र ...२२६० ... नोंद दि. २१-३-८२ १६८२८


करीत. एकदा गव्हाच्या लोंब्या तर एकदा त्यानी अवकाळी आंबेच मागितले. भाद्रपदाचा महिना पण झाडावर श्रावण आंबा तयार होता. खास राजाकरिता राखून ठेवलेल्या त्या आंब्याना फडकी बांधलेली होती. व राखणाइतही ठेवण्यात आले होते. पण मध्यान्हरात्री गोविंदप्रभूकरिता ते आंबे चोरून आणले गेले. ऋद्धिपूर येथील राजमठ म्हाइंभटानी गोविंदप्रभूंकरिता घेऊन दिला. गोविंदप्रभूंचे त्या ठिकाणी वास्तव्य व्हावे. त्याचे 'निवासस्थान' तेथेच असावे अशी भक्तांची इच्छा होती. एक स्मृती त्यासबंधी सागते. गोविंदप्रभू नसले तर 'रीधपुरी राउळेंवीण अरीष्टें उठीताति : एकासि ज्वरु येताति एका खोकले लागताति : एका खते खाड्के होताति : एका कुष्टें लागताति एका खरुजा लागताति ऐसा अवघा लोकु पीडा भुतला :' लोकाचे आर्त पुरविण्यासाठी मठाबरोबरच बाजूचे आवारही म्हाइंभटाने मिळविले आणि त्यासाठी 'ताबेयाचे पत्र' केले. गोविंद-प्रभूंच्या अनेक आवडीप्रमाणेच या गोष्टीसाठीहि म्हाइंभटानी स्वत चे द्रव्य वापरले होते. राजमठामुळे गोविदप्रभूंच्या वास्तव्याला स्थिरता आली. आणि त्यामुळे तदनुषगिक काही उपचारही आले. पाडव्याच्या दिवशी गोविंदप्रभूंना ओवाळण्या-साठी नगरस्त्रिया येत. त्याच्या थाळ्यात म्हाइंभट चोळ्या ठेवीत असे. गोविंद-प्रभूसमोर गायन करणाऱ्यास त्याने रेशमी वस्त्र दिले. गोविदप्रभूच्या आग्रहाखातर सराफकट्टयात ते काही वेळ 'सोने चोरू' ही झाले. त्या सराफकट्टयात 'हातीं मुद्रिका : डोईस टोपरें अंगीं अगीया : ऐसे वसति : परतु विहारी परत आल्या-नतर मात्र म्हाइंभट 'मुद्रिका अंगीया टोपरें फेडीती : मग आचळे नेसेति कंथा पागुरेति : मग भिक्षेसि जाति'

घरच्या श्रीमंतीमुळे उत्तम अन्न आणि उत्तम वस्त्र याची सवय असलेल्या म्हाइंभटाला पथात प्रवेश केल्यानतर भिक्षेचे अन्न खाणे किती जड गेले असेल याची आपण कल्पना करू शकतो. भिक्षेच्या अन्नातील एक घास घेताच सुरुवातीला तर त्याला उलटीच झाली. हळूहळू त्याने त्या अन्नाचीही सवय लावून घेतली. 'काही प्रसगी सराफकट्टयात जाणारा, व्यवहार करणारा हा गृहस्थ भिक्षेचे अन्न खात नसावा, गाईला घालीत असावा' अशी साहाजिकच लोकाची कल्पना झाली आणि त्यामुळे ते 'म्हाइंभटासि नासले . वीटलें : आवलें . घटइलें खरवडि कोंडा ऐसे भिक्षेसि घालीति :' परंतु तीच भिक्षा गोसाव्याना दृष्टीपूत करून आडाच्या काठी बसून, एकत्र कालवून म्हाइंभट खात असत. आणि चिखलवनी पीत असत. एवढ्यात गोविंदप्रभू तेथे यायचे. म्हाइंभटाचे ते भिक्षाभोजन पाहून ते संतुष्ट व्हायचे आणि म्हणायचे 'ऐया माझा आता होय म्हणे :' एकदा त्यानी 'चारु होय म्हणे : वारु होय म्हणे : चारु तो वारु म्हणे :' असे म्हणून म्हाइंभटाचे 'चारुवारु' असे नाव ठेवले होते. नागदेवाचार्यांनाही 'हरिमा' असे नाव त्यांनी ठेवले होते. गोविंदप्रभूंचे देहावसान झाल्यानंतर खादा देणाऱ्यात

म्हाइंभटही होता. नागदेवाचार्यांना त्याची गोविंदप्रभूवरील श्रद्धा चांगल्या परिचयाची होती आणि त्याच्या या विश्वासामुळेच एकदा पैजेने त्यांनी म्हटले होते, ' म्हाइंभटातें श्रीप्रभुदास्यावेगळें जो दाखवी तयासि मी महावाक्य वाखाणिन. '

**वैयक्तिक जीवन**

वैयक्तिक जीवनात मात्र म्हाइंभट फारसा सुखी नव्हता असे दिसते. देमाइसा किंवा देमती ही त्याची पत्नी. म्हाइभटाने पंथात प्रवेश केल्यानंतर तीही पंथात आली, परतु विरक्ताला शोभेल असे तिचे वर्तन मात्र नव्हते. गोविंदप्रभूंना भोजनात पोळ्या वाढतानाही तिने चुकारपणा केला. एकदा देमाइसा आणि कोथळोबा पायावर पाय ठेवून तादूळ सडीत होती. एवढ्यात म्हाइभट बाहेरून आले आणि त्याच्या दृष्टीस हा चमत्कारिक प्रकार पडला. त्याच्या मनात विकल्प निर्माण झाला. त्याना वाटले, ' देहा ऐसें होए आणि रात्री तैसे होए ' एवढ्यात गोविंदप्रभू तेथे आले आणि त्यानी त्याना पाय बाजूस घेण्यास सागितले. त्या दिवसापासून कोथळोबाने अन्न, पाणी वर्ज्य केले. काळवडले. तीळ तीळ झिजू लागले. रोडले : तेव्हा गोविंदप्रभू म्हणाले, ' कोथळा ऐसा नव्हे म्हणे : ' आणि हे म्हाइभटानाही पटले. कोथळोबाचा कैपक्ष घेऊन त्यानी एकदा देमाइसेला बाक्ताडनही केले होते. एकदा देमाइसेच्या करवटीने—लाकडी भाड्याने कोथळोबा पाणी प्याला. ' तू शूद्र असता माझ्या करवतीचे पाणी कसें प्यालास ? ' असे देमाइसा म्हणाली. तेव्हा म्हाइभट म्हणाले, ' तुझा दोन्ही देवाशी संबंध आबाइसा सारखी माता आणि नागदेवासारखा बंधू. असे असता अजून तुझे अज्ञान कसे गेले नाही ? कोथळोबाने तुझ्या करवतीचे पाणी प्यावे हें तुझे भाग्य नव्हे काय ! असे म्हणून त्यानी तिला कोथळोबास दडवत घालावयास लाविले.

एकदा देमाइसेने म्हाइभटाच्या पिशवीतून त्याला न विचारता दोन आसू ( नाणी ) काढून घेतली. नंतर म्हाइंभटानी पाहिले, तर पिशवीत दोन आसू नाहीत. ' कोणी काढल्या ? कोणी वडिलानीच. वडीलधाऱ्यानीच काढून घेतल्या असतील ' असे म्हणून त्यानी महदाइसेचा संशय घेतला. ' देमाइसेवाचून कोण करणार ? ' या कल्पनेने महदाइसेने एक युक्ती योजिली. तिने अवचितपणे देमाइसेच्या डोकीला तेल लावले. माखले. मग तिच्याकडून अंगातील चोळी काढविली. आणि देमाइसेकडून पाणी घातले. तेवढ्यात तिने चोळीच्या बाखोरीत पाहिले. तेव्हा तिला तिथे त्या दोन्ही आसू दिसल्या. ती चोळी घेऊन म्हाइंभटाजवळ आली आणि म्हणाली, ' घ्या तुमच्या दोन्ही आसू. तुमच्या बायकोच्या बाखोरीलाच आहेत.' ते पाहिल्यानंतर म्हाइंभटांना मोठा अनुताप झाला. ' मी पापीया हो आई ' म्हणून ते तिच्या पायी पडले. मग महदाइसा म्हणाली, ' या आसू आता तिलाच द्या व तिला आणखी काही बोलू नका. ' म्हाइंभटानी ते मानले

आणि त्याप्रमाणे केले. मग महदाइसेने म्हटले, ' आता घाला गुरुकुळाला दंडवत तुम्ही गुरुकुळाबद्दल वेगळी कल्पना केलीत.' ' ठीक आहे आई ' असे म्हणून म्हाइंभटानी शेणामातीने अंग माखून घेतले. आणि ' मी पापी, गुरुकुळाचा संशय घेतला, मला सर्वांनी क्षमा करावी ' असे म्हणून सर्व गुरुकुळाला दंडवत घातले. तेव्हा नागदेवांनी ' उठा उठा ' असे म्हणून उठविले. त्यानंतर म्हाइंभटानी आपल्याजवळ असलेला सर्व परिग्रह नागदेवाच्या हाती आणून दिला आणि दंडवत घालून म्हटले ' आज पासून मी सर्वसंगपरित्याग केला. ' तेव्हापासून म्हाइंभट आपल्याशी द्रव्यसंग्रह करीनासे झाले. ही स्मृती देमाइसा, महदाइसा आणि म्हाइंभट या तिघाच्याही स्वभावावर प्रकाश टाकणारी आहे

## स्मृति–संकलनाचा निदिध्यास

म्हाइंभट हा महानुभाव पथातील पदसिद्ध अधिकारी पुरुष नसला, तरी गोविंदप्रभू आणि चक्रधर याच्या भक्तीत तो कोणासही हार जाणार नाही. या दोघाच्याही सहवास–सानिध्याचा लाभ त्याला झाला झाला होता. त्याच्या जीवनाशी तो एकरूप झाला होता. त्यामुळेच की काय त्याच्या निधनानंतर त्याच्या स्मृतींचे संकलन करण्याचे त्याने ठरविले असावे. जणू त्याच्या एकेक स्मृती आठवताना, ऐकताना आणि लिहिताना त्याच्या सहवासातील जीवनच तो जगत होता. ' लीळाचरित्र ', ' स्मृतिस्थळ ', ' गोविंदप्रभूचरित्र ' ही पंथाच्या प्रमुख व्यक्तींची चरित्रे सहजी चाळली तरी त्या त्या व्यक्तींच्या साध्यासुध्या वर्तनक्रमाविषयी चरित्रलेखकाला वाटणारा भक्तिभाव त्यातून ओथंबून राहिल्याचे लक्षात येईल. या आठवणी जमविण्याचा निदिध्यास त्याने घेतला होता. उन्हा–पावसाची, थंडी-वाऱ्याची पर्वा त्याने केली नाही. ' येतां जाता उठत बसतां घास गिळता ' आपल्या प्रभूंची आठवण त्याना व्हायची. त्यांची मूर्ती शब्दरूपाने साकार करण्याचे वेड लागून राहिले होते. चक्रधरांच्या आठवणी मिळविण्याकरिता म्हाइभट खेइभटाच्या गावी गेले. खेइभट शेतावर गेले होते, तर म्हाइभट तेथे गेले आणि चक्रधरांच्या आठवणी सागण्याची त्याने त्यास विनती केली. खेइभटाने ते कबूल केले. पण त्या आठवणी मिळाल्या कशा ? स्मृतिकार सांगतो, ' खेइभट कृषीकर्म करीति : आणि म्हाइंभट तया मागा मागा गोसावीयांचीया लीळा पुसति : ' खेइभट सांधति : त्या म्हाइंभट नमस्कारूनि घेंति : ' म्हाइंभटाची ही चिकाटी थक्क करून सोडणारी आहे. आठवणी जमविण्याची एकही संधी ते वाया घालवीत नसत. आणि असे काही घडले तर त्याच्या जीवाला मोठी चुटपूट लागून राहात असे. एकदा विजनात म्हाइंभट बसले असताना गदोनायकानी त्यांना पाहिले. तेव्हा लागलीच घोड्यावरून उतरून त्यांनी त्याना नमस्कार केला आणि त्यानी विचारले, ' आपण कोण महात्मे ? ' पण म्हाइंभटानी मौनभंग

केला नाही. तेव्हां त्याना नमस्कार करून गदोनायक निघून गेले. नंतर येणाऱ्या वडुव्याला म्हाइभटाने ' हे कोण असे विचारता ' ते गदोनायक ' अशी माहिती मिळाली. तेव्हा त्याच्या मनाला मोठी खंत लागून राहिली. ' अरेरे, मी पापी ! त्याच्याशी बोलतो, तर त्याना गोसाव्याच्या लीळा तरी विचारल्या असत्या ' असे म्हणून एक संस्कृत श्लोक त्यानी म्हटला–

' अपरीक्ष्य न कर्तव्य कर्तव्यं सुपरीक्षितम् ।
पश्चाद् भवति संतापो ब्राह्मणी नकुले यथा. '

भिक्षार्जनास गेले असताना काहीजण त्याना मुद्दाम आग्रहाने बोलवीत, त्याना भक्तीने काही देऊ करीत. परंतु त्याचा स्वीकार करण्यापूर्वी गोसाव्याच्या काही लीला ऐकविल्या पाहिजेत अशी म्हाइंभटाची अट असे. एकदा प्रतिष्ठानकडे लीळा जमविण्याकरिता ते गेले असता सारंग पंडिताला भेटले. सारंग पंडिताने त्याचा सत्कार करण्याचे ठरविले, परंतु गोसाव्याच्या लीळा सांगितल्याखेरीज आपण काही घेणार नाही असे म्हाइंभटानी सांगितले. त्या ऐकल्यानंतरच चक्रधराचा प्रसाद त्यानी घेतला. अशा तऱ्हेने अतीव श्रद्धेने म्हाइभटानी या आठवणी गोळा केल्या तरी त्याना अधिकृत स्वरूप येण्यासाठी त्यावर अधिकारी हात फिरण्याची आवश्यकता होतीच आणि या बाबतीत नागदेवाचार्यांचा अधिकार अर्थातच सर्वमान्य होता. म्हाइभटानी या आठवणींची संपादणी नागदेवाचार्यांच्या साहाय्याने केली. श्रीमुखींचे निश्चित शब्द कोणते, कोणते नव्हेत हे त्यानी सांगितले. ज्याच्या अनुभवाच्या लीळा असतील त्या त्यानाच विचाराव्यात असेही त्यानी सुचविले. त्याप्रमाणे करून म्हाइंभटानी लीळांचे पूर्वार्ध उत्तरार्ध असे दोन विभाग केले. या दृष्टीने म्हाइंभट हा मराठीचा आद्य संशोधक, संपादक आणि चरित्रकार होता, असेच म्हणावे लागेल.

## इतर ग्रंथरचना

आद्य मराठी कवयित्री महदाइसा आणि म्हाइभट यांचे संबंध अत्यंत जिव्हाळ्याचे होते. गोविंदप्रभूंच्या सांगण्यावरून स्फूर्ती होऊन तिने ' धवळे ' रचले. या धवळ्याचा उत्तरार्ध लिहिला जावा असा म्हाइंभटांनी तिच्याकडे आग्रह धरला. पण आपणास आता स्फूर्ती होत नाही असे तिने कळवळून सांगितले. तेव्हा उत्तरार्ध हा म्हाइंभटानीच लिहिला असे म्हटले जाते. म्हाइंभटाची इतर ग्रंथरचना फारशी उपलब्ध नाही. उपलब्ध आहेत त्या त्याच्या दहा आरत्या. या आरत्याना महानुभाव पंथात ' जतीचा दशकु ' असे म्हटले जाते. त्याशिवाय आणखीही काही आरत्या त्याच्या नावावर आहेत. संस्कृत भाषा पंडित असलेल्या म्हाइंभटाच्या नावावर काही टीकात्मक व तत्त्वज्ञानपर रचना कशी नाही याचे

आश्चर्य वाटते. वास्तविक तशी कुवत त्याच्या ठिकाणी निश्चितपणे होती. एका स्मृतीत म्हटले आहे 'एकदा म्हाइंभट गीतेवर भाष्य करीत होते. 'आपणचि पदे करिति : आणि आपणचि अर्थ करीति : आपणचि सथा करीति आपणचि परिहास सुति :'–१३५ (गो. प्र. च.) अशा तऱ्हेच्या म्हाइंभटाच्या टीका त्या त्यावेळी लिहिल्या गेल्या असत्या तर महानुभाव आणि पर्यायाने मराठी वाङ्मयात मोलाची भर पडली असती.

## अखेर

आपल्या गुरूचे जणु शाब्दिक स्मारक करून म्हाइंभट कृतकृत्य झाले. व्यवहारी जगात आता त्याना रस वाटेनासा झाला. ज्याच्यासाठी जीव पाखडावयाचा त्या मूर्ती आता अदृश्य झाल्या होत्या. मग आता स्वतःचे देहभान कुठले राहणार? उर्वरित आयुष्य अटनविजनात त्यांनी घालविले, परतु अशक्तपणा अतिशय आला. आपला शेवट ऋद्धिपुरास व्हावा या इच्छेने देमाइसेच्या साहाय्याने ते तिथे आले. म्हाइंभट आल्याचे समजताच भटोबास त्याना सामोरे गेले. महाद्वाराजवळच उभयतांची भेट झाली. म्हाइंभटानी भरल्या उरानी भटोबासांना म्हटले, 'भटो निडळावरि पावो ठेवा' असे म्हणून त्यानी त्याचा पाय धरला. परतु 'निडळावरी पाय तो गोसाव्याचा' असे म्हणून नागदेवाचार्यांनी आपला हात त्यांच्या कपाळावर ठेवला. एके दिवशी म्हाइंभटानी नागदेवाना विचारिले, 'भटो मज देवो होईल?' यानी असे का विचारावे असा नागदेवाना प्रश्न पडला, म्हणून थोडा वेळ ते स्तब्ध राहिले. त्यामुळे म्हाइंभटाना अत्यंत दुःख झाले. ते म्हणाले, 'मी पापी, मला देव कसा होईल?' चक्रधराची आठवण सांगून नागदेव म्हणाले, 'तुम्हा जरि देव नव्हे : तरि कोण्हाहि नव्हे : म्हणौनि तुम्हा देव होईल.' हे ऐकल्यानतर त्याना समाधान झाले. त्यांनी सर्वांची क्षमायाचना केली. आणि गोविंदप्रभूच्या सन्निध आपल्याला पुरण्याची त्यानी विनती केली. अशा तऱ्हेने आपल्या परम दैवताच्या निदिध्यासातच म्हाइंभटानी आपल्या जीवनाचा शेवट केला. आपल्या जीवनातील कृतापराधाची जाणीव होऊन कदाचित म्हाइंभटाना पश्चात्ताप झाला असावा, परंतु चक्रधर आणि गोविंदप्रभू या दोघांचे सेवा-दास्य लक्षात घेता ह्याना देव व्हावयास हरकत नसावी असेच नागदेवाचार्यांना वाटले असावे.

महानुभावीय पंथधुरीणाच्या या चरित्रकाराने आपल्या पंथाच्या दृष्टीने मोठे कार्य केले आहे, हे तर खरेच; परतु साधनाच्या अभावी महाराष्ट्राच्या तत्कालीन इतिहासाबाबत अंधकारात असणाऱ्याना मोठीच सामुग्री मिळवून दिली आहे. तत्कालीन सामाजिक आणि राजकीय परिस्थिती, धार्मिक समजुती, तत्कालीन वाक्प्रचार यांचे फारच चागले दर्शन या चरित्रग्रंथातून होते. बोली-भाषेचा टवटवीतपणा आजही आपल्याला जाणवतो. फारसा पाल्हाळ नसलेल्या

आणि नेमके सागणाऱ्या या स्मृती अंतःकरणाला चटका लावून जातात. 'नामूलं लिख्यते किंचित्' हा निर्धार म्हाइभटानी केलेला दिसतो. यामुळे कित्येक आठवणी त्रोटक वाटतात. परंतु त्याना स्वतःच्या मल्लीनाथीचे अस्तर म्हाइंभटानी जोडलेले दिसत नाही.

या स्मृतींचा अभ्यास वा वाचन करीत असताना एक गोष्ट प्रामुख्याने लक्षात आली, ती ही की या स्मृतींमधून एकसंघ जीवन वा व्यक्तिचित्र नजरे-समोर उभे राहू शकत नाही. गोविंदप्रभू, चक्रधर, नागदेव किंवा अशा अनेक व्यक्तींच्या स्मृती देताना त्यात काळाचे आणि स्थळाचे महत्त्व ध्यानात घेतले आहे हे खरे. तथापि त्यावरून त्या व्यक्तींच्या जीवनातील चढउताराचे बारकावे लक्षात येऊ शकत नाहीत, हेही खरे आहे. शिवाय अशा तऱ्हेचा लेखी किंवा अन्य स्वरूपाचा आधारही सापडत नाही. अशा स्थितीत म्हाइंभटांनी केलेल्या थोर कार्याची कल्पना येऊ शकते. महानुभाव पंथातील परमेश्वरस्वरूप व्यक्तीच्या प्रत्येक हालचालीचे आणि कृत्याचे स्मरण त्यांच्या भक्ताना परमप्रिय असते. त्या दृष्टीने त्या त्या व्यक्तीच्या जीवनातील सर्वसामान्य प्रसंगानाही यात स्थान मिळालेले आहे. या स्मृती आपल्या समोर ठेवताना त्या स्मृतिकाराच्या शब्दात देण्याची काळजी म्हाइंभटानी घेतलेली आहे.

या स्मृतीमधील काही दुवे हाती लागत नाहीत हे खरे, परंतु महानुभाव पंथातील बऱ्याच थोर व्यक्तींच्या जीवनावर प्रकाश पडण्यास त्यामुळे मोठी मदत झाली आहे. या स्मृतींच्या आधारे त्याच्या वैयक्तिक जीवनाचा शोध घेण्याचा मार्ग सोपा झाला आहे. महानुभाव पंथातील थोराच्या सानिध्यातच म्हाइंभट राहिले असल्याने त्याच्याही जीवनातील अनेक घटनाचे दर्शन या स्मृतीतून घडते. अहंकारी पंडितापासून आर्त भक्तापर्यंत होत गेलेली म्हाइंभटांच्या जीवनातील स्थित्यंतरे आपल्यासमोर उभी राहतात.

## ७ : कवीश्वराचार्य भास्कर

### व्यक्तित्व

' अतिसुंदर, आरक्तमिश्रित गौरवर्णी शरीरयष्टी, दीर्घ वनवट आजानुबाहो, सुस्मित मनोहर मुख असेति ' अशा आकर्षक व्यक्तिमत्त्वाची ही व्यक्ती म्हणजे महानुभाव पंथातील ' शृंघारिया कवि ' भास्कर होत. उंच, पुष्ट, गोऱ्या वर्णाची ही व्यक्ती उघड्या अंगाने जाऊ लागली म्हणजे साऱ्यांच्या नजरा त्याच्यावर खिळून राहावयाच्या. प्रवचनाच्या वेळी त्याच्या वाणीने आणि रूपाने सारा स्त्रीपुरुष श्रोतृवर्ग मंत्रमुग्ध होऊन जावयाचा. निसर्गदत्त सौंदर्याला भास्कराच्या नीटस वागण्याने अधिकच उठाव येत असे. अंगावरील वस्त्राची शिवण आत घालून ते अंगात घालीत व वरच्या बाजूस प्रावर्ण पांघरीत. त्याचे हे मनोज्ञ रूप न्याहाळण्यात साहजिकच साऱ्यांना सुख होई.

### तुम्ही सकळे कलाव्युत्पन्न

पंथीय संकेतांचे काटेकोर पालन करणाऱ्या नागदेवाचार्यांना भास्कराचे हे आकर्षक रूप आवडत नव्हते, असे नाही. पण त्यामागचा पंथाच्या दृष्टीने असलेला धोका त्यांनी जाणला आणि एके दिवशी भास्करांना बोलावून सांगितले, ' तुम्ही सकळ कलाव्युत्पन्न, वैराग्ये दमनशील, बहुतांचे धर्मपालिते की ! ' सौंदर्यसंपन्न व्यक्तीकडे स्त्रिया आकर्षित होतात आणि त्यामुळे धर्मसिद्धी होणार नाही. त्याकरिता भास्करांना त्यांनी दशाचे वस्त्र पांघरण्यास सांगितले. त्यानंतर शिवण बाहेर काढून सर्वांग झाकणारे ठिगळाचे वस्त्र ते पांघरू लागले. नागदेवांच्या या उपदेशाने भास्करांना धन्यता वाटली. सुख झाले. या प्रसंगाने नागदेवांनी भास्कराबद्दलच्या आपल्या भावनाही प्रकट केल्या होत्या. काही काळानंतर पंथाचे आचार्यपद भूषविणाऱ्या या व्यक्तीच्या चारित्र्याला जपण्याचा प्रयत्न नागदेवांनी अत्यंत हळुवारपणे पण जागरूकतेने केला. ' वेधवंती नागदेवां 'नी स्वतःच्या आणि

इतरांच्याही अनुभवावरून अधिकारवाणीने केलेला या उपदेश भास्करानी तितक्याच नम्रतेने स्वीकारला.

नागदेव हे भास्कराचे दीक्षागुरु. नागदेवाच्या मनात आपल्या या बुद्धिमान शिष्याबद्दलचे प्रेम आणि भास्कराच्या ठिकाणी त्याच्याबद्दलचा आदर ओतप्रोत होता. भास्कराच्या लेखणीप्रमाणेच त्याची वाणीहि अत्यंत रसाळ, ओघवती आणि प्रभावी होती. स्वतःच्या काव्याबद्दल 'शिशुपालवधा'त भास्कराने म्हटले आहे, 'बोल जैसे सुधारसे घोळिले किं चांदिणा चुभळिले ना तरि परिमळे बोळिले : चापेयाचेनि १९' अगदी हेच वर्णन त्याच्या अमोघ वक्तव्यालाही लागू पडते. अमृताची गोडी, चादण्याची शीतलता आणि चाफ्याचा सुगंध त्याच्या वाणीत भरून राहिला होता. त्यांच्या वाणीने केवळ जाणत्यानाच नव्हे तर सर्वसामान्य माणसालाही वेड लागले होते. एके दिवशी गंगेसमीप बसून भास्कर काही वाचीत होते आणि संस्कृत व्याख्या करीत होते. जवळच पाणोठा होता आणि एका बाजूला होता मठ. पाणोठ्यावर येणारे जाणारे स्त्री-पुरुष त्यांच्या वक्तृत्वाचा आस्वाद घेत तसेच खिळून राहिले. 'थोर रसु अवतरविला : आवघे नगर आकर्षिले.' गर्दी एवढी वाढत गेली, की मठात प्रवेश करायलाही जागा राहिली नाही. तेव्हा साहजिकच नागदेवानी चौकशी केली, तेव्हा भास्कराच्या प्रवचनाचे हे कौतुक त्याच्या कानी आले. आणि 'हे काइ जाले या भटोसी' असे उद्‌गार त्यांच्या तोंडून बाहेर पडले. त्यानी भास्कराला बोलावून घेतले आणि म्हटले 'महात्म्याजवळ ईश्वर सामग्री असली तरी ती लोपावी अस असताना तुम्ही ती पाणोठ्यासारख्या ठिकाणी बाहेर प्रकाशिता. लोकाना आकर्षित करता-तुम्हांला जर याची मोठी हौसच असेल तर यापुढे मलाच भागवत आणि गीता वाखाणून दाखवा' 'तुज जरि ऐसे व्यसनः तरी मजपुढा श्री भागवता : गीता म्हणा :' अशा रीतीने भास्कराचा हा 'जनतासपर्क' कमी होऊन त्यानी मठातच प्रवचने करावयास सुरवात केली. तेणे भटोबासाचे अंतःकरण द्रवे : आणि अवघे चंद्रमय होये :'

## पुण वाचा रसाळा गर्वू सांडवीन कोकिळां

आपल्या काव्यशक्तीबद्दलचा सार्थ आत्मविश्वास भास्करानी 'शिशुपाल-वधाच्या' सुरुवातीसच व्यक्त केला आहे. 'पुण वाचा रसाळा : गर्वू साडवीन कोकीळा कळहंसा अवकळा करीन मी २०' दंभस्फोट करण्याची त्याच्या ठिकाणची ही उर्मी अनेक वेळा उसळून आलेली दिसते. उत्कृष्ट वैय्याकरणी असलेल्या अनताचार्य या आपल्या पित्याजवळ काव्य-व्याकरणाचा त्यांचा अभ्यास झालेला होता. त्यानंतर देयापूर अग्निहोत्री त्र्यंबकाचार्यांकडून वेदवेदांग आणि वैदिक क्रिया याचे त्यानी शिक्षण घेतले. या बुद्धिमान शिष्यावर प्रसन्न होऊन

आपली सुंदर कन्या सरस्वती ही त्र्यंबकाचार्यांनी त्याला दिली. आपल्या पत्नीसह काही दिवस काशी येथे भास्करानी वास्तव्य केले. आपल्या पांडित्याच्या जोरावर त्यानी तेथील पंडितातही मानाचे स्थान मिळवले. याच ठिकाणी त्याना 'कवीश्वर' ही पदवी देण्यात आली असे म्हणतात; परंतु पथीयांच्या कल्पनेनुसार नागदेवांनीच त्यांचे 'कवीश्वर' हे नाव ठेवलेले होते. काशीच्या या मुक्कामात भास्कराच्या पत्नीचा बाळंतपणातच मृत्यु घडला आणि मूलही गेले. त्यामुळे त्यांच्या ठिकाणी मोठी विरक्ती उत्पन्न झाली. काशीहून परत येत असता उज्जयनीस त्यांना दुर्दैवाने अटकेत पडावे लागले. त्या ठिकाणचा अधिकारी यवन होता आणि भास्कराच्या मराठी बोलण्यावरून तो यादवांचा हेर असावा असे त्यास वाटले. परंतु चक्रधराच्या कृपेने त्याची सुटका झाली. तेथून आल्यानंतर भास्करानी महानुभाव पंथात प्रवेश केला.

विद्वत्तेचे माहेरघर असलेल्या काशी क्षेत्री विजय मिळवलेल्या भास्कराचे संस्कृतवर मोठे प्रभुत्व होते. उत्स्फूर्तपणे मुखातून बाहेर पडणारी त्याची काव्यरचना संस्कृतमध्येच होत असे. शीघ्रकवित्वाबद्दल त्याची प्रसिद्धी होती. लिंबू वर उडवावे आणि ते खाली येऊन झेलण्यापूर्वीच यानी एक नवा श्लोक रचावा इतकी त्याच्या बुद्धीची तीव्रता होती. साहजिकच वादविवाद करून आपल्या बुद्धीची चमक दाखवावी ही त्यांची सुप्त इच्छा असावयाची. स्वतःच्या गुरूशीही त्यानी वादात दोन हात करून त्यांना हरविले. त्याचे पूर्वाश्रमीचे गुरु केशवाचार्य याची व भास्करांची गाठ नदीजवळ पडली. तेव्हा केशव म्हणाले. 'तू एवढा विद्वान आणि आम्हाला सोडून नागदेवापाशी आलास. तरी आता (तुला) काइ तृतीय सांग निगाले?' त्यानी असे डिवचल्यावरोबर भास्करानी तितक्याच तडफेने त्याना उत्तर दिले, 'ऐसे (होय): पहा नाः'

आणि त्या दोघात उधाणि (वाद) सुरू झाली. त्यात भास्करानी केशवाचार्यांच्या मताचे समूळ खंडन करून त्यांना निरुत्तर केले. त्याला 'तृतीय शृंग' निघाल्याचे त्यांनी मान्य केले. भिक्षा करण्यासाठी ते निघाले. नागदेवाकडे येऊन त्यानी दंडवत घातले, परंतु त्यांना उपदेश देण्यास नागदेव तयार नव्हते. ते म्हणाले, 'हा अनाधिकार्या असे।' तेव्हा भास्करानी त्याना म्हटले 'भटो मज-कारणे :' आणि त्याच्या आग्रहावरून त्यानी दीक्षा दिली, परंतु त्याचा पूर्वग्रह नष्ट न झाल्याने पुढे नागदेवांनी त्याना जाण्यास सांगितले.

एके दिवशी नागदेवाकडे कोणी एक विद्वास आले व त्यांनी त्याच्याशी चर्चा सुरू केली. चर्चा करीत असताना ते म्हणाले, 'हे ऐसे नव्हे की : न घडे की' भास्कर तेथून जवळच आपले अंगावरील वस्त्र शिवीत बसले होते. त्यानी

एकदम म्हटले, ' हे कैसे न घडे ' अकस्मात् मध्येच विचारलेला हा प्रश्न ऐकून किंचित रोषाने तो विद्वास म्हणाला, ' मां यातु तुम्ही काई जाणा . '

त्याचा प्रश्न ऐकून नागदेव म्हणाले, ' हा कैसा नेणे हा बोरीकर भानू नव्हे : यासि बोला : ' आणि नंतर त्या दोघात वाद सुरू झाला. चर्चेत भास्करानी त्याला निरुत्तर केले, तेव्हा त्याना आश्चर्य वाटले.

महानुभावांच्या द्वैती तत्त्वज्ञानाची टवाळी करणाऱ्या एका सन्याशाची खोड मोडण्याची भास्कराना तीव्र इच्छा होती. त्यानी तसे एके दिवशी नागदेवाना सागितलेही. परतु नागदेव म्हणाले, ' तू होऊन चर्चा करू नकोस. त्यानीच वेळ आणली तर कर. ' आणि एके दिवशी सधी चालून आली. भास्करांनी त्याचा चांगला मुखभग केला. संन्यासीया दैन्य जाले '

पिंपळेश्वराच्या देवळात प्रवचन करण्यासाठी पैठणाहून एक विद्वास आला होता, तिथे जाण्याची भास्कराची फार इच्छा होती. तिथे न जाण्याबद्दल नागदेवानी सागितले असताही कुणाला न कळत भास्कर तेथे गेले. दाराच्या खाबाला टेकून ऐकत बसलेल्या भास्करानी प्रवचन चालू असता एके ठिकाणी ' अबद्ध ' ' अबद्ध ' असे म्हटले आणि त्या दोघात वादविवाद सुरू झाला. त्यानी वेगळा पाठ सुचविला आणि आठ दहा प्रकारे त्या श्लोकाचा अर्थ करून दाखविला. साहजिकच त्याला मोठे समाधान झाले आणि त्याने ' तुम्ही कवण ' असा प्रश्न केला. तेव्हा तेथेच संस्कृतमध्ये त्यानी उत्तर दिले :

काव्यालापकलापकेलिकुशलाः शृंगारवीरावृताः ।
केचित्कृष्णकथासु सुंदरमतिस्तद् भास्करोऽह कवि ॥ १ ॥

हे ऐकून त्या विद्वासाने म्हटले, ' तुम्ही मनुष्य नव्हा : इथली अधिष्ठात्री देवताच माझा गर्व नाहीसा करण्याकरिता साकार झाली आहे. ' तेव्हा भास्करानी लागलीच म्हटले, ' आम्ही देवता नव्हो : आम्ही वेधवती नागदेवभटाचे '. अशा प्रकारे संन्यासीगर्वहरण करून भास्करानी सर्वांना आश्चर्यचकित करून सोडले. सुप्रसिद्ध कवी विष्णुदास नामा याच्याशीही भास्करांनी चर्चा केली होती असे एक स्मृती सागते.

भास्कराची चर्चेची आणि विवरणाची पद्धत नागदेवांना फार आवडे. त्यामुळे त्यांनी त्याना ' गीता व्याख्यान ' करण्यास सांगितले. परतु भास्करानी ते स्वत. न करता वाकले हरिभट याना करण्यास सागितले. तेही विद्वास होते. त्यांनी गीता वाखाणिली. परंतु ' त्याचा शब्द नावेक ठसु : रसवृत्ति तोडकी : आइकावेया तैसे गुरुकुल न बैसे त्याच्या विवरणाने काही नागदेवांचे समाधान झाले नाही आणि त्यामुळे भास्कराच्या विवरणपद्धतीचे वैशिष्ट्य अधिकच समजून आले.

वादविवाद करण्याची भास्करांची आवड इतकी विलक्षण होती की ते त्यात देहभान विसरून जात असत. नागदेव हे त्याचे गुरु. परंतु त्यांच्याशी धर्म-वार्ता करीत असताना त्यांना आपल्या संबधाची जाणीव राहिली नाही. आक्षेप-परिहारार्थ त्यानी खूप चर्चा केली आणि चर्चेत त्याचा विवेक सुटत चालल्याचे लक्षात येताच केसोवासानी त्याना वेळीच हटकले. ते म्हणाले, 'भटो, अधीकरणेसि इतुके वाढवीता दूषण असे : अधीष्टानींची प्रसन्नता जाये : यैसीया परी काइ अर्थेसिधी होईल : भटोबासाचे बोलणे ईश्वर वाणि की : ते आइकिले तैसे सिरसा नमस्करूनि घेयावे : न परीसवे तरी आपणचि विमर्शावे :' हे ऐकल्यानंतर भास्कर किती खजील झाले असतील, याची कल्पना करू शकतो.

वादविवादातील या प्रभुत्वातील जोरावरच भास्करांनी आपल्या श्वशुरानी त्याच्या नावे केलेली सर्व मिळकत परत मिळवली. मृत्यूपूर्वी त्र्यंबकाचार्यांनी भास्कराच्या नावाने सर्व मालमत्ता केली. परंतु भास्कर काशीहून परत येण्यापूर्वीच विनायक दीक्षित नावाच्या गृहस्थाने ती हीन मार्गाने मिळविली. भास्कर येताच वाद करून ती आपली असल्याचे सिद्ध करण्याचे आव्हान देण्यात आले. भास्करानी ते स्वीकारले आणि वादात प्रतिपक्षीयाना सपूर्णपणे पराभूत केले. तेव्हा पश्चात्तापदग्ध होऊन त्याने क्षमा मागितली. भास्करानीही उदार बुद्धीने सर्व मालमत्ता व अधि-कार सर्वांना वाटून टाकले. हा भास्कराच्या आयुष्यातील मोठ्या आनंदाचा क्षण होता.

### तुम्ही सकळ कलाव्युत्पन्न—बहुताचे धर्मपालिते की :

स्वतंत्र आणि तीव्र बुद्धिमत्ता असूनहि नम्र भक्ताची भूमिका भास्करानी कधीच सोडली नाही. नागदेवाचे आदेश ते शिरसावंद्य मानावयाचे. त्याच्या पठडीत पंथीय संस्कार घडलेल्या भास्कराकडे पंथाचे आचार्यपद कालांतराने चालत आले. नागदेवाच्या निधनानंतर मध्यंतरी बाइदेव किंवा भावेदेवबास हे काही काळ आचार्य होते. त्यानंतर आचार्यपदाची धुरा भास्करांना सांभाळावी लागली. या काळात मुसलमानाच्या टोळधाडी चोहीकडे उठत होत्या आणि महानुभाव पंथ या एका क्रांतिकारक काळातून मार्गक्रमण करीत होता. ही वावटळ थोडीशी शमल्या-नंतर इतस्ततः गेलेले महानुभावीय हळूहळू एकत्र जमू लागले. त्या सर्वांना पंथीय तत्त्वज्ञान सुगम करून सागून त्याच्या ठिकाणच्या कोमेजलेल्या अंकुराना भास्करानी पुन्हा पल्लवित केले या धुमश्चक्रीच्या काळात भास्कर पंथाचे सर्व ग्रंथ आपल्या सोबत बाळगीत. मध्यंतरी त्याच्यावर झालेल्या हल्ल्यात बरेचसे ग्रंथ नष्ट नष्ट झाले. 'लीळाचरित्रा'ची पोथीही त्याचेकडे आलेली होती. भास्कराचे प्रमुख शिष्य नागांबिका, रामदेव व परशुरामबास हे होत. त्यानी आपल्या स्मरणातील लीला लिहून काढून 'लीळाचरित्रा'त भर टाकली. नागदेवाच्या निक्षेपावर देऊळ

करावे अशी गोपाळपंडिताची इच्छा होती, परंतु तसे करू नये याविषयी भास्करानी अनेक दूषणे दाखविली. तेव्हा गोपाळपंडिताने तो विचार सोडून दिला. कवीश्वर विजनास गेले असता एके ठिकाणी मुग्या आल्या, एके ठायी गायरे आली आणि कोणतेहि स्थान 'सत्वानै एचि :' विजन पाळता येईना म्हणून ते घरी आले. व भटोना ही हकीगत सांगितली. ते म्हणाले, 'आलेति : हे उचित स्फुरले :' यातील भास्कराचा चोखंदळपणा ध्यानात घेण्याजोगा आहे. मुसलमानाच्या स्वाऱ्या-मुळे उध्वस्त झालेल्या पंथाला सावरून धरून त्यांच्यात प्राण ओतण्याचे काम भास्कराना करावे लागले. या स्वाऱ्यामुळे पंथीयांच्या ऐहिक जीवनावर फार मोठे परिणाम झाले आणि त्याच्या ठिकाणच्या श्रद्धाही डळमळीत होण्याची शक्यता निर्माण झाली. पंथीय तत्त्वज्ञान सांगणारे ग्रंथही उपलब्ध होण्याची शक्यताही दुरावली. अशा वेळी बौद्धिक सामर्थ्य शाबूत असलेल्या आणि पंथीय तत्त्वज्ञानाची नस ओळखणाऱ्या भास्करानी त्याना मार्गदर्शन केले आणि दिलासा दिला.

भास्कराकडे आलेले आचार्यपद पंथीय दृष्टीने महत्त्वाचे आहेच, पण त्याच्या काव्यक्षेत्रातील थोरवीलाही ते शोभेसेच आहे. 'शिशुपालवध' आणि 'उद्धवगीता' या दोन प्रवृत्तिनिवृत्तिपर काव्यानी मराठी साहित्यात त्यांचे स्थान अढळ झालेलेच आहे. आणखीही विरहाष्टक, जयाष्टक, पूजावसर अशी काही छोटी काव्ये त्यानी रचलेली आहेत. ह्याचे गद्य 'श्रीकृष्णचरित्र' ही प्रसिद्ध आहे संस्कृत भाषेवरील त्याचे प्रभुत्व उत्स्फूर्त काव्याच्या वेळी दिसून येतच असे. तेव्हा त्या भाषेत त्याचे काही साहित्य असल्यास नवल नाही. नरविलापस्तोत्र, पूजावसर, चालिसाख्यस्तोत्र, श्रियाष्टक असे काही ग्रंथ संस्कृत भाषेत त्याच्या नावावर आहेत. 'शिशुपालवध' आणि 'उद्धवगीता किंवा 'एकादशस्कंध' हे ग्रंथ नाग-देवाच्या निधनानंतर निर्माण झाले असले पाहिजेत. नागदेवाच्या नतर भावे व्यास हे पंथाचे आचार्य होते आणि आपला पहिला ग्रंथ 'शिशुपालवध' लिहून झाल्या-नंतर साहजिकच भास्करानी ह्याचेकडे अभिप्रायार्थ दिला. तो पाहून बाईदेवबास म्हणाले, 'कवीश्वरहो, ग्रंथु निका जाला परि निवृत्ताजोगा नव्हेचि :' हे ऐकून भास्करानी 'येकादसस्कंदु' (उद्धवगीता) केला. रचिला. तो ऐकल्यानंतर बाईदेवबास म्हणाले, 'आता होये कवीश्वरहो हा निवृत्ताजोगा जाला : म्हणौनि थोर तोखले.' (स्मृ. ख्य. वृ. ७) श्रीकृष्ण हे परमदैवत कोणत्याही स्वरूपात आराधण्यास मिळाले, तर अत्यंत सुखावणाऱ्या भास्करानी बाईदेवबासाच्या उद्गारांनी 'उद्धवगीते'सारखे तत्त्वज्ञानपर काव्यही सरसे निर्माण केले. त्यांच्याच शब्दात सांगावयाचे तर—

वर्णिता कान्हो चौहात मल्लु : वोडवू होत असे नवल्लू वोल रसे दोंदिलू नाचतु दिसे ॥ २१ ॥

श्रीकृष्ण कथेचे आळे कीजे खोल
बुद्धि भावार्थरसाची जीती ओल
तरि प्रबंधलतेचे वेल : वाढत दिसती ।। २२ ।।

अंतरंगात खोलवर मुरलेल्या श्रीकृष्णचरित्राचे वर्णन करताना त्यांच्या भावनांना उधाण येत असे आणि विविध रसांनी न्हाऊनच त्यांच्या मुखावाटे शब्द बाहेर पडत असत. भावरसाचा जिवंत ओलावा त्यांच्या अंतःकरणात असल्याने त्यांची प्रबंधलतिका बहरून गेली आहे.

**' देह थोर तुटले : '**

भास्कराचे अखेरचे दिवस एकट्याने अटन करण्यात गेले. शरीराकडे त्यांचे दुर्लक्ष झाले. अत्यंत अशक्तपणा आला. अशा स्थितीत दंतिगोपाळबास त्यांच्या साहाय्यार्थ धावून आले. दंतिगोपाळबासासमवेत अटन करीत असताना मोठी अशक्ती उत्पन्न झाली. तेव्हा दंतिगोपाळबासांनी त्यांना पालखीत बसवले. साडेगावी देवळाच्या पायरीशी पालखी उतरविली. भास्करांनी तेथूनच नतमस्तक होऊन नमस्कार केला. गोपाळबासांनी एक पायरी चढून नमस्कार करता येईल असे सांगितले त्याप्रमाणे त्यांनी प्रयत्न केला आणि हळूहळू सर्व पायऱ्या ते चढून गेले. तेव्हा मोठ्या समाधानाने ते गोपाळबासांना म्हणाले, ' भले केले गोपाळदेवा : माझे अव्हेरण चुकवीले : ' म्हणून दोन्ही हातांनी त्यांनी गोपाळबासांना दंडवत केले.

अशाच प्रकारे ते दोघेही अटनाकरिता गेले असता ' कवीश्वरबासाचे देह थोर तुटले. ' तेव्हा फाकणी करून ते दोघे विहरण करू लागले. परंतु अशक्तपणाने कवीश्वरांची गति कुंठली आणि एका ठिकाणी ते स्वस्थ पडून राहिले. हिंडत हिंडत गोपाळबास तिकडे आले. कवीश्वरबासांचे जवळ जाऊन ते पाहतात तो ' चिन्ह पालटले होते. विस्मृती प्रवर्तली होती.' तेव्हा पाण्याचा बोळा त्यांनी त्यांच्या तोंडात पिळला. सावध झाल्यानंतर कवीश्वरांनी गोपाळबासांना ओळखले आणि त्यांचे डोळे अश्रूंनी भरून आले. ' आहा गोपाळ देया : ऐसें का केलें ' असा प्रश्न त्यांनी केला. तेव्हा ' तुम्ही बहुतासी धर्मपालिते ' असे म्हणून त्यांना उठविले. त्यांची शुश्रूषा केली व ज्या वैद्याकडून औषध घेतले त्यांना नंतर कवी-श्वरांनी ' गीतावाक्य ' वाखाणिले.

थोड्या श्रमात अधिक पुण्य गाठी बांधण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका व्यापाऱ्यास भास्करांनी दाद दिली नाही. एकदा ते, रामोपाध्ये, कान्होपाध्ये व परसरामबास हे चौघे संगमास आले. तेथे एक सहस्र भोजन घालण्याकरिता एक व्यवहारा आला होता. त्याला रात्री एक स्वप्न पडले, की भटमार्गातील एका

महात्म्याला जेवू घातले असता सहस्रभोजन होईल. सकाळी कवीश्वरबासांचे त्याला दर्शन झाले. समोर येऊन दंडवत करून त्याने रात्रीचे स्वप्न त्याना सांगितले. ' घेतले असते, परंतु आमचे गुरु पुढे गेले आहेत ' असे म्हणून त्यानी ते टाळले आणि पुढे निघाले.

कवीश्वरांची आज्ञा घेऊन आलेले गोपाळबास एकटेच अटन करीत चंदन-चंदनास गेले. अन्नछत्रातील अन्न तेथे न घेता गंगेवर खाण्याच्या त्यांच्या इच्छेमुळे अन्न मिळाले नाही. शेवटी डोंगरावर त्यानी देह ठेवला आणि ' छिन्नस्थळी ' ' धोंड्याखाली ' ठेवली. काही काळानंतर कवीश्वर शोध करीत त्या ठिकाणी आले व त्यानी ' छिन्नस्थळी ' आपल्या ताब्यात घेतली. महेश्वरपंडिताची कन्या नाति नागाइसा सत्रसींगीस निधन पावली. तिने लिहून ठेवलेली ' छिन्नस्थळी ' शोध करीत गेलेल्या भास्कराच्या हाती पडली. ' आणि कवीश्वरबासा थोर दुःख झाले '. तिच्याबद्दलचा शोक श्लोकरूप घेऊन बाहेर पडला.

> कात श्रीमत्सुदेशे सतशिखरगिराधृत्तरोत्तुंगशृंगे
> निष्ठावत्यानुगत्या निजजनसखिनां यान्त पन्थानमेकम् ।
> आग्नेयं नागदेवं निजजनपरमानंदमार्गं जगाम
> स्मृत्वा श्रीचक्रपाणिं निजहृदि दधती ब्रह्म नागाविकासा ।। १ ।।

या ठिकाणी त्यानी आपल्या आयुष्याचे शेवटचे दिवस घालविले. या काळात मराठी साहित्यात मोलाची भर टाकणारी रचना त्यानी केली. ' शिशुपालवधासारखा ' उत्तम ओवीबद्ध ग्रंथ त्यानी मराठीत रचला आणि त्याला त्याचे संस्कृत काव्यशास्त्राचे ज्ञान उपयोगी पडले. महानुभावीयांच्या ' सा ग्रंथा 'त भास्कराच्या ' उद्धवगीता व ' शिशुपालवध ह्या दोन्ही ग्रंथाना मानाचे स्थान प्राप्त झाले आहे. काही किरकोळ रचना त्यांनी संस्कृतमध्ये केलेली असली तरी महत्त्वाची आणि सरस अशी वाङ्मय निर्मिती त्यानी मराठीमध्येच केलेली आहे आणि अशा तऱ्हेने पंथ-संस्थापकाचा आदेशही मानलेला आहे. भास्कराच्या काव्यात विविध रसाना भरती आलेली आहे. ' शिशुपालवध ' या शीर्षकावरून वीररसवर्णनाची अपेक्षा असली तरी एकदर ग्रंथात शृंगाराला प्राधान्य मिळाल्याने ' शृंगारिया कवी ' अशी पदवी त्याच्या लेखनाला शोभेशीच म्हणावी लागेल. ' उद्धवगीते ' सारख्या तत्त्वज्ञानपर ग्रंथात व्यवहारातील समर्पक उपमा देऊन त्यांनी पंथीय तत्त्वज्ञान

अत्यंत सुगम करून सांगितले आहे. अमोघ वाणी, रसाळ लेखणी आणि विनम्र सरणी यानी भास्कराचे स्थान महानुभाव पंथात तसेच मराठी साहित्यात अढळ झाले आहे.*

♠ ♠

* कवीश्वराचार्य भास्करभट्ट बोरीकर याच्या जीवनाविषयीची माहिती प्रारंभी डॉ वि. भि. कोलते व श्री. वा. ना. देशपांडे यानी रिधपूरचे विद्वान महंत श्री यक्षदेव महानुभाव याचेकडून मिळालेल्या ' भानुविजय ' या पोथीवरून ' विविधज्ञानविस्तारा 'च्या ऑक्टोबर १९२८ व ऑगस्ट १९३२ या अंकात दिली होती; परंतु आधाराची पोथी प्रक्षिप्त ठरल्याने भास्कराचा पूर्ववृत्तात, त्याच्या विवाहाविषयीची माहिती, काशीयात्रा, कारागृहवास, त्यातून श्रीचक्रधरांच्या कृपेने सुटका व देवदेवेश्वराची प्राप्ती या सर्व गोष्टी अविश्वासार्ह असल्याचे डॉ. कोलते याचे मत आहे. भास्कराची प्रचलित माहिती ' भानुविजय ' व काही आख्यायिका याच्या आधारे तयार करण्यात आली आहे व ती अलीकडच्या काळातील आहे. कवीश्वर भास्कराबाबत डॉ कोलते म्हणतात, ' तो स्वतः विरक्त बनल्यामुळे कोणत्याही प्रकारचे मानापमानाचे झेंगट आपल्या पाठीमागे लागू नये म्हणून पंचकृष्णातील एक कृष्ण गोविंद प्रभु व दीक्षागुरु नागदेवाचार्य याच्यासुद्धा जवळ तो फारसा राहिला नाही ' असे नागदेवाचार्य चरित्र व ऋद्धिपूरचरित्र ' या ग्रंथावरून अनुमानता येते ' [ पहा : भास्करभट्ट बोरीकर : पृष्ठ ८, ९ व २४. ]

# ८ : महानुभाव वाङ्मयपरंपरा

## विविध वाङ्मयप्रकार

महानुभाव पंथातील अनेक कवींनी विपुल ग्रंथरचना तर केलीच, शिवाय विविध वाङ्मयप्रकारामध्ये भरही टाकली. त्यात पंथ संस्थापकांची व देवतांची चरित्रे प्रमुख आहेत. ' लीळाचरित्र ', ' गोविंदप्रभु चरित्र ', इ. चरित्रपर ग्रंथनिर्मितीस महेंद्रभटाचे परिश्रम कारणीभूत झाले. चरित्रनायकाविषयीचा गाढ आदरभाव व श्रद्धा याबरोबरच लौकिक मराठी भाषेचे जिवंत स्वरूपही या ग्रंथातून पाहावयास मिळते. सूत्र वाङ्मयात चक्रधर–वचनोक्तिसंग्रह असून टीकावाङ्मयात सूत्रवाङ्मयाचे विवरण करण्यात आले आहे. याखेरीज न्याय, व्याकरण, छंद, कोश इत्यादी शास्त्राचे विवेचन करणारे ग्रंथही निर्माण झाले. महानुभाव पंथीयात महेंद्र, केशव, दामोदर, भास्कर यासारखे व्युत्पन्न पंडित होते. संस्कृताध्ययनामुळे झालेल्या संस्कारांचा प्रत्यय त्यांच्या वाङ्मयातही येतो. यामुळेच त्यांच्या मराठी रचनाही संस्कृतच्या वळणावर गेल्या आहेत. या पंथातील कवींनी क्षेत्र व व्यक्तिमहात्म्य वर्णन करणारी काही स्तोत्रे व काव्येही लिहिली आहेत. या सर्व वाङ्मयाचे पाच विभागात वर्गीकरण केले जाते. ( १ ) श्रुती ( अवतारी पुरुषांची चरित्रे व वचने. ) ( २ ) स्मृती. ( स्मृतिस्थळ. ) ( ३ ) वृद्धाचार. ( आचार्यांचे आचार विचार. ) ( ४ ) मार्ग-रूढी ( टीका व रूढ विचार. ) ( ५ ) वर्तमान. ( नंतरचे सर्व वाङ्मय. )

## साती ग्रंथ :

आद्य मराठी कवयित्री महदाइसा ही महानुभाव पंथाची एक श्रेष्ठ अनुयायी होती. तिने लिहिलेले धवळे प्रसिद्ध आहेत. महानुभावांना पूज्य असलेल्या काही ग्रंथांचा उल्लेख ' साती ग्रंथ ' या नावाने केला जातो. ' साती ग्रंथ ' असे आहेत— १. ( वछाहरण–दामोदर पंडित ( शके १२३८. ) २. ( रुक्मिणी स्वयंवर. नरेंद्र.

(शके १२९४.) ३. शिशुपालवध–भास्कर. (शके १२३५.) ४. उद्धवगीता-भास्कर. (शके १२३६) ५. ज्ञानप्रबोध–प. विश्वनाथ बाळापूरकर. (शके १२५३.) ६. सह्याद्रिवर्णन–खळोव्यास. (शके १२२४.) ७. ऋद्धिपूर वर्णन–नारोव्यास बहाळिये. (शके १२८५.) चक्रधराची दिनचर्या 'पूजावसर' किंवा 'नित्यदिनी लीळा' नावाने लिहून ठेवणारा भावेदेव किंवा बाइंदेव बास हा भास्करभटाचा गुरुबंधू होय. नागदेवाचार्यांकडून त्यांनी दीक्षा घेतली होती. चक्रधराचा सहवास त्यास लाभला होता. 'पूजावसर' हे छोटेसे प्रकरण चक्रधराच्या प्रात: कालापासून रात्रीपर्यंतच्या लीळा ग्रंथित करणारे आहे. पंथीयात 'संध्ये प्रमाणेच किंवा वारकऱ्यांच्या 'हरिपाठा'प्रमाणे त्याचे नित्य वाचन होत असते. याच्या नित्यपठनाने चक्रधराचे नित्यस्मरण करणे पंथानुयायांना सोपे झाले आहे. भावेदेव व्यास स्वतः अतिशय विद्वान आणि विरक्त पुरुष होता. मूळचा गंगातीरावरील नेवासे या भागातील तो राहाणारा. प्रश्नावळी, मूर्तिज्ञान इ. अन्यही काही ग्रंथ त्याने लिहिले. नागदेवाचार्यानंतर काही काळ बाइदेवबासानी पंथाचे आचार्यपदही भूषविले.

## केशिराज व आनेराज

पंथीयाच्या दृष्टीने विशेष वाङ्मयीन कार्य करणारा ग्रंथकार म्हणजे केशव व्यास किंवा केशिराज बास हा होय. त्याचे वडील बंधू गोपाळ पंडित किंवा आनेराजबास यानी व केशिराजानी मिळून चक्रधराची वचने 'सूत्रपाठ' या नावाच्या ग्रंथात संग्रहीत केली. सुमारे अकरा प्रकरणाच्या या ग्रंथात चक्रधराचे तत्त्वज्ञान विशद करणारी सूत्रे आहेत. याच 'सूत्रपाठा'वर पुढच्या काळात अनेकांनी टीप-ग्रंथादी लेखन केले. केशिराजानी याच सूत्राच्या अनुषंगाने चक्रधरानी वेळोवेळी जे दृष्टान्त दिले, ते एकत्रित करून सूत्र, दृष्टान्त आणि दार्ष्टान्तिक अशा क्रमाने त्याची मांडणी केली. यालाच 'दृष्टान्त पाठ' असे नाव रूढ असून त्यात ११४ दृष्टान्ताचा समावेश करण्यात आला आहे. केशिराजानी श्रीचक्रधराचे स्वरूपवर्णन करणारा 'मूर्तिप्रकाश' या नावाने लिहिलेला ग्रंथही पंथीयात प्रिय आहे. चक्रधराची मूर्ती आणि कृती यथारूप चित्रित करण्याचा प्रयत्न केशिराजानी आपल्या ग्रंथात केला आहे.

केशिराज आणि आनेराज हे दोघेही पैठणजवळील वरखेडवाडे येथील चक्रपाणी नावाच्या गृहस्थाचे पुत्र. केशिराजानी रत्नमालास्तोत्र, ज्ञानकलानिधिस्तोत्र व दृष्टान्तस्तोत्र यासारख्या लहानमोठ्या संस्कृत रचनाही केल्या. आनेराजानी 'लक्षण-रत्नाकर' हा संस्कृत व 'सुभाषितान्ताक्षरी' हा मराठी असे काही ग्रंथ रचिले. हे उभयतः बंधू नागदेवाचार्यांचे शिष्य होते. त्यातील गोपाळ पंडित (आनेराज बास) हे पारमांडल्य आम्नायाचे प्रवर्तक म्हणून प्रसिद्ध आहेत. गोपाळ पंडित सात महिन्याचे जन्मले. त्याचे डोळे उघडत नव्हते. अशा स्थितीत आईने त्यास श्री

चक्रधराकडे सोपविले. त्यानंतर त्यास दृष्टी आली. चक्रधरांनीच या गोपाळ पंडिताचे ' पारमांडल्य ' असे नाव ठेवले होते. गोपाळपंडित देवगिरीस पुराणिक व खासगी कोषाध्यक्ष म्हणून काम पाहण्यासाठी रामदेवराव यादवाची धाकटी पत्नी कामाइसा हिच्याकडे होता. याच्यामुळेच कामाइसाने नागदेवाचार्यांकडून दीक्षा घेतली. त्यांचा ' द्वात्रिंशल्लक्षण ' ( बत्तीस लक्षण ) हा संस्कृत ग्रंथही प्रसिद्ध आहे. यावर पुढच्या काळात पंथातील अनेकानी टीका ग्रंथ लिहिले. त्यांच्या मराठी ग्रंथावरही टीकाग्रंथ लिहिण्यात आले आहेत.

केशवराज किंवा केसोबास हा त्याचा धाकटा भाऊ. तो ' केशिराजसूरी ' या नावानेही प्रसिद्ध आहे. त्याने ' गुढे ' या आपल्या ग्रंथात नागदेवाचार्यांनी त्याला केलेला उपदेश बारा भागात विवरून सांगितला आहे. त्याच्या उपदेशानेच तो अधिक विरक्त बनला. पत्नीनेही त्याचे योगीपण मानले. नागदेवाचार्यांनी त्याची कसोटी घेणारे प्रसंग पाहून ' माझा केशवु शुकयोगींद्र की गा ' असे उद्‌गार काढले होते. केशिराज बास आणि दामोदरपंडित हे दोघे अत्यंत जिव्हाळ्याचे मित्र होते. ते नेहमी एकत्र असावयाचे. त्या उभयतांना कोणी वेगळे दाखवील, त्यास ' मी महावाक्य वाखाणीन अशी होड नागदेवाचार्यांनी लावली होती. मित्र-प्रेमामुळेच दामोदर पंडितानी ' वत्सहरण ' या आपल्या साती ग्रंथात समाविष्ट झालेल्या आख्यान काव्यात केशिराजाचे नाव ग्रथित केले आहे.

## दामोदर पंडित

दामोदर पंडित व त्याची पत्नी हिराबा उभयता नागदेवाचार्यांची शिष्य होत. दामोदर पंडिताना ' गायनी कळा ' अवगत होती. चक्रधरांची आळवणी करणारी रागदारीयुक्त पदे दामोदर पंडिताच्या मुखातून ऐकून नागदेवाचार्यांनी ' पंडिताचे गीत ते माझे हाकारे गा ' असे उद्‌गार काढले. पंथात गायन निषिद्ध मानले असताही त्याना गायनास अनुमती दिली. ' वत्सहरण ' हे त्याचे सुमारे ५०० ओव्यांचे काव्य असून त्यात श्रीकृष्णकृत अघासुरवध व ब्रह्मदेवकृत वत्सहरण या आख्यानांचे वर्णन आहे. त्यानी रागदारीयुक्त अशा ६० चौपद्या लिहिल्या असून त्यावर पुढे मराठीत अनेक अर्थविशद करणाऱ्या टीका लिहिण्यात आल्या. दामोदर पंडितानी हिन्दी व संस्कृत रचनाही केली आहे. दामोदर पंडितांची पत्नी हिराबा हीही मोठी विदुषी होती.

## नरेंद्र—

' साती ग्रंथा 'त समाविष्ट झालेल्या सुप्रसिद्ध ' रुक्मिणी स्वयंवर ' या काव्याचा कर्ता नरेंद्र हा रामदेवरावाच्या दरबारात होता. नृसिंह आणि शैल्य हे त्याचे दोघे बंधूही काव्यरचना करीत. नृसिंहाचे ' नलोपाख्यान ' तर शैल्याचे

'रामायण' अशी काव्ये आहेत. याचे उपनाव अयाचित असे होते. हे तिघेही रामदेवरायाचे आश्रित होते. त्याच्या इच्छेनुसार नरेंद्राने 'रुक्मिणी स्वयंवर' हे काव्य लिहून रामदेवरावास वाचून दाखविले. ते रसाळ आणि अप्रतिम काव्य ऐकून रामदेवरावास त्यात आपले नाव ग्रथित व्हावे अशी इच्छा झाली. त्यानी त्याकरिता नरेंद्रास द्रव्य देऊ केले. पण यामुळे 'आमच्या कविकुळास कलंक लागेल' असे बाणेदार उद्‌गार नरेंद्राने काढले. 'उर्वरित भाग लिहून देतो' असे सागून नरेंद्र दरबारातून परत आला. त्या काव्याची प्रत रात्रभर बसून तिघा बंधूनी उतरून काढली. नऊशे ओव्या लिहून झाल्यानंतर राजसेवक आले व त्यानी तो ग्रथ नेला. या घटनेने नरेंद्राचे चित्त पोळले. तो विरक्त बनला. नागदेवाचार्यांकडे येऊन त्याने सन्यासदीक्षा घेतली. प्रारभीचा १८०० ओव्याचा व प्रतलेखनानंतर ९०० ओव्याचा उरलेला हा ग्रंथ नरेंद्राने, महानुभाव पंथात प्रवेश केल्यानंतर पूर्ण केला अशी कल्पना आहे. या काव्याच्या तीन हजार ओव्यांच्या प्रतीही आज उपलब्ध आहेत.

महानुभाव पंथात पंडित दामोदर याचेकडून उपदेश घेणारा विष्णुदास नामा या नावाचा एक कवी आहे, परतु देवीचा उपासक असलेला विष्णुदास नामा हाच महानुभाव पंथीय विष्णुदास नामा असल्याचा विश्वासार्ह पुरावा अद्यापि उपलब्ध झालेला नाही. त्याच्या महाभारताची काही पर्वे साकेतिक लिपीत आढळत असली तरी त्या किंवा त्याच्याच 'द्रौपदी स्वयंवर' या काव्यात केवळ कृष्णभक्ती एवढेच एक समान सूत्र आढळते. नागदेवाचार्यांचे पुत्र महेश्वर पंडित यानी 'ऋद्धिपूर वर्णन' हा ८२५ ओव्याचा ग्रंथ शके १२२४ मध्ये लिहिला. त्यानी निर्वेदस्तोत्र, सकटस्तोत्र, इ. स्फुट रचनाही केली आहे. कुमाराम्नायातील मुनिव्यास यानी शके १२७५ मध्ये 'स्थानपोथी' हा गद्यग्रंथ लिहिला. तो सकळ लिपीत आहे. चक्रधरसंबधित सर्व स्थानाची नोंद त्यात आहे. वज्रलिपी, सुंदरी लिपीचे जनक मानल्या जाणाऱ्या न्यायव्यास याचे नावावर स्मृतिवृद्धाचार, सिद्धान्तस्थळ इ. ग्रथ आहेत.

### स्वयंवर काव्ये :

चौदाव्या शतकात 'नवरस नारायण' या नावाच्या महानुभाव कवीने 'महाभारतावर' मराठीत रचना केली असून त्याचे 'शल्यपर्व' अलीकडे डॉ. यू. म. पठाण यानी प्रसिद्ध केले आहे. त्याचे गुरु शार्ङ्गधर भोजने हे असून चक्रधर संबधित स्थानाची माहिती देणारा 'तीर्थ मालिका' हा ग्रथ त्यानी लिहिला आहे. हे उपाध्याय आम्नायातील होते. एल्हण व चाल्हण हे ह्या काळातील दोन प्रसिद्ध महानुभाव कवी. एल्हणाने कृष्णचरित्रपर 'अष्टविवाह' हा ग्रंथ लिहिला असून त्यात पहिल्या भागात रुक्मिणीहरणाचा प्रसंग आहे. चाल्हण

पंडित हा विद्वान पंडित होता व त्याचा शिष्य परिवारही मोठा होता. त्याच्या नावावर 'सत्त्वानुवाद', 'ज्ञानप्रकाश' व शास्त्रसंबोधिनी टीका हे ग्रंथ आहेत. त्याचा शिष्य नृसिंह याने 'संकेत गीता' ही टीका व 'रुक्मिणी स्वयंवर' हे अडीच हजार ओव्यांचे काव्य लिहिले आहे.

संतोषमुनी कृष्णदास हा पंधराव्या शतकातील कवी. याचा 'रुक्मिणी स्वयंवर' हा २८ अध्यायांचा ग्रंथ प्रसिद्ध आहे. तो त्याने नाशिक जिल्ह्यातील सिन्नर येथील भिल्लम मठात लिहिला. हा कवी पारमांडल्य आम्नायातील होता. 'रुक्मिणी स्वयंवरा'चे मूळचे २५ अध्याय व ३२०५ ओव्या होत्या. त्यात पौषदाख्य गोपाळमुनींने भर घालून ते काव्य २८ अध्यायांचे व ३७४० ओव्यांचे केले. अलीकडे संतोषमुनींचेच एक 'लघुरुक्मीणी स्वयंवर' उपलब्ध झाले आहे. शिवराम किंकर या कवीने ४० अध्यायांचे 'गोपिका स्वयंवर' हे काव्य लिहिले, परंतु ते अपूर्ण राहिले आहे. 'दानव्रत कथा' हे वृत्तबद्ध चार अध्यायांचे काव्य शिवमुनी यांनी लिहिले. ते गोपीराज विद्वांस यांचे शिष्य होते. या काव्यात श्रीकृष्णतुलेचे कथानक आले आहे. शके १७७६ मध्ये राघवमुनी विद्वांस या कवीने 'वत्सला स्वयंवर' हे तेरा अध्यायांचे काव्य लिहिले. व्यासोच्छिष्ट कथा ऐकून तिची योजना आपण या काव्यात करीत असल्याचे त्याने सांगितले आहे.

## सांकेतिक लिपी

महेंद्रभटाचे चरित्रग्रंथ व 'साती ग्रंथ' या पंथीयांना पूजनीय व नित्यस्मरणीय. ग्रंथांचे पावित्र्य राखण्याच्या दृष्टीने तेराव्या शतकात खळोव्यास ह्या गृहस्थाने सकळ लिपी शके १२७५ च्या सुमारास निर्माण करून ते लिपिबद्ध करून टाकले. अशाच तऱ्हेच्या सुंदरी, पारमांडल्य, वज्रलिपी, सुभद्रालिपी, अंकलिपी इ. सुमारे पंचवीस लिपी पुढील काळात निर्माण झाल्या. परशराम बासाच्या काळात निर्माण झालेल्या तेरा आम्नायांनी विविध सांकेतिक लिपींचा अवलंब करून त्यात पंथीय वाङ्मय निबद्ध करून टाकले. अर्थात काही पोथ्या देवनागरी लिपीतही आढळतात. महाराष्ट्राच्या दूरदूरच्या भागात अशा तऱ्हेच्या पोथ्या सापडतात.

## पंथ प्रसार

पंथाचे कार्य पुढील काळात केवळ महाराष्ट्रापुरतेच मर्यादित न राहाता ते पंजाब व त्यापुढीलही प्रदेशात विस्तारले. तिकडे मठ मंदिरे स्थापन झाली व तेथील भाषातून पंथीयांनी वाङ्मयनिर्मितीही केली. महानुभाव पंथाचा प्रसार उत्तरेकडे कसा झाला यासंबंधी डॉ. य. खु. देशपांडे यांनी सांगितलेली हकीगत अशी

आहे '* " पंजाबात सारंगकोट येथे कृष्णराज नावाचे क्षत्रिय गृहस्थ असत. त्यांचा उंटावरून दक्षिण देशात म्हणजे नर्मदेच्या दक्षिणेस मालाची ने-आण करण्याचा व्यापार होता. एकदा व्यापारानिमित्त फिरत असता वऱ्हाडात कवीश्वर आम्नायातील ' माघेराजबुआ ' यांची गाठ पडली. त्यांचा उपदेश कानी पडल्यामुळे कृष्णराजाची संसारापासून निवृत्ती झाली व त्यांनी महात्मधर्माची दीक्षा माघेराजबुवा यांचेजवळून घेऊन त्यानाच धर्मगुरु केले. परत पंजाबात गेल्यावर कृष्णराजानी एकांतवास स्वीकारून ब्रह्मविद्येत काळ घालविण्यास सुरवात केली. सारंगकोट येथे त्यांचा भाऊ राहात असे. तो शाक्तपंथी असून देवीचा निस्सीम उपासक होता. प्रथम त्याच्या चार मुलांना व नंतर त्यालाही महात्मधर्माची दीक्षा देऊन गुप्त ब्रह्मविद्येचा त्यांना परिचय करून दिला. ही गोष्ट पंधराव्या शतकाच्या अखेर अखेर घडली व तेथून या पंथाचा पंजाबात प्रसार व्हावयास सुरवात झाली.

**हिन्दी रचना :** सोळाव्या-सतराव्या शतकात पंजाबी, हिन्दी भाषात ग्रंथलेखनही झाले. कृष्णराज ऊर्फ पं. कृष्णमुनी पंजाबी यांची हिंदी रचना विशेष प्रसिद्ध आहे. अडास्तोत्र, गुलरस्तोत्र, दर्शनप्रकाश, अवतारमहिमा, जडदर्शनसार व श्रीकृष्ण, दत्तात्रय यांची स्तोत्रे इ. रचना त्यांनी केली आहे. विधिचन्द्र शर्मा या कवीनी ' चोवीस गुरु आख्यान ', ' हंसावतार रासास्तोत्र ', ' व्रतखंड ', ' प्रसंग निधान ' ' रुक्मिणी स्वयवर ', ' परदेशावतार चरित्र ', ' ब्रह्मविद्यार्थ प्रकाश ', इ. ग्रंथ रचना चौपाइ व अन्यवृत्तात केली आहे. त्यांनी ' संजीवनी ' नावाची गीतेवरील टीका चौपाईमध्ये रचिली आहे. चक्रपाणी एळवकर यांनी ' भरवस मालिका ', ' प्रसाद मालिका ', हे मराठी व ' वैराग्यतिस्सा ', ' रुक्मिणीहरणतिस्सा ' हे हिन्दी ग्रंथ रचिले. पंडित राजेन्द्रमुनि तळेगावकर यांनी शके १६१८ मध्ये ' राजवल्लभी ' नावाची एक गीतेवरील टीका हिन्दी भाषेत लिहिली. हिन्दी भाषेत त्यांचे ' श्रीकृष्ण बालक्रीडा ', ' बुधबावनी ' ' ज्ञानबावनी इ. इतर ग्रंथही आहेत. अकरा भाषांचे ज्ञान असलेल्या कृष्णमुनी पंजाबी किंवा ख्याली बहादुर कवीने ' सुदामा चरित्र-कथा ', ' श्रीकृष्ण जन्माष्टमी ' ' रुक्मिणी स्वयवर ' इ. काव्ये रचिली. यांचा कलगी तुऱ्याचा आखाडा असल्याचे डॉ. य. खु. देशपांडे सांगतात. ( महानुभावीय वाङ्मय—पृष्ठ ८२ )

## भाष्य, टीका, शास्त्र ग्रंथनिर्मिती

भागवताच्या दशम स्कंधावर ' गद्यराज ' नावाची टीका तेराव्या शतकात हिरण्यगर्भ अथवा हयग्रीव व्यास यांनी लिहिली. २८० श्लोकांच्या या ग्रंथात विविध वृत्ताचा वापर करण्यात आला आहे. आनेराज व्यास यांचेकडून त्यांनी

* महानुभावीय मराठी वाङ्मय — दुसरी आवृत्ति पृष्ठ ५३–५४

महानुभाव पंथाची दीक्षा घेतली. त्यांचा जन्म शके ११८७ मध्ये झाला व निधन शके १२४६ मध्ये पैठण येथे झाले. संस्कृत वाङ्मयाचा त्यांचा विशेष व्यासंग होता. पंधराव्या शतकात 'गद्यराज' या ग्रंथावर विश्वनाथ पंडित यांनी टीका लिहिली. चक्रधरांच्या सूत्रांचे विवरण करणारा 'हेतुस्थळ' हा ग्रंथ न्यायव्यास यांनी शके १२७५ मध्ये लिहिला. त्यांनी संस्कृत व मराठीत ग्रंथरचना केली आहे. या न्यायव्यासाकडून मंत्रोपदेश घेतलेल्या पं. भीष्माचार्यांनी बरीच महत्त्वाची ग्रंथरचना केली आहे. लक्ष्मण रत्नाकर भाष्य, दिनाकर प्रबंध, श्रीक्षेत्र ऋद्धिपूर_ महात्म्य, लक्षण सारोद्धार, सिद्धान्तसार, दत्तात्रय प्रबंध इ. ग्रंथ व 'मार्ग मंजरी' हे श्लोकबद्ध स्तोत्र इ. रचना त्यांनी केली आहे. पं. भीष्माचार्यांनी जयदेवाच्या 'गीत गोविंदा'वर 'महाराष्ट्र सुबोधिनी' नावाची टीका लिहिली आहे. व्याकरणावर त्यांचे 'नामविभक्ती' व भाषाशास्त्रावर 'पंचवार्तिक' असे दोन ग्रंथ आहेत. 'पंचवार्तिका'त सूत्रलक्षण, सूत्रप्रकृति, सूत्रकारक, सूत्राख्यान व सूत्रस्वरूप अशी पाच प्रकरणे आहेत. चक्रधरांच्या सूत्ररूप वचनावर आचार, विचार व लक्षण या तिन्ही स्थळांची बांधणी शके १३३५ च्या सुमारास गुर्जर शिवव्यास व सिद्धान्ते हरिव्यास यांनी केली. गुर्जर शिव व्यासांनी या आचार-विचार-लक्षण स्थळावर गद्यभाष्य केले आहे. गुर्जर शिवव्यास हे चक्रधरांचे वंशज होत. त्यांचे पूर्वाश्रमीचे नाव गोपाळ होते. त्यांची मातृभाषा गुजराती असली तरी पंथीय वाङ्मय त्यांनी मराठीतूनच लिहिले आहे.

शके १३१० च्या सुमारचे पं. भीष्माचार्य लातूरकर यांनी 'गद्यराज' व 'अताक्षरी' वर टीका लिहिली असून वाइदेशकर भीष्माचार्य नावाच्या दोघा गृहस्थांनी 'निरुक्त प्रकरण' व 'लक्षण महाभाष्य' इ. ग्रंथांची रचना केली आहे. कान उदय पंडित यांचे त्रिस्थळावर एक भाष्य असून गोविंद मुनी यांचा 'लक्षणरत्नाकर भाष्य' व पारमांडल्य चक्रपाणी यांचा 'सिद्धान्त भागवत' हे ग्रंथही याच काळात लिहिले गेले. भास्करमुनी पारमांडल्य यांनी 'परसिद्धान्त सूत्रपाठा'ची मराठीतून संस्कृतात रचना केली. पंधराव्या शतकात पारमांडल्य चक्रपाणी यांनी 'सिद्धान्त भागवत' हा ग्रंथ लिहिला. 'गीतार्थ बोधिनी' किंवा 'भिंगारकरी'ही गीतेवरील टीका भिंगारकर बुवा या पंडितांनी संस्कृतमध्ये लिहिली. प. गोपाळमुनी दर्यापूरकर यांनीही गद्यरूप 'गोपाळदासी' नावाची गीता—टीका मराठीत लिहिली आहे. हे कवीश्वर आम्नायातील होते. दत्तराज मराठे यांनी 'साती ग्रंथा' वरील कठीण शब्दांचा टीप 'ग्रंथ' तयार केला. विश्वनाथ व्यास बीडकर या कवींनी ध्यानामृत स्तोत्र, 'आचार, दृष्टान्त स्थळावरील महाभाष्य रचना व 'गद्यराज' चौपद्या यावर टीका लिहिलेल्या आहेत. हे उपाध्याय आम्नायातील असून ते देवेराजगुरु यांचे शिष्य होते,कवीश्वर आम्नायातील गोपीभास्कर या कवींनी सोळाव्या शतकाच्या अखेरीस राजभद्र, आचार महाभाष्य, विद्यासागर

भाष्य, भगवद्‌गीतेवरील भास्करी टीका. इ. ग्रंथ लिहिले. मुरारमल्ल विद्वास याचे-कडून त्यानी पंथाची दीक्षा घेतली. कवि मुरारिमल्ल या उपाध्याय आम्नायातील कवीनी ' दर्शन प्रकाश ' नावाचा विविध्र धर्मपंथांचा व त्याच्या मताचा परिचय करून देणारा ग्रंथ शके १५६० मध्ये लिहिला. सस्कृत श्लोकावर मराठी विवरण अशी त्याची रचना आहे. कवीश्वर आम्नायातील लक्षधीर या कवीनी ' ज्ञानमार्तंड ' नावाच्या काव्याची रचना शके १५४० च्या सुमारास केली. उमरावती जिल्ह्या-तील पुसद येथील पं. शार्ङ्गधर या कवीने सोळाव्या शतकात संस्कृत व मराठी भाषेत ग्रंथरचना केली. सस्कृत व मराठी या दोन्ही भाषात त्यानी गीतेवर ' कैवल्यधाम,' नावाची टीका रचिली. ' गीता प्रश्नावली ' ' पारमहंसधर्ममालिका ' स्तोत्र, दत्तात्रयवर्णन स्तोत्र ' ' रासक्रीडा स्तोत्र ', ' चूडामणि काव्य ' इ. त्याचे ग्रंथ आहेत. शके १६१७ च्या सुमारास दिवाकर कपाटे या कवीनी ' मति रत्नाकर ' व ' यतिप्रबध ' हे ग्रंथ रचिले. त्याचे एक शिष्य गोपाळदास यानी त्यातील अपुरा भाग पूर्ण केला. गोविंदमुनी जामोदकर या मदलसा आम्नायातील कवीनी गीतेवर ' कैवल्यसजीवनी ' नावाची टीका लिहिली आहे.

## समारोप—

महानुभाव पथाच्या प्रारंभीच्या काळात वाङ्मयरचनेला बहर येऊन विविध वाङ्मयप्रकार निर्माण झाले असले, तरी ही प्रक्रिया पुढील काळात सातत्याने चालू राहिलेली दिसत नाही. पूर्वसूरींच्या वचनांचा संग्रह, सकलन, टीका, टिप्पणी, भाष्ये व क्वचित आख्यान काव्ये यासारखे प्रयत्न थोड्याफार प्रमाणात होत राहिले. पुढे तेराव्या शतकात खळोव्यास व अन्य काही महानुभावानी पथीय ग्रंथाचे पावित्र्य शुद्ध राहण्याच्या दृष्टीने ' सकळ ' ' सुंदरी ' ' पारमांडल्य ' इ. सांकेतिक लिप्या शोधून काढल्या व त्यात पथीय ग्रथ बद्ध करून टाकले. त्यामुळे महानुभाव वाङ्मयाचा प्रसार पंथीयाव्यतिरिक्त सामान्य जनतेत होण्याचा प्रवाह कुंठित झाला. निःसंग एकाकिता साधण्याच्या आत्यंतिक निवृत्तिवादी तत्त्वज्ञानामुळे हा पथ जन सामान्यात लोकप्रिय होऊ शकला नाही. शिवाय संस्कृताध्ययनाच्या पठडीत तयार झालेल्या महानुभावीय पंडितानी पांडित्यपूर्ण व अभिजात स्वरूपाची ग्रथरचना केल्यामुळे ती विशिष्ट वाचकवर्गापुरतीच मर्यादित राहिली. लोकभाषेचा स्वीकार करूनही हा पंथ व त्यातील ग्रंथ त्यांनीच निर्माण केलेल्या बधनात अडकून राहिले. वारकरी पथातील संतकवीत समाजातील विविध थरातील व्यक्तींचा समावेश आहे. त्याच्या काव्यलेखनात त्यामुळे भाषिक, भावनिक व वैचारिक विविधता आलेली दिसते. तसा प्रकार महानुभाव वाङ्मयात आढळत नाही. महानुभाव पंथीयाच्या आचार–विचाराविषयी समाजात अनेक गैरसमज पसरत गेल्यामुळे त्याच्या पथाविषयी व वाङ्मयाविषयी फारशी आस्थाही राहिली नाही. त्यामुळे प्राचीन

मराठी काव्यावर पुढील काळात महानुभाव वाङ्मयाचा प्रभाव पडल्याचे दिसून येत नाही. तथापि आधुनिक काळात महानुभाव पंथ व त्यांचे वाङ्मय याविषयींच्या संशोधकाच्या आत्मीयतेच्या प्रयत्नामुळे त्यांचे वाङ्मयधन आता प्रकाशात येऊ लागले आहे. पंथाचे व त्यातील साहित्याचे पुनर्मूल्यमापन व पुनरुज्जीवन होऊ लागले आहे. पंथीय सुशिक्षित पदवीधराकडूनही जाणीवपूर्वक प्रयत्न होत आहेत. त्यामुळे महानुभाव पंथ साहित्याची अनेक अज्ञात दालने प्रकाशात येण्याची आशा निर्माण झाली आहे.

## परिशिष्ट : १

—' वेधवंती नागदेव ' हे प्रकरण प्रसिद्ध झाले, त्यावेळी जुने शुद्धलेखन प्रचलित होते, तसेच ते छापले गेले आहे. वाचकानी कृपया नव्या शुद्धलेखना-प्रमाणे ते दुरुस्त करून घ्यावे. पुस्तकातील काही महत्त्वाची अशुद्धे दुरुस्त करून ती शुद्धिपत्रात दिली आहेत.

—' लीळाचरित्र 'कार माहींभटाची म्हाइंभट, महेंद्रभट, महिमाभट अशीही नावे प्रचलित आहेत. ती एकाच व्यक्तीची समजावीत.

—' आद्य मराठी कवयित्री · महदाइसा या प्रकरणातील ' गाथा-सप्तशती 'चा संदर्भ प्रा. पा. ना. कुलकर्णी यानी सुचविला. लेखक त्यांचा आभारी आहे.

—' श्री गोविंदप्रभू ' या प्रकरणातील स्मृतींचे संदर्भ ' गोविंदप्रभुचरित्र ' ( सं. डॉ. कोलते ) या पुस्तकातील व ' वेधवती नागदेव ' या प्रकरणातील स्मृतींचे अनुल्लेखित संदर्भ ' स्मृतिस्थळ ' ( सं. वा. ना. देशपांडे ) या पुस्तकातील आहेत.

निर्बंध
33-3-42
ucee
2960

परिशिष्ट : २

# तीन चक्रधर :

महानुभाव पंथाचे संस्थापक श्री चक्रधर याच्या जीवनचरित्राविषयी विविध मते अलीकडे माडण्यात आली आहेत. प्रचलित समजुतीप्रमाणे चक्रधराचे पूर्वाश्रमीचे नाव हरपालदेव असे असून ते भडोच येथील विशाळदेव या प्रधानाचे पुत्र होते. माल्हणीदेवी हे त्याच्या मातेचे नाव अनेक संताच्या जीवनात अनेक चमत्कार आढळतात. परंतु हरपाळदेवाच्या मृत शरीरात चागदेव राउळानी केलेल्या प्रवेशासारखी घटना अन्यत्र कोठे आढळत नाही. त्यामुळे चक्रधराच्या जीवनातील हा प्रसंग चिंतनीय बनला आहे. महानुभाव पंथाचे तत्त्वज्ञान व आचारधर्म याविषयी महंत दत्तलक्षराज यानी दिलेल्या माहितीच्या आधारे डॉ. भाडारकर, लोकमान्य टिळक, ह. ना. आपटे, वि. ल. भावे, भिंगारकर, य खु. देशपाडे इत्यादींनी लेखन केले; परंतु चक्रधरचरित्राविषयी महानुभावीयातच मतभेद दिसून येतात. महाराष्ट्र व पंजाब येथील महानुभाव पंथाच्या शाखात प्रचलित असलेल्या 'लीळाचरित्रा'त चक्रधरविषयक विभिन्न लीळाचा समावेश झालेला दिसतो. या पथाच्या पंजाब शाखेतील हरीपूर, हजारा येथील महंत कै. मुकुदराज आराध्य यांनी हिन्दी भाषेत 'श्री चक्रधर' या नावाचे एक पुस्तक लिहिले आहे. या पुस्तकात ते म्हणतात, 'या कथानकात उल्लेखिलेला राजा त्रिमल्लदेव व त्याचा प्रधान विशाळदेव ब्राह्मण याचा इतिहासात कोठेही पत्ता लागत नाही. त्रिमल्ल निपुत्रिक असल्यामुळे गुजराथचे सिंहासन कोणत्या विशाळदेव नावाच्या सामवेदी ब्राह्मणास समर्पण केले होते? आजपावेतो जे शिलालेख, ताम्रपट, दंतकथा, आख्यायिका अगर इतर इतिहासाची साधने उपलब्ध आहेत, त्यात त्रिमल्लदेव व त्याचा लाड सामवेदी विशाळदेव नावाचा प्रधान याचा ओझरताही उल्लेख कुठेच आला नाही.'[१]

"त्या काळात ब्राह्मणांमध्ये विशाळदेव, हरपाळदेव ही नावे प्रचारातसुद्धा आली नव्हती. मग या विशाळदेवाच्या मुलाचे नाव हरपाळदेव असणे कसे शक्य आहे?"[२] हरपाळदेवाचे एकूण कथानक काल्पनिक असावे असे त्याचे मत आहे. भडोच गॅझेटियरमध्ये विशाळदेव-हरपाळदेव यांच्या हकीकतीचा काही आढळ होत नाही.

---

१. श्रीचक्रधर ; पृष्ठ ५८.

२. श्रीचक्रधर पृष्ठ ७३.

कै. महंत मुकुंदराज आराध्य यानी आपल्या ' श्री चक्रधर ' या ग्रंथात चक्रधराविषयींची वेगळी माहिती दिली आहे. तीनुसार अनहिलवाड येथे साळुंकी घराण्यातील विशाळदेव नावाचा वाघेला शाखेचा क्षत्रिय राजा होता. त्याचा मुलगा हरपाळदेव. त्याची आई चव्हाण घराण्यातील असून तिचे नाव मल्हाणदेवी असे होते. " अनहिलवाडच्या या चक्रधराविषयी कोणताही ऐतिहासिक आधार मिळत नाही. ' हेमाद्रि ऊर्फ हेमाडपंत ' ( ले. ॲड. पाध्ये ), ' गुजराथचे चालुक्य ' ' ले. अशोककुमार मुजुमदार ), ' मुंबई गॅझेटियर ,' ' भारतीय संस्कृतीचा इतिहास ', चित्रावाचा मध्ययुगीन चरित्रकोश ' इ. ग्रंथातून याविषयी काही उल्लेख आढळत नाही.[३] त्यामुळे महंत आराध्य यांची चक्रधरविषयक ही नवी माहितीही विवाद्य राहिली आहे.

अलीकडे श्री. ल. शि. चौधरी यांचे महात्मा ऊर्फ मानभाव पंथ व चक्रधर या नावाचे एक पुस्तक प्रसिद्ध झाले असून त्यांत त्यानी तिसऱ्याच एका चक्रधराच्या जीवनाच्या व पंथाच्या उत्पत्तीचे साग्रह प्रतिपादन केले आहे. भारत इतिहास संशोधक मंडळाच्या शके १८३९ मध्ये प्रसिद्ध झालेल्या अहवालातील ' नागेशकृत महात्म कथनम् ' या संस्कृत ग्रंथाच्या व शके १८३५ मध्ये प्रसिद्ध झालेल्या अहवालातील ' मानभावोत्पत्ति कथा ' या आनंद संप्रदायी सदानंद कवीच्या ओवीबद्ध मराठी ग्रंथाच्या आधारे त्यांनी ही माहिती दिली आहे. " पैठण येथे कृष्णभट नावाचा एक ब्राह्मण होता. त्याचा एका मातंग स्त्रीशी संबंध आल्यानंतर त्या उभयतावर बहिष्कार घालण्यात आला. कृष्णभटाने अनुष्ठान करून श्री विष्णूस प्रसन्न केले. त्याला एक मुकुट देऊन भगवान विष्णूनी सांगितले, की जोवर तो मुकुट त्याच्या मस्तकी असेल, तोपर्यंत लोक त्याला चतुर्भुज विष्णू मानतील त्याप्रमाणे लोकाकडून त्याची पूजाअर्चा होऊ लागली. कृष्णभटास मातंग स्त्रीपासून पाच मुले झाली. त्यांची नावे कृष्ण, दत्त, चांग्या, गुंड्या व परसा अशी ठेवण्यात आली. ती मातंग स्त्री स्वत.स देवकी म्हणवू लागली. ( या पाच मांग भावावरून ' मांगभाव ' अथवा ' मानभाव ' हे नाव पंथास रूढ झाले. ) आपल्या या पाच मुलांच्यामार्फत कृष्णभटाने आपल्या वेगळ्या संप्रदायाचा प्रसार सुरू केला. त्याच्याकरिता वेगवेगळे मठ स्थापन करून त्यावर त्यांची स्थापना केली. याप्रमाणे खानदेशात चांगदेव येथे चांग्या, माहूर येथे दत्त्या, ऋद्धिपूर येथे गुंड्या, पैठण येथे परशा व डोमेगाव येथे एका मुलाची नियुक्ती झाली. त्यांचे प्रस्थ वाढत चालल्याचे पाहून हेमाडपंताने गणपतीस प्रसन्न करून घेतले. त्यांनी यामागील सर्व गौडबंगाल हेमाडपंतास सांगितले. हेमाडपंताने एकदा पूजेकरिता कृष्ण

---

३. याविषयी अधिक माहिती श्री. ल. शि. चौधरी यांच्या ' महात्मा ऊर्फ मानभाव पंथ व चक्रधर ' या पुस्तकात प्रकरण १६ मध्ये पाहावी

कै. महंत मुकुंदराज आराध्य यानी आपल्या ' श्री चक्रधर ' या ग्रंथात चक्रधराविषयीची वेगळी माहिती दिली आहे. तीनुसार अनहिलवाड येथे साळुंकी घराण्यातील विशाळदेव नावाचा वाघेला शाखेचा क्षत्रिय राजा होता. त्याचा मुलगा हरपाळदेव. त्याची आई चव्हाण घराण्यातील असून तिचे नाव मल्हाणदेवी असे होते." अनहिलवाडच्या या चक्रधराविषयी कोणताही ऐतिहासिक आधार मिळत नाही. ' हेमाद्रि ऊर्फ हेमाडपंत ' ( ले. अॅड. पाध्ये ), ' गुजराथचे चालुक्य ' ' ले. अशोककुमार मुजुमदार ), ' मुंबई गॅझेटियर ,' ' भारतीय संस्कृतीचा इतिहास ', चित्रावाचा मध्ययुगीन चरित्रकोश ' इ. ग्रथांतून याविषयी काही उल्लेख आढळत नाही.[३] त्यामुळे महंत आराध्य याची चक्रधरविषयक ही नवी माहितीही विवाद्य राहिली आहे.

अलीकडे श्री. ल. शि. चौधरी याचे महात्मा ऊर्फ मानभाव पंथ व चक्रधर या नावाचे एक पुस्तक प्रसिद्ध झाले असून त्यात त्यानी तिसऱ्याच एका चक्रधराच्या जीवनाच्या व पथाच्या उत्पत्तीचे साग्रह प्रतिपादन केले आहे. भारत इतिहास सशोधक मडळाच्या शके १८३९ मध्ये प्रसिद्ध झालेल्या अहवालातील ' नागेशकृत महात्म कथनम् ' या सत्कृत ग्रथाच्या व शके १८३५ मध्ये प्रसिद्ध झालेल्या अहवालातील ' मानभावोत्पत्ति कथा ' या आनंद सप्रदायी सदानंद कवीच्या ओवीबद्ध मराठी ग्रंथाच्या आधारे त्यानी ही माहिती दिली आहे. " पैठण येथे कृष्णभट नावाचा एक ब्राह्मण होता. त्याचा एका मातग स्त्रीशी सबध आल्यानंतर त्या उभयतावर बहिष्कार घालण्यात आला. कृष्णभटाने अनुष्ठान करून श्री विष्णूस प्रसन्न केले. त्याला एक मुकुट देऊन भगवान विष्णूनी सागितले, की जोवर तो मुकुट त्याच्या मस्तकी असेल, तोपर्यंत लोक त्याला चतुर्भुज विष्णू मानतील. त्याप्रमाणे लोकाकडून त्याची पूजाअर्चा होऊ लागली. कृष्णभटास मातग स्त्रीपासून पाच मुले झाली. त्याची नावे कृष्ण, दत्त, चाग्या, गुड्या व परसा अशी ठेवण्यात आली. ती मातग स्त्री स्वत:स देवकी म्हणवू लागली. ( या पाच माग भावावरून ' मागभाव ' अथवा ' मानभाव ' हे नाव पंथास रूढ झाले. ) आपल्या या पाच मुलाच्यामार्फत कृष्णभटाने आपल्या वेगळ्या संप्रदायाचा प्रसार सुरू केला. त्याच्याकरिता वेगवेगळे मठ स्थापन करून त्यावर त्याची स्थापना केली. याप्रमाणे खानदेशात चागदेव येथे चाग्या, माहूर येथे दत्त्या, ऋद्धिपूर येथे गुंड्या, पैठण येथे परशा व डोमेगाव येथे एका मुलाची नियुक्ती झाली. त्याचे प्रस्थ वाढत चालल्याचे पाहून हेमाडपंताने गणपतीस प्रसन्न करून घेतले. त्यानी यामागील सर्व गौडबंगाल हेमाडपंतास सांगितले. हेमाडपताने एकदा पूजेकरिता कृष्ण

३. याविषयी अधिक माहिती श्री. ल. शि. चौधरी याच्या ' महात्मा ऊर्फ मानभाव पथ व चक्रधर ' या पुस्तकात प्रकरण १६ मध्ये पाहावी

भटास आपल्या घरी बोलविले. त्याच्या मस्तकावरील मुकुट काढताच कृष्णभटाचे मूळरूप प्रकट झाले व गौप्यस्फोट झाला. तेव्हा हेमाडपताने त्याला प्रायश्चित्त सांगितले. "नित्यनित्य भिक्षान्न भक्षण कर, नेसण्याचे वस्त्र भिलाव्याच्या तेलात भिजवून तयार कर व ते नेस. तसेच पांघरण्याची दुसरी वस्त्रखंडेही त्याचप्रमाणे तयार करून पांघर. या भिलाव्याच्या तेलाने रंगलेले तुझे वस्त्र ज्या दिवशी सफेद होईल, त्यादिवशी आपण शुद्ध झालो असे तू समज. तसेच भिलाव्याच्या तेलाने माखलेल्या भोपळ्यातील अन्न ग्रहण करीत जा. नेहमी खाली पाहात जा. उलटी काठी धर. याप्रमाणे हे आचरण करीत असता हे पाप्या, ज्या वेळी तू मरशील, त्या वेळी तू शुद्ध होशील."[४] कृष्णभटास व त्याच्या अनुयायास गाढवावर बसवून शेणमार करून देवगिरीबाहेर हाकलण्यात आले. श्री. चौधरी म्हणतात, 'ही कथा मानभावांच्या ग्रंथात उघडपणे सापडणे शक्य नाही. "परसा तो प्रतिष्ठानीचा यासी श्रीप्रभुचक्रधर म्हणती' यावरून कृष्णभटास देवकी मांगिणीपासून झालेला जो 'परसा' तो 'चक्रधर' असे श्री. चौधरी सांगतात. सदानंदाच्या 'मानभावोत्पत्तिकथा' या ग्रंथातील अधिक माहिती अशी आहे. 'कृष्णभटाने भट मार्ग स्थापन केला. एक विवक्षित लिपी तयार करून, तीत विपरीत शास्त्रे रचून मुलाला पढविली. देवकीचे नाव 'भटोबाई' असे ठेवले. वेद खोटे म्हणू लागला इ. इ. शेवटी या ग्रंथातील वचन जो सत्य मानणार नाही, त्याला अत्यंत ग्राम्य अशी गद्धेगाळ या सदानंदाने दिली आहे.[५]

श्री. चौधरी यांनी महानुभाव पंथाविषयी केलेले लेखन म्हणजे पेधारा येथील महानुभावमहंत दिगंबर गुरू बाबू-बोवा यांनी वारकरी संप्रदायी श्री. सीताराम भुसारी यांचेवर भरलेल्या अब्रुनुकसान भरपाईच्या खटल्यात श्री. भुसारी यांचे वतीने घेतलेल्या वकीलपत्राची कागदपत्रे होत. त्यामुळे त्यात वकिली थाटाचा अभिनिवेश उतरला आहे. महानुभाव पंथाची अनेक वैगुण्ये कोटिक्रमांनी दाखविण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. महानुभाव हे वैदिक हिंदू नव्हेत, हे दाखविण्याकरिता त्यांनी अनेक प्रकरणे लिहिली आहेत. आज ते श्रीकृष्णाची मूर्तिपूजा करतात, स्वतःस हिन्दू म्हणवतात हेही त्यांच्या कर्मठ दृष्टीस मान्य नाही. या पंथातील थोर पुरुषाच्या चरित्रातील काही प्रसंगांना त्यांनी स्वमतपोषक वळण दिले आहे. त्या सर्वांचा परामर्श घेणे येथे शक्य नाही. ज्या नागेश व सदानंद नावाच्या गृहस्थाच्या ग्रंथाच्या आधारावर त्यांनी आपल्या या नव्या कथेचा इमला उभा केला, त्याचेविषयीचा ऐतिहासिक पुरावा काय आहे? ते दोघे कोण, कोठले त्यांचा अधिकार काय? याविषयी ते काही माहिती देत नाहीत. हे ग्रंथ केव्हा

---

४. म. भा. पंथ व चक्रधर .पृष्ठ २ व ३.

५. म. भा. पंथ व चक्रधर पृष्ठ ६.

लिहिण्यात आले, याचा कालोल्लेखही नाही. महानुभाव पंथीयाना तिरस्कृत बनविण्या-करिता या कपोलकल्पित कथा रचण्यात आल्याचे दिसते. कृष्णभट नावाच्या गृहस्थाचा एक वेगळा पथ होता. माझे स्नेही श्री. रा. चिं. ढेरे ' मातंगपट्ट ' या नावाने या पंथाचा साधार इतिहास लौकरच प्रसिद्ध करणार आहेत. त्या कृष्णभटाचा व महानुभाव पंथाचा काहीही संबध नाही. अन्य अनेक मूलभूत व ऐतिहासिक आधार शोधणाऱ्या श्री. चौधरींनी नागेश व सदानंद याच्या भाकडकथाचा आधार घेतल्याने त्याचे सर्व विवेचन ठिसूळ पायावर आधारित असे झाले आहे. या नागेशाच्या कथेत सिद्धेश्वर म्हणजे शकराची आराधना केल्यानंतर कृष्णभटास विष्णु भगवान (?) प्रसन्न होतात. हेमाडपतासारख्या राजकारणी पुरुषावर गणपती प्रसन्न होऊन सारे गौडबंगाल सागतात, या साऱ्या भाकडकथा आहेत. श्री. चौधरी याच्याच शब्दात सागायचे तर A myth आहे. आधुनिक काळात एखाद्या श्रीमत व्यापाऱ्याने आपल्या मुलाना ठिकठिकाणी दुकाने किंवा कारखाने काढून द्यावेत, त्याप्रमाणे कृष्णभटाने ठिकठिकाणी मठ स्थापून त्यावर आपल्या मुलाची नियुक्ती केल्याची कल्पना हास्यास्पद आहे. शिवाय या मातंगी पुत्राचा अधिकार समाजाने कितपत मानला हाही प्रश्नच आहे. सदानंदाच्या ग्रथातील सांकेतिक लिपीचा उल्लेख किंवा देवकीचे ' भटोबाई ' हे नामकरण इ. म्हणजे महानुभाव पथाच्या अपुऱ्या माहितीवर उभारलेला कल्पनाविलास आहे. महानुभाव पंथीयाना पूजनीय व्यक्तींचा चांगया, गुड्या, दत्त्या, परद्या असा उल्लेख अनुदार-पणा दर्शविणारा आहे. नागदेवाचार्यांना ' भटोबास ' म्हणत, त्यांचा सदानदाने ' भटोबाई ' बनविली. साकेतिक लिपीचे किंवा एकदरीने सर्वच पंथ उभारणीचे कर्तृत्व कृष्णभटाकडे दिले. साकेतिक लिपी एकच नसून अनेक आहेत व त्या बन-ण्यात अनेकांचे हातभार लागले आहेत. महानुभाव पंथातील आचार पाहून तसे प्रायश्चित्त हेमाडपताने दिल्याची कथा रचण्यात आली असावी. कृष्णभटाच्या थोरवीचा विचार करता चक्रधराना या पंथात इतके महत्त्व का प्राप्त झाले याचा काहीही खुलासा यात नाही. महानुभाव पंथाने आपल्यावर घालून घेतलेल्या बंधनामुळे अनेक अपसमज कसे प्रसृत झाले याची कल्पना मात्र या ग्रंथावरून येऊ शकते. श्री. चौधरी यानी महानुभाव पंथाचे तत्त्वज्ञान, आचारधर्म, प्रमुख पंथीयांच्या चरित्रातील घटना, पंथीय वाङ्मय याविषयी चिकित्सकपणे अनेक नवीन गोष्टी उजेडात आणण्याचा प्रयत्न केला आहे. त्याच्या प्रतिपादनातील अाग्रही भाग सोडला, तर त्याचे विवेचन नवी दृष्टी देणारे वाटते; परंतु चक्रधर व त्यांचा पथ याचेविषयीचा त्याचा ग्रंथाधार मात्र मान्य होण्यासारखा नाही, हे निश्चित. चक्रधरविषयक विवेचनाचाच फक्त परामर्श येथे घेतला आहे.

♠ ♠

# आधारभूत व संदर्भ ग्रंथ


लीळाचरित्र—संपादक डॉ. शं. गो. तुळपुळे
(एकांक—पूर्वार्ध, भाग १–२, उत्तरार्ध, भाग १–२)
[सुविचार प्रकाशनमंडळ, १९६६–६७–६९]

स्मृतिस्थळ—संपादक : वा. ना. देशपांडे
(व्हीनस प्रकाशन, तिसरी आवृत्ति, १९६८)

स्मृतिस्थळ—संपादक डॉ. शं. गो. तुळपुळे (सिटी बुकस्टॉल, १९६९)

स्मृतिस्थळ—संपादक : डॉ. व. वि. पारखे
(सुनीता प्रकाशन, डोंबिवली, १९७०)

शिशुपालवध—संपादक : डॉ. वि. भि. कोलते (अरुण प्रकाशन, मलकापूर)

उद्धवगीता—संपादक . डॉ. कोलते (अरुण प्रकाशन)

रुक्मिणीस्वयंवर—संपादक डॉ. कोलते (अरुण प्रकाशन)

भास्करभट्ट बोरीकर—संपादक : डॉ. कोलते (अरुण प्रकाशन)

वच्छहरण—संपादक : डॉ. कोलते (अरुण प्रकाशन)

स्थान पोथी—संपादक : डॉ. कोलते (अरुण प्रकाशन)

गोविंदप्रभु चरित्र—संपादक डॉ. कोलते (अरुण प्रकाशन)

श्रीचक्रधर चरित्र—संपादक : डॉ. कोलते (अरुण प्रकाशन)

मूर्तिप्रकाश—संपादक : डॉ. कोलते (अरुण प्रकाशन)

सह्याद्रिवर्णन—संपादक डॉ. कोलते (पुणे विद्यापीठ, १९६४)

श्रीऋद्धिपूरवर्णन—संपादक : डॉ. तुळपुळे (सुविचार प्रकाशन, १९६७)

प्रवास—संपादक . डॉ. तुळपुळे (सुविचार प्रकाशन, १९६४)

रुक्मिणी स्वयंवर—रा. चिं. ढेरे (जोशी ब्रदर्स, हैद्राबाद, १९६८)

रुक्मिणी स्वैंवर—( संतोषमुनि कृष्णदासकृत ) —संपादक ना. ब. जोशी
( कृष्णदास महानुभाव, हैद्राबाद )

शल्यपर्व—( नवरसनारायण कृत )—संपादक : डॉ. यू. म. पठाण

महानुभावीय मराठी वाङ्मय—य. खु. देशपांडे
( व्हीनस प्रकाशन आवृत्ति दुसरी, १९६० )

महानुभाव-कविकाव्य सूची—वि. ल. भावे, १९२४

महात्मा ऊर्फ मानभावपंथ व चक्रधर—ल. शि. चौधरी
( डॉ. यशोदा चौधरी, जळगाव, १९७१ )

महानुभावांचा आचारधर्म—डॉ. कोलते ( अरुण प्रकाशन, १९४८ )

महानुभाव तत्त्वज्ञान—डॉ. कोलते ( अरुण प्रकाशन, १९५६ )

आद्य मराठी कवयित्री—वा. ना. देशपांडे ( कॉंटिनेंटल प्रकाशन, १९५६ )

लीळाचरित्र एक अभ्यास—प्रा. व. दि. कुलकर्णी
( व्हीनस प्रकाशन, १९६७ )

संताच्या चरित्रकथा—रा चिं. ढेरे ( पुष्पक प्रकाशन, पुणे, १९६७ )

श्रीचक्रधरोक्त सूत्रपाठ—अ. भा. महानुभाव परिषद ( फैजपूर, १९६५ )

महानुभाव इतिहास प्रकर्ण—मराठी संशोधन पत्रिका ( ऑक्टोबर १९६३ )

महाराष्ट्र सारस्वत—वि. ल. भावे ( पाचवी आवृत्ति १९६३ )

मराठी वाङ्मयाचा इतिहास—खंड १—ल. रा. पांगारकर १९३२

प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास—खंड १ पूर्वार्ध डॉ. अ. ना. देशपांडे
( व्हीनस प्रकाशन १९६६ )

यादवकालीन मराठी भाषा—डॉ. शं. गो. तुळपुळे
(के. भि. ढवळे १९४२ )

महाराष्ट्र जीवन—खंड १ संपादक प्रा. गं. बा. सरदार
( जोशी–लोखंडे, १९६० )

संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुति—प्रा. गं. बा. सरदार
( म. सा. परिषद, आवृत्ति पहिली : १९६२ )

डॉ. पेंडसे गौरव ग्रंथ—संपादक डॉ. अ. ना. देशपांडे
( सुविचार प्रकाशन, १९६३ )

डॉ. कोलते गौरव ग्रंथ—

महानुभाव संशोधन—संपादक : डॉ. कोलते ( अरुण प्रकाशन )

१६०२७

# वाचकांस विज्ञप्ती

[ प्रस्तुत पुस्तकात अनवधानाने छपाईच्या काही चुका राहून गेल्या आहेत. तरी वाचकानी पुढीलप्रमाणे त्या दुरुस्त करून घेण्याची कृपा करावी. —प्रकाशक. ]

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ७ | २० | मननावेगळ्या | मननावेगळेया |
| ९ | २१ | बौद्धिक प्रक्रिया ( intellctrual art ) | बौद्धिक कला ( intellectual art ) |
| १० | १४ | नामदेव | नागदेव |
| ११ | ३२ | Ensyclopaedio | Encyclopaedia |
| १८ | १२ | ते आंते आते | तेआं तेआते |
| २३ | २० | कण्व | काण्व |
| २५ | १७ | मायापित्याचे | मायपित्याचे |
| २६ | १० | विरहरणाकरिता | विहरणाकरिता |
| २७ | ६ | पाखाली | पाखालीखाली |
| ३४ | २६ | तेव्हाही रौरींच्या | तेव्हा हिरौरींच्या |
| ३७ | ४ | वय | व्यय |
| ३८ | ७ | अन्यायाची | अभावाची |
| ४५ | १ | सकाळचे | सकळाचे |
| ४६ | १५ | होती | हाती |
| ४७ | ३३ | भरोबास | भटोबास |
| ४८ | १२ | नागैल | लागैल |
| ५६ | १ | अशुचित | अशुचि |
| ५६ | २७ | नुरुष | पुरुष |
| ५६ | २७ | जीजनातील | जीवनातील |
| ५९ | २६ | सुनासिनींनी | सुवासिनींनी |
| ६० | ८ | ताही | नाही |
| ६० | १५ | मुलींना | मुनींना |
| ६२ | ४ | जण | मज |
| ६३ | ७ | उजवीए | उत्तरीए |
| ६९ | ३ | तुमचे | तुमते |
| ७० | ८ | प्रीयक्तेया | प्रीयवक्तेया |

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ७४ | १९ | देसाइसानेहि | देमाइसानेही |
| ७६ | १८ | नामदेवाचार्यांनी | नागदेवाचार्यांनी |
| ७७ | १ | केळी | केली |
| ७७ | ५ | शेकीस | शेकीत |
| ८० | ६ | बाधाया | बाधावा |
| ८२ | २१ | म्हणाल | म्हणाले |
| ८२ | २३ | मृत्यचे | मृत्याचे |
| ८२ | २५ | ऐकूण | ऐकून |
| ८३ | ९ | करण्याच | करण्याचे |
| ८३ | १८ | य्यावे | यावे |
| ८४ | २२ | गाले | गोत |
| ८६ | १८ | मागो | मागे |
| ८७ | १० | इयेते | इयेते |
| ८९ | १ | यानंदर | यानंतर |
| ८९ | ११ | येतंय | येतंव |
| ८९ | २१ | जाऊ | भाऊ |
| ९० | २१ | पळताना | दळताना |
| ९१ | १८ | अी | जी |
| ९२ | ११ | म्हणत | म्हणता |
| ९२ | १५ | एका | एळा |
| १०० | ८ | केला | केले |
| १०१ | १८ | विहारी | बिऱ्हाडी |
| १०९ | २१ | साग | सॅांग |
| ११९ | २१ | कुमाराश्रायातील | कुमाराम्नायातील |
| ११९ | २९ | साङ्र्गधर | शाङ्र्गधर |
| १२२ | ७ | लक्ष्मण | लक्षण |
| १२२ | ८ | महात्म्य, लक्षण | महात्म्यलक्षण, |
| १२३ | ७ | पुसदा | पुसद |
| १२३ | १० | ‘ सक्रीडास्तोत्र ’ | ‘ रासक्रीडास्तोत्र ’ |
| १२३ | २५ | एकात्मिता | एकाfिता |

[illegible]
[illegible] নিবন্ধ
[illegible]

RFFBK-0018427